# लोकशाहीचें माहेर

## डेन्मार्क

वा. ब. कर्णिक



# लोकशाहीचें माहेर

(डेन्मार्कचें प्रवासवर्णन)

लेखक :

वासुदेव बळवंत कर्णिक

किंमत दोन रुपये

प्रकाशक :
ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी.
ठोकळ प्रकाशन
६२ बुधवार, पुणें २

पहिली आवृत्ति : इ. स. १९५६

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई नं. ४

# अर्पणपत्रिका

माझ्या बालपणीं रघुनाथ पंडित, मोरोपंत इत्यादि कवींच्या कविता मला पाठ करायला लावून, माझ्याशीं कवितांच्या भेंड्या लावून, हरि नारायण आपट्यांच्या कादंबऱ्या मला वाचायला लावून, जिनें माझ्या मनांत मराठी साहित्याबद्दल प्रीति उत्पन्न केली व माझ्याबाबतच्या आपल्या आशा-आकांक्षा पुऱ्या होण्याच्या आंतच जी भरल्या संसारांतून नाहींशी झाली त्या माझ्या पूज्य आईला आणि ज्यांनीं सरकारी नोकरींत असूनसुद्धां इ. स. १९०५ सालापासून स्वदेशीचें व्रत स्वीकारून, आपल्या वागण्यानें माझ्या हृदयांत देशभक्तीचा स्फुलिंग पेटविला व ज्यांच्या आचरणामुळें पुढें मला कारागृहांत जाऊन व स्थानबद्धतेंत राहून देशाबाबतचें आपलें ऋण अंशतः फेडण्याची स्फूर्ति दिली त्या माझ्या परमपूज्य वडिलांना हें पुस्तक मी सादर समर्पण करीत आहें.

—लेखक

# कृतज्ञतेची ओंजळ

माझी 'वाडग्मीण' प्रकाशांत आल्यानंतर आज चारपांच वर्षांनीं मी वाङ्मयीन क्षेत्रांत 'पुढचें पाऊल' टाकीत आहें. १९५२ सालीं मी ऑस्ट्रेलियाच्या प्रवासांतून परतल्यावर 'विषुववृत्ताच्या पलीकडे' या नांवाचें एक प्रवासवृत्त लिहिणार होतों. त्याची योजना व त्याला लागणारा 'मालमसाला' मजजवळ तयार होता. नित्याच्या कामाच्या गर्दीमुळें पुस्तक लिहिणें जें लांबणीवर पडलें तें आजतागाईत!

१९५४ सालीं मी डेन्मार्कला जाऊन आलों. तिथें मीं जें पाहिलें तें मीं मित्रांना सांगितलें. चारदोन लेख पण मीं लिहिले. पुस्तकरूपानें मीं हे प्रसिद्ध करावे अशी अनेकांनीं सूचना केली. 'मला बरें वाटावें' म्हणून या सूचना मित्र करीत असतील, असा पोक्त विचार करून मीं त्या सूचनांकडे फारसें लक्ष दिलें नाहीं.

एक मित्र मात्र 'विलक्षण' भेटला. "तुमच्याजवळची सारी माहिती तुम्ही तरी छापा, नाहीं तर मी छापतों." असें त्यानें सांगितलें. "तुम्ही जरी छापायला तयार असलां तरी मला तें लिहून काढावें लागेल ना! सरकारी कामाच्या भाऊगर्दीत असलें लिखाण लिहायला लागणारी लागणारी सवड कुठें आहे मला?" असें मी म्हणतांच, "मी लेखकच पाठवितों. उद्यांपासून तुम्ही त्याच्याजवळ सवड मिळेल तसें बसत जा. एकदां लिहायला प्रारंभ केलात कीं तुम्ही पण रंगून जाल त्यांत आणि पुस्तक आपोआप पूर्ण होईल." असें त्या मित्रानें सांगितलें. हे मित्र म्हणजे श्री. बाबूरावजी ऊर्फ ग. ल. ठोकळ.

त्यांच्या बोलण्यांतील जिव्हाळा, आपुलकी व साहित्याबाबतची भक्ति, यांची मला खात्री पटली. त्यांचा लेखक मजकडे येऊं लागला. या पुस्तकांतील शब्दन् शब्द त्यानें लिहिला. माझ्या वर्णनांत तो रंगून जाई. मध्येंच हात थांबवून तो चर्चा करी. कधीं लिहितां लिहितां त्याचे डोळे पेंगत. मी बोलावीन त्या वेळीं बिचारा हजर राही. या लेखकाचें नांव श्री. जगदीश नलावडे. आमच्या पुण्याचे माजी महापौर श्री. गणपतराव नलावडे यांचा हा मुलगा. यानें जर लक्ष घातलें नसतें व श्री. ठोकळांचा 'ससेमिरा' मागें लागला नसता तर हें पुस्तक प्रकाशांत आलेंच नसतें. श्री. बाळ नलावडे याचे मी आभार मानतों.

श्री. ठोकळ यांच्यामुळेंच 'लोकशाहीचें माहेर' आज वाचकांसमोर येत आहे. वास्तविक 'विषुववृत्ताच्या पलीकडे' हें पुस्तक आधीं प्रसिद्ध व्हायला पाहिजे होतें. थोरल्या बहिणीच्या लग्नाआधीं धाकटींचें लग्न जमतें ना? त्यांतलाच हा प्रकार! श्री. ठोकळ यांनीं या पुस्तकाच्या प्रकाशनांत जें व्यक्तिगत लक्ष घातलें त्याबद्दल त्यांचे मी अगदीं मनापासून आभार मानतों!

माझ्या या पुस्तकाला प्राध्यापक अनंत काणेकरांनीं प्रस्तावना लिहून दिली. श्री. काणेकर व मी १९२३ सालापासून जवळ आलों; एका बाकावर बसून शिकलों. तेव्हांपासून 'भाऊ' माझा मित्र बनला. माझ्या 'वाडगिणीचा' पुरस्कार करायला माझे कॉलेजपासूनचे मित्र श्री. के. नारायण काळे पुढें आले. आज श्री. काणेकर माझ्या या नव्या अपत्याला हातीं धरून प्रकाशांत आणीत आहेत. हें पुस्तक लिहायला त्यांनींच उत्तेजन दिलें. "या स्कँडेनेव्हिअन देशांनीं खूप चांगलीं लोककल्याणाचीं कामें केलीं आहेत. आपल्या लोकांना तीं माहीत नाहींत. आपल्या देशांतून डेन्मार्कला जाणारे फार थोडे आणि त्यांपैकीं लिहूं शकणारे फारच थोडे. तूं सांग लोकांना डेन्मार्कसारख्या लहान देशांनीं काय केलें तें." भाऊ म्हणाला. "मी पुस्तक लिहिलें तर तूं पुस्तकाला प्रस्तावना लिहिशील?" मीं त्याला विचारलें. "मोठ्या आनंदानें." तो म्हणाला. आज त्यानें प्रस्तावना लिहून आपला शब्द खरा केला. श्री. काणेकरांचे मीं आभार मानले तर परकेपणाचा वास येण्याची भीति वाटते. सबब त्यांचे औपचारिक आभार न मानतां 'भाऊं'च्या ऋणाची मला असलेली जाणीव मात्र मी येथें व्यक्त करतों.

या पुस्तकाचीं मुद्रितें माझ्याकडे आलीं तशीं तीं मीं सौ. शांताबाई भांडारकरांना वाचायला दिलीं. परदेशांत अनेक वर्षें राहून त्यांनीं उच्च शिक्षण घेतलें. इंग्रजी साहित्याचा पण त्यांचा व्यासंग दांडगा आहे. समाजसेवेच्या क्षेत्रांत काम करतांना त्यांचा परिचय झाला. समाजसेवा हें त्यांचें आजचें आवडतें कार्यक्षेत्र आहे. माझ्या या पुस्तकाला पुरस्कार लिहिण्याची मीं त्यांना विनंति केली. माझ्या लिखाणांतील सत्यता पडताळून पाहण्याचा त्यांचा अधिकार व त्यांची चिकित्सक वृत्ति माहीत असल्यामुळेंच मीं ही विनंति करण्याचें धाडस केलें. सौ. शांताबाईंनीं या पुस्तकाचें पानन् पान काळजीपूर्वक वाचून काढलें व या पुस्तकाला घवघवीत असा पुरस्कार लिहून पाठविला याबद्दल त्यांचा मी

नितांत ऋणी आहें. त्यांच्या पुरस्कारामुळें व श्री. काणेकरांच्या प्रस्तावनेमुळें माझ्या पुस्तकाला प्रतिष्ठा प्राप्त झाल्याची मला सदैव जाणीव राहील.

डेन्मार्कला जाऊन तेथील जीवन पाहण्याची संधि मला मुंबई सरकारनें व भारत सरकारनें दिली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दोनदां मला परदेशाच्या प्रवासाचा योग लाभला. याबद्दल या दोन्ही सरकारांचा मी खूप ऋणी आहे.

हें पुस्तक छापण्यासाठीं मी आमचे शिक्षणाधिकारी माननीय सी. शा. भांडारकर यांच्याकडे परवानगी मागितली. ही परवानगी दिल्याबद्दल व माझ्या बाबतींत वेळोवेळीं दाखविलेल्या आपुलकीबद्दल मी त्यांचे मनापासून प्रकट आभार मानतों.

डेन्मार्कमधील जीवन जवळून पाहण्याची संधि मला माझे डॅनिश मित्र Mr. Erick Olsen, त्यांच्या पत्नी Mrs. Ella Olsen, तेथील फोटोग्राफर Mrs. Luisa Larsen व आमचे डेन्मार्कमधील मार्गदर्शक Dr. Peter Manniche यांनीं मिळवून दिली. त्यांनीं केलेल्या मदतीमुळें व अकृत्रिक प्रेमामुळेंच मला हें लिखाण जनतेसमोर मांडतां आलें. त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें. (Mange Tak ! Tusen Tak)

या पुस्तकाचें अंतरंग व बहिरंग आकर्षक करण्यासाठीं आमचे चित्रकार-मित्र श्री. ग. वि. देशपांडे यांनीं खूप परिश्रम घेतले. श्री. देशपांडे यांनीं केलेल्या या साह्याबद्दल त्यांचे पण मी आभार मानतों.

ह्या पुस्तकाची छपाई आकर्षक व लवकर करून दिल्याबद्दल मौज प्रिंटिंग ब्यूरोचे श्री. भागवत यांचा पण मी आभारी आहें.

माझ्या 'वाडगिणी'चें स्वागत मराठी वृत्तपत्रांनीं, समाजसेवकांनीं व वाचकांनीं खूप चांगलें केलें; त्यामुळेंच 'लोकशाहीचें माहेर' प्रसिद्ध करण्याची व पुन्हां साहित्याच्या क्षेत्रांत पदार्पण करण्याची मला हिंमत झाली. या पुस्तकाला रसिकांचा आधार मिळाला तर 'विषुववृत्ताच्या पलीकडे' हें पुढील पुस्तक लिहिण्याचा मला धीर होईल. पुस्तकांचे खरे परीक्षक वाचकच आहेत, याची मला जाणीव आहे. त्यांच्याच चरणीं ही 'कृतज्ञतेची ओंजळ' मी मनापासून रुजू करतों.

चैत्र शु. प्रतिपदा, शके १८७८
शांतिनिकेतन,
३१९ सोमवार, पुणें २.

वासुदेव बळवंत कर्णिक

# प्रास्ताविक

माझे परम मित्र श्री. कर्णिक यांच्या 'लोकशाहीचें माहेर' या पुस्तकाला प्रवासवृत्त म्हणण्यापेक्षांहि एका तज्ज्ञ समाजशिक्षणशास्त्रज्ञाची डेन्मार्कमधल्या शंभर दिवसांच्या वास्तव्याची उद्‌बोधक दैनंदिनी म्हणणेंच अधिक योग्य होईल, असें मला वाटतें. हॅम्लेट् नाटकामुळें आपल्या चांगलेंच परिचयाचें झालेल्या डेन्मार्कमधल्या एल्सिनोर या गांवीं एक महिना राहिल्यानंतर एके ठिकाणीं लेखक म्हणतात, "...एल्सिनोरला येऊन पोंचल्याला आज एक महिना पूर्ण झाला. या एका महिन्यांत डेन्मार्कचें राजकीय, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक जीवन खूप जवळून पहायला मिळालें. कॉलेजांत होणाऱ्या व्याख्यानांनीं सुद्धां ज्ञानांत चांगली भर पडली. पण डेन्मार्कचें खरें दर्शन झालें असेल तर तें येथील लोकांशीं झालेल्या अनौपचरिक परिचयामुळें !..." श्री. कर्णिक डेन्मार्कला गेले आणि तिथें तीन महिने राहिले ते विशिष्ट शिक्षणपद्धतीचा अभ्यास करण्या-करतां; वेगवेगळीं स्थळें आणि निरनिराळीं माणसें पहाण्याकरतां नव्हे. त्यामुळें या पुस्तकांत स्थलवर्णनें किंवा व्यक्तिचित्रणें फारशीं आढळत नसलीं, तरी डेन्मार्कसारख्या चिमुकल्या देशांत प्रौढशिक्षणाच्या उत्कृष्ट सोयी असल्यामुळें सामान्य शेतकऱ्याचेंहि जीवनमान किती उच्च झालें आहे आणि केवळ राजकीयच नव्हे तर खरीखुरी आर्थिक आणि सामाजिक लोकशाही कशी प्रस्थापित झाली आहे याचें जिवंत चित्र डोळ्यांपुढें उभें रहातें.

एल्सिनोरमधल्या 'इंटरनॅशनल पीपल्स कॉलेज'मध्यें भारतांतून गेलेले हे शिक्षणतज्ज्ञ मुख्यत्वेंकरून आपला शिक्षणक्रम पुरा करणार होते. पण डेन्मार्कमधल्या एखाद्या शेतकरी कुटुंबांत प्रत्येकानें पंधरावीस दिवस रहाणें हा या शिक्षणक्रमाचा एक भाग होता. स्टॅव्हनशॉल्ट या फक्त तीनशें लोकसंख्या असलेल्या खेड्यांत ओल्सन नांवाच्या एका डॅनिश शेतकऱ्याच्या कुटुंबांत श्री. कर्णिक राहिले. एरिक ओल्सन, त्यांची बायको एला, त्यांचीं दोन मुलें आणि दोन नोकर यांच्या सहवासांत काढलेल्या दोन आठवड्यांचें लेखकानें केलेलें वर्णन वाचून डेन्मार्कमधल्या गृहजीवनाची चांगलीच कल्पना येते. एला सर्वांचें जेवण करते. मालक, मालकीण, पाहुणे, शेतावर मालकाबरोबर काम करणारा

नोकर आणि घरकाम करणारी मुलगी एकाच टेबलावर जेवायला बसतात. एरिक् मधून मधून कोपेनहेगनला जातो, आणि शेतकी किंवा पशुपालन यासंबंधीं कांहीं नवीन माहिती देणारीं पुस्तकें मिळाल्यास विकत घेऊन येतो. एलानें गृहजीवनशास्त्राचा तीन महिन्यांचा एक अभ्यासक्रम पुरा केला आहे. हें सर्व वाचीत असतां आपल्याकडल्या सर्वसामान्य वकिलाचें, डॉक्टरचें किंवा एखाद्या महाविद्यालयाच्या प्राचार्याचेंहि जीवनमान अजून डॅनिश शेतकऱ्याच्या इतकें नाहीं याची तीव्र जाणीव होऊं लागते.

पुस्तकी शिक्षणाच्या प्रसारामुळें नव्हे तर जीवनोपयोगी शिक्षणावर भर दिल्यामुळें डेन्मार्कची इतकी प्रगति झाली हें उघड आहे. या शिक्षणाचें मर्म शिकण्याकरतांच श्री. कर्णिक व इतर शिक्षणतज्ज्ञ यांना भारत सरकारनें डेन्मार्कला पाठविलें होतें. एके ठिकाणीं कर्णिक म्हणतात,...“आपल्या देशामध्यें गेल्या कांहीं वर्षांत खेड्यांतून शहरांत खूप मोठ्या प्रमाणावर लोक जाऊं लागले आहेत. खेड्यांतील उत्साही बुद्धिमान् तरुण वर्ग खेड्यांबाहेर जाऊं लागल्यामुळें खेडीं निष्प्रभ होऊं लागलीं आहेत. ही खेड्यांतली बुद्धिमत्ता खेड्यांत राहिल्याशिवाय व खेडीं समृद्ध होण्यासाठीं त्यांचे श्रम व अक्कल कारणीं लागल्याशिवाय आपला देश समृद्ध होणार नाहीं. खेडीं समृद्ध करण्याचा शास्त्रशुद्ध प्रयोग आपल्या शिक्षणपद्धतींत बदल घडवून आणून डेन्मार्कनें केला असल्यामुळें डेन्मार्कच्या धर्तीवर आपल्या देशांतील ग्रामीण शिक्षणाची पुनर्रचना व्हावी या हेतूनें....भारत सरकारनें अनुभवी शिक्षणतज्ज्ञांना डेन्मार्कला...पाठविलें....” खेड्यांतून लोक शहराकडे जाऊं लागतात याचें कारण खेडीं दरिद्री आहेत, जमिनीवर काम करून जगणें शक्य होत नाहीं, शहरांत पैसे मिळतात आणि जीवनमान थोडेंबहुत तरी सुधारतां येतें म्हणून. जमिनींतून उत्तम उत्पन्न काढतां येईल आणि खेड्यांतच सुखी जीवन जगतां येईल, तर शहराकडे धांव घेण्याचा मोह खेडुताला सहसा होणार नाहीं. ज्या योगानें जमिनींतून उत्तम उत्पन्न काढतां येईल असें शिक्षण आणि अशीं साधनें खेड्यांतील जनतेच्या हातीं दिलीं पाहिजेत. भारतांतला सुखवस्तु शेतकरीही आपल्या मुलाला बी. ए. किंवा एल्एल्. बी होण्याकरितां शहरांत पाठवितो. त्यामुळें बापाच्या मागून पहावयाला कुणी नसल्यामुळें शेतीपरी शेती जाते आणि मुलगाहि

भारतांतल्या वेकार बी. ए. च्या संख्येंत भर घालतो. कर्णिकांनीं वर्णन केलेली डेन्मार्कमधली शिक्षणाची पद्धति पहा : "... डेन्मार्कमध्यें मुलें चौथी पास झालीं कीं त्यांची शैक्षणिक पहाणी करण्यांत येते. या वेळीं मुलें साधारण बारा वर्षांचीं असतात. जीं मुलें चांगलीं असतात, त्यांना बौद्धिक शिक्षणावर भर असलेल्या शाळेंत पाठविण्यांत येतें. साधारणपणें चाळीस टक्के मुलें पहिल्या प्रतीच्या शाळेंत जातात व साठ टक्के मुलें दुसऱ्या प्रतीच्या शाळेंत जातात. ...." चौथी इयत्ता झाल्याबरोबर शिक्षणाला नवा फाटा फोडायचा, पुन्हां मॅट्रिकनंतर आणखी नवे फाटे आणि फक्त संशोधन किंवा शिक्षण यासारख्या व्यवसायांत जाऊं इच्छिणारालाच बी. ए. किंवा एम्. ए चा अभ्यासक्रम अशी सुधारलेल्या देशांची पद्धति आहे. आमच्याकडे कारकून होणार असो, वकील होणार असो, हिशेबतपासणीस होणार असो कीं, प्रोफेसर होणार असो, बी. ए. झाल्यावर मग काय करायचें त्याचा विचार !

ग्रुंडरविग या जागतिक कीर्तीच्या डॅनिश शिक्षणतज्ज्ञानें डेन्मार्कमध्यें प्रौढ-शिक्षणासाठीं लोकशाळांचें जाळें पसरलें. कर्णिकांना या लोकशाळांचें सूक्ष्म निरीक्षण करतां आलें. या निरीक्षणांतून त्यांनीं काढलेला निष्कर्ष अत्यंत मोलाचा आहे. ते म्हणतात, "...आपल्या जीवनामध्यें साक्षरतेला काय स्थान आहे त्याची सर्वसाधारण प्रौढाला मुळींच कल्पना नाहीं. त्यामुळें साक्षर व्हायला तो मुळींच उत्सुक नसतो. साक्षर होण्याची ज्याला इच्छा नाहीं त्याला शिकविणें चांगल्या शिक्षकालासुद्धां कठीण काम वाटतें, व त्यामुळें केवळ साक्षरताप्रसाराची चळवळ मूळ धरूं शकत नाहीं. प्रौढ शिकण्याला नाखूष नसतो. कांहीं तरी नवें शिकण्याची त्याची नेहमीं धडपड चालू असते; परंतु त्याला जें शिक्षण देणें असतें तें त्याच्या जीवनाशीं निगडित झालेलें असावें अशी त्याची अपेक्षा असते. त्याच्या दैनंदिन गरजा पुऱ्या पाडण्याला व त्याचें उत्पादन वाढवून त्याचें जीवनमान सुधारण्याला जर त्या शिक्षणाची मदत झाली तर असें शिक्षण घ्यायला सर्वसाधारण प्रौढ केव्हांहि तयार होतील...." रशियांतील साक्षरताप्रसारासंबंधीं कुठलें तरी पुस्तक वाचतांना एक गोष्ट वाचलेली मला आठवते. एक निरक्षर तरुणी नवऱ्यानें किती आग्रह केला तरी लिहावयाला शिकेना. "करायचंय् काय शिकून! गृहकृत्यें मी चांगलीं करतें; तुझ्यावर जिवापाड प्रेम करतें," असें ती आपल्या नवऱ्याला

म्हणायची. नवरा अनेक संस्थांचा चिटणीस व मोठा लोकप्रिय माणूस होता. त्याला नाना प्रकारचीं पत्रें यायचीं. संध्याकाळीं ती पत्रांचें पुडकें त्याला द्यायची. कांहीं दिवसांनीं कांहीं निळयागुलाबी पाकीटांतलीं पत्रें कुणा स्त्रीचीं तर नसतील ना, असा संशय तिला येऊं लागला, आणि तीं पत्रें कुणाचीं असतील हें समजून घेण्याची तिला अनावर इच्छा झाली. तेव्हां रात्रंदिवस खटाटोप करून नवऱ्याच्या न कळत ती लिहावयाला शिकली! शिक्षण जीवनोपयोगी आहे हें एकदां पटलें कीं माणूस कसा पटकन् शिकूं लागतो, हें या गोष्टीवरून चांगलेंच पटतें.

या दैनंदिनींत डेन्मार्कमधल्या आपल्या अनुभवांच्या अशा कित्येक मनोरंजक आणि उद्बोधक गोष्टी धांवत्या, खुसखशीत भाषेंत कर्णिकांनीं सांगितल्या आहेत. वाचकांना त्या निःसंशय आवडतील.

अनंत काणेकर

२ एप्रिल १९५६

# पुरस्कार

दहावीस वर्षांपूर्वी परदेशगमन ही एक क्वचितच घडणारी गोष्ट होती. एखादीच व्यक्ति असा प्रवास करून येई व तिच्या तोंडचीं नावीन्यपूर्ण वर्णनें ऐकण्यास लोक आतुर असत. आजकाल परदेशाला जाऊन येणें ही एक रोजचीच बाब झाली आहे. त्यामुळें एखाद्या प्रवाशानें केलेल्या प्रवासवर्णनामध्यें कांहींतरी विशेषच असल्याखेरीज तें वाचण्याविषयीं फारशी उत्सुकता वाटत नाहीं.

श्री. कर्णिकांनीं डेन्मार्कमधील आपल्या वास्तव्याचें, रोजनिशीच्या रूपानें केलेलें वर्णन वाचल्यानंतर, त्यांत असेंच कांहींतरी 'विशेष' आहे अशी माझी खात्री झाली. श्री. कर्णिक प्रौढशिक्षणाचे अधिकारी असून, त्या विषयाचा अभ्यास करण्यासाठीं ते डेन्मार्कला गेले होते. प्रौढशिक्षणाच्या कामांत आपल्या देशांत येणाऱ्या अडचणींचा त्यांना परिचय आहे.

त्यामुळें या विशिष्ट पार्श्वभूमीशीं सुसंगत होतील अशाच सुधारणा निवडून त्यांचें बारकाईनें आकलन करणें त्यांना शक्य झालें. उगीच जें दिसेल त्याचें वर्णन करावें, असें न करतां, येथल्या समाजोन्मुख वाचकाला उद्बोधक होतील अशाच प्रसंगांचीं, व्यक्तींचीं व संस्थांचीं त्यांनीं अतिशय मार्मिक पण विनोदपूर्ण वर्णनें या पुस्तकांत केलीं आहेत. येथून जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे पाश्चात्य देशांत वास्तव्य बहुधा संस्थांतून असतें. त्यामुळें तेथील गृहजीवन, बहुजनसमाजाच्या आशा-आकांक्षा यांची त्याला फारशी माहिती होत नाहीं. श्री. कर्णिक डेन्मार्कमध्यें असतांना १५ दिवस एका शेतकरी कुटुंबाच्या घरींच राहिल्यानें त्यांच्या संस्कृतीशीं समरस होण्याची त्यांना उत्तम संधि मिळाली व तिचा त्यांनीं पूर्ण फायदाही घेतला.

हें पुस्तक वाचतांना परदेशांतील लोकांकडून आपल्याला शिकण्यासारखें अजून बरेंच आहे हें पटल्याखेरीज रहाणार नाहीं. कष्टाळूपणा, नवें ज्ञान मिळविण्याचा उत्साह, नव्या पद्धतींचा अवलंब करण्याची तयारी, सामाजिक जीवनांतील दिलदारपणा, देशहिताविषयींची जागरूकता असे अनेक गुण श्री. कर्णिकांनीं वर्णिलेल्या प्रसंगांतून वाचकांच्या दृष्टोत्पत्तीस येतात. विशेषतः हे प्रसंग अगदीं दैनंदिन जीवनांतले असल्यामुळें त्यांची सत्यता मनाला सहज पटते. डेन्मार्कमधील प्रौढशिक्षणाच्या कार्यानें तेथील लोकशाहीला किती मजबुती व सार्थता आणली आहे हें पाहिलें म्हणजे त्या कार्याबद्दलही नवी सहानुभूति व आशा वाटूं लागते.

**सौ. शांताबाई भांडारकर**

२५ मे ५४

आज मी कुलाबा जिल्ह्यांत पनवेलला मुक्कामाला होतों. रात्रीचें जेवण झाल्यावर गप्पा मारीत बसलों असतांना एक ज्योतिषी तेथें आले. त्यांनीं माझी कुंडली मागितली. मला आठवली त्याप्रमाणें मीं माझी पत्रिका त्यांना कागदावर काढून दिली. ती नीट पाहून झाल्यावर त्यांनीं मला प्रश्न विचारावयास सांगितलें. केवळ गंमत म्हणून मीं त्यांना विचारलें, "परदेशीं जाण्याचा योग या पत्रिकेंत आढळतो का ?" दोनच वर्षांपूर्वी मीं मुंबई व भारतसरकारच्या प्रतिनिधि म्हणून ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडमध्यें जाऊन आलों होतों. पुन्हा कोण आपल्याला परदेशीं पाठविणार ! ही संधि आपणांला मिळणार नाहीं, अशी माझी पूर्ण समजूत होती. केवळ गंमत म्हणूनच तो प्रश्न मीं त्यांना विचारला होता. ज्योतिष्यांनीं नक्की काय उत्तर दिलें, तें मला आज आठवत नाहीं. मला वाटतें ते असें म्हणाले, "योग आहे, पण नक्की केव्हां तो येईल हें पूर्ण पत्रिका हातीं नसल्यामुळें सांगणें कठीण आहे." योगायोग असा कीं, नेमक्या त्याच वेळेला माझ्या नांवाची एक तार पनवेलच्या तार ऑफिसांत आली होती; व मीं ज्योतिष्याला विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर त्या तारेंत होतें.

२६ मे ५४

ती तार मला मिळाली नाहीं. अर्थात् तारेंतील बातमी पण मला कळली नाहीं. आज मी पुण्यांत येऊन दाखल झालों. दारांत पाऊल ठेवतों तों कचेरींतील प्रत्येकानें येऊन निरोप सांगितला कीं, आल्याबरोबर मे. डायरेक्टरसाहेबांना टेलिफोन करावा. त्याप्रमाणें टेलिफोन करतांच "आमची तार तुम्हांला मिळाली का?" असा प्रश्न त्यांनीं केला. मी म्हणालों, "नाहीं." "तारेची नक्कल पाठवितों. ती वाचा आणि ताबडतोब येऊन भेटा." असें त्यांनीं सांगितलें. पांच मिनिटांच्या आंत तारेची नक्कल हातीं आली. ती वाचून मी तर थक्कच झालों. "तुम्ही डेन्मार्कला जाता कां?" असें त्या तारेंत विचारलें होतें. ही बातमी इतकी अनपेक्षित होती कीं, आपण कोणता निर्णय घ्यावा हें ठरविणें पण कठीण झालें. घरांत जाऊन पत्नीशीं विचारविनिमय केला. ती परवानगी द्यायला तयार होईना. या सुमारास वर्तमानपत्रांतून विमानअपघाताच्या बातम्या वरचेवर येत होत्या. त्यामुळें मला विमानानें प्रवास करूं द्यायला ती तयार नव्हती. प्रवास विमानानें होणार, ही गोष्ट निश्चित दिसत होती. अशी संधि आयुष्यांत फार थोड्यांना मिळते. ज्यानें संधि दिली तोच आपलें रक्षण करील इत्यादि तत्त्वज्ञान सांगून मीं तिची कशीबशी संमति मिळविली; व डायरेक्टरसाहेबांना भेटून मी डेन्मार्कला जायला तयार असल्याचें सांगितलें. "तुमची संमति मी मुंबईसरकारमार्फत भारतसरकारला कळवितों. तुम्ही तयारींत राहा; परंतु त्यांचा अखेरचा हुकूम येईपर्यंत, तुमची निवड नक्की झाली असें समजूं नका." असें त्यांनीं सांगितलें.

२९ मे ५४

आजरोजीं भारतसरकारकडून डेन्मार्कला जाण्यासाठीं माझी निवड झाल्याचें कळविण्यांत आलें. डेन्मार्कला भारतांतून एकूण सतरा लोक जाणार होते; व या सर्वांची भारत सोडण्यापूर्वीं दिल्लींत एक सभा होती. भारतसरकारचे शिक्षण-मंत्री ना. आझाद व शिक्षणखात्याचे श्रेष्ठ अधिकारी डेन्मार्कमध्यें जाणाऱ्या मंडळींना निरोप देणार होते. या सभेसाठीं मीं दिल्लींत हजर राहावें व दोन तारखेला दिल्लींतूनच मीं विमानानें निघावें, असें मला दिल्लीहून आलेल्या

टेलिफोनवरून सुचविण्यांत आलें. दोन वर्षांपूर्वी मी परदेशांत जाऊन आल्यामुळें पूर्वीची प्रवासाची तयारी आजही मला उपयोगीं पडणार होती. त्याचमुळें इतकी घाईनें सूचना मिळाली असतांनासुद्धां मी जायला तयार झालों. तथापि पासपोर्ट वगैरे बाबतचीं कामें करणें प्राप्त होतें. त्यासाठीं मुंबईस जावें लागणार होतें. सबब "मी दिल्लीला येऊं शकत नाहीं. दोन तारखेला मुंबईहून मी त्याच विमानानें डेन्मार्कला जायला निघेन," असें मीं कळविलें. पुढील दोनतीन दिवस खूपच गडबडींत गेले. प्रवासाची तयारी करणें, कामाचा ताबा दुसऱ्या अधिकाऱ्यास देणें इत्यादि सर्व गोष्टी उरकतांना खूप गडबड उडाली.

२६ जून ५४

आज सकाळीं घरातील मंडळींना घेऊन मीं पुणें सोडलें. मुंबईला आल्यावर विमानाचें तिकीट मिळविलें व इतर अपुरीं राहिलेलीं कामें पुरीं केलीं. चौकशी-अंतीं असें कळलें कीं, माझा प्रवास एअर इंडिया इंटरनॅशनलच्या विमानानें होणार होता. तें विमान सांताक्रूझ विमानतळावरून रात्रीं ११ ला सुटणार होतें. रात्रीं ८॥ च्या सुमारास मला निरोप द्यायला आलेल्या मंडळींसह मी विमान-तळावर आलों. थोड्याच वेळांत दिल्लीहून एक विमान आलें व त्या विमानांतून डेन्मार्कला मी ज्या मंडळींबरोबर जाणार होतों ती सर्व मंडळी आली. खालीं येऊन तीं सर्व माणसें माझा शोध घेऊं लागलीं. आपल्याबरोबर कोण कोण येणार आहेत, याची मला कल्पना नव्हती. त्यामुळें सहप्रवाशांची माहिती करून घेण्यास मी उत्सुक होतों. जाणाऱ्या मंडळींत कोणी ओळखीचीं माणसें असलीं तर तेवढाच आपला वेळ चांगला जाईल, असें वाटत होतें. इतक्यांत माझे मित्र श्री. माध्ये गौडा हे मला शोधीत मी बसलों होतों त्या ठिकाणीं आले. श्री. गौडा हे भारतीय पार्लमेंटचे सभासद आहेत व म्हैसूर प्रदेशांतील प्रौढ-शिक्षण-समितीचे अध्यक्ष आहेत. एकाच क्षेत्रांत काम करीत असल्यामुळें त्यांचा व माझा खूप परिचय आहे. मनुष्य अत्यंत लाघवी आणि प्रेमळ. त्यांना पाहिल्यावर मला खूप आनंद झाला. बरोबर जाणाऱ्या मंडळीची श्री. गौडा यांनीं माहिती सांगितली. त्यावरून माझ्याबरोबर ऑस्ट्रेलियांत आलेले पश्चिम बंगालचे प्रौढशिक्षणाधिकारी श्री. निखिल रॉय, जामिया मिलिया (दिल्ली)चे श्री. बरकत अल्ली फिराक,

बिहारचे श्री. साही, श्री. शर्मा व श्री. तारकेश्वर सिंह, कोल्हापूर येथील मौनी विद्यापीठाचे श्री. साने इत्यादि परिचित मंडळी या सोळा लोकांत असल्याचें ऐकून मनाला उत्साह वाटला. थोड्याच वेळांत ही सर्व मंडळी मला येऊन भेटली. अपरिचितांशींही परिचय झाला. परिचित मित्रांना मीं मिठ्या मारल्या. या सर्व मंडळींत सौराष्ट्रांतील 'लोकभारती' या मूलोद्योगाच्या क्षेत्रांत गेलीं कित्येक वर्षें काम करीत असलेल्या संस्थेचे जनक, भारतीय राज्य-सभेचे सभासद व महात्माजींचे एक जुने सहकारी, श्री. नानाभाई भट, यांना पाहून मला विशेष आश्चर्य व आनंद वाटला. आपल्या संघाचें नेतृत्व यांच्या-कडेच देण्यांत आलेलें आहे, असें मित्रांनीं सांगितलें. सत्तरीच्या पुढें गेलेल्या या गृहस्थाकडे हा मान केवळ त्यांच्या वयामुळेंच आला नव्हता. वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध आणि तपोवृद्ध असे ते गृहस्थ आहेत.

मी माझ्या मित्रांना भेटण्यांत गुंतलों होतों; तों मला निरोप देण्याकरितां आलेल्या माझ्या घरांतील छोटेखानी फौजेला (माझी मुलगी, माझ्या चारपांच पुतण्या व एक पुतण्या), मी ज्या विमानानें जाणार आहें त्याच विमानानें शेरपा तेनसिंग हा जाणार असल्याची बातमी समजली. मग ती सर्व छोटी फौज आपण विमानतळावर कोणासाठीं आलों हें विसरून शेरपाच्या भोवतीं गोळा झाली. त्यांनीं त्याच्या स्वाक्षऱ्या मिळविल्या व त्याच्या भोवतींच तीं मुलें घोटाळत राहिलीं.

बरोबर ११ वाजतां विमान निघालें. पूर्वीं ऑस्ट्रेलियाचा प्रवास विमानानें केल्यामुळें मला विमानाचा मुळींच त्रास वाटला नाहीं. निघण्यापूर्वींचे चारपांच दिवस खूप धांदलींत गेल्यामुळें थोडी विश्रांति घेतली. विमानांत स्वस्थशी झोप लागत नाहीं, पण मिळालेल्या विश्रांतीनें शीण कमी झाला.

३ जून ५४

आतां पहाटेचा १॥ वाजला आहे. विमान कराचीला येऊन पोंचलें. सर्व उतारूंना खालीं उतरावयास लावलें. या ठिकाणीं पासपोर्टची पाहणी झाली. एकेक ग्लास मोसंबीचा रस मिळाला. आम्ही सर्वजण पुन्हा विमानांत जाऊन बसलों. २। वाजतां विमान सुटलें. सारी रात्र प्रवास चालू होता.

आतां सकाळचे ९ वाजले आहेत. आम्ही कैरोच्या विमानतळावर येऊन

पोंचलों. सकाळची वेळ आहे, तरी उन्हाचा कडाका आहे. या ठिकाणीं विमानतळावरच आमच्या न्याहारीची तयारी करण्यांत आली. उपाहारगृहांतील परिचारक सर्व मुसलमान असून ते अरेबिक भाषेंत बोलत आहेत. कैरोला उतरल्यावर पिरॅमिड्स पाहण्याची उत्सुकता वाटूं लागली. पण विमान ताबडतोब निघणार असल्यामुळें कैरो शहर पाहावयास मिळणार नाहीं, असें सांगण्यांत आलें. कैरोला येऊन पिरॅमिड न पाहतां परत जाणें ही कल्पना दुःसह वाटली. पण त्याला इलाज नाहीं. कैरो शहरांत व आजूबाजूला किती छानदार वस्तू तयार होतात याची प्रवाशांना माहिती देण्यासाठीं व तो माल विकण्यासाठीं विमानतळावरच एकदोन दुकानें काढलीं आहेत. उंटाच्या चामड्यापासून बनविलेल्या सुंदर वस्तू तेथें विकावयास ठेवल्या होत्या. पण त्यांची किंमत ऐकल्यावर वस्तू विकत घेण्याचा धीर कांहीं कोणाला झाला नाहीं. नाहीं म्हणायला उंटांच्या तांड्याचें छायाचित्र असलेलें एक कार्ड मीं विकत घेतलें व माझ्या छोट्या मुलीला त्यावर एक पत्र लिहून तें तेथेंच पोस्टांत टाकलें. बरोबरच्या पुष्कळ मित्रांनीं माझें अनुकरण केलें.

सुमारें एक तासभर विश्रांति घेतल्यावर पुन्हा प्रवास सुरू झाला. दुपारचें जेवण विमानांतच झालें. विमानाचा प्रवास साधारणपणें कंटाळवाणाच असतो. पण तो माझ्या परिचयाचा झाला होता. आकाशांतील वेगवेगळीं दृश्यें पाहात असतांना मराठी साहित्यांतील कांहीं कवितांच्या ओळींची आठवण होत होती. पांढरेशुभ्र ढग पाहतांना माधव ज्यूलियनच्या "जणुं चूर रुप्याचा उधळित अथवा हिम किंवा कापूर" या व अशा कांहीं ओळींची प्रकर्षानें आठवण झाली.

आतां विमानाचा वेग हळूहळू कमी व्हावयास लागला. आम्ही जिनेवाच्या जवळ जवळ येत चाललों आहोंत. जिनेवाला विमान थांबणार आहे. कुठल्याहि शहराकडे विमानांतून पाहण्यांत एक और मजा असते. आतां विमान जिनेवाला येऊन पोंचलें. आम्ही विमानांतून खालीं उतरलों. विमानतळावर फोटोग्राफरची व वर्तमानपत्राच्या बातमीदारांची बरीच गर्दी दिसली. पाऊसही सुरू झाला होता. आम्ही खालीं उतरलों व विमानतळावरील हॉटेलाकडे निघालों. हे एवढे बातमीदार आणि कॅमेरेवाले कोणासाठीं आले असतील असा विचार मनांत येतो न येतो तोंच आमच्याबरोबर असलेल्या तेनसिंगची आठवण झाली. तेनसिंग आपला सहप्रवासी आहे, ही गोष्ट आम्ही विसरलों होतों. पण जिनेवाच्या

कॅमेरेवाल्यांनीं आम्हांला त्याच्या अस्तित्वाची आठवण करून दिली. तेनसिंग व त्याचा दुभाषी खालीं उतरल्याबरोबर कॅमेरावाल्यांची एकच धावपळ झाली. तें दृश्य पाहून झाल्यावर आम्हीं जाऊन चहा घेतला. तेथें उपाहारगृहांत मुंबई विद्यालयाचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक श्री. सी. एन्. वकील भेटले. आम्हांला पाहिल्यावर ते आमच्याजवळ आले व त्यांनीं आमची विचारपूस केली. परदेशांत भारतीय मनुष्य आपल्याला भेटला कीं आनंद वाटतो.

जिनेवाच्या विमानतळावर घड्याळाचीं दुकानें आहेत. स्वित्झर्लंड हा घड्याळांचा देश. त्यामुळें येथें चांगलीं व स्वस्त घड्याळें मिळतात. घड्याळें स्वस्त असलीं तरी तीं घेण्याचा मोह टाळावा लागला. कारण इतक्या घिसाडघाईनें परदेशीं जावयाला निघालों, तर मग खिशांत पैसे कितीसे असणार ? श्री. गौडांनीं मात्र एक छानसें घड्याळ विकत घेतलें. येथें आम्हीं चहा घेतला व पुन्हा जाऊन विमानांत बसलों.

जिनेवा येथें आमच्या विमानांत एक अद्ययावत् पोशाख केलेला हिंदी गृहस्थ चढला. त्याच्याबरोबर त्याची सुस्वरूप पत्नी आहे. त्यांच्या एकंदर रुबाबावरून तो गृहस्थ परदेशीं वकिलातीमध्यें काम करीत असावा असें वाटलें. आपल्या विमानामध्यें १६-१७ भारतीय प्रवाशी आहेत याची त्यानें दक्खलसुद्धां घेतली नाहीं. परदेशांत राहणारा भारतीय आपल्या स्वदेशी बांधवांविषयीं परदेशामध्यें इतक्या उदासीन व बेपर्वाई वृत्तीनें कसा वागूं शकतो, याचें आम्हांला आश्चर्य वाटलें! तास दीड तासानें हें जोडपें पॅरिसला उतरलें. पण या अवधींत त्यांनीं आमची विचारपूस तर नाहींच केली, पण आमच्याकडे नजर टाकण्याची सुद्धां त्यांना जरूरी वाटली नाहीं.

आतां पॅरिस शहर जवळ आलें. विमानांतून प्रवास करतांना रात्रीच्या वेळीं कोणत्याही मोठ्या शहराजवळ तुम्ही आलांत व वरून खालीं त्या शहराकडे तुम्हीं पाहिलेंत, तर कित्येक वेळपर्यंत त्या शहरांतील रंगबेरंगी दिवे आकाशांतील ताऱ्यांप्रमाणें लुकलुकतांना तुम्हांला दिसतील. हें दृश्य अत्यंत सुंदर व विलोभनीय असतें. केवळ हें दृश्य पाहण्याकरितांच, विमानाचा प्रवास मी आनंदानें पत्करण्यास तयार होईन. हें दृश्य पहातांना गडकऱ्यांच्या—

" नाचत ना गगनांत नाथा
तारांची बरसात नाथा "

या ओळींची मला सारखी आठवण होत आहे. विमान पॅरिस शहराजवळ येतांना या आनंदाचा पुन्हा एकदा प्रत्यय आला.

आतां आम्ही पॅरिस विमानतळावर उतरलों आहोंत. वर सांगितलेलें जोडपें पण येथेंच उतरलें. या ठिकाणीं खूपच चांगलें जेवण आम्हांस मिळालें. मी जेवायला बसलों तों माझ्या शेजारीं एक भारतीय गृहस्थ येऊन बसले. ते विशेष बोलके दिसले. त्यांनीं स्वतः होऊन आमची विचारपूस केली. बोलतां बोलतां ते गुजराथी गृहस्थ असल्याचें कळलें. त्यामुळें येथून पुढें आमचें संभाषण गुजराथींतूनच झालें. या गृहस्थांचें नांव श्री. मंगळदास मेहता. मुंबईमध्यें ते सॉलिसिटरचा धंदा करतात. दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टींत ते असा परदेशाचा प्रवास करतात, असें त्यांनीं सांगितलें. या गृहस्थांनीं आमच्या विमानांतून पुढें लंडनपर्यंत प्रवास केला. पॅरिस शहर पाहण्याची माझी इच्छा मात्र पुरी होऊं शकली नाहीं. कारण जेवणानंतर ताबडतोब विमान निघालें. मला गुजराथी येत असल्याचें पाहून श्री. मेहता यांना आनंद वाटला व पॅरिस ते लंडन हा प्रवास त्यांनीं माझ्या शेजारींच बसून केला. या प्रवासांत परदेशांतील व आपल्या शिक्षणपद्धतीबद्दल आमची चर्चा झाली. गृहस्थ मोठा अनुभवी व जिज्ञासू वृत्तीचा दिसला. थोड्याच वेळांत लंडन शहर समोर दिसूं लागलें. रात्रीं ९ वाजतां आम्ही लंडनला आलों. लंडनचा विमानतळ शहरापासून खूपच दूर आहे. अर्ध्या-पाऊण तासांत कस्टमची व इतर पाहणी झाल्यावर आम्ही विमान कंपनीच्या मोटारींत जाऊन बसलों. पंचवीस एक मैल मोटारीचा प्रवास झाला व लंडनच्या कांहीं भागांचें धावतें दर्शन झालें. दुतर्फा झाडी असलेल्या एका मोठ्या आवारांत मोटारनें प्रवेश केला. हें एक लंडनमधलें मोठें हॉटेल आहे. या हॉटेलचें नांव सेल्सडन पार्क.

या हॉटेलमध्यें विमान कंपनीनें आमची राहण्याची व्यवस्था केली आहे. डेन्मार्कला जाण्यासाठीं लंडन ते कोपनहेगन असा प्रवास करणारें विमान आम्हांला घ्यावें लागणार होतें. 'एअर इंडिया इंटरनॅशनल' हें विमान मुंबई ते लंडन अशीच वाहतूक करतें; लंडन ते कोपनहेगन हा प्रवास 'ब्रिटिश युरोपियन एअरवेज' कंपनीच्या विमानानें करावयाचा होता. तें विमान दुसऱ्या दिवशीं दुपारीं सुटणार होतें. त्यामुळें ती रात्र आम्हांला लंडनमध्यें काढणें भाग पडलें. मनाला आनंद वाटला, कीं लंडन शहर आपणांस थोडा वेळ

कां होईना पण पाहायला मिळणार. कैरो, जिनेवा व पॅरिस या शहरांवरून आम्ही अक्षरशः उडत गेलों. हीं शहरें पाहावयास न मिळाल्यामुळें निराशा झाली होती, पण ती एवढी तीव्र नव्हती. पण जर लंडन पाहावयास मिळालें नसतें, तर मात्र खूप वाईट वाटलें असतें. फार दिवसांपासून अंतःकरणांतल्या कुठल्या तरी कोपऱ्यांत लंडन पाहण्याची भूक सांठवून ठेवलेली होती. त्याच लंडनमध्यें आज मी आलों आहें व तेथील एका प्रासादतुल्य निवासस्थानांत मुक्काम केला आहे. फार जुन्या काळची इच्छा तृप्त झाल्याचें समाधान त्या रात्रीं मला मिळालें. त्या रात्रीं खूप चांगली झोप मला लागली असती. पण श्री. गौडांना व मला दोघांना मिळून एक मोठी खोली मिळाली होती. श्री. गौडा खूप मोठ्यानें घोरतात. त्यामुळें प्रारंभीं थोडा त्रास झाला. पण शेवटीं निसर्गानें परिस्थितीवर मात केली व झोप छान मिळाली.

४ जून ५४

आज सकाळीं लौकरच उठलों व न्याहारी करून लंडन शहर पाहण्यास बाहेर पडलों. आमच्या हॉटेलपासून लंडनमधील प्रेक्षणीय भाग बराच दूर होता. म्हणून खास टॅक्सी करून आम्ही शहर पाहण्याचें ठरविलें. आमच्या बरोबर मुजुमदार नांवाचे एक बंगाली गृहस्थ आहेत. शिक्षणाच्या निमित्तानें पूर्वी ते दोन वर्षें लंडनला राहिले होते. त्यामुळें वाटाड्याचें काम त्यांनीं उत्तम प्रकारें केलें. पंचवीस एक मैलांचा प्रवास केल्यावर पूर्वीं इंग्रजी पुस्तकांतून वाचलेल्या वेस्टमिन्स्टर ॲबे, पार्लमेंट हाऊस, बकिंगहॅम पॅलेस इ. स्थळांचें दर्शन झालें. बकिंगहॅम पॅलेस-जवळ रस्त्याच्या दुतर्फा लोकांची गर्दी होती. आम्हीसुद्धां त्या गर्दींत सामील झालों. सर्व लोक एक लष्करी परेड पाहण्यासाठीं थांबलेले असल्याचें कळलें. तपासाअंतीं असें कळलें कीं, राजघराण्यांतील ड्यूक ऑफ ग्ल्युसिस्टर यांची थोड्याच दिवसांनीं राजवाड्याला भेट होणार होती. त्यांच्या आगमनप्रसंगीं त्यांचें बादशाही स्वागत होणार होतें. त्या स्वागताची ही रंगीत तालीम होती. या परेडमध्यें शुभ्र घोड्यांवर लाल कपडे घालून बसलेले, हातांत तलवारी घेतलेले असे सैनिक होते. ती परेड खरोखरच पाहाण्यासारखी होती. ब्रिटिशांनीं आपलें जुनें ऐतिहासिक वैभव व आपला इतमाम किती काळजीपूर्वक जोपासला आहे,

हें त्यावरून स्पष्ट दिसत होतें. जुनी परंपरा संभाळणें हें ब्रिटिशांचें एक वैशिष्ट्य आहे. या जुन्या वैभवाचें कौतुक करण्यासाठीं व राजघराण्यावरील आपलें प्रेम व्यक्त करण्यासाठीं लोकांची गर्दी लोटलेली होती. ही मिरवणूक पाहण्यांत वेळ गेल्यामुळें शहर पाहवयास फारसा वेळ मिळाला नाहीं. शहरें काय सर्वच एकासारखीं एक. परदेशांतील चार दोन मोठीं शहरें पाहिलीं कीं बाकीच्या मोठ्या शहरांची कल्पना आपोआप येते. परंतु असली कवाईत पुन्हा केव्हां पाहावयास मिळणार ? म्हणून येथेंच आम्हीं थोडासा वेळ घालविला. त्यानंतर कोपनहेगन ते एल्सिनोर या प्रवासाचीं रेल्वेचीं तिकिटें आम्हीं मिळविलीं व हॉटेलांत परत आलों. हॉटेलांत येऊन उभे राहतों तों विमान कंपनीची बस आम्हांला नेण्यासाठीं तेथें येऊन उभी असल्याचें दिसून आलें. आम्हीं घाईघाईनें जेवण उरकलें. जेवण खूप चांगलें होतें. सामान घेऊन आम्ही बसमध्यें बसलों व २॥ वाजतां विमानतळावर आलों. कस्टमची तपासणी व इतर औपचारिक कार्यक्रम पार पडले. आम्ही विमानांत जाऊन बसलों. हें विमान वर सांगितल्याप्रमाणें बी. ई. ए. कंपनीचें होतें. आंतील व्यवस्था अधिक चांगली होती. विमान चालू झालें व ६ च्या सुमारास आम्ही डेन्मार्कमध्यें आलों. डेन्मार्क हा बेटांचा देश आहे, याची सत्यता विमानांतून डेन्मार्कचें दर्शन घडतांच आम्हांला पटली. बरोबर ६॥ वाजतां आम्ही कोपनहेगन विमानतळावर उतरलों. त्या ठिकाणीं इंटरनॅशनल पीपल्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. पीटर मॅनिकी यांच्या वतीनें प्रो. जोहान्सन् यांनीं आमचें स्वागत केलें. डेन्मार्कमधील आमचें शिक्षण याच पीपल्स कॉलेजमध्यें होणार होतें, व त्याच्या मार्गदर्शनाची सर्व जबाबदारी डॉ. मॅनिकी ह्यांनीं स्वीकारली होती. विमानतळावरच वर्तमानपत्राचे वार्ताहर हजर होते. आमच्या वतीनें श्री. नानाभाई भट यांनीं त्यांना मुलाखत दिली. तेथेंच आमचें सर्वांचें छायाचित्र घेण्यांत आलें. हा सर्व कार्यक्रम आटोपल्यावर एल्सिनोरची गाडी गांठण्यासाठीं आम्ही कोपनहेगन स्टेशनवर आलों. वाटेनें कोपनहेगनचें धावतें दर्शन झालें.

कोपनहेगन या शब्दाचा अर्थ व्यापाऱ्यांचें बंदर असा आहे. या बंदराची भौगोलिक ठेवण खूपच चांगली आहे. ह्या बंदरांत प्रवासी आगबोटी व मच्छीमारी करणाऱ्या बोटी नांगर टाकून उभ्या असलेल्या तुम्हांला दिसतील. हें एक अतिशय मोठें शहर आहे. डेन्मार्कच्या एकूण लोकसंख्येपैकीं $\frac{1}{4}$ लोकसंख्या या

एका शहरांत केंद्रित झालेली आहे. डेन्मार्कची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ४२॥ लाख आहे. त्यांपैकीं १२-१३ लाख लोक कोपनहेगन व त्याभोंवतालच्या उपनगरांत राहतात. या शहरांत प्रासादतुल्य अशा खूप मोठ्या इमारती दृष्टीस पडतात.

डेन्मार्क हा जरी कृषिप्रधान देश असला तरी औद्योगीकरणानें डेन्मार्कमध्यें चांगलीच प्रगति केली आहे. डेन्मार्कच्या एकूण निर्यात होणाऱ्या मालापैकीं ४० टक्के माल हा कारखान्यांतून तयार झालेला असतो. कोपनहेगनमध्यें खूप मोठमोठाले कारखाने आहेत. लोखंडी व पोलादी कारखाने हा अत्यंत महत्त्वाचा उद्योगधंदा डेन्मार्कमध्यें आहे. शेतीला लागणारीं सर्व उपकरणें, विजेचीं यंत्रें, डीझेल इंजिनें, डेअरीच्या धंद्याला लागणारीं यंत्रें इत्यादि सर्व आधुनिक यंत्रसामग्री येथें तयार केली जाते. याखेरीज साखरेचे कारखाने, बिअर तयार करण्याचे कारखाने इत्यादि मोठे कारखाने कोपनहेगनमध्यें दृष्टीस पडतात; आणि म्हणूनच कोपनहेगन शहर इतकें झपाट्यानें वाढत आहे.

कोपनहेगन स्टेशनांत आल्यावर गाडीला वेळ असल्यामुळें आम्ही तेथील उपाहारगृहांत चहा घेण्यासाठीं थांबलों. या परदेशी शहरांत एक मोठी गैरसोय आपल्या हिंदी नागरिकांना तापदायक वाटते. या स्टेशनांतून हमाल दिसत नाहींत. प्रत्येक उतारूला आपल्या बरोबरीचें सामान येथून तेथें स्वतःच हलवावें लागतें. आमच्या देशांत लहानशी बॅग धरण्यासाठीं हमाल बोलावण्याची संवय आम्हांला लागल्यामुळें बरोबरीचें सामान जिन्यावरून इकडून तिकडे हिंडवितांना आमच्यापैकीं पुष्कळांना प्रारंभीं खूप त्रास झाला; पण पुढें हळू हळू ही गोष्ट आमच्या अंगवळणीं पडली.

एल्सिनोरची गाडी आली व आम्ही गाडींत बसलों. येथील आगगाड्यांत फक्त दोनच वर्ग असतात. पहिला व दुसरा. आमची गाडी ८ वाजून २० मिनिटांनीं कोपनहेगनहून सुटली व आम्ही ९॥ ला एल्सिनोरला आलों. सूर्य अद्यापि अस्ताला गेला नव्हता. ९॥ ला एवढा फटफटीत उजेड पाहून आम्हांला आश्चर्य वाटलें. स्टेशनवरून आम्ही आमच्या निवासस्थानाकडे गेलों. आम्ही येणार असल्याची येथील व्यवस्थापकांना कल्पना होतीच. आमच्या राहण्याच्या खोल्या आम्हांला दाखविण्यांत आल्या. जेवण घेतल्यावर आम्ही आपापल्या खोल्यांत विश्रांतीसाठीं गेलों. दिवसभरच्या प्रवासाच्या दगदगीमुळें केव्हां एकदा बिछान्याला अंग लावूं असें सर्वांना झालें होतें.

५ जून ५४

आज सकाळीं फार लौकर जाग आली. याचें मुख्य कारण म्हणजे सकाळीं तीन-साडेतीनलाच येथें उजाडतें. झुंजूमुंजू झाल्यावर उठण्याची संवय असल्यामुळें सूर्यप्रकाश खोलींत आल्याबरोबर जाग येणें स्वाभाविक होतें. प्रातर्विधि आटोपून न्याहारी-साठीं आम्ही खालीं भोजन-गृहामध्यें आलों. तेथेंच पीपल्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. मॅनिकी आम्हांला येऊन भेटले. त्यांची ओळख करून घेण्यामध्यें वेळ गेल्यामुळें न्याहारीच्या टेबलावरील पदार्थांकडे फारसें कुणाचें लक्ष गेलें नाहीं. आम्हीं न्याहारी आटोपली व व्याख्याना-साठीं वरच्या दिवाणखान्यांत जमलों. त्या ठिकाणीं डॉ. पीटर मॅनिकी यांनीं आमचें सर्वांचें स्वागत केलें.




इंटरनॅशनल पीपल्स कॉलेजचे प्राचार्य
डॉ. पीटर मॅनिकी

आपल्या देशामध्यें गेल्या कांहीं वर्षांमध्यें खेड्यांतून शहरांत खूप मोठ्या प्रमाणांत लोक जाऊं लागले आहेत. खेड्यांतील उत्साही बुद्धिमान् तरुणवर्ग खेड्याबाहेर जाऊं लागल्यामुळें खेडीं निष्प्रभ होऊं लागलीं आहेत. ही खेडयां-तील बुद्धिमत्ता खेडयांत राहिल्याशिवाय व खेडीं समृद्ध होण्यासाठीं त्यांचे श्रम व अक्कल कारणीं लागल्याशिवाय आपला देश समृद्ध होणार नाहीं. खेडीं समृद्ध करण्याचा शास्त्रशुद्ध प्रयोग आपल्या शिक्षणपद्धतींत बदल घडवून आणून डेन्मार्कनें केला असल्यामुळें डेन्मार्कच्या धर्तीवर आपल्या देशांतील ग्रामीण शिक्षणाची पुनर्रचना व्हावी, या हेतूनें भारत सरकारनें डॉ. पीटर मॅनिकी यांना भारतामध्यें बोलाविलें होतें. त्यांनीं भारतामध्यें दौरा काढला, निरनिराळ्या संस्थांना भेटी

दिल्या व एक अहवाल सादर केला. त्या अहवालांत त्यांनीं एक अशी सूचना केली कीं, डेन्मार्कनें केलेले प्रयोग अभ्यासण्यासाठीं भारतसरकारनें अनुभवी शिक्षणतज्ज्ञांची एक तुकडी डेन्मार्कला पाठवावी. ही सर्व हकीकत डॉ. पीटर मॅनिकी यांनीं आपल्या स्वागताच्या भाषणांत आम्हांस सांगितली. याच वेळीं पुढील तीन महिन्यांच्या शिक्षणकालांत आम्हीं कोणता कार्यक्रम अमलांत आणावयाचा आहे याची त्यांनीं आम्हांला कल्पना दिली.

एल्सिनोर येथील ग्रंथालय विभागाचे प्रमुख मि. ब्रेमर्स्टट यांची पण याच सभेंत गांठ पडली. त्यांनीं दुपारचा कार्यक्रम समजावून सांगितला. आज दुपारीं व्याख्यानें नव्हतीं. स्थानिक महत्त्वाच्या जागांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखण्यांत आला होता.

पुढील तीन महिन्यांत आम्ही एल्सिनोरलाच राहणार आहोंत व आमचें शिक्षण इंटरनॅशनल पीपल्स कॉलेज या संस्थेंतच होणार आहे. एल्सिनोर हें




इंटरनॅशनल पीपल्स कॉलेज

एक सुंदर शहर आहे. डेन्मार्कमधील हें अत्यंत जुनें शहर होय. इतिहासामध्यें सन १२०० सालापासून एल्सिनोरचें नांव ऐकावयास येतें. पण एल्सिनोरची खरी भरभराट इ. स. १४२६ पासून झाली. या काळांत एल्सिनोरमध्यें हेरिंग

जातीचे मासे मिळूं लागले. ह्या माशांना खूप किंमत येऊं लागली. येथूनच एल्सिनोरच्या भरभराटीस सुरुवात झाली. एल्सिनोरमधूनच डेन्मार्क ते स्वीडन या दोन देशांत वाहतूक जलमार्गानें होते. स्वीडनचा किनारा एल्सिनोरमधून स्पष्ट दिसतो. स्वीडनहून रोज कित्येक नागरिक एल्सिनोरला येतात व एल्सिनोरचे लोक पण स्वीडनमध्यें रोज जा-ये करतात. या दृष्टीनें या शहराला फार महत्त्व आहे.

एल्सिनोरला खरें महत्त्व शेक्सपीयरच्या हॅम्लेट नाटकानें मिळवून दिलें आहे. ज्या क्रोनबर्गच्या किल्ल्यामध्यें हॅम्लेटची कथा घडली तो किल्ला एल्सिनोरमध्येंच आहे. हा किल्ला पाहण्यासाठीं आज दुपारीं आम्ही बाहेर पडलों. या ठिकाणीं एक छोटासा म्यूझियम पण आहे. क्रोनबर्ग किल्ला पाहण्याची खूपच उत्कंठा होती. कॉलेजांत असतांना हॅम्लेटचें अध्ययन आम्हीं केलें होतें, व त्यामुळें क्रोनबर्ग किल्ला पाहिल्यावर हॅम्लेट नाटकांतील कथेचा चित्रपट झरकन डोळ्यासमोरून जात होता. आज एक जुनें इतिहासप्रसिद्ध पूर्वपरिचित स्थळ पाहवयाला मिळाल्याबद्दल खूप आनंद वाटला.



क्रोनबर्ग किल्ला

क्रोनबर्ग किल्ल्याकडे जातांना १६ व्या शतकांत बांधलेलीं कांहीं डॅनिश घरें पाहिलीं. पुढें येथील कमर्शियल (व्यापारी) व नेव्हल (आरमारी) म्यूझियम पण पाहिला. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कोपनहेगनहून भारतांत गेलेल्या जहाजाचें एक मॉडेल येथें पाहावयाला मिळालें. तें १७८२ सालीं बांधण्यांत आल्याची तेथें नोंद होती. १७ व्या व १८ व्या शतकांत डेन्मार्कनें जहाजें बांधण्यांत व आरमार उभारण्यांत खूपच प्रगति केली होती. ज्या वेळीं इंग्लंड व इतर देश युद्धामध्यें गुंतले होते, त्या वेळीं डेन्मार्क आपली ह्या क्षेत्रामध्यें प्रगति करीत

होता. याच ठिकाणीं मोडीमध्यें लिहिलेलें एक अस्सल पत्र पाहून सानंद आश्चर्य वाटलें. हें पत्र तंजावर येथून लिहिलें होतें. १८ व्या शतकांत भारतांतून एक चपराशी तेथील राजाचें एक पत्र घेऊन डेन्मार्कला आला होता. या भेटीची नोंद व त्या चपराशाचा एक छोटासा पुतळा पण येथें पाहावयास मिळाला. ज्या चाबकाच्या व बेड्यांच्या जोरावर डॅनिश लोकांनीं आफ्रिकन गुलामांना ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न केला तो चाबूक व त्या बेड्या येथें पाहावयास मिळाल्या. साम्राज्यशाहीच्या लोभानें वेडावलेल्या गोऱ्या लोकांनीं कोणत्या पाशवी सामर्थ्याच्या जोरावर एतद्देशीय लोकांवर आपली हुकमत चालविण्याचा प्रयत्न केला त्याची कल्पना तो चाबूक व त्या बेड्या पाहून आली.

६ जून ५४

आजपासून सकाळच्या प्रार्थनेला सुरुवात झाली. आश्रमभजनावलींतील कांहीं निवडक भजनें म्हणण्याचें ठरलें. शांतिनिकेतनमधील श्री. धार नांवाचे गृहस्थ आमच्याबरोबर होते. त्यांना आम्ही 'दादा' म्हणत असूं. दादा बंगाली भजनें चांगलीं म्हणतात. त्याचप्रमाणें बिहारचे प्रसिद्ध नारायण शर्मा हे पण भजनें चांगलीं म्हणतात. ते एका मूलोद्योगी ट्रेनिंग कॉलेजांत असल्यामुळें रोज प्रार्थना म्हणण्याचा त्यांना सराव आहे. प्रार्थना झाल्यावर त्या दिवशींचा कार्यक्रम सांगण्याचें काम व इतर कांहीं सूचना देण्याचें काम माझ्याकडे आलें. कारण आमच्या मंडळीनीं मला आपल्या पार्टीचा चिटणीस निवडलें आहे. ही एक नवी जबाबदारी माझ्यावर आली आहे. आमच्या मित्रांच्या रहाण्या-खाण्या-पिण्या-बाबतच्या अडचणींची दाद लावून घेणें व त्याचप्रमाणें शैक्षणिक कार्यक्रमाची डॉ. मॅनिकींच्या मदतीनें रूपरेषा ठरविणें इत्यादि कामें माझ्याकडे आलीं आहेत.

आमची राहण्या-जेवणाची व्यवस्था ज्या ठिकाणीं केली होती त्या ठिकाणाचें नांव 'Dansk Rawkosi Skola—डॅनिश अपक्व अन्नाची शाळा' असें होतें. शाळा मिस् यूल या नांवाची एक स्त्री चालवीत आहे. आज न्याहारीच्या वेळीं मिस् यूल जातीनें हजर होत्या. त्या कोपनहेगनमध्यें राहतात व एलिस-नोरला ही आपली संस्था चालवितात. प्रारंभीं त्यांनीं आमची सर्वांची ओळख करून घेतली आणि नंतर आपल्या संस्थेविषयीं थोडक्यांत माहिती सांगितली.

ही संस्था मिस् यूलनें स्वतः उभी केली आहे. त्यांच्या वडिलांना वयाच्या ८० व्या वर्षी कॅन्सर झाला. आपल्या वडिलांना हा भयंकर रोग जडलेला पाहून बाईला मोठा धक्का बसला. पण त्या गांगरून गेल्या नाहींत. कॅन्सर हा रोग कां व कशानें होतो याचा अभ्यास करावयाला त्यांनीं सुरुवात केली. या अध्ययनांत त्यांना असें आढळून आलें कीं, जर माणसानें कच्च्या भाज्या, कच्चीं फळें कच्चें कडधान्य खाल्लें, तर कॅन्सर बरा होईल. हा शोध त्यांना लागल्यावर तो त्यांनीं आपल्या वडिलांच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं त्यांचें म्हणणें ऐकलें नाहीं. तोंड बांधून मरण्यापेक्षां आवडेल तें खाऊन मरण्याचा त्यांचा निर्धार होता. थोड्या दिवसांनीं ते वारले. मरतांना त्यांनीं मुलीसाठीं खूप पैसा मागें ठेवला. या पैशांतून या बाईनीं ही शाळा चालविली आहे.

बाईचा असा विश्वास आहे कीं, कॅन्सरसारख्या भयंकर रोगाचा जन्म मांसाहारामुळें होतो. कच्चें अन्न व शाकाहार जर माणसानें घेतला तर त्याला दीर्घकाळ संपूर्ण आरोग्याचें जीवन जगतां येईल. शाकाहाराचा व कच्च्या अन्नाचा प्रचार करण्याकरितां त्यांनीं ही संस्था चालविली आहे. हें अन्न घेऊन पाहण्यासाठीं व या पद्धतीनें आपल्या रोगांवर उपचार करण्यासाठीं, त्याचप्रमाणें या उपचारपद्धतीचें तंत्र समजून घेण्यासाठीं, निरनिराळ्या देशांतील लोक या ठिकाणीं येतात व कांहीं दिवस राहतात. येणाऱ्या लोकांमध्यें बायकांचाच भरणा फार असतो. या बायांना निरनिराळ्या प्रकारचे व्यायाम येथें शिकविले जातात.


या कच्च्या आहाराबाबत बाईचें आणखीं एक म्हणणें असें आहे कीं, शिजविलेल्या अन्नापेक्षां कच्चें अन्न माणसाला कमी लागतें. भारतासारख्या ज्या देशांत अन्नधान्याची टंचाई आहे, त्या ठिकाणीं शिजविलेल्या अन्नाऐवजीं कच्च्या अन्नाचा जर वापर केला, तर अन्नधान्याची खूप बचत होईल. आपली भूक भागविण्याकरितां जर चार शिजविलेलीं गाजरें आपणांला खावीं लागत असलीं तर एक कच्चें गाजर खाऊन आपली भूक भागेल. जें काम एका गाजरानें होऊं शकतें त्या ठिकाणीं आपण चार गाजरांचा वापर करतों. अन्न शिजवून खाल्ल्यामुळें चार माणसांना पुरणारें अन्न एका माणसासाठीं खर्ची घालावें लागतें. आम्ही भारतांत परत गेल्यावर तिच्या या विचारसरणीचा प्रचार करावा व भारताला अन्नधान्याच्या टंचाईतून व कॅन्सरसारख्या दुःसाध्य रोगाच्या मगरमिठींतून वांचविण्याचा प्रयत्न करावा, असें त्यांनीं आग्रहानें आम्हांला सांगितलें. आपल्या

या शोधावरील त्यांची दुर्दम्य श्रद्धा पाहून आम्हांला त्यांचें कौतुक वाटलें. परंतु त्यांच्या वसतिगृहांत मिळणाऱ्या अन्नाबद्दल एकदोन दिवसांतच आमच्यामध्यें अप्रीति उत्पन्न झाली.

आजपासून आमच्या शैक्षणिक कार्यक्रमाला सुरुवात झाली. आज सकाळीं एक व्याख्यान झालें. दुपारीं आम्ही सर्वजण डेन्मार्कमध्यें अत्यंत वैपुल्यानें आढळणारी वनश्री पाहण्याकरितां निघालों. डेन्मार्कमध्यें ठिकठिकाणीं हिरवींगार गवताचीं कुरणें आहेत. तीं पाहिल्यावर पदोपदीं बालकवींच्या—

" हिरवे हिरवेगार गालिचे
हरित तृणाच्या मखमालीचे "

या ओळींची आठवण होत होती. रस्त्याच्या जवळच ठिकठिकाणीं दाट वनराजी काळजीपूर्वक संभाळलेली आढळून येत होती. आज डॅनिश लोकांचा एक सणाचा दिवस होता. त्यामुळें सर्वांना सुट्टी होती. उन्हाळा हा वर्षांतील अत्यंत आनंदाचा काळ. डेन्मार्कमध्यें उन्हाळा फक्त तीन महिनेच असतो. या तीन महिन्यांत डॅनिश लोक खूप आनंदांत असतात. या वेळीं काम कमी असतें. जेवढी गंमत करतां येईल तेवढी करण्याचा ते कसून प्रयत्न करतात. उन्हाळ्यांतील रविवारीं किंवा सणाच्या दिवशीं तर त्यांच्या उत्साहाला भरती येते. डेन्मार्कमध्यें



डेन्मार्कमधील सायकलींचा सुळसुळाट

ठिकठिकाणीं निरनिराळीं सरोवरें आहेत. पाण्याची बिल्कूल कमतरता नाहीं. समुद्रसुद्धां सन्निधच आहे. त्यामुळें पोहणें किंवा तासच्या तास पाण्यांत डुंबत राहणें हा डॅनिश लोकांचा एक आवडता कार्यक्रम आहे. सुट्टीच्या दिवशीं अनेक स्त्रीपुरुष व मुलें आपापल्या सायकलींवरून कुठें ना कुठें तरी सहलीला निघालेलीं तुम्हांला आढळतील. पुण्यापेक्षांही डेन्मार्कमध्यें सायकलींचा सुळसुळाट अधिक आढळतो. ४५-५० लाख वस्तीच्या या देशांत २० लाख सायकली आहेत. एकेका घरांत तीन-चार-पांच सायकली आढळतील. अगदीं छोटीं छोटीं मुलेंसुद्धां सायकल चालवितांना दिसतात. मुलांची भीति कमी व्हावी, म्हणून बापाची सायकल उजवीकडे, आईची डावीकडे व मध्यें बाळाची किंवा बेबीची सायकल अशा वराती रस्त्यानें हिंडतांना आढळतात. इथल्या सायकलच्या प्रस्थाबद्दल बोलतांना एक डॅनिश गृहस्थ मला म्हणाला, "सायकल आमच्या पांचवीलाच पुजलेली आहे." त्याच्याच शब्दांत सांगावयाचें तर "Danish children are born on cycles." सायकलवरून दुधाच्या बाटल्यांचीं अथवा इतर कसलीं



डॅनिश मुलगा सायकलीवरून किती तरी सामान वाहून नेतो.

तरी पुष्कळशीं खोकीं वाहून नेणारीं डॅनिश मुलें रस्त्यांतून नेहमीं दिसतात.

आज संध्याकाळीं येथील ग्रंथपाल श्री. ब्रेमर्स्टेट यांच्याकडेच आम्हां सर्वांना जेवणाचें आमंत्रण होतें. हे गृहस्थ अत्यंत विनोदी व मनमोकळे आहेत. त्यांची मोठी मुलगी डेन्मार्कमध्यें ऑपेरा गायिका म्हणून प्रसिद्ध आहे. या बाईचे यजमान म्हणजे आमच्या ग्रंथपालांचे जावई डेन्मार्कमधील शिक्षणमंत्र्याच्या कार्यालयांत मोठ्या अधिकारावर आहेत. डेन्मार्कमधील सर्व लोकांना परकीय पाहुणे आपल्या घरीं आले कीं अपरिमित आनंद वाटतो. परदेशांत आपले मित्र असावेत, असें त्यांना उत्कटतेनें वाटत असतें. प्रत्येक डॅनिश स्त्री-पुरुषाला आपल्या मातृभाषेखेरीज दुसरी एक तरी परकीय भाषा येत असते. परकीय पाहुणा आपल्या घरीं आला कीं मोठ्या उत्साहानें ते त्याचें स्वागत करतात, व आपल्या आतिथ्याचा त्याच्यावर जेवढा वर्षाव करतां येईल तेवढा करण्याची ते पराकाष्ठा करतात. याचा अनुभव या ग्रंथपालांच्या घरीं आम्हांला आला. त्यांनीं आम्हांला खूप खाऊं घातलें, गाणीं सुनविलीं व आमची जेवढी करमणूक करतां येईल तेवढी करण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमांतील कांहीं गाणीं अशीं होतीं कीं, तीं श्री. ब्रेमर्स्टेट, त्यांच्या पत्नी, त्यांच्या लेकी, जावई व नातवंडें या सर्वांनीं आपले सूर एका सुरांत मिळवून गाऊन दाखविलीं. डेन्मार्कमध्यें अशीं कांहीं गाणीं प्रचलित आहेत जीं सत्तर वर्षांच्या म्हाताऱ्यापासून तों सात वर्षांच्या मुलांपर्यंत सर्वांच्या तोंडीं झालेलीं असतात. तीं सर्वांना पाठ म्हणतां येतात. डेन्मार्कचें हें वैशिष्ट्य आहे.

या ग्रंथपालांच्या घरीं बराच वेळ घालविल्यावर आम्ही रात्रीं निवासस्थानावर परत आलों. या कार्यक्रमामुळें आजचा दिवस खूप आनंदांत गेला.

७ जून ५४

आज सकाळीं पण व्याख्यानें झालीं. डेन्मार्कमधील जुनीं खेडीं कशीं होतीं व त्यांतील घरें वगैरे कोणत्या प्रकारचीं होतीं याची कल्पना नव्या पिढीला यावी म्हणून दोनशें वर्षांपूर्वींच्या एका खेड्याचा नमुना डेन्मार्कमध्यें एके ठिकाणीं खूप चांगल्या रीतीनें जतन करून ठेवला आहे. हें स्थळ पाहण्याकरितां आज दुपारीं आम्ही बाहेर पडलों. जुन्या काळचीं तीं घरें व त्या घरांतील सर्व वस्तू जशाच्या

तशा काळजीपूर्वक जतन करून ठेवल्या आहेत. आमच्याबरोबर वाटाड्याचें काम करणाऱ्या मुली होत्या. त्या आम्हांला सर्व वस्तूंविषयीं उपयुक्त माहिती देत होत्या. या वेळच्या खेड्यांमध्यें एक विशेष गोष्ट दिसून आली ती ही कीं, येथील लोक एकत्र येऊन पुष्कळच सामूहिक कार्यक्रम साजरे करीत असत. त्या काळचा शेतकरी पण सुखी व समृद्ध असावा. घरांतच मद्य वगैरे तयार करण्याची व्यवस्था दिसली. त्या वेळेच्या मानानें घरामध्यें फर्निचर पण आढळून आलें. आश्चर्य असें कीं, या वेळच्या घरांतसुद्धां चीनमध्यें तयार झालेल्या कांचेच्या वस्तू घरांघरांतून आढळल्या. प्रत्येक घरामध्यें कुटुंबांतील स्त्रीपुरुषासाठीं एक व मुलांसाठीं एक असे दोन पलंग आढळले. याबद्दल सांगतांना आमची वाटाडी स्त्री म्हणाली कीं, "सर्वांत लहान मूल जें असेल, त्याला आपल्या पायाशीं झोपविण्याची पूर्वी पद्धत होती. रात्रीं झोपेमध्यें बेसावधपणें त्या मुलांना लाथांचा प्रसाद मिळाल्यामुळें कधीं कधीं सकाळीं तीं मेलेलीं आढळून येत असत." डॅनिश जोडप्यांची ही झोप कुंभकर्णाच्या झोपेपेक्षांदेखील प्रदीर्घ असल्याचें ऐकून आम्हांला आश्चर्य वाटलें.

हें प्रदर्शन पाहिल्यानंतर आम्ही कोपनहेगनला गेलों. त्या ठिकाणीं तिव्होली नांवाचें एक करमणुकीचें ठिकाण आहे. तें आम्हीं पाहिलें. डेन्मार्कमधील लोकांचें हें अत्यंत आवडीचें ठिकाण आहे. या ठिकाणीं बाल-वृद्ध, स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब सर्व एके ठिकाणीं येतात व आपल्या जिवाची मनमुराद करमणूक करून घेतात. या ठिकाणीं आपल्याकडील जत्रेमध्यें जसे पाळणे, 'मेरि-गो-राउंड' इत्यादि करमणुकीचे प्रकार असतात, तसे या ठिकाणीं भरपूर प्रमाणामध्यें आढळून आले. निरनिराळ्या प्रकारच्या जुगारांचे खेळ पण होते. बरेचसे लोक येथें येऊन जुगार खेळतात. आपल्याकडे जुगार खेळणें हें आपण अनैतिक मानतों. तशा प्रकारचा जुगाराबद्दलचा सामाजिक तिटकारा येथें आढळून येत नाहीं. या ठिकाणीं करमणुकीचीं बरींचशीं साधनें उपलब्ध होतीं. निरनिराळ्या प्रकारचीं उपाहारगृहें व मदिरापानाचीं गृहें पण येथें होतीं. संध्याकाळचा वेळ आनंदानें घालविण्याकरितां आलेली सर्व मंडळी आपापल्या परीनें आपल्या जिवाची करमणूक करून घेत होती. करमणुकीच्या या प्रकारांमध्यें आमच्यापैकीं कांहींना कांहीं गोडी वाटली नाहीं. त्यामुळें आम्ही लौकरच तेथून काढतां पाय घेतला.

८ जून ५४

आतां रोजचा कार्यक्रम जवळ जवळ ठरल्यासारखाच होता. रोज सकाळीं व्याख्यानें व दुपारीं संस्थांना भेटी. या व्याख्यानांतून डेन्मार्कची राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक परिस्थिति कशी हळूहळू सुधारत गेली याची माहिती आम्हांला देण्यांत येत होती. जगामध्यें आज जे देश पुढारलेले म्हणून ओळखले जातात त्यांपैकीं डेन्मार्क हा एक महत्त्वाचा देश आहे. १८४९ सालापासून या देशांत लोकशाही राज्यपद्धति चालू आहे. येथें लोकांचें राज्य गेलीं शंभर वर्षें चालू असल्यामुळें त्यांची परिस्थिति सुधारून त्यांना सुखासमाधानांत ठेवण्यासाठीं येथें खूपच प्रयत्न केले जात आहेत. जनतेच्या हितासाठीं ज्या कल्याणकारी योजना सरकारनें आंखल्या आहेत, त्यांची माहिती देणारा बोलपट आज आम्हीं पाहिला. जनतेच्या हिताचें सरकार आपल्या लोकांना अन्न, वस्त्र, आसरा पुरविण्याची हमी कशी घेतें, त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाची व्यवस्था कशी करतें व त्यांना आजारापासून मुक्त करण्याकरितां औषधपाणी पुरविण्याची दक्षता कशी घेतली जाते, याची पूर्ण कल्पना या बोलपटावरून आली.

डेन्मार्क हा लहान देश. त्याचें एकूण क्षेत्रफळ १७१८० चौ. मैल. लोकसंख्या पन्नास लाखाच्या आंतच. सर्व लोक एकच भाषा बोलणारे. ९७ टक्के लोक एकाच पंथाच्या चर्चमध्यें जातात. हे सर्व मार्टिन ल्यूथरचे अनुयायी. त्यामुळें ते ल्यूथेरियन चर्चमध्यें जाऊन आपले सर्व धार्मिक विधि पार पाडतात. तात्पर्य काय, कीं हा एक एकजिनसी देश आहे. त्यामुळें या देशाला आपली उन्नति करून घेतां येणें सोपें झालें आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे डेन्मार्कमधली भौगोलिक परिस्थिति खूपच अनुकूल अशी आहे. नॉर्वे, स्वीडन या देशांत जशी खनिज संपत्ति आढळते, चांगलीं जंगलें आढळतात, तशीं डेन्मार्कमध्यें आढळत नाहींत. डेन्मार्कची हवा शेतीला पोषक अशी आहे. या देशांत कडाक्याची थंडी नाहीं किंवा रखरखीत उन्हाळा नाहीं. एकूण जमिनीपैकीं शेंकडा ९५ टक्के जमीन लागवडीखालीं आणतां येण्यासारखी आहे व शेंकडा ७७ टक्के जमिनींत चांगली शेती होऊं शकते. डेन्मार्कमध्यें राय, बार्ली (जव), गहूं इत्यादि प्रकारचीं धान्यें, वेगवेगळया भाज्या, हिरवेंगार गवत यांची भरपूर पैदास होते. चांगल्या गाई, धष्टपुष्ट डुकरें व जातिवंत कोंबड्या यांमुळें शेतकऱ्यांच्या

संपत्तींत मोलाची भर पडली आहे. या सर्व नैसर्गिक अनुकूल परिस्थितीला डेन्मार्कच्या शेतकऱ्यांच्या भरपूर मेहनतीची जोड मिळाली आहे; व म्हणूनच हा देश इतका समृद्ध झाला आहे. देशाची आर्थिक परिस्थिति सुधारल्यामुळें, आज पाहिलेल्या बोलपटांत ज्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली गेली त्या योजना डेन्मार्कला राबवितां येणें शक्य झालें आहे.

आमची राहण्याची व्यवस्था अपक्व अन्नाचा प्रचार करणाऱ्या शाळेंत करण्यांत आली होती. ही योजना करतांना डॉ. मॅनिकी यांनीं अशी कल्पना करून घेतली होती कीं, सर्व भारतीय लोक हे शाकाहारीच असतात. पण आमच्यापैकीं फारच थोडे वैष्णव होते. बहुतेक सर्व शक्तिदेवीचे उपासक. धार्मिक कृत्येंसुद्धां माशाच्या नैवेद्यावांचून न करणारे बंगाली, समुद्रपट्टीवर राहणारा मी, रोजाच्या दिवशींसुद्धां मुरगी खाणारा आमचा बरकत इत्यादि सर्व मंडळींना ही वैष्णवाची उपासना मानवणें कठीण झालें. आम्ही ज्या संस्थेंत राहिलों होतों, त्या संस्थेच्या मालकिणीची शिस्त अत्यंत कडक. त्या संस्थेच्या परिसरांतसुद्धां सामिष अन्न आणलें जातां कामा नये, असा त्यांचा कटाक्ष होता. त्यामुळें केवळ निरामिष अन्नावर पुढल्या तीन महिन्यांच्या काळांत जगावयाचें कसें, हा प्रश्न आमच्यापुढें येऊन उभा राहिला. या आमच्या उपाहारगृहांत कच्चे बटाटे, कच्च्या भाज्या, मोड आलेलीं धान्यें, कच्चा लसूण, दूध, लोणी यांवांचून कांहीं खावयाला मिळत नसे. एवढा सात्त्विक आहार पुढील तीन महिने सतत भक्षण केला, तर आपल्यामधील सात्त्विक प्रवृत्तींचा अवास्तव विकास होईल व कदाचित् परत गेल्यावर संसारापासून विरक्त राहण्याचीसुद्धां इच्छा होईल व मग एवढी धडपड करून जें शिक्षण येथें मिळविलें त्या शिक्षणाचा देशाला उपयोग होणार नाहीं, या भीतीनें आम्हीं डॉ. मॅनिकींना विनंती केली कीं, आमच्यापैकीं जे शक्तिदेवीचे उपासक आहेत, त्यांना हवा असलेला सामिष आहार देण्याची कांहींतरी व्यवस्था करावी. त्याप्रमाणें आज संध्याकाळीं येथें आल्यापासून प्रथमच जेवणाच्या ताटांत चांगल्या चवदार माशाचें दर्शन झालें व सक्तीनें घडलेल्या उपासाचें पारणें फिटलें.

आज दुसरी एक चांगली घटना घडली. या आमच्या निवासस्थानांत एका खोलींत दोनदोन, तीनतीन लोक राहण्याची व्यवस्था होती. आम्ही आलों त्या वेळीं गर्दी असल्यामुळें आम्हांला चौघांना एकाच खोलींत ठेवण्यांत आलें होतें. आमच्यापैकीं तिघांची रात्रींच्या वेळीं घोरण्याची चढाओढ लागे. मी घोरतों कीं नाहीं हें

मला माहीत नाहीं, पण या तिघांच्या घोरण्याचा मात्र मला खूपच त्रास झाला; व एकादी निराळी खोली मिळविण्याचा मीं प्रयत्न केला. या निवासस्थानांतील वरच्या मजल्यावरील एक छोटी, पण सुंदर अशी स्वतंत्र खोली मला मिळाली. खोलीला लागून गच्चीं आहे. त्या गच्चींतून खालचा बाग, भोवतालची झाडी व एक छोटेसें रमणीय असें तळें यांचें दर्शन होतें. माझ्या आयुष्यांत इतकें चांगलें राहण्याचें स्थळ मला कधींच मिळालें नव्हतें. ही खोली मिळाल्यामुळें व विशेषतः या खोलींत मी एकटाच असल्यामुळें आतां मला खूप वाचन व लेखन करतां येईल असें वाटतें. या खोलींत दिव्याची व्यवस्था चांगली आहे. डोळ्यांवर प्रकाश न येतां पडल्या पडल्या वाचण्याची सोय आहे. आज रात्रीं मीं बरेंचसें वाचन केलें.

९ जून ५४

आज चार व्याख्यानें झालीं. पाऊस आज खूप पडला. त्यामुळें बाहेर जाणें शक्य झालें नाहीं. आम्ही येथें आल्यापासून पावसाची पिरपिर सारखीच चालू आहे. त्यामुळें आज बाहेरचा कार्यक्रम होऊं शकला नाहीं. आज खोलींत बसून घरच्या मंडळींना व भारतांतील मित्रांना पत्रें लिहिण्याचा कार्यक्रम उरकला. जो आनंद पत्र वाचतांना होतो तसाच आनंद पत्रें लिहितांनासुद्धां होऊं शकतो याची अनुभूति मला परदेशच्या प्रवासांतच मिळाली. सरकारी पत्र-व्यवहार खूप करावा लागत असल्यामुळें खासगी पत्रें लिहिण्यांत उत्साह घरीं असतांना मला कधीं वाटत नसे. पण परदेशांत असतांना आपल्याला रोज खूप पत्रें यावींत व आपण खूप पत्रें लिहावींत असें मनापासून वाटतें.

१० जून ५४

आज पण पाऊस होता. सकाळचीं व्याख्यानें झालीं; पण दुपारचा बाहेरचा कार्यक्रम नव्हता. म्हणून मी व श्री. गौडा एल्सिनोर शहरांत गेलों. आमच्या निवासस्थानापासून शहर २-२॥ मैल दूर आहे. शहरांत जाऊन आम्हीं केस कापून घेतले. पण बिल देतांना हजामत झाल्याचें आढळून आलें. प्रत्येकीं जवळ जवळ

२-२॥ रुपयांचा खर्च झाला. ज्या न्हाव्याजवळून आम्हीं केस कापून घेतले त्याला इंग्रजी मुळींच येत नव्हतें व आम्हांला त्याची भाषा समजत नव्हती. आमचे केस कोणत्या पद्धतीनें कापावेत याची तो आस्थेनें चौकशी करीत असावा, असें एकंदर त्याच्या हालचालीवरून दिसून आलें. सारखा वाकून कांहीं तरी तो आमच्याशीं बोलत होता. शेवटीं त्यानें निरनिराळ्या प्रकारचे केशरचनेचे फोटो आमच्यापुढें ठेवले. त्याच्या या आतिथ्यशीलतेच्या अतिरेकांतून आपली सुटका करून घेण्यासाठीं आम्हीं एका फोटोवर बोट ठेवलें; मग मात्र एक अक्षर न बोलतांना त्यानें आपलें काम सुरू केलें. केस कसे कापले गेले, कुणास ठाऊक! पण केस निश्चित कापले गेले याची खिशाला मात्र जाणीव झाली.

या दुकानाच्या शेजारींच एक मासे विकण्याचें दुकान होतें. तऱ्हेतऱ्हेचे मासे कांचेच्या कपाटांत मांडून ठेवले होते. ते पाहतांच आमच्या दोघांच्याही तोंडास पाणी सुटलें. माझ्यापेक्षां श्री. गौडा हे अनुभवी असल्यामुळें मी नको म्हणत असतांही आम्ही दुकानांत गेलों. दुकानांतून हिंडतांना आमची मोठी पंचाईत होते. तेथील विक्रेत्यांना इंग्रजी येत नाहीं व आम्हांला डॅनिश येत नाहीं. व्यवहार करावयाचा कसा ? त्यामुळें 'Taller de Englesk' (तुम्हांला इंग्रजी येतें का ?) या अर्थाचें डॅनिश वाक्य आम्हीं पाठ केलें आहे. या प्रश्नाला बहुधा नॉय असें उत्तर येतें. मग खुणा वगैरे करून जमलें तर आम्ही प्रयत्न करतों, नाहीं तर खरेदी न करतांच बाहेर पडावें लागतें. पण या मासेविक्रेत्या बाईला इंग्रजी चांगलें येत होतें व त्यामुळें "तळलेले मासे आहेत काय ? येथें आम्ही ते खाऊं शकतों काय ?" इत्यादि प्रश्न आम्हीं तिला विचारले. तिनें सुद्धां अत्यंत आतिथ्यशीलतेनें चांगले निवडक मासे, बरोबर थोडें लोणचें व चटणी इत्यादि पदार्थ आम्हांला दिले. चांगले मासे खाल्ल्याचें समाधान आज आम्हांला मिळालें.

जरी पाऊस पडत आहे, हवा सर्द आहे, तरी रस्त्यांतून अनेक माणसें हिंडत फिरत आहेत. एका दुकानाच्या समोर माणसांची एक मोठी रांगच्या रांग उभी आहे. तपास करतां समजलें कीं, तें आइस्क्रीम विकण्याचें दुकान आहे. या गोऱ्या लोकांना आइस्क्रीम खाण्याचा खूप शोक असतो. ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंड-मध्येंसुद्धां हीच गोष्ट माझ्या लक्षांत आली. डेन्मार्कमधील लोक खूप आइस्क्रीम खातात. आइस्क्रीम खात खात रस्त्यानें हिंडतांना त्यांना संकोच वाटत नाहीं. आइस्क्रीम खूप खात असल्यामुळें व केक व चाकोलेटसुद्धां तितक्याच प्रमाणांत

खात असल्यामुळें येथील लोकांचे दांत चांगले नसतात. दांतांकरितां ते डॉक्टर-कडे जातील, पण आइस्क्रीम खाण्याचें कमी करणार नाहींत. आइस्क्रीमनें दांत बिघडतात, थंडींत तें खाल्लें तर बाधण्याची भीति आहे इत्यादि तत्त्वज्ञान लक्षांत असूनसुद्धां आम्ही पण त्या दुकानासमोरील रांगेंत जाऊन उभे राहिलों. विचार केला कीं, ज्या अर्थी एवढे लोक आइस्क्रीमची वाट पाहात तिष्ठत उभे आहेत त्या अर्थी तें आइस्क्रीम विशेष चांगलें असलें पाहिजे आणि अनुभव पण तसाच आला. खूप चांगलें आइस्क्रीम खावयाला मिळालें. दुकानांतील माणसेंही फार चांगलीं होतीं. बिस्किटाच्या पिठाचें वेष्टन करून त्यामधून आइस्क्रीम देण्याची येथें पद्धत आहे. हीं वेष्टनें कशीं तयार करतात त्याचें प्रात्यक्षिक त्यांनीं आम्हांस दाखविलें व या धंद्याबद्दल इतर बरीचशी माहिती त्यांनीं आम्हांस दिली. दुकानांतील एका बाईला इंग्रजी येत असल्यामुळें आमचें काम सोपें झालें.

११ जून ५४

आमच्या रोजच्या कार्यक्रमांत व्याख्यानानंतर श्रमदानाचा कार्यक्रम होता. डेन्मार्कमधील लोकशाळां(फोक हायस्कूल्स)च्या अभ्यासक्रमांत विद्यार्थ्यांच्या श्रमदानाला एक निश्चित असें महत्त्वाचें स्थान आहे. आमच्या विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मॅनिकी यांचा असा आग्रह आहे कीं, आम्ही पण रोज थोडें श्रम-दान करावें. आमच्यापैकीं जे तरुण व ताकदवान होते, त्यांनीं आमच्या वसति-गृहाच्या अंगणांतील एक जागा साफ करण्याचें काम पत्करलें. या जागेवर पुढें एक थिएटर बांधण्याचा डॉ. मॅनिकी यांचा विचार आहे. आमच्यापैकीं श्रमदानाची संवय नसलेले, जरा वयानें व शरीरानें मोठे अशा लोकांचा दुसरा वर्ग आहे. त्यांच्याकडे स्ट्रॉबेरीच्या झाडांजवळ वाढलेलें गवत उपटून काढण्याचें काम आहे. आमच्यापैकीं तिसरा वर्ग असा आहे कीं, त्यांना बाहेर जाऊन उघड्यावर काम करणें आवडत नाहीं. आम्हीं राहात असलेल्या अपक्क अन्न-शालेंत आमची जेवणाची व्यवस्था नीट झाली नव्हती. आम्ही येथें आल्याला आतां आठदहा दिवस झाले होते. निवासस्थानांतील बायांशीं आमचा चांगला परिचय झाला होता. आमच्यापैकीं कोणी स्वयंपाकघरांत जाऊन आम्हांला आवडणारे पदार्थ

चनविण्याचें काम करतील, तर जरूर ती मदत द्यायला त्या बाया आतां तयार झाल्या होत्या. श्री. धार (आमचे दादा) व श्री. गौडा या दोघांनीं हें बल्लवाचार्याचें काम पसंत केलें. आपल्या मदतीला एकदोन आमच्यांतील मदतनीस घेऊन त्यांनीं स्वयंपाकघरांत श्रमदानाला सुरुवात केली. याप्रमाणें आमचें श्रमदान रोज व्यवस्थित सुरू झालें. पहिल्या दिवशीं स्ट्रॉबेरीच्या बाजूचें गवत उपटतांना गवत व स्ट्रॉबेरीचीं रोपें यांतील फरक न समजल्यामुळें मी गवतापेक्षां स्ट्रॉबेरीचीं रोपेंच जास्त उपटलीं. माझें हें दुष्कृत्य पाहून तेथील बागवान धावत आला व त्यानें माझी चूक सुधारली.

१२ जून ५४

आज आमच्या कॉलेजला भेट देण्यासाठीं नॅटो (NATO) तर्फें बारा वार्ताहरांची भेट होणार होती. यामुळें सकाळपासून आमचे प्राचार्य डॉ. मॅनिकी यांची खूप धांदल उडाली होती. हे वार्ताहर दुपारीं ३।-३॥ च्या सुमारास शाळेमध्यें आले. या मंडळींना आपल्या संस्थेचा परिचय करून देण्यासाठीं डॉ. मॅनिकी यांनीं या पाहुण्यांना व विद्यालयांतील सर्व विद्यार्थ्यांना एके ठिकाणीं गोळा केलें. या वार्ताहरांमध्यें दोन स्त्रिया होत्या. प्रारंभीं डॉ. मॅनिकी यांनीं पाहुण्यांचें खूप उत्साहानें स्वागत केलें व नंतर आपल्या विद्यालयाविषयीं त्यांना माहिती सांगितली. ते म्हणाले, "इंटरनॅशनल पीपल्स कॉलेज, एल्सिनोर १९२१ सालीं स्थापन झालें. पहिल्या महायुद्धानंतर देशोदेशांतील तेढ कमी व्हावी या हेतूनें निरनिराळ्या देशांतील विद्यार्थ्यांना एके ठिकाणीं आणावें व त्यांना एकत्र अभ्यास करण्याची संधि द्यावी या हेतूनें ही संस्था स्थापन करण्यांत आली. पहिल्या महायुद्धानंतर राजकीय व आर्थिक क्षेत्रांत आंतरराष्ट्रीयत्व वाढविण्याचा प्रयत्न सुरू झाला. परंतु जोंपर्यंत वेगवेगळ्या देशांतील माणसांमध्यें आंतरराष्ट्रीय ऐक्याची भावना वाढीला लागत नाहीं, तोंपर्यंत राजकीय व आर्थिक क्षेत्रामध्यें आंतरराष्ट्रीयत्वाची कल्पना यशस्वी होणें शक्य नाहीं. पहिल्या महायुद्धानंतर सर्व राष्ट्रांना एके ठिकाणीं आणणारी 'लीग ऑफ नेशन्स' ही संस्था स्थापन झाली. युद्धाच्या आपत्तीनें गांजलेली वेगवेगळ्या देशांतील जनता 'लीग ऑफ नेशन्स'कडे आशाळभूतपणें डोळे लावून राहिली; परंतु जोंपर्यंत शिक्षणानें

जनतेच्या हृदयांमध्यें आंतरराष्ट्रीयत्वाची भावना वाढीला लागली नाहीं तोंपर्यंत शांततेबाबतच्या अपेक्षा यशस्वी होणार नाहींत. ज्याप्रमाणें डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे इत्यादि स्कॅन्डिनेव्हियांतील देशांतील लोकांच्या मनांमध्यें एकमेकांबद्दल आपुलकी वाटत आहे अशीच आपुलकी जगांतील सर्व राष्ट्रांतील लोकांना एकमेकांबद्दल वाटावी. प्रत्येक देशांतील लोकांना इतर देशांतील लोकांच्या अडचणी, आशा-आकांक्षा चांगल्या रीतीनें समजाव्यात व अशा रीतीनें एकमेकांची ओळख नीट झाल्यावर, जगामध्यें कोठेंही युद्धाची ठिणगी उडणें अशक्य व्हावें, या हेतूनें हें विद्यालय स्थापन करण्यांत आलें आहे. स्कॅन्डिनेव्हियन देशांतील लोकशाही यशस्वी करण्याकरितां, तेथील लोकशाळांनीं जसें मोलाचें यशस्वी कार्य केलें त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीयत्वाचा विकास करण्याकरितां, आंतरराष्ट्रीय बंधुभाव वाढविण्याकरितां व आंतरराष्ट्रीय लोकशाही यशस्वी करण्याकरितां योग्य असे स्त्रीपुरुष निर्माण करण्याच्या हेतूनें मीं हें 'इंन्टरनॅशनल पीपल्स कॉलेज' स्थापन केलें. गेल्या तीसपस्तीस वर्षांमध्यें जगांतील सर्व राष्ट्रांचा या संस्थेशीं संबंध आला आहे. आमचे मित्र आज जगभर पसरलेले आहेत."

डॉ. मॅनिकी यांचें भाषण त्या वार्ताहरांच्या अपेक्षेप्रमाणें खूप लांबलेलें दिसलें. कारण डॉ. मॅनिकी बोलत असतांनाच त्यांच्यापैकीं एकजण उठून म्हणाला, "डॉक्टर, आम्हांला आतां गेलें पाहिजे. आम्हांला पुढें कामें आहेत. आम्हीं आपल्याला दिलेला वेळ संपला आहे." त्यांची जाण्याची वेळ झाली होती. सौजन्याला धक्का न लावतां जेवढा वेळ बसतां येईल तेवढा वेळ बसण्याचा त्यांनीं प्रयत्न केला होता. सभा संपली. त्या वार्ताहरांनीं कांहीं छायाचित्रें घेतलीं. हीं छायाचित्रें घेतलीं जात असतांना भारतीय मित्रांशीं चारदोन गोष्टी ते बोलले व झटकन बसमधून निघून गेले. त्यांच्या या वागण्यानें डॉ. मॅनिकी यांची खूप निराशा झाली असें त्यांच्या चेहऱ्यावरून दिसलें.

१३ जून ५४

आज रविवार. रविवारीं येथें सर्व कामकाज बंद असतें. दुकानें सुद्धां बंद. डेन्मार्कमधील लोकांना सहलींची फार आवड. रस्त्यावरून सायकलींच्या रांगांच्या रांगा सहलीला निघालेल्या आढळतील. मोटरवाल्यांची तशीच गर्दी. आपल्या

मुलांमाणसांना घेऊन रविवारचा दिवस घराबाहेर काढण्याची या देशांत प्रथा आहे.

आज आमची सहल मात्र कुठें निघाली नाहीं. परदेशांत रविवारीं एक काम करावें लागतें तें म्हणजे आपले कपडे धुणें. परदेशांत कपड्यांच्या धुलाईचा खर्च फार येतो. सुती कपडे सहसा कोणी दुकानांत धुवायला पाठवीत नाहींत. हे लोक आपले सुती कपडे घरींच धुतात व स्वतःच कपड्यांना इस्त्री करतात. आम्हांला पण आमचे सुती कपडे दुकानांत धुवायला पाठविणें परवडणारें नव्हतें. त्यामुळें रविवारीं कपडे धुण्याचा कार्यक्रम करणें प्राप्त होतें. सकाळची वेळ त्यांत गेली. दुपारीं आमच्या विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची एक सभा होती. या सभेला आम्हांला पण आमंत्रण होतें. सभा संपल्यावर विविध गुणदर्शनांचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमांत डॅनिश, स्विस, नॉर्वेजियन, फ्रेंच, इंग्लिश इत्यादि देशांतील विद्यार्थ्यांनीं आपआपले कार्यक्रम करून दाखविले. डॅनिश, स्वीडिश आणि फ्रेंच या लोकांचे कार्यक्रम आम्हांला खूप आवडले. आम्हीं भारतीयांनीं पण या कार्यक्रमांत भाग घेतला व एकदोन गाणीं त्यांना ऐकवलीं.

परदेशांत जाणाऱ्या आमच्या भारतीय मित्रांनीं कांहीं गोष्टी लक्षांत ठेवायला पाहिजेत. त्यांचा उल्लेख ओघाओघानें येईलच. परंतु सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी कीं, येथून जाणाऱ्या मित्रांना एक अर्धा तासपर्यंत तरी तेथील लोकांची करमणूक करतां आली पाहिजे. कांहीं नकला, लोकगीतें, लोकनृत्यें, एखादें वाद्य वाजवितां येणें, कांहीं अभिनय करून दाखविणें यांपैकीं कांहीतरी कला आपल्याजवळ असली पाहिजे. या करमणुकीच्या कार्यक्रमांच्या वेळीं दुसऱ्यांना हसविण्याची कला किंवा ताकद जर तुमच्याजवळ असेल, तर तुम्ही खूप लोकप्रिय ठरतां. या बाबतींत आमच्यापैकीं पुष्कळजण परदेशी मित्रांचा अपेक्षाभंग करतात. आम्ही सतरा भारतीय होतों, पण आमच्यापैकीं एकहीजण कलावान नव्हता. येथून पुढें असले कार्यक्रम करण्याची पाळी आमच्यावर नेहमींच येईल व कांहींतरी कार्यक्रम बसवून ठेवला पाहिजे याची आम्हांला प्रकर्षानें जाणीव झाली. आमच्यापैकीं राजस्थानी शर्मांना कांहीं मेवाडी लोकगीतें येत होतीं. गारगोटींच्या साव्यांचा आवाज चांगला होता. त्यांना दोनचार भावगीतें पाठ येत होतीं. शांतिनिकेतनमधील धार बंगाली गीतें म्हणू शकत होते, तर बिहारचे प्रसिद्ध नारायण शर्मा

भोजपुरी व मैथिली लोकगीतें म्हणूं शकत होते. आजच्या कार्यक्रमानंतर माझ्या खोलींत भरलेल्या अनौपचारिक सभेंत वरील सामग्रीच्या जोरावर आपलें कलापथक उभारावयाचें ठरलें.

१४ जून ५४

आज सकाळीं व्याख्यानें नव्हतीं. आज आम्ही डेन्मार्कमधील एका इतिहासप्रसिद्ध स्थळाला भेट देण्याकरितां निघालों. या शहराचें नांव "रॉस्कीलडा". या ठिकाणीं मोठें कॅथिड्रल-चर्च आहे. डेन्मार्कमधील सर्व राजांची ही दफनभूमि आहे. राजघराण्यांतील सर्व लोकांचीं प्रेतें शवपेटिकांतून येथें ठेवण्यांत आलीं आहेत व त्यांवर उत्तम कलात्मक अशीं थडगीं बांधण्यांत आलीं आहेत. डॅनिश स्थापत्याचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून या चर्चकडे येथील लोक अभिमानानें बोट दाखवितात. या चर्चच्या भिंतींवर लांकडांमध्यें येशू ख्रिस्ताचें संपूर्ण चरित्र कोरलेलें पाहावयास मिळतें. गेल्या महायुद्धाच्या वेळीं शत्रूंच्या बॉंब-हल्ल्यापासून वांचविण्यासाठीं या चर्चमधील सर्व चांगल्याचांगल्या वस्तू येथून दूर नेऊन भुयारामध्यें ठेविल्या होत्या. डेन्मार्कचें राज्य पुन्हा तेथील लोकांच्या हातीं आल्यावर अज्ञातवासांत पडलेल्या या वस्तु पुन्हां: स्थानापन्न झाल्या.

या ठिकाणीं आम्हांला डेन्मार्कच्या मार्गारेट राणीचें थडगें पाहायला मिळालें. ही डेन्मार्कची राजकन्या. तिनें नॉर्वे देशाच्या राजाशीं लग्न केलें. ऐन तारुण्यांत विसाव्या वर्षी तिला वैधव्य आलें. या राजाला मुलगा नव्हता. नॉर्वेजिअन लोकांनीं मार्गारेटला आपली राणी बनविलें. कांहीं वर्षांनीं डेन्मार्कच्या गादीवर असलेले तिचे वडील वारले. त्यांनाही मुलगा नव्हता. तेथील जनतेनें पण राणी म्हणून मार्गारेटची निवड केली. अशाच आपत्तींत सांपडलेल्या स्वीडननें पण मार्गारेटलाच आपली राणी म्हणून पसंत केलें. यामुळें डेन्मार्क, स्वीडन व नॉर्वे हे स्कॅन्डिनेव्हियांतील तीन देश एका छत्राखालीं आले. याचा परिणाम असा झाला कीं, या तीन देशांतील लोकांमध्यें एकमेकांबद्दलचा बंधुभाव वाढीला लागला. आज या तीन देशांचीं तीन स्वतंत्र राज्यें असलीं, तरी या तिन्ही देशांत फार चांगले संबंध असल्याचें आढळून येतें. हे तिन्ही देश फार लहान आहेत. आजच्या धकाधकीच्या मामल्यांत या लहान लहान देशांना स्वतंत्रपणें

जगतां येणें फार कठीण आहे. परंतु या तिन्ही देशांनीं आपली खूप भरभराट करून घेतली आहे. आदर्श अशी लोकशाही राजव्यवस्था या तिन्ही देशांत निर्माण झाली आहे. पण गेल्या महायुद्धांचा यांना अत्यंत कटु अनुभव आला आहे. युरोपामध्यें कोठेंही युद्ध भडकलें, तरी त्या युद्धाच्या स्थंडिलावर पहिले यांचे बळी देण्यात येतात. ही गोष्ट गेल्या महायुद्धानें या लोकांना चांगली पटवून दिली आहे. त्यामुळें आपल्या तिन्ही देशांमध्यें बंधुभाव निर्माण व्हावा, तिन्ही देशांनीं एकत्र यावें, आपले प्रश्न एकमेकांच्या मदतीनें सोडवावेत व आपली अशी एक संघटना निर्माण करावी, असा प्रयत्न या देशांतील जाणत्या लोकांनीं आज येथें चालविला आहे.

आज आम्हीं एका शाळेला पण भेट दिली. या शाळेला 'कन्सॉलिडेशन स्कूल' असें म्हणतात. या शाळेंत सात ते चौदा वर्षांचीं मुलें येतात. डेन्मार्क-मध्यें मुलें चौथी पास झालीं कीं त्यांची शैक्षणिक पाहणी करण्यांत येते. या वेळीं मुलें साधारण बारा वर्षांचीं असतात. जीं मुलें चांगलीं असतात, त्यांना बौद्धिक शिक्षणावर भर असलेल्या शाळांत पाठविण्यांत येतें व इतरांना व्याव-सायिक शिक्षणशाळांत पाठविण्यांत येतें. साधारणपणें चाळीस टक्के मुलें पहिल्या प्रतीच्या शाळेंत जातात व साठ टक्के मुलें दुसऱ्या प्रतीच्या शाळेंत जातात. ही शाळा पाहून आम्ही परत आमच्या निवासस्थानीं आलों. तेथें आल्यावर असें समजलें कीं, आमच्याबरोबर असलेले बिहारचे श्री. चौधरी यांना इस्पि-तळांत नेण्यांत आलें आहे. श्री. चौधरी यांना मूळव्याधीचा त्रास होत होता. म्हणून त्या दिवशीं ते आमच्याबरोबर आले नव्हते. डॉक्टरांना बोलावून त्यांची प्रकृति दाखवा, असें डॉ. मॅनिकींना सांगून आम्ही बाहेर गेलों होतों. डॉक्टर आले ते रोग्याला इस्पितळांतच घेऊन गेले. आमच्या गैरहजेरींत श्री. चौधरी यांना इस्पितळांत जावें लागल्यानें ते खूप घाबरले असतील असें मला वाटलें. आमच्या संघाचा सेक्रेटरी म्हणून त्यांचा तातडतोब तपास करणें जरूर होतें. हें इस्पितळ येथील नगरपालिकेनें चालविलेलें आहे. 'मला श्री. चौधरींची भेट घेतां येईल का' असें मीं तेथील अधिकाऱ्यांना टेलिफोनवरून विचारलें. 'श्री. चौधरी बरे आहेत; आपण त्यांना सकाळीं भेटलांत तरी चालेल.' असें त्यांनीं कळविल्यामुळें मी इस्पितळांत जाऊं शकलों नाहीं.

१५ जून ५४

आज सकाळीं उठल्यावर चौधरींना जाऊन भेटण्याचा निश्चय केला. व्याख्याना-नंतर चौधरींची भेट घेतली. त्यांच्या डॉक्टरांना पण भेटलों. त्यांना चारपांच दिवस इस्पितळांत राहावें लागेल, असें डॉक्टरनीं सांगितलें. इस्पितळाची व्यवस्था फार चांगली दिसली. येथील लोक आपली खूप आपुलकीनें व आस्थेनें विचारपूस करतात व चांगली काळजी घेतात, असें श्री. चौधरींनीं सांगितलें.

आमच्या बंगाली मित्रांनीं आज देशबंधु चित्तरंजनदास यांची पुण्यतिथि असल्याची आठवण करून दिली. यानिमित्त आम्हीं एक छोटा कार्यक्रम आंखला. आमच्या वसतिगृहांतील व विद्यालयांतील कांहीं मंडळींना आम्हीं आमंत्रण दिलें. बंगालचे श्री. निखिलरंजन रॉय यांनीं देशबंधु दास यांचें चरित्र व जीवनकार्य याविषयीं माहिती सांगितली. त्यानंतर एक बंगाली प्रार्थना झाली व नंतर सर्वांनीं मिळून ' वंदे मातरम् ' गीत गायिल्यावर हा कार्यक्रम संपला.

आज घरून पत्र आलें. दोन तारखेला मीं घर सोडलें होतें. गेल्या पंधरा दिवसांत घरची व भारतांतील कांहींच बातमी समजली नव्हती. एल्सिनोर हे कोपनहेगनपासून अगदीं जवळ असूनसुद्धां येथें एकही इंग्रजी भाषेंतील वर्तमानपत्र येत नाहीं, ही आश्चर्याची गोष्ट. सर्व वर्तमानपत्रें डॅनिश भाषेंतील. आम्हांला जरी डॅनिश येत नव्हतें तरी वर्तमानपत्र आम्ही नित्यनियमानें चाळत होतों. एखाद्या बातमीच्या प्रारंभीं इंडिस्के (इंडिया) हा शब्द आढळला तर पुढील बातमी आपण कोणाकडून तरी वाचून घेऊं, या आशेनें आम्ही वर्तमानपत्र चाळीत होतों. परंतु असा योग फारच क्वचित् येई. त्यामुळें घरचें पत्र आल्यावर घरची जशी बातमी समजली तशी भारतांतील पण कांहीं बातमी समजली. त्यामुळें आनंद झाला. आपण परदेशांत असलों कीं आपल्या देशाविषयींच्या हकीकती ऐकून घेण्यासाठीं खूप आतुर बनतों, व आपल्या देशाबद्दल कांहीं ऐकायला मिळालें कीं घरचा मित्र अथवा नातेवाईक भेटल्यानें जो आनंद होतो तसाच आनंद ही बातमी ऐकून आपणांस होतो.

१६ जून ५४

आज सकाळीं एल्सिनोरमधील नगरपालिकेनें चालविलेल्या प्राथमिक शाळांना

भेट दिली. डेन्मार्कमध्यें प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांनीं स्वीकारलेली आहे. प्राथमिक शाळांच्या इमारती माध्यमिक शाळांच्या इमारतींपेक्षां देखील पुष्कळदां खूप चांगल्या असल्याचें आढळून येतें. एल्सिनोर येथें नगरपालिकेव्यतिरिक्त इतर कोणत्याही संस्थेनें चालविलेली प्राथमिक शाळा नाहीं. डेन्मार्कमध्यें सात ते चौदा वयाच्या मुलांना सक्तीनें शिक्षण देण्याची सोय करण्यांत आली आहे. या सक्तीच्या योजनेचें एक वैशिष्ट्य आहे. एखाद्या पालकाला आपल्या ७ ते १४ वयाच्या मुलाला शाळेंत पाठवावयाचें नसलें, तर त्या मुलाला शाळेंत धाडण्याबाबत त्याच्यावर सक्ती नाहीं. त्यानें आपल्या मर्जीप्रमाणें मुलाचें खाजगी रीतीनें शिक्षण चालवावें, अशी त्याला मुभा आहे. पण या बाबतींत सरकारचा एक निर्बंध मात्र त्यानें पाळला पाहिजे. त्या ठिकाणीं जी माध्यमिक शाळा असेल, त्या शाळेच्या मुख्याध्यापकाकडे आपल्या मुलाला वर्षाच्या शेवटीं नेऊन सदर मुलाचें शिक्षण सरकारी अभ्यासक्रमाला धरून केलें जात आहे, असा दाखला त्यानें त्या मुख्याध्यापकाकडून मिळविला पाहिजे. अशा प्रकारें खाजगी रीतीनें अभ्यास करणाऱ्या आपल्या विभागांतील सर्व विद्यार्थ्यांची नोंद या मुख्याध्यापकानें ठेविली पाहिजे. ७ ते १४ वयाच्या मुलांना शिक्षण मिळालेंच पाहिजे, एवढाच सरकारचा कटाक्ष आहे. मुलाला शिक्षण देण्याचें संपूर्ण स्वातंत्र्य सरकारनें आईबापांना दिलें आहे.

आज दुपारीं डेन्मार्कबाबत आम्हीं कांहीं फिल्म्स पाहिल्या. त्यांतील एक फिल्म "डेन्मार्कचें आपल्याला आमंत्रण आहे" (Denmarks calls you) ही आम्हांला खूप आवडली. या फिल्ममध्यें डेन्मार्कनें निरनिराळ्या क्षेत्रांत गेल्या कित्येक वर्षांत जी प्रगति केली, त्यांची आकर्षक माहिती पाहायला मिळाली. दुसरी एक फिल्म आम्हीं 'डॅनिश लोकशाळां' विषयीं पाहिली. गेल्या शंभर वर्षांत येथील लोकशाळांनीं जें प्रशंसनीय कार्य केलें, त्याची संपूर्ण माहिती या फिल्ममध्यें चित्रित करण्यांत आली होती. येथील लोकशाळांच्या क्षेत्रांत महत्त्वाचें काम करणारे श्रीयुत नवरुप यांचें व्याख्यान ऐकण्याची आज संधि मिळाली. लोकशिक्षणाच्या क्षेत्रांतील एक नाणावलेले प्राचार्य म्हणून सबंध युरोप खंड आज नवरुपांना आदरानें ओळखीत आहे. त्यांचें व्याख्यान खरोखरच उद्बोधक झालें. आम्ही लवकरच त्यांची शाळा पाहायला जाणार आहोंत.

१७ जून ५४

नेहमींप्रमाणें आज व्याख्यानांचा कार्यक्रम होऊं शकला नाहीं. आमच्या विद्यालयाच्या कार्याचें टेलिव्हिजनसाठीं चित्रण करण्याकरितां तेथील लोक येणार होते. त्यामुळें सकाळपासून डॉ. मॅनिकींची खूप धांदल उडाली होती. या कार्यक्रमांत भारतीय विद्यार्थ्यांनीं कांहीं गाणीं वगैरे गाऊन भाग घ्यावा, असा डॉ. मॅनिकी यांचा आग्रह होता. आम्हीं या कार्यक्रमाकरितां एक साधें गाणें व "वैष्णव जन तो" हें प्रार्थनागीत मुद्दाम बसविलें होतें. शाळेंतील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी आपआपल्या देशांतील वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम तयार करून आपली पाळी केव्हां येते याची उत्सुकतेनें वाट पाहात होतीं. पावसाची झिमझिम सारखी चालू होती. त्यामुळें जें काम एरव्हीं तासाभरांत झालें असतें त्याकरितां चार तास खर्चीं पडले. जरासा पाऊस थांबला, प्रकाश दिसला, कीं कॅमेरावाले धडपडीनें पुढें येत; पण पुन्हा आकाश ढगाळलें, कीं बाजूला जाऊन सिगारेट ओढीत बसत. भारतांत असतांना या फिल्मी दुनियेंत पाऊल टाकण्याची संधि कधींच मिळाली नव्हती. त्यामुळें हा सर्व अनुभव नवा व अपूर्व असा वाटला.

आज विशेष उल्लेख करण्यासारखी एक दुसरी घटना घडली. ऑस्ट्रेलियांत जातांना एक खादीची छानशी फेल्ट हॅट मीं करवून घेतली होती. भारतांत ती वापरण्याची कधीं जरूर पडली नाहीं. पण डेन्मार्कला जातांना ही ठेवणींतली हॅट मीं बरोबर घेतली होती. श्रीयुत गौडांना ही हॅट खूप आवडली. मीं त्यांना ती बक्षिस द्यावी, असें त्यांनीं सुचविलें. ही हॅट मला आवडत असूनसुद्धां कोणतेही आढेवेढे न घेतां मीं ती श्री. गौडांना बक्षिस दिली. सात तारखेला आम्ही ज्या वेळीं दिवसभर बसनें हिंडलों त्या वेळीं ती हॅट श्री. गौडांच्या डोक्यावर होती. पण येतांना ते ती हॅट बसमध्यें विसरले. तारीख ८ ला ही गोष्ट लक्षांत येतांच बस कंपनीला टेलिफोन करून आम्हीं हॅटचा तपास केला. कंपनीच्या लोकानीं 'आज हॅट येथें नाहीं; आम्ही तपास करतों; आपलें नांव व पत्ता व हॅटचें वर्णन सांगा' असें सुचविलें. जरूर ती माहिती आम्हीं त्यांना पुरविली. हॅट हरवलेल्याला एक आठवडा लोटल्यामुळें ती पुन्हा मिळण्याच्या बाबत आम्हीं जरासुद्धां आशा बाळगली नव्हती. किंबहुना आपली एक हॅट होती व ती हरवली, ही गोष्ट सुद्धां मी विसरून गेलों होतों. परंतु आज खोलींत पाऊल

टाकतांच माझी हॅट, माझ्या खोलींतील टेबलावर, माझी वाट पाहात उभी असल्याचें पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला. चौकशीअंतीं असें कळलें कीं, बस कंपनीनें प्रयत्नपूर्वक तपास करून ती हॅट शोधून माझ्याकडे पाठविली. ती हॅट पाहून मनांत विचार आला कीं, जर ही हॅट मी माझ्या देशांतल्या बसमध्यें विसरलों असतों तर अशा रीतीनें ती परत आली असती का ?

आज रात्रीं कांहीं जर्मन विद्यार्थी-विद्यार्थिनींनीं ऑपेराचा संगीत कार्यक्रम करून दाखविला. हा कार्यक्रम आम्हांला खूप आवडला. जर्मन तरुणांचा तो उत्साह व आनंद पाहून आम्हांला अतिशय आश्चर्य वाटलें. गेल्या महायुद्धांत ज्या देशाला सर्वांनीं मिळून चारीमुंडे चीत करण्याची अहमहमिका चालविली होती, त्याच हतबल झालेल्या देशांतील नवजवानांनीं पुन्हा उत्साहानें आणि ध्येयवादानें स्वतःच्या पायांवर उभे राहण्याचा जो प्रयत्न चालविला आहे, तो पाहून खूप कौतुक वाटलें.

१८ जून ५४

आज श्रमदानासाठीं रोजचें काम न करतां मी स्वयंपाकघरांत काम करण्यासाठीं गेलों. भात चांगला कसा करावा, याचें प्रात्यक्षिक त्या बाईला दाखविण्याकरितां मी मुद्दाम तेथें गेलों होतों. डेन्मार्कमध्यें तांदुळ चांगला मिळे. पण त्यांना भात चांगल्या रीतीनें करतां येत नसे. स्वयंपाकघरांत गेलों असतांना तेथें स्वयंपाक करीत असलेल्या बाईशीं बोलतांना असें आढळून आलें कीं, ही बाई विश्वविद्यालयांत शिक्षण घेत आहे. फुरसतीच्या वेळीं ती स्वयंपाकिणीचें काम करते व अशा रीतीनें द्रव्यार्जन पण करीत असते. "Earn and learn" (कमवा आणि शिका) या तत्त्वाप्रमाणें परदेशांतील पुष्कळ विद्यार्थी वागतात व स्वतःच्या शिक्षणाचा खर्च पालकांवर न टाकतां तो स्वतःच परस्पर भागविण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारें द्रव्यार्जन करण्याला त्या देशांतील विद्यार्थ्यांना भरपूर संधि मिळूं शकते, हें सुद्धां येथें नमूद केलें पाहिजे. या बाईला आपल्या मातृभाषेखेरीज पांचसहा परदेशी भाषा येत होत्या, हें ऐकून तर मला आश्चर्यच वाटलें. एवढ्या मोठ्या विदुषीला एका हॉटेलांत स्वयंपाकिणीचें काम करण्यांत कोणताहि कमीपणा वाटत नव्हता. अत्यंत खेळीमेळीनें व कामसूपणानें

ती आपलें काम करीत असे. एके दिवशीं आमच्यापैकीं कांहीं जणांमध्यें बसून आमच्या येथील स्वयंपाकाच्या पद्धतीबाबत तिनें आस्थापूर्वक चौकशी केली व श्री गौडा व श्री धार यांच्या मदतीनें आम्हांला आवडतील असे पदार्थ बनविण्याचा ती प्रयत्न करूं लागली. त्या स्वयंपाकिणीचा सुसंस्कृतपणा पाहून आम्हांला आश्चर्य वाटलें.


१९ जून ५४

सकाळचीं व्याख्यानें झालीं व दुपारीं येथून वीस मैलांवर असलेल्या एका शेतकीच्या प्रायोगिक केंद्राला आम्हीं आज भेट दिली. या ठिकाणीं आम्हीं तेथील डेअरी पाहिली. डेन्मार्क हा दूधदुभत्याचा देश. प्रारंभींच्या काळांत डेन्मार्कनें खूप मोठ्या प्रमाणांत इंग्लंडांत धान्याची निर्यात केली; पण पुढें निरनिराळ्या देशांतून इंग्लंडला धान्य जाऊं लागलें. या धान्याच्या बाजारपेठेंत परकीय मालाबरोबर चढाओढ करणें कठीण आहे असें आढळून आल्याबरोबर, डेन्मार्कमधील शेतकऱ्यांनीं धान्यांचें उत्पादन कमी करून दूधदुभत्याचें उत्पन्न वाढविलें. त्यांनीं आपल्या गाई व आपलीं डुकरें यांची खूप परिश्रमपूर्वक काळजी घेण्यास सुरुवात केली. याचा परिणाम असा झाला कीं, डेन्मार्कला खूप मोठ्या प्रमाणांत लोणी, चीज, मांस व बेकन परदेशीं पाठवितां येणें शक्य झालें. या मालाच्या विक्रीच्या जोरावरच डेन्मार्कमधील शेतकरी आज एवढा सधन झाला आहे.

येथील शेतकऱ्यांना आपल्या गाईचें व डुकरांचें कौतुक फार. घरीं आलेल्या पाहुण्याला आपण ज्याप्रमाणें घरांतील चांगल्या चांगल्या वस्तू दाखवितों, त्याचप्रमाणें डेन्मार्कमधील शेतकरी पाहुण्याला त्यांच्या गाई व डुकरें दाखविण्याकरितां आग्रहानें घेऊन जातात. भारतांतील डुकरें पाहण्याचा आम्हांला सराव असल्यामुळें डुकरांबद्दल एक प्रकारची शिसारी आम्हांला वाटत होती. आम्ही ज्या वेळीं हीं डुकरें पाहायला त्यांच्या गोठ्यामध्यें शिरलों, त्यावेळीं आमच्यापैकीं कांहीं सोवळ्या माणसांनीं नाकाला रुमाल लावले. आमच्या लोकांचें हें वर्तन पाहून त्या डॅनिश शेतकऱ्याला आश्चर्य वाटलें असावें. कारण तो म्हणाला, "तुम्ही डुकरें पाहून नाकाला रुमाल लावतां, पण या डुकरांची आम्हांला खूप किंमत वाटते. आमच्या घरांतील रेडिओ व चांगलें फर्निचर या डुकरांमुळेंच आम्ही

विकत घेऊं शकतों. आम्हांला डॉलर व पौंड मिळवून देणाऱ्या जिवंत बँका म्हणजे आमच्या गाई व आमचीं डुकरें."


डेन्मार्कमध्यें खूप चांगल्या गाई व डुकरें पाहावयाला मिळतात. आपण कोठेंहि गेलों तरी आपल्याला हिरवींगार कुरणें व त्या कुरणांवर चरणाऱ्या गाई मे ते आढळतील. डेन्मार्कमध्यें एकूण दूध देणाऱ्या सोळा लाख गाई आढळतील. सप्टेंबर हा गवताचा हंगाम असतो. त्या वेळेला सर्व कुरणें हिरवींगार असतात. या कुरणांमधून या गाई दिवसभर आरामशीरपणें चरत असतात. या गाईंची वरचेवर वैद्यकीय तपासणी केली जाते. डेन्मार्कमधील शेंकडा ९९·७ गाई क्षयरोगापासून मुक्त आहेत. त्यांना क्षयरोग होऊं नये म्हणून काळजी घेण्यांत येते. लाळेचे व खुराचे रोग होऊं नयेत म्हणून त्यांना टोचण्यांत येतें. गाईंची पैदास कृत्रिम पद्धतीनें होत असल्यामुळें छोट्या बैलांना जगविण्याची पद्धत येथें नाहीं. गाईला जर गोरा झाला तर त्याची चारपांच दिवसांच्या आंतच कत्तलखान्यांत रवानगी करण्यांत येते. त्याचप्रमाणें जी गाय वासरें देत नाहीं, अथवा दूध देत नाहीं, तिची पण रवानगी कत्तलखान्यांत केली जाते. या बाबतींत डॅनिश शेतकरी कधींहि भावनाप्रधान होत नाहींत. ज्या जनावरापासून अर्थोत्पादनाची आशा नाहीं त्याला तो फुकट खायला घालून जगवणार नाहीं. गाईच्या दुधामध्यें लोण्याचा अंश वाढविण्याच्या दृष्टीनें गाईला खुराक देण्यांत येतो. साधारणपणें हें लोण्याचें प्रमाण चार साडेचार टक्के पडतें. एक गाय वर्षाला सुमारें चारशें पौंड लोणी देते. शेतीच्या व्यवसायांत



डॅनिश शेतकऱ्याचें गोधन

गुंतलेल्या पुरुषांची, स्त्रियांची, मुलांची व म्हाताऱ्यांची एकूण संख्या पाहिली व लोण्याचें एकूण उत्पादन पाहिलें, तर त्याचें प्रमाण माणशीं तीनशेंचव्वेचाळीस पौंड इतकें पडतें. डेन्मार्कमधून निर्यात होणाऱ्या मालामध्यें लोण्याची निर्यात ही फार महत्त्वाची मानली जाते.

गाईप्रमाणेंच डुकरांची पण काळजीपूर्वक पैदास केली जाते. एका डुकरीणीला साधारणपणें सहापासून सोळापर्यंत पिलें होतात. नरपिलूं दोनशें दिवसांचें होईपर्यंत त्याची खूप काळजीनें जोपासना करण्यांत येते. त्याला स्किम्डदूध, ताक, बीट इत्यादि पदार्थ खायला घालून चांगल्या रीतीनें वाढविण्यांत येतें. त्या पिलाचें वजन २१० पौंड झालें कीं त्याची रवानगी सरळ कसाईखान्यांत केली जाते. या डुकरांच्या मांसापासून बेकन करण्यांत येतें. जगाच्या बाजारपेठेंत डेन्मार्कच्या बेकनला खूप मोठा भाव येतो. डेन्मार्कमध्यें एकूण ३२ लाख डुकरें आहेत.



डुकरें

या प्रायोगिक केंद्रांत दुसऱ्या दोन प्राण्यांची काळजीपूर्वक पैदास केली जात होती. त्यांपैकीं एकाचें नांव 'मिंग' आणि दुसऱ्याचें नांव 'सिल्व्हर फॉक्स'. या प्राण्यांच्या अंगावरील लोकरीला (Fur) परदेशांत खूप मागणी येते. विशेषतः हॉलीवुडमधील नटींना या फरचा फार शोक आहे. तो पुरविण्यासाठीं व अर्थात् त्यायोगें पैसे मिळविण्यासाठीं या प्राण्यांची काळजीपूर्वक जोपासना केली जाते.

हे प्रायोगिक केंद्र पाहून आम्ही आमच्या निवासस्थानीं आलों. आज आमच्या विद्यालयाला भेटण्यासाठीं १७० शेतकरी आजूबाजूच्या खेड्यांतून येथें आले होते. यांना शेतकरी कोण म्हणणार ! प्रत्येकाचे रुबाबदार कपडे, तोंडांत मोठा चिरूट किंवा पाइप व गळ्याभोवतीं लटकणारा कॅमेरा पाहिल्यावर, येथील शेतकरी किती संपन्न व सुखी आहेत, याची कल्पना आली. या लोकांच्यासाठीं

एक खास करमणुकीचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. आम्हीं पण या कार्यक्रमांत भाग घेतला. परंतु आज झालेल्या कार्यक्रमांत स्विस विद्यार्थ्यांचीं लोकनृत्यें मला खूप आवडलीं. कांहीं सांघिक खेळ पण झाले. आमच्यामध्यें खिलाडू वृत्तीचा अभाव आहे असें त्यांना वाटूं नये, म्हणून आमच्यापैकीं कांहींनीं या खेळांत भाग घेतला.

या ठिकाणीं एक बंगाली तरुण भेटला. तो मोठा धाडसी दिसला. प्रवासासाठीं पुरेसा पैसा नसतांना सुद्धां कुठें गाणें गाऊन, कुठें भाषणें करून, तर कुठें भीक सुद्धां मागून, त्यानें भारतापासून डेन्मार्कचा प्रवास केला होता. तो कधीं पायीं फिरला तर कधीं बोटींतून, तर कधीं कुणाच्या मेहरबानीनें खाजगी मोटारींतून, असा त्यानें प्रवास केला. रात्रीं माझ्या खोलींत येऊन आपल्या प्रवासाची रोमांचकारी हकीकत त्यानें मला ऐकविली. आतां त्याला सफाईदार डॅनिश बोलतां येतें. " एका फार चांगल्या देशांत तुम्ही आलां आहांत. या देशामध्यें जें कांहीं शिकतां येण्यासारखें आहे, तें तुम्ही शिका. विशेषतः एखादी कला अथवा व्यवसाय जर शिकतां आला तर शिकून घ्या. " आपल्या भारताला तुमच्यासारख्यांच्या अनुभवाची फारच गरज आहे, असें सांगून आम्हीं त्याला निरोप दिला.

२० जून ५४

दरवर्षीं इंग्लंडमधील एक नाटक कंपनी, ज्या किल्ल्यामध्यें हॅम्लेटची कथा घडली, त्या किल्ल्यामध्यें येऊन हॅम्लेट नाटकाचे प्रयोग करून दाखवीत असते. अशीच एक कंपनी येथें आली होती. आज रविवार असल्यामुळें आम्हीं सर्वांनीं हा प्रयोग पाहण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें क्रोनबर्ग किल्ल्यामध्यें जाऊन योग्य वेळीं हजर झालों. नाटकाचें थिएटर उघडें होतें (open-air). सर्व खुर्च्या एकाच प्रकारच्या होत्या. ज्यांनीं अधिक किंमतीचीं तिकिटें विकत घेतलीं होतीं त्यांना पुढील रांगेंत खुर्च्या मिळाल्या. तिकिटाच्या आकाराखेरीज चार-सहा आणे अधिक दिले, तर खुर्चीवर ठेवण्यासाठीं एक उशी मिळते. लाकडी खुर्चीवर उशी ठेवून बसायचें व नाटक संपल्यावर उशी तशीच टाकून निघून जायचें. जातांना प्रत्येक माणूस प्रामाणिकपणें आपली उशी जागेवर

ठेवून जातो. ही उशी जशी भाड्यानें मिळते, तसेंच नाटक पाहतांना पांघरण्यासाठीं गरम पांघरूण पण भाड्यानें मिळतें. त्याला चार-सहा आणे पडतात. नाटकाला गर्दी खूप होती. ह्या प्रयोगांचा गाजावाजा खूप झाला होता व हा पहिलाच प्रयोग असल्यानें गर्दी पण खूप झाली होती. ह्या रंगभूमीचें वैशिष्ट्य म्हणजे खुद्द स्टेजवर दिवे मुळींच नव्हते. स्टेजपासून तीस-चाळीस फूट अंतरावर दुतर्फा मोठे खांब उभारण्यांत आले होते व त्या खांबावरून स्टेजवर भरपूर प्रकाश सोडण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. नाटकाला सुरवात झाली, त्याच वेळीं आकाश खूप ढगाळलेलें होतें व विजा चमकत होत्या. थिएटर उघड्यावर असल्यामुळें कार्यक्रम कसा पार पडेल याची सर्वांना काळजी वाटत होती. नाटक सुरू झालें व पावसाची मोठी सर आली. लोकांची पांगापांग झाली. पडदा पडला. थोडा वेळ थांबून पुन्हां नाटक सुरू करण्यांत आलें. आपण दिलेला इषारा न मानतां उद्धटपणें आपल्या जागेवर बसून नाटक पाहण्याचा अट्टाहास करणाऱ्या लोकांचा वरुण राजाला राग आला असावा. निसर्गापुढें मानव लंगडा पडला. नाटक थांबलें. लोक घरोघर निघून गेले. सर्वांच्याप्रमाणें आमची पण खूप निराशा झाली. रंगभूमीवर पडलेला पडदा आमच्या आनंदावरच पडल्यासारखा वाटला.

२१ जून ५४

आम्हांला व्याख्यान देण्यासाठीं इंग्लंडमधील वेल्स विश्वविद्यालयाचे तज्ज्ञ प्राध्यापक डॉ. ग्रिफिथ यांचीं व्याख्यानें सुरू झालीं होती. पहिलीं दोनतीन व्याख्यानें कामगार मैदानावर होणाऱ्या व्याख्यानांसारखीं वाटलीं. पण आजचीं दोन्ही व्याख्यानें मात्र मला खूप आवडलीं. पूर्वेकडील देशांत जननसंख्येचें प्रमाण वाढत असल्यामुळें आंतरराष्ट्रीय राजकारणावर त्याचा कसा परिणाम होईल याची व्याख्यात्यानें कल्पना दिली. आपल्या दुसऱ्या व्याख्यानांत आंतरराष्ट्रीय राजकारणांत भारताला केवढें मोठें महत्त्वाचें स्थान मिळालें आहे व इतःपर जागतिक राजकारणाचीं सूत्रें युरोप खंडातून न हलतां तीं आशियांतून कशीं हालविलीं जातील याची त्यांनीं कल्पना दिली. आज लोक-शिक्षण मासिकासाठीं पहिला लेख येथून लिहून पाठविला.

२२ जून ५४


आज व्याख्यानें नव्हतीं. सकाळची न्याहारी झाल्यावर आम्ही फ्रेड्रिक्सबर्ग येथील राष्ट्रीय म्यूझियम पाहाण्याकरितां बाहेर पडलों. या ठिकाणीं एक किल्ला असून त्या किल्ल्यांतच म्युझियम आहे. इ. स. १५६२ दुसऱ्या फ्रेड्रिक राजानें हें स्थळ बांधलें. चौथ्या खिश्चन राजानें त्याची पुन्हा एकवार डागडुजी केली. इ. स. १८४० पर्यंत राजघराण्यांतील सर्व समारंभ येथेंच साजरे होत असत. आजसुद्धां या स्थळापैकीं कांहीं भाग डेन्मार्कच्या राजाकरितां राखून ठेवण्यांत आला आहे. एकदां मोठी आग लागली व यापैकीं काहीं भाग जळाला. तो पुन्हा व्यवस्थित बांधला जावा व जुन्या स्मृती जोपासल्या जाव्यात, म्हणून त्याची पुन्हा उभारणी करण्यासाठीं राजानें आपली देणगी दिली. हें काम खूप खर्चाचें होतें. म्हणून जनतेजवळूनसुद्धां पैसा गोळा करण्याचें ठरलें. एक लॉटरी उभारण्यांत आली व लोकांनीं योग्य असा हातभार लावला. डेन्मार्कमध्यें बीअर तयार करण्याचे दोन अतिशय मोठे कारखाने आहेत. त्यांपैकीं एका कारखान्यानें वाङ्मयाचा व कलेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना भरपूर शिष्यवृत्त्या देण्याचा उपक्रम गेलीं कित्येक वर्षे चालविला आहे तर दुसऱ्या कारखान्यानें शास्त्रीय संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करण्याची जबाबदारी पत्करली आहे. वरील म्यूझियमसाठीं जेव्हां पैसा उभारण्यांत आला तेव्हां या बिअरच्या कारखान्यांनीं त्या कामीं चांगलीच मदत केली. हा म्यूझियम खरोखरीच फार प्रेक्षणीय आहे.



लोकशाळांचा जनक रे. फादर ग्रुंडरविग

हा म्यूझियम पाहून झाल्यावर डेन्मार्कमधील एक प्रख्यात लोकशाळा पाहण्यासाठीं आम्ही गेलों. या लोकशाळेचें नांव 'ग्रुंडरविग फोक

हायस्कूल.' डेन्मार्कमधील लोकशाळांची मूळ कल्पना रेव्हरंड एन्. एफ्. ग्रुंडरविग यानें तेथील जनतेपुढें मांडली. तो एक मोठा कवि, साहित्यिक, शिक्षणशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञानी होता. बिशप ग्रुंडरविग या नांवानें तो प्रसिद्ध होता. परंतु त्याला 'लोकशाळांचा जनक' म्हणून ओळखलें जातें. तो इ. स. १७८३ मध्यें जन्मला व १८७२ मध्यें मरण पावला. डेन्मार्कमधील पहिली लोकशाळा १८४४ सालीं स्थापन झाली.



ग्रुंडरविगच्या नांवानें बांधलेल्या चर्चचें दृश्य

आज आम्हीं पाहिलेली लोकशाळा ग्रुंडरविगचें स्मारक करण्याकरितां बांधलेली होती. ग्रुंडरविगला एक पंचवीस-तीस हजार रुपयांची थैली लोकांनीं अर्पण केली होती. या पैशांतूनच १८५६ सालीं ही शाळा बांधण्यांत आली. लोकशाळेमध्यें वर्षांतून दोन सत्रें चालतात. पहिलें सत्र उन्हाळ्यामध्यें भरतें. मे, जून व जुलै या तीन महिन्यांत पहिलें सत्र चालतें. उन्हाळी सत्र हें स्त्रियांचें सत्र असतें. या वेळीं येथील बायकांना काम कमी असतें. म्हणून या सत्रामध्यें शिक्षण घेण्यासाठीं त्या लोकशाळेंत येतात. लोकशाळेंत खास स्त्रियांसाठीं शिवणकाम, झगे तयार करणें, गृहव्यवस्था राखणें, बालकांचें संगोपन करणें, इत्यादि स्त्रियांच्या जिव्हाळ्याच्या विषयांवर व्याख्यानें देण्यांत येतात. लोकशाळेंतील विद्यार्थ्यांना अभ्यासाचीं ठराविक पुस्तकें नसतात, परीक्षा नसते, प्रमाणपत्रें नसतात, किंवा पदव्या नसतात. तेथील प्राचार्य व अध्यापक आपल्या अनुभवाचे बोल विद्यार्थ्यांना ऐकवीत असतो. जिवंत शब्दांमार्फत विद्यादान केलें जातें. शिक्षकांजवळ असलेलें प्रभावी व्यक्तिमत्त्व विद्यार्थ्यांना स्फूर्ति देण्याचें काम करीत असतें. या शाळांना सरकारी मदत मिळते. पण त्या सर्व खाजगी व्यक्तींनीं व

अनुभवी शिक्षकांनीं चालविलेल्या असतात. या शाळांची उपयुक्तता लक्षांत घेऊन सरकार त्यांना हरएक प्रकारची मदत करतें. पण सरकार त्यांच्या अंतर्गत कारभारांत कोणत्याहि प्रकारची ढवळाढवळ करीत नाहीं. आपल्या कल्पनेप्रमाणें आपल्या कामाची आंखणी व अंमलबजावणी करण्याचें संपूर्ण स्वातंत्र्य या लोकशाळांच्या प्राचार्यांना मिळालेलें आहे.

या लोकशाळांमध्यें पुरुषांचें सत्र हिवाळ्यांत सुरू होतें. यावेळीं शेतांवर काम कमी असतें. थंडी कडाक्याची पडते. लोक जास्तींत जास्त वेळ घरामध्येंच घालवितात. हा काळ शेतकऱ्यांना अभ्यासाच्या दृष्टीनें अनुकूल वाटतो. हें सत्र नोव्हेंबरमध्यें सुरू होतें व एप्रिलमध्यें संपतें. डेन्मार्कमधील शेतकरी आपल्या आयुष्यांत केव्हां ना केव्हांतरी लोकशाळेंत जाऊन शिक्षण घेण्यास उत्सुक असतो. त्याच्या आजोबानें लोकशाळेंत शिक्षण घेतलें होतें, वडिलांनीं घेतलें होतें, व त्याची आई पण लोकशाळेंत जाऊन आली होती. त्यामुळें तो पण लोकशाळेंत जाण्याची वाट पाहात असतो. या लोकशाळेंत येणाऱ्या विद्यार्थ्यांना फी भरावी लागते. सत्र चालू असतांना त्यांना वसतिगृहांत राहावें लागतें, खाण्यापिण्याचा खर्च करावा लागतो. ज्यांची आर्थिक परिस्थिति चांगली नसते त्यांना सरकारतर्फे शिष्यवृत्ति मिळते. साधारणपणें शेकडा ६० टक्के लोकांना अशी मदत मिळत असते. ही मदतीची रक्कम त्यांना भराव्या लागणाऱ्या फीच्या ७५ टक्केपर्यंत असूं शकते. डेन्मार्कमधील लोकशाळांचा गेल्या शंभर वर्षांचा इतिहास अत्यंत स्फूर्तिदायक आहे. १८४९ सालीं डेन्मार्कमध्यें लोकशाही स्थापन झाली. येथील लोकशाही जगामध्यें आदर्श मानली जाते. डेन्मार्क हें कोऑपरेटिव्ह सोसायट्यांचें माहेरघर. या कोऑपरेटिव्ह सोसायट्या येथें इतक्या चांगल्या रीतीनें चालूं शकल्या, येथील लोकशाही इतकी आदर्श होऊं शकली, या सर्वांचें श्रेय येथील लोकशाळांना देण्यांत येतें.

२३ जून ५४

२३ जून म्हणजे 'मिड्समर नाइट.' हा डेन्मार्कमधील अत्यंत आनंदाचा दिवस. वर्षांतील हा सर्वांत मोठा दिवस. या दिवशीं खूप वेळपर्यंत सूर्यनारायणाच्या दर्शनाचा लाभ लोकांना मिळतो. हा दिवस डॅनिश लोक एखाद्या मोठ्या

सणाप्रमाणें साजरा करितात. या दिवशीं सर्व लोक अतिशय आनंदांत असतात. साहजिकच आज आम्हांला व्याख्यानें ऐकावीं लागलीं नाहींत. दुपारीं एक चांगला करमणुकीचा कार्यक्रम आंखण्यांत आला होता. या कार्यक्रमाला नुकतीच सुरुवात झाली होती. आम्हीं पण कार्यक्रमांत भाग घेण्यासाठीं उत्साहानें पुढें झालों होतों. कार्यक्रम सुरू झाला, तोंच पांच-दहा मिनिटांत डॉ. मॅनिकी तेथें आले व त्यांनीं मला बाजूला बोलावून आपल्याबरोबर मोटारींत बसण्यास सांगितलें. नजीकच्या एका खेड्यावर 'मिडसमरचा' सण साजरा होणार होता. त्या ठिकाणचा सोहळा पाहण्यासाठीं ते मला व श्री गौडा यांना बरोबर घेऊन निघाले. या गांवाचें नांव 'हॉर्नबेक'. हें एक अगदीं लहानसें खेडें आहे. या खेड्याची कायमची लोकवस्ती १७०० आहे. तें समुद्रावर वसलेलें आहे. सर्व वस्ती कोळी लोकांची. हें ठिकाण फार चांगलें असल्याकारणानें दरवर्षी सुमारें ८००० लोक गांवांत हवा बदलण्यासाठीं येतात. बाहेरचे पाहुणे गांवीं आले कीं कोळी लोक आपली राहतीं घरें पाहुण्यांना भाड्यानें देतात व आपण आपल्या बंगल्याच्या बाहेरील घरांमध्यें जाऊन राहतात. उन्हाळ्याच्या या हंगामांत बारा महिन्यांची कमाई हे कोळी करून घेतात. या कोळ्यांचीं आठ मासेमारी जहाजें आहेत. सहकारी पद्धतीनें ते मासेमारी करतात. हिंवाळ्यांत पाहुणेहि नसतात; मासेमारीचें कामहि कमी असतें. त्या वेळीं घराची डागडुजी करणें, येणाऱ्या पाहुण्यांसाठीं घरें रंगवून ठेवणें, फर्निचर तयार करणें इत्यादि कामें ते करतात.

आज या ठिकाणीं एक फार मोठा कार्यक्रम साजरा होणार होता. आम्ही खेड्यांत गेल्यावर तेथील गांवकरी मंडळींनें आमचें अत्यंत प्रेमानें स्वागत केलें व नंतर आम्ही ज्या ठिकाणीं समारंभ साजरा होणार होता त्या ठिकाणीं गेलों. तेथें जवळ जवळ हजार दीड हजार लोक जमले होते. सर्वजण आनंदी वातावरणांत वावरत होते. डॉ. मॅनिकी यांनीं लोकांना उद्देशून एक भाषण केलें व आमच्या वतीनें श्री गौडा दोन शब्द बोलले. डॉ. मॅनिकी यांनीं गौडांच्या भाषणाचें भाषांतर डॅनिशमध्यें सांगितलें.

ज्या ठिकाणीं ही लोकांची गर्दी जमली होती, तेथें ठिकठिकाणीं होळ्या पेटविण्यांत आल्या होत्या. आपल्याप्रमाणें डॅनिश लोकदेखील जुन्या रूढी पाळणारे आहेत. या उत्सवामध्यें ही त्यांची रूढिप्रियता विशेष प्रामुख्यानें आमच्या नजरेस आली. डॅनिश लोकांची अशी एक जुनी समजूत आहे कीं, आपणांवर

येणारीं सर्व संकटें एक चेटकीण आणीत असते. आजच्या दिवशीं ठिकठिकाणीं होळ्या पेटवून आपल्या देशांतून या चेटकीणींची हकालपट्टी करायची असतें. होळी पेटली कीं चेटकीण एका झाडूवर बसते व जर्मन देशाला पळून जाते.

गेल्या महायुद्धांत ज्या वेळीं जर्मनीनें डेन्मार्क व्यापिला होता, त्या वेळीं डेन्मार्कमध्यें ठिकठिकाणीं रोज अंधार पाडण्यांत येत होता. तेवीस जूनला डेन्मार्कमध्यें ठिकठिकाणीं वर सांगितल्याप्रमाणें होळ्या पेटविल्या जातात. या युद्धकाळांत 'ब्लॅक आऊट'चे नियम फार कडक होते. त्यामुळें जर्मन लोकांनीं या होळ्या पेटविण्यास सक्त बंदी केली होती. स्वीडन युद्धांत पडलेला नव्हता. डेन्मार्कच्या लोकांना तेवीस जूनच्या उत्सवांत मुळींच भाग घेतां येणार नाहीं, याबद्दल स्वीडनच्या लोकांना अत्यंत वाईट वाटलें. डेन्मार्क व स्वीडन हे वस्तुतः जरी दोन भिन्न देश असले, तरी या दोन देशांमध्यें एकप्रकारची अभिन्नता आहे. दोन्ही देशांतील लोकांना परस्परांबद्दल खूप जिव्हाळा वाटतो. तेवीस जूनला जर्मनांच्या जुलमी सत्तेमुळें डॅनिश लोकांना आपला उत्सव साजरा करतां येणार नाहीं, हें लक्षांत आल्याबरोबर स्वीडनच्या लोकांनीं आपल्या सर्व होळ्या किनाऱ्याच्या बाजूनें पेटविल्या. हेतु हा कीं, या होळ्यांच्या दर्शनानें डेन्मार्कच्या लोकांना थोडें तरी समाधान मिळावें. गुलाम बनलेल्या डॅनिश लोकांनीं ह्या होळ्यांचा समारंभ दुरून पाहिला व आपली दुधाची तहान ताकावर नव्हे, तर दुधाचें भांडें दुरून पाहूनच भागविली. हा कार्यक्रम रात्रीं बराच वेळ चालतो. होळ्यांच्या जागीं आम्हीं तास दीड तास घालविला. आमचे अनोळखी चेहरे पाहून, आमच्याशीं ओळख करून घेण्याकरितां पुष्कळ मंडळी आम्हांला येऊन भेटली. त्यांच्याशीं अनौपचारिक बोलणीं झालीं. या डॅनिश लोकांच्या आतिथ्यशील व प्रेमळ अंतःकरणाची खरी ओळख या अनौपचारिक भेटींमुळेंच झाली. हा जरी उन्हाळ्यांतला खूप मोठा दिवस असला, तरी आज थंडी मात्र खूप कडाक्याची पडली होती. कधीं एकदां खोलीवर जाईन व आरामशीर पांघरुणांत पडेन, असें मला झालें होतें.

२४ जून ५४

'एस्परग्रेड' या नांवाचें एक खेडें एल्सिनोरच्या जवळच आहे. त्या खेड्यांतील शाळा पाहण्यासाठीं आज आम्ही गेलों होतों. या ठिकाणीं शाळेला

जोडून एक छोटासा म्यूझियम आहे. आम्ही एका वर्गांत गेलों. त्या वेळीं तेथें इतिहासाचा तास चालू होता. त्या म्यूझियममधील वस्तूंच्या साहाय्यानें इतिहासाचे शिक्षक इतिहासांतील एक विशेष कालखंड विद्यार्थ्यांना समजावून सांगत होते. म्यूझियममधील वस्तूंचा उपयोग शैक्षणिक साहित्य म्हणून त्या शिक्षकानें केलेला पाहून आम्हांला खूप आनंद झाला. प्रत्येक शाळेला जोडून असा एक छोटासा म्यूझियम असला तर इतिहास, भूगोल, शास्त्र हे एरवीं रुक्ष वाटणारे विषय विद्यार्थ्यांना किती चटकदार पद्धतीनें शिकवितां येतील, याची या पाठावरून कल्पना आली. या शाळेला जोडूनच एक ग्रंथालय आहे. भोवतालच्या सात खेड्यांतील छोट्या छोट्या ग्रंथालयांना पुस्तकें पुरविण्याचें काम हें ग्रंथालय करितें. डेन्मार्कमध्यें ग्रंथालयांची चळवळ चांगलीच वाढीला लागलेली आहे. ग्रंथालयांची चळवळ चांगल्या रीतीनें चालविण्याकरितां शाळांचा व शिक्षकांचा जास्तींत जास्त उपयोग केला जातो. या ग्रंथालयांचा फायदा गांवांतील प्रौढ लोकांना जसा घेतां येतो, त्याचप्रमाणें शाळेंतील विद्यार्थ्यांनासुद्धां घेतां येतो. या ग्रंथालयांत विद्यार्थ्यांना उपयुक्त वाटतील अशीं पुस्तकें पण ठेविलीं जातात. शिवाय प्रत्येक शाळेचें आपल्या मुलांसाठीं एक छोटेंसें ग्रंथालय असतेंच. डेन्मार्कमध्यें देशभर पसरलेल्या ग्रंथालयांचें संचालन तेथील मध्यवर्ती लायब्ररीमार्फत होतें. डेन्मार्कमधील कोणत्याहि नागरिकाला, कोणतेंहि पुस्तक हवें असेल तर त्यानें त्या पुस्तकाची मागणी स्थानिक ग्रंथालयाच्या ग्रंथपालाकडे करावयाची असते. तो ग्रंथपाल ती मागणी मध्यवर्ती ग्रंथालयाकडे कळवितो व तें पुस्तक त्याला पुरविण्याची खटपट मध्यवर्ती ग्रंथालय करतें.

परवां आम्ही हॅम्लेट पाहण्याकरितां गेलों होतों; परंतु मेघराजाच्या अवकृपेमुळें खेळ पूर्ण न पाहतांच आम्ही परत आलों. आपला खेळ पाहाण्यास भारतीय लोक आले होते व ते खेळ न पाहतांच परत गेले, ही बातमी त्या नाटकमंडळीच्या व्यवस्थापकांना समजलेली दिसली. आज हॅम्लेट् नाटकाचा पुन्ह प्रयोग होता. त्या व्यवस्थापकानें डॉ. मॅनिकी यांना कळविलें कीं, 'भारतीय मित्रांना हें नाटक पाहण्याची इच्छा असेल, तर त्यांना आमचें आग्रहाचें आमंत्रण आहे. पूर्वी काढलेल्या तिकिटांवरच त्यांना नाटक पाहतां येईल. पुन्हा पैसे खर्च करण्याची गरज नाहीं.' ही सवलत डॅनिश लोकांना दिलेली नव्हती.

आम्ही नाटक पाहण्यास गेलों. नाटक चांगलें झालें. नटनटींनीं आपआपलीं

कामें सफाईदार रीतीनें करण्याचा कसोशीनें प्रयत्न केला. निसर्गानें पण जरूर तें सहकार्य दिलें. हॅम्लेटचें काम चांगलेंच झालें; 'पण जगावें कीं मरावें?' हें आत्मगत भाषण तितकेंसें प्रभावी झालें नाहीं, असें मला वाटलें. 'गर्ट्रुड' वयानें खूप मोठी वाटली. या एवढ्या मोठ्या बाईसाठीं हॅम्लेटच्या काकानें एवढा मूर्खपणा कां केला असेल कुणास ठाऊक! ऑफेलियाचें काम चांगलेंच झालें. एकंदरींत खेळ मला आवडला. थंडी जरी कडाक्याची होती तरी शेवटपर्यंत चिकाटी धरून आम्हीं खेळ पाहिला. क्रोनबर्गच्या किल्ल्यांत हॅम्लेट नाटक पाहावयास मिळाल्याबद्दल समाधान वाटलें.

२५ जून ५४

घरून फार दिवसांत पत्र नाहीं. त्यामुळें मनांत सारखी काळजी व हुरहूर वाटते. आज विशेष महत्त्वाचा कार्यक्रम नसल्याकारणानें पत्रलेखनाचा कार्यक्रम हातीं घेतला. थंडी खूप होती. त्यामुळें खोलीच्या बाहेर पडण्याची फारशी इच्छा नव्हती. संध्याकाळीं डॉ. मॅनिकी यांनीं आपल्या शाळेचा इतिहास सांगणाऱ्या 'स्लाइड्स' दाखविल्या. प्रारंभींच्या काळांत इमारत बांधण्यासाठीं पैसा नसल्यामुळें विद्यार्थ्यांनीं श्रमदान करून हें बांधकाम कसें पुरें केलें, याची त्यांनीं कल्पना दिली. डॉ. मॅनिकी यांचा स्वभाव खूप विनोदी आहे. ही माहिती सांगत असतांना त्यांनीं एक जुनी आठवण सांगितली. संस्थेच्या प्रारंभींच्या काळांत तेथील विद्यार्थ्यांना संस्थेंतील सर्व कामें हातांनींच करावीं लागत असत. डॉ. मॅनिकी यांना या काळांत एका विद्यार्थ्याची खूप मदत झाली. या विद्यार्थ्याचा वरचा मजला बराचसा रिकामा होता. पण तो अत्यंत मेहनती, श्रद्धाळू व उत्साही होता. एकदां त्यांच्या विद्यालयांत एका परदेशी प्राध्यापकांचें फ्रॅन्सिस बेकनच्या लिखाणाबद्दल व्याख्यान होणार होतें. या व्याख्यानाला हजर राहण्याची सदर विद्यार्थ्यानें डॉ. मॅनिकींजवळ परवानगी मागितली. "या व्याख्यानाचा विषय फार कठीण आहे. तूं व्याख्यानाला जाऊं नकोस," असें डॉक्टरनीं त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; पण शेवटीं त्याचा हिरमोड होऊं नये, म्हणून त्याला परवानगी दिली.

व्याख्यान संपल्यावर तो डॉक्टरकडे येऊन म्हणाला, "डॉक्टर, व्याख्यान

चांगलें झालें." "तुला तें समजलें का?" असें विचारतांच तो "हो" म्हणाला. "कोणत्या विषयावर ते प्राध्यापक बोलले?" असें डॉ. मॅनिकींनीं त्याला विचारलें. त्यावर तो म्हणाला, "सबंध व्याख्यान फ्रेंच बेकनसंबंधीं होतें." ही गोष्ट ऐकून टाळ्यांचा कडकडाट झाला. डॉक्टर मॅनिकी यांच्या खिशांत अशा तऱ्हेच्या खूप गोष्टी आहेत. चार लोकांना हसवूं शकतील, अशा गोष्टींचा सांठा जरी आपल्या जवळ असला, तरी लोकांची आपल्याला चांगली करमणूक करतां येते. या बाबतींत सुद्धां आपण फार दरिद्री आहोंत, याची आम्हांला प्रकर्षानें जाणीव झाली.

२६ जून ५४

सकाळीं आठलाच आम्हीं घर सोडलें. गॅनलूडर या खेड्यांत असलेली सरकारी डेअरी पाहण्यासाठीं आम्ही निघालों. या अशा सहली आम्ही बस-मधून करीत असूं. जातांना दुपारचें जेवण आम्ही कागदांत बांधून बरोबर नेत असूं. हें जेवण म्हणजे निरनिराळ्या प्रकारचीं सँडविचेस. डॅनिश लोक पावाच्या दोन तुकड्यांमध्यें काय वाटेल ते पदार्थ भरतात. अंडीं, काकडी, केळीं, टॉमेटो यांच्या जोडीला खजूर, सुकीं अंजिरें, हे पदार्थ सँडविचमध्यें पाहून आम्हांला आश्चर्य वाटलें. परदेशांतील बरेचसे लोक आपलें मधल्या वेळचें जेवण सँडविचवरच भागवितात. त्यांचें खरें जेवण संध्याकाळचें. हें संध्याकाळचें जेवण सहासाडेसहाला घेण्याची प्रथा आहे. घरांत काम करणाऱ्या मोलकरणींना घरीं जाण्यासाठीं वेळेवर सोडतां यावें, म्हणून हें जेवण इतक्या लवकर घेण्याची प्रथा असावी. शिवाय दुपारचें जेवणहि नीट झालेलें नसतें. त्यामुळें घरीं आल्याबरोबर चांगली भूकहि लागत असली पाहिजे. सहा-साडेसहाला जेवण घेऊन रात्रीं पुन्हा कांहीं न खातांच आपल्याला झोप कशी येईल, याची काळजी आमच्या लोकांना प्रारंभीं खूप वाटली. पण हळूहळू ती संवय आमच्या अंगीं बाणली गेली.

गॅनलूडरला प्रथम आम्हीं एक मोठें चर्च पाहिलें. डेन्मार्कमधील कोणत्याहि खेड्यांत तुम्ही पाऊल टाकलेंत, तर त्या ठिकाणीं असलेलें पांढऱ्या भिंतीचें व तांबड्या छपराचें चर्च तुमची नजर खेचून घेतल्यावांचून राहणार नाहीं. या

चर्चच्या प्रांगणामध्यें तुम्हांला निरनिराळ्या प्रकारचीं फुलझाडें पाहायला मिळतील. फुलझाडांच्या सान्निध्यांत चिरंतन विश्रांति घेत असलेल्या कित्येक जीवांचीं थडगीं तुम्हांला येथें पाहायला मिळतील. क्वचित् प्रसंगीं एखादा पुरुष अथवा एखादी बाई आपल्या नातेवाइकाच्या थडग्याजवळ बसून त्या थडग्याभोवतालची जागा साफसूफ करतांना अथवा थडग्याभोवतीं आपण लावलेल्या झाडांना पाणी घालतांना आपणाला आढळेल.

डेन्मार्कमधील प्रत्येक खेड्यांत एक चर्च व त्या चर्चला जोडून एखादी लहानशी तरी शाळा तुम्हांला आढळेल. मिशनरी लोकांनीं शिक्षणाचें लोण आमजनतेपर्यंत पोहोंचविण्याचें काम फार उत्साहानें व कसोशीनें वर्षानुवर्ष केलें आहे. आजहि ते हें ज्ञानदानाचें पवित्र कार्य करीत आहेत.

या चर्चमध्यें आम्ही सर्वजण जमलों. तेथें डॉ. मॅनिकी यांनीं डेन्मार्कच्या खेड्यांची सामाजिक व आर्थिक घडण कशी असते याची कल्पना दिली. तेथून आम्ही एका शेतकऱ्याच्या घरीं गेलों. त्याच्या घराच्या अंगणांत प्रवेश करतांच डाव्या हाताला डुकरांचा गोठा दिसला. दारांतच आमचें स्वागत करणाऱ्या शेतकऱ्यानें आपल्या या संपत्तीचें रसभरित वर्णन केलें. उजव्या बाजूला गोशाळा होती. प्रत्येक गाईच्या समोर एका लाकडी पाटीवर त्या गाईचें वय, ती रोज किती दूध देते, त्या दुधांत लोण्याचें प्रमाण किती असते, इत्यादि माहिती लिहून ठेवण्यांत आली होती. या गोठ्याच्या पलीकडे कोठार होतें. त्यामध्यें वरच्या बाजूला गवत ठेवण्यांत आलें होतें व खालीं धान्य, लाकूड, कोळसा इत्यादि जीवनोपयोगी वस्तू ठेवल्या होत्या. घरावर कौलांऐवजीं गवताचें छप्पर घातलें होतें. नवीं घरें सोडलीं, तर डेन्मार्कमधील सर्व साधारण घरें याच नमुन्याचीं असतात. डुकरांचा गोठा, गोशाळा, धान्याचें कोठार व कोंबड्यां-करितां एक छोटेंसें आवार, प्रत्येक शेतकऱ्याच्या घरीं पाहावयास मिळेल. एखाद-दुसरा घोडाहि तेथें आढळतो. घरापासून शेत व कुरण हीं थोडीं दूर असल्यामुळें शेतकरी घोड्यावर बसून शेतावर जावयास निघतो. जातांना तो गाई बरोबर घेऊन जातो. त्यांना हांकून न्यावें लागत नाहीं. घोड्यावर बसलेला शेतकरी शीळ वाजवितो व त्याच्यामागें त्या गाई जात असतात. डेन्मार्कमध्यें ठिकठिकाणीं हिरवीं-गार कुरणें आहेत. सकाळपासून त्या कुरणांमध्यें गाईंना सोडण्यांत येतें. भरपूर चारा जवळच खायला असल्यामुळें गाई जागींच बसून रवंथ करीत असतात.

फारशी धावपळ करण्याच्या भानगडींत त्या पडत नाहींत. बहुधा त्यांना जाणीव झालेली असावी कीं, आपण जर फार धावपळ केली तर भोवतालीं लावलेल्या तारांतून जाणारी वीज आपल्याला धक्का दिल्याशिवाय राहणार नाहीं.

या शेतकऱ्याच्या घरीं आम्हीं आपल्या शिदोऱ्या सोडल्या. त्यानें आमच्याकरितां चहा, केक वगैरे पदार्थ तयार ठेविले होते. हा शेतकरी सुसंपन्न दिसला. त्याची बायको तेथील निरनिराळ्या सामाजिक चळवळींत भाग घेते. त्यांचा एक सोळा वर्षांचा मुलगा आम्ही गेल्यापासून आमच्याबरोबर होता व आपल्या घराविषयीं तसेंच आपल्या देशाविषयीं जास्तींत जास्त माहिती सांगण्याची त्याची धडपड चालू होती. त्यानें शाळा सोडली होती व तो आपल्या वडिलांच्या शेतीवर उमेदवार (Apprentice) म्हणून काम करीत होता.

डेन्मार्कमध्यें सात ते चौदा वयाचीं मुलें प्राथमिक शाळेंत जातात. सातवी इयत्ता पास झाल्यावर बरींचशीं मुलें कॉलेजांत न जातां शेतीचें शिक्षण व अनुभव घेण्याकरितां चार वर्षेंपर्यंत कोणाच्या तरी शेतावर काम करितात. या काळांत त्यांना जेवायला व राहायला फुकट मिळतें; शिवाय थोडा पगारहि मिळतो. या पगारांतून ते आपला बाकीचा खर्च भागवितात. मुलगा आपल्या बापाच्या शेतावर जरी उमेदवार म्हणून राहिला तरी त्याला वर सांगितल्याप्रमाणें पगार मिळतो. त्याचा बापहि त्याच्याकडून रोज आठ-दहा तास ठोकून काम घेतो. शाळेच्या चिमण्या जगांतून बाहेर पडलेल्या या विद्यार्थ्यांचा या चार वर्षांच्या काळांत जीवनाशीं खूप निकटचा संबंध येतो. त्याच्या पुस्तकी शिक्षणाला व्यवहारज्ञानाची चांगली जोड मिळते. या चार वर्षांच्या काळांत आगामी जबाबदाऱ्यांचें हसत खेळत स्वागत करण्याची धमक व लायकी त्याच्या अंगीं उत्पन्न होते. जीवनाचा जवळून परिचय झाल्यावर, आपल्यामध्यें असलेल्या शैक्षणिक उणीवांची पण त्याला जाणीव होते या उणीवा भरून काढण्याकरितां पुढें केव्हां तरी तो लोकशाळेंत जाऊन पुढील शिक्षण घेतो. १८ ते २५ ही लोकशाळेंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची वयोमर्यादा आहे.

जेवणानंतर आम्ही स्थानिक शाळा पाहण्यास गेलों. या शाळेंत लाकूडकाम हा हस्तव्यवसाय शिकविला जात होता. येथील प्रत्येक शाळेंत कोणता ना कोणता तरी हस्तव्यवसाय शिकविला जातो. या हस्तव्यवसायाला लागणारा कच्चा माल शाळेतर्फे पुरविला जातो. या मालापासून तयार झालेल्या वस्तूंवर मालकी मात्र त्या मुलांची

असते. आपण तयार केलेली वस्तु आपण स्वतःच वापरणार आहोंत, अशी त्या मुलाची खात्री असल्यामुळें, जास्तींत जास्त मेहनत व काळजी घेऊन, तो मुलगा ती वस्तु बनविण्याचा प्रयत्न करीत असतो. यामुळें डेन्मार्कमधील शाळांतील मुलांचें हस्तव्यवसायाचें काम विशेष चांगलें असल्याचें आम्हांला आढळून आलें.

या शाळेमार्फतच रात्रीची शाळा पण चालत असते. या शाळेंतून प्रौढांना शिकविण्याचें काम चालतें. या रात्रीच्या शाळेंतसुद्धां सुतारकामाचें शिक्षण प्रौढांना दिलें जातें. या ठिकाणीं शिकावयास येणारे प्रौढ आपल्याला लागणारा कच्चा माल स्वतः विकत आणतात. शिक्षक त्यांना लागणारें तांत्रिक ज्ञान देतो व मार्गदर्शन करतो. हे प्रौढ आपणास लागणाऱ्या खाटा, खुर्च्या, टेबलें इत्यादि वस्तू बनविण्यास येथें शिकतात. तयार झालेली वस्तू अर्थातच त्यांच्या मालकीची असते. प्रौढांच्या शिक्षणाला व्यवसायाची जोड दिली, तर आजच्यापेक्षां अधिक खुशीनें व अधिक संख्येनें प्रौढ आपल्याहि लोकशिक्षण-वर्गांत येतील, असें आम्हांस त्या क्षणीं वाटलें.

गॅनलूडगहून आम्ही स्टॅव्हनशॉल्ट नांवाच्या दुसऱ्या खेड्यांत गेलों. या ठिकाणीं रस्त्याच्या कडेला चारपांच शेतकरी आमची वाट पाहात उभे होते. यामध्यें एब्सेन नांवाचा एक ९० वर्षांचा शेतकरी होता. त्यानें आमच्याकरितां छानशीं गुलाबाचीं फुलें आणलीं होती. आपण ज्याप्रमाणें कोणाला भेटावयाला जातांना मुलांसाठीं खाऊ घेऊन जातों, त्याप्रमाणें डेन्मार्कमधील लोक ओळखीच्या ठिकाणीं जातांना मुलांसाठीं चॉकोलेट किंवा फळें, निदान फुलें तरी घेऊन जातात. पण तुम्ही कांहीं सुद्धां बरोबर नेलें नाहीं, तरी तुमचें कांहीं चुकलें आहे, अशी जाणीव तुमचा यजमान तुम्हांला केव्हांहि करून देणार नाहीं.

स्टॅव्हनशॉल्टला उतरल्यावर आमचे पांच गट करण्यांत आले व प्रत्येक गटाला एकेका शेतकऱ्याच्या घरीं पाठविण्यांत आलें. या पांचामध्यें एक स्त्री होती. आम्हीं चौघेपांचजण या बाईबरोबर गेलों. त्या बाईचें नांव मिसेस् ओल्सन. तिनें आपल्या शेतीबद्दल आम्हीं विचारलेल्या प्रश्नांचीं समर्पक उत्तरें दिलीं. तिच्या नवऱ्याचें नांव एरिक ओल्सन्. हे हंगामाचे दिवस असल्यामुळें एरिक खूप कामांत होता. तो यंत्राच्या साहाय्यानें गाईची धार काढीत होता. येथें हातानें कोणी दूध काढीत नाहीं. आम्ही एरिकला जाऊन भेटलों व त्याच्याशीं त्याच्या शेतीबद्दल बातचीत केली. तो गृहस्थहि मला फार चांगला वाटला.

कोपनहेगनसारख्या शहरांत राहून डॅनिश जीवनाची यथायोग्य कल्पना येणार नाहीं; सबब आमच्या डेन्मार्कमधील वास्तव्यांत आम्हांला कांहीं दिवस तरी खेड्यांत पाठविण्यांत यावें व तेथील ग्रामीण जीवनाचे व शेतकऱ्यांच्या जीवनाचे प्रश्न आम्हीं समजून घ्यावेत, अशी भारत सरकारच्या शिक्षण खात्यानें डॉ. मॅनिकी यांना सूचना दिली होती. त्याप्रमाणें कांहीं शेतकऱ्यांना पत्रें लिहून, 'तुम्ही एखादा भारतीय विद्यार्थी आपल्या घरांत पंधरा दिवसांसाठीं घ्यावयास तयार आहांत का?' अशी डॉ. मॅनिकी यांनीं विचारणा केली होती. ज्यांना थोडें तरी इंग्रजी समजेल, अशाच शेतकऱ्यांची निवड करण्यांत येणार होती. वर उल्लेखिलेल्या स्टॅव्हनशॉल्ट खेड्यांतील चार-पांच शेतकरी भारतीयांना ठेवण्यास तयार होते. मिसेस ओल्सनच्या घरीं पण एक भारतीय राहणार होता. दिवसभर या खेड्यामध्यें घालविल्यावर आठ-साडेआठच्या सुमारास आम्ही परत फिरलों.

२७ जून ५४

आज रविवार. कपडे धुण्याखेरीज निश्चित असा दुसरा कार्यक्रम नाहीं. दुसरा कार्यक्रम घरीं पत्र लिहिण्याचा. आमच्यापैकीं सहाजण आसकॉव्ह येथील लोकशाळा पाहण्यासाठीं आज सकाळींच उठून गेले. त्या ठिकाणची लोकशाळा विशेष प्रसिद्ध आहे. या सहलीला बरेच पैसे पडणार होते, म्हणून आम्हीं त्या सहलींत भाग घेण्यास नकार दिला. जेवढा कार्यक्रम आमच्याकरिता आंखला गेला असेल, तेवढ्यांतच भाग घेणें आमच्या खिशाला परवडणार होतें. येथील खर्चाकरितां आम्हांला सरकारकडून मिळणारी मदत अजून हातीं आली नव्हती. पत्रव्यवहार चालू झाला होता; पण प्रत्यक्ष पैसा हातीं पडायला खूप वेळ लागेल, अशीं चिन्हें दिसत होतीं. तेव्हां जपून पावलें टाकणें क्रमप्राप्त होतें. त्या सहा जणांनीं आपला खर्च करण्याचें ठरविलें होतें.

आज रविवार असल्यामुळें व्याख्यानें वगैरे नव्हतींच. संध्यकाळीं पियानो व व्हायोलिन वादनाचा एक कार्यक्रम झाला. त्या कार्यक्रमाला आम्ही हजर राहिलों. संगीतशास्त्रांत आम्ही अनभिज्ञ. त्यांत पाश्चात्य संगीतांत तर आम्हांला कांहींच समजत नव्हतें. परंतु या दोन्ही कलापटूंच्या वादनाची गोडी मात्र अवीट

असल्याची जाणीव माझ्यासारख्या रुक्ष माणसालाहि झाल्यावांचून राहिली नाहीं.

२८ जून ५४

व्याख्यानें चालूच आहेत. स्वीडनला दोन-चार दिवसांसाठीं जाण्याचा कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. डेन्मार्कहून स्वीडनला रोज 'जा ये' करणारे लोक आहेत. स्कॅन्डिनेव्हियन् देशांतील नागरिकांना एकमेकांच्या देशांत जायला पासपोर्ट लागत नाहीं. पासपोर्टशिवाय डेन्मार्कचा नागरिक स्वीडन, नॉर्वे, या देशांत जाऊं शकतो. परंतु आम्हांला स्वीडनला जाण्याकरितां परवानगी मागणें जरूर होतें. या परवानगी-अर्जासोबत आपले फोटो पण पाठवायचे होते. स्वतःच्या फोटोची जादा प्रत नसल्यामुळें आम्ही फोटोग्राफरच्या शोधांत निघालों. माझ्याबरोबर मद्रासचे श्री. राजनायकम् होते. श्री. राजनायकम् हे रामकृष्ण मिशनमध्यें काम करतात. आयुष्यभर ब्रह्मचारी राहून देशसेवा करण्याचा त्यांनीं संकल्प केला आहे.

एक फोटोग्राफरचें दुकान आम्हांला आढळलें. तपास करतां तें दुकान एका बाईनें चालविलें होतें, असें समजलें. त्या बाईचें नांव लुईसा लारसन्. तिनें आमची आस्थेनें चौकशी केली. आपण काढलेले अनेक फोटो तिनें आम्हांला दाखविले. आम्हांला जरी पासपोर्टवर लावण्यासाठीं साधा एक एक फोटो हवा होता, तरी आम्ही 'नको नको' म्हणत असतांना, त्या बाईनें वेगवेगळ्या पोजमध्यें आमचे चारपांच फोटो घेतले. तिच्याशीं बोलतांना आम्ही अगदीं व्यावहारिक पद्धतीनें बोलत होतों. आम्ही पासपोर्टकरितां एक फोटो घेणार आहोंत, बाकीचे फोटो घेण्यास आम्ही बांधलेले नाहीं इत्यादि गोष्टी आम्हीं तिला स्पष्ट करून सांगितल्या. शिष्टाचाराला बळी पडून खिशाला भलतीच कातर लागूं नये, म्हणून इतक्या सडेतोडपणें, इच्छा नसतांना सुद्धां बोलावें लागलें. त्यावर ती बाई म्हणाली, "मी पैशासाठीं धंदा करीत नाहीं. मी एक कलावंत आहें. मला कलेनें खूप पैसा दिला आहे. मी माझ्या हौसेकरितां काम करतें. हे तुमचे फोटो काढतांना तुमच्याकडून दोन पैसे मिळविण्यापेक्षां आयुष्यभर तुमची मैत्री कशी टिकवितां येईल याचाच मी विचार करीत आहें." तिचे हे उद्गार ऐकून आम्हांला खूप लाजल्यासारखें झालें. भारताबद्दल

तिला चांगली माहिती दिसली. इतर डॅनिश लोकांच्या मानानें तिला इंग्रजी खूप चांगलें येत होतें. तिच्याशीं कांहीं वेळ गप्पा मारून आम्ही परतलों.

२९ जून ५४

आज कडाक्याची थंडी पडली होती. इथल्या उन्हाळ्याची थंडी जर इतकी कडक, तर हिंवाळ्यांतली थंडी असेल तरी कशी याचाच आम्ही विचार करीत होतों. आज खोलीच्या बाहेर पडावयाची कोणाचीच इच्छा नव्हती. तथापि डॉ. मॅनिकी आमच्या येथें आल्यामुळें दिवाणखान्यांत येऊन त्यांची भेट घेणें भाग पडलें. व्याख्यनाऐवजीं चर्चेचा कार्यक्रम घेण्याचें ठरलें. डेन्मार्कमधील लोकशाळांची योजना भारतामध्यें कशी राबवितां येईल, यावर चर्चा सुरू झाली. या चर्चेमध्यें आमच्या मंडळींचे खूप विसंवादी सूर ऐकावयास आले. ही चर्चा चालू असतांना माझ्या मनांत एक विचार सारखा येत होता. आमच्यापैकीं प्रत्येकाच्या कल्पना व दृष्टिकोन इतका भिन्न आहे कीं, शेवटीं भारत सरकारला आपला अहवाल देणें मोठें कठीण काम होणार आहे. आमच्या सतरा लोकांपैकीं आठ लोक सरकारी अधिकारी होते. हे सरकारी अधिकारी तीन निरनिराळ्या प्रांतांतून आलेले होते. या तीन प्रांतांतील परिस्थिति भिन्न होती. त्यामुळें या सरकारी अधिकाऱ्यांत एकवाक्यता होणें कठीण होतें. बिनसरकारी जे गृहस्थ आमच्याबरोबर होते, त्यांच्यामध्यें पण एकवाक्यता होण्याची आशा दिसत नव्हती. त्यांपैकीं कांहीं व्यक्तिंना असें वाटत होतें कीं, भारतीय संस्कृति ही खूप जुनी व आदर्श आहे. ज्या वेळीं इतर देशांतील लोक रानटी दशेंत होते, त्या वेळीं आम्ही सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर होतों. आतां जरी औद्योगिक क्षेत्रांत यांनीं थोडी प्रगति केली असली, तरी भारत हा आध्यात्मिक क्षेत्रांत जगाचा गुरुत्व होणार आहे. तेव्हां या डेन्मार्कसारख्या लहान देशापासून आपण काय शिकणार?

या मंडळींत दुसरा एक थर असा होता कीं, ज्यांना येथील प्रत्येक गोष्ट शंभर टक्के चांगली अतएव अनुकरणीय वाटत होती. डेन्मार्कमधील प्रत्येक मॉडेल जसेंच्या तसें उचलून भारतामध्यें कसें नेऊन ठेवितां येईल, याचाच ही मंडळी विचार करीत होती. आमच्यामध्यें आणखी कांहीं व्यक्ती अशा होत्या

कीं, ज्यांना डेन्मार्कमधून कांहीं न्यावें असें वाटत होतें; परंतु त्यांचा असा विश्वास होता कीं जर भारतामध्यें कोणतीहि नवी कल्पना रुजवावयाची असेल, तर तें काम सरकारी अधिकाऱ्यांच्या मार्फत होणें शक्य नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांना सोडून समाजसेवकांच्या मार्फत जर कांहीं काम केलें तरच तें होईल, असा यांचा मनोमय आग्रह होता. चर्चा रंगली चांगली, पण ही आवळ्यांची मोट एकत्र बांधायची कशी हा प्रश्न मला भेडसावूं लागला; कारण मी आमच्या संघाचा सेक्रेटरी होतों.

३० जून ५४

सकाळींच डॉ. मॅनिकी यांनीं एक निरोप पाठविला. त्यांच्या पीपल्स कॉलेज-तर्फे आज एक सामुदायिक प्रार्थनेचा कार्यक्रम होणार होता. या कार्यक्रमांत आम्हीं सहभागी व्हावें, अशी इच्छा त्यांनीं व्यक्त केली होती. आम्हीं त्यांची विनंति मान्य केली. या कार्यक्रमाकरितां कांहीं संस्कृत श्लोक निवडून काढण्याचें काम मजकडे सोंपविण्यांत आलें. या प्रार्थना मीं संस्कृतमध्यें म्हणून दाखवाव्यात, श्री निखिल रॉय यांनीं त्यांचें इंग्रजींत भाषांतर करून सांगावें व शेवटीं एक दोन भजनें म्हणण्याचें काम शांतिनिकेतनचें श्री धार, बिहारचे श्री शर्मा, गारगोटीचे श्री सावे व अमरावतीचे श्री लोंढे इत्यादि मित्रांनीं करावें असें ठरलें.

प्रार्थनेचे श्लोक निवडतांना मीं खूप काळजी घेतली. सर्वांनीं सुखी राहावें, सर्वत्र शांतीचें साम्राज्य पसरावें, विश्वबंधुत्वाचा प्रसार व्हावा, कोणीं कोणाचा द्वेष करूं नये इत्यादि शाश्वत स्वरूपाचीं जीवनमूल्यें ज्या श्लोकांतून वर्णिलीं आहेत, तेच श्लोक निवडण्याची मीं दक्षता घेतली. हिंदु धर्म हा संकुचित नाहीं, त्याच्यामध्यें एकांगीपणा पण नाहीं, तर तो अत्यंत सहिष्णु, उदार, शांततावादी, विश्वबंधुत्वाचा संदेश सांगणारा असा एक अत्यंत पुरोगामी धर्म आहे, हें निवडलेल्या प्रार्थनांच्या द्वारें लोकांच्यापुढें मांडण्याचा आमचा प्रयत्न होता. प्रार्थनेचा कार्यक्रम फारच चांगला झाल्याचें शेवटीं सर्वांनीं सांगितल्यावर मनाला तेवढेंच समाधान वाटलें.

आज कांहीं अमेरिकन डॉ. मॅनिकी यांची संस्था पाहण्यासाठीं आले होते. त्यांच्याबरोबर एक निग्रो बाई पण होती. या लोकांनीं आमच्याशीं बरीच

अनौपचारिक चर्चा केली. "तुम्हांला कम्युनिझमची भीति नाहीं का वाटत?" असा प्रश्न त्यांच्यापैकीं कांहींजण विचारीत होते. "आम्हांला कोणत्याही 'इझम्'ची भीति वाटत नाहीं. 'आपण जगूं या' व 'इतरांना पण जगण्याची संधि देऊं या' ही आमची विचारसरणी असल्यामुळें आम्हांला कोणाचेंहि भय वाटत नाहीं." असें आम्हीं त्यांना सांगितलें.

आज सूर्यग्रहण होतें. एका विशिष्ट जागेवरून तें चांगलें पाहावयाला मिळेल, असें समजल्यावर आम्ही कांहीं मंडळी ग्रहण पाहण्यासाठीं तेथें गेलों. परत येतांना त्या फोटोग्राफर बाईकडे गेलों. आमचे फोटो तयार झाले होते. फोटो चांगले निघाले होते. आमच्या कल्पनेपेक्षां फोटो खूपच चांगले निघाले होते. फोटो पाहतांच 'मी एक कलावन्त आहें' या बाईच्या उद्गारची सत्यता पटली. थंडी खूप असल्यामुळें जास्त वेळ बाहेर न घालवितां आमचे पाय आपल्या निवासस्थानाकडे वळले.

१ जुलै १९५४

ऑफिसच्या कामाचा ताबा दुसऱ्या अधिकाऱ्याकडे सोंपविल्याला आज एक महिना झाला. या गेल्या महिन्यामध्यें विद्यार्थ्यांच्या भूमिकेंत वावरतांना एक निराळ्या प्रकारचा आनंद अनुभवायला मिळाला. आज आम्ही सकाळींच लवकर उठून कोपनहेगेन येथील सरकारी मध्यवर्ति ग्रंथालय पाहण्यास निघालों. या ग्रंथालयाला 'रॉयल लायब्ररी' म्हणतात. जगांतील सर्व भाषांतील पुस्तकें येथें ठेविण्यांत आलीं आहेत. येथील शिक्षण खात्याचे एक अधिकारी मि. ऑब्लिंग व एल्सिनोरच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल मि. ब्रेमरस्टंट हे आमच्याबरोबर होते. मि. ऑब्लिंग हे मि. ब्रेमरस्टंट यांचे जांवई. त्यांची भेट त्यांच्या सासऱ्यांच्या घरीं पूर्वींच झाली असल्यामुळें त्यांच्याशीं खूप मनमोकळेपणानें वागतां आलें. ते शिक्षणखात्यांत एक मोठे अधिकारी असल्यामुळें त्यांच्या मदतीनें आम्हांला हें ग्रंथालय फार चांगल्या रीतीनें पाहतां आलें.

या ग्रंथालयांत आम्हांला कांहीं संस्कृत हस्तलिखितें पाहावयास मिळालीं. हीं हस्तलिखितें एका भारतीय पंडिताकडून जर्मनीनें विकत घेतलीं होतीं व १९२८ सालीं डेन्मार्कनें तीं जर्मनींतून विकत आणलीं. या ठिकाणीं पुढील मराठी

पुस्तकें पाहून आम्हांस सानंद आश्चर्य वाटलें: श्रीयुत बापट व दिघे यांचें संतविजय, राजवाड्यांची ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, रामदासांची कविता, ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण, इत्यादि. कांहीं मोडीमध्यें लिहिलेलीं हस्तलिखितें पण पाहायला मिळालीं. ह्या मोडींतील हस्तलिखितांची संख्या एकोणतीस होती. याशिवाय पंचतंत्र, सभापर्व, विराटपर्व हीं संस्कृत पुस्तकें पण येथें होतीं. अवेस्ता भाषेंतील खूप चांगले ग्रंथ या ठिकाणीं आढळले. हे ग्रंथ, मुंबई व मद्रास येथें विकत मिळाले होते.

डेन्मार्कमध्यें कोणत्याहि छापखान्यानें कोणतेंहि पुस्तक छापलें कीं त्याची एक प्रत विनामूल्य या ग्रंथांलयाकडे पाठविली जाते. त्यामुळें या मध्यवर्ती ग्रंथालयांत डेन्मार्कमध्यें प्रसिद्ध झालेलें कोणतेंहि पुस्तक मिळण्याची सोय झाली आहे. ग्रंथालय खूपच मोठें आहे. कोणत्याहि कपाटाला कुलूप नाहीं. मुक्तद्वार वाचनालय आहे. वाचकांना जास्तींत जास्त आरामांत बसून वाचतां यावें म्हणून सर्व प्रकारची तरतूद करण्यांत आली आहे.

तेथील व्यवस्थापकांनीं आम्हांला एक चांगलें जेवण दिलें. अपक्व अन्नशाळेंतील शाकभाजीचें खाणें खाऊन विटलेल्या आमच्या जिभांना सामिष अन्नाचा नैवेद्य येथें खावयास मिळाला. बौद्धिक मेजवानीबरोबरच ही दुसरी मेजवानी मिळाल्यामुळें या ग्रंथपालांविषयींचा आमचा आदर वाढला असल्यास त्यांत नवल नाहीं.

तेथून आम्ही डेन्मार्कमधील पार्लमेंट पाहण्यासाठीं निघालों. येथील पार्लमेंट-मध्यें भारतांतील पार्लमेंटसारखीं दोन गृहें आहेत. एक फॉलकेटींग म्हणजे लोकसभा व दुसरें लॅन्डस्टाग म्हणजे राज्यसभा. ५ जून १८४९ पासून डेन्मार्कमध्यें लोकशाही राज्यव्यवस्था सुरू झाली. हा दिवस राष्ट्रीय सण म्हणून साजरा केला जातो. १८४९ सालीं जरी लोकशाही राज्यव्यवस्था येथें अंमलांत आली होती, तरी १९५० पर्यंत स्त्रियांना पार्लमेंटच्या निवडणुकींत मतदानाचा हक्क मिळालेला नव्हता. १९०८ सालीं प्रथम त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींत मतदान करण्याची संधि मिळाली. १९१५ सालीं डेन्मार्कनें आपली राज्यघटना सुधारली व त्या वेळीं स्त्रियांना मत देण्याचा हक्क मिळाला. लोकसभेला मत देण्याचा अधिकार वयाच्या २५ व्या वर्षी माणसाला मिळतो, तर वयाच्या २३ व्या वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींत तो भाग घेऊं शकतो. आज डेन्मार्कमधील स्त्रियांना पुरुषांप्रमाणेंच मतदान

करतां येतें व पुरुषांच्या बरोबरीनेंच कोणत्याहि निवडणुकीला उभें राहतां येते. लोकसभेंत २५१ सभासद असतात. त्यांपैकीं दोन 'फॅरोआयलंड'चे प्रतिनिधि असतात. राज्यसभेंत ७६ सभासद असतात, त्यांपैकीं एक 'फॅरोआयलंड' मधील असतो. प्रत्येक बिलाचें वाचन दोन्ही गृहांतून तीनदां व्हावें लागतें व अशा रीतीनें जें बिल दोन्ही गृहांत बहुमतानें मंजूर होईल त्याला राजाची संमति मिळते व मग त्याला कायद्याचा दर्जा प्राप्त होतो. मंत्री या पार्लमेंटचा सभासद असलाच पाहिजे असा कटाक्ष नाहीं. तो जरी पार्लमेंटचा सभासद नसला तरी त्याला पार्लमेंटमध्यें भाषण करतां येतें; परंतु मतदान मात्र करतां येत नाहीं. पार्लमेंटमध्यें कॉंझर्वेटिव्ह लोक हिरव्या रंगाच्या खुर्चीवर बसतात; तर सोशल डेमोक्रॅट तांबड्या खुर्चीवर बसतात. आज बहुमत त्यांचेंच आहे. आज डेन्मार्कमध्यें पूर्वींप्रमाणें पार्लमेंटचीं दोन गृहें नाहींत. फक्त लोकसभाच आहे. या लोकसभेंत एकूण १७९ सभासद आहेत. डेन्मार्कमधील आमदारांना आपल्या देशांतील ट्राममधून, बसमधून वा रेल्वेमधून विनामूल्य प्रवास करतां येतो. ते जर विमानांतून प्रवास करायला निघाले, तर मात्र त्यांना कोणतीहि सवलत मिळत नाहीं. हें पार्लमेंटगृह पाहिल्यावर मला मुंबई, पुणें व दिल्ली येथील पार्लमेंट व असेंब्ली या गृहांची आठवण झाली. आपल्या देशांतील पार्लमेंटगृहें, या देशांतील पार्लमेंटगृहापेक्षां मला अधिक आकर्षक व रुबाबदार वाटलीं. दिवसभराची सहल आटोपून आम्ही निवासस्थानीं परत आलों.

गेले चार-पांच दिवस मी खूप बेचैन आहें. येथें मिळणारें जेवण अत्यंत असमाधानकारक आहे. बरोबर आलेला पैसा खर्च झाला आहे. त्यामुळें बाहेर जाऊन भूक भागवितां येत नाहीं. भारतसरकारकडून खर्चासाठीं मिळणारी रक्कम नजीकच्या भविष्यकाळांत हातीं पडण्याची आशा नाहीं. त्यांना लिहिलेल्या पत्राचें उत्तर नाहीं. उसनवारीला सुरुवात झाली आहे. श्री. गौडांकडून कांहीं रक्कम उचललेली आहे. गेल्या कांहीं दिवसांत घरचें पत्र पण नाहीं. या सर्व कारणांमुळें खूप अस्वस्थता वाटते. अर्थात् बाजूच्या इतर कोणालाहि याची चाहूल लागूं न देण्याची मी काळजी घेत आहें. श्री. गौडांजवळ मात्र माझ्या अडचणी मीं स्पष्टपणें मांडल्या आहेत व त्यांनीं मला जरूर तें आर्थिक साहाय्य देण्याचें कबूल केलें आहे. परंतु कोणाजवळ कांहीं मागणें माझ्या स्वभावाला मानवत नाहीं व त्यामुळेंच जिवाला त्रास होत आहे.

२ जुलै १९५४

सकाळीं लवकरच आम्ही उठून सहलीला जावयास निघालों. सहकारी तत्त्वावर चाललेला एक बेकन्चा कारखाना व डुकरांना मारण्याचा कसाईखाना पाहण्यासाठीं आम्ही निघालों. डेन्मार्कहून फार मोठ्या प्रमाणामध्यें बेकन्ची निर्यात होते. बेकन् डुकराच्या मांसापासून बनवितात. या कारखान्यांत डुकरांची कत्तल करण्यापासून तो बेकन् तयार होईपर्यंतचे सर्व व्यवहार आम्हीं पाहिले. आज डेन्मार्कमध्यें डुकरांची पद्धतशीर पैदास केली जाते. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला आपल्याकडील डुकरांप्रमाणेंच हीं डुकरें दुबळीं व रोडकीं होतीं. डेन्मार्कची आर्थिक परिस्थिति बिघडल्यावर ती सुधारण्यासाठीं गाईंची व डुकरांची पद्धतशीर रीतीनें पैदास व जोपासना करण्याचें ठरलें. प्रारंभींच्या काळांत व्यापारी लोक शेतकऱ्यांकडून डुकरें विकत घेत, तीं कसाईखान्याला विकीत व मधली दलाली घेऊन ते गबर होत असत. १८८७ सालीं डेन्मार्कमधील फोक हायस्कूलचे एक प्राचार्य मि. पी. ब्रोजसेल यांच्या लक्षांत आलें कीं, आपल्या जवळपास राहणाऱ्या शेतकऱ्यांकडून या व्यापाऱ्यांनीं केवळ डुकरांच्या विक्रीवर वीस-पंचवीस हजार रुपये कमाविले आहेत. मग त्यांनीं सहकारी तत्त्वावर डुकरें मारण्याचा कसाईखाना व बेकन् फॅक्टरी काढण्याची चळवळ सुरू केली. १८८७ सालच्या डिसेंबर महिन्यांत असा पहिला सहकारी कारखाना डेन्मार्कमध्यें उभारण्यांत आला. आज या ठिकाणीं अशा प्रकारचे सहकारी तत्त्वावर चालविण्यांत आलेले बरेचसे कारखाने आहेत. हा कारखाना पाहून झाल्यावर आम्हीं छोट्या शेतकऱ्यांची वसाहत पाहिली. या वसाहतीला 'स्मॉल होल्डर्स कॉलनी' म्हणतात. डेन्मार्कमध्यें ज्यांच्याजवळ १० एकरांपेक्षां कमी जमीन आहे, असे पुष्कळ शेतकरी आहेत. या शेतकऱ्यांनीं आपली खूपच सुधारणा करून घेतली आहे. कांहीं खार जमिनींवर चांगली मेहनत घेऊन त्यांनीं या जमिनी लागवडीखालीं आणल्या आहेत. हे शेतकरी अत्यंत मेहनती व कर्तबगार आहेत.

या शेतकऱ्यांची परिस्थिति समजून घेण्याकरितां, आम्ही एका शेतकऱ्याच्या घरीं गेलों. त्याचा संसार टापटिपीचा वाटला. आम्ही त्याच्या घरीं येणार याची त्याला कल्पना असावी. डेन्मार्कमध्यें अशी एक प्रथा आहे कीं, आपल्या घरीं कोणी पाहुणे येणार असल्यास आपल्या अंगणामध्यें जो ध्वजस्तंभ असतो, त्यावर

आपल्या देशाचें मोठें निशाण लावितात. पाहुण्यांच्या सन्मानार्थ हें निशाण लावण्याची पद्धत आहे. वरील शेतकऱ्यानें आमच्या आगमनप्रसंगीं असें निशाण लावून आमचा सत्कार केला. त्याच्याशीं अनौपचारिक गोष्टी बोलून व त्याच्या आतिथ्याचा साभार स्वीकार करून आम्ही बाहेर पडलों.

३ जुलै ५४

टेलिव्हिजनचे लोक आज पुन्हां आले. त्या दिवशीं पावसामुळें त्यांचें काम अपुरें राहिलें होतें. आमच्या श्रमदानाच्या कार्यक्रमाचें त्यांनीं चित्रीकरण केलें. आज येथील कॉलेजांत एक करमणुकीचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. या कार्यक्रमांत आम्हीं पण भाग घेतला. दुसऱ्याची करमणूक करण्याचें कसब आपल्या अंगीं मुळींच नसल्याची पुन्हा एकदां प्रकर्षानें जाणीव झाली. या कार्यक्रमांच्या वेळीं डॉ. मॅनिकी यांनीं चांगल्या विनोदी गोष्टी सांगितल्या. हे गृहस्थ वयानें खूप मोठे आहेत. तथापि तरुणाला लाजवील असा उत्साह त्यांच्याजवळ आहे. आपल्या हाताखालीं काम करणाऱ्या लोकांच्याबरोबर ते अगदीं खेळीमेळीनें वागतात.

४ जुलै ५४

रविवारच्या रजेमुळें आज सर्वत्र सामसूम आहे. घरून फार दिवसांत पत्र नाहीं, त्यामुळें थोडा बेचैन आहें. रविवारचीं कामें करण्यांत दिवस गेला. संध्याकाळीं समुद्रावर फिरावयास गेलों. तेथें आठ-नऊ वर्षांचीं तीन मुलें आलीं होतीं. किनाऱ्यावरील एक छोटीशी होडी घेऊन तीं तिन्ही मुलें नौकाविहाराला निघालीं. बरोबर कोणीहि मोठा माणूस नाहीं व मुलें निर्भयपणें पाण्यामध्यें होडी घेऊन जातात, हें दृश्य पाहून मला त्या मुलांच्या धिटाईचें कौतुक वाटलें.

एल्सिनोरला येऊन पोंचल्याला आज एक महिना पूर्ण झाला. या एका महिन्यांत डेन्मार्कचें राजकीय, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक जीवन खूप जवळून पाहायला मिळालें. कॉलेजांत होणाऱ्या व्याख्यानांनीं सुद्धां ज्ञानांत चांगली भर पडली. पण डेन्मार्कचें खरें दर्शन झालें असेल तर तें येथील लोकांशीं झालेल्या अनौपचारिक परिचयामुळें!

५ जुलै १९५४

सकाळीं दहा वाजतां आम्हीं एल्सिनोर सोडलें व हॉर्नबेक येथें गेलों. तेथें नगरपालिकेनें चालविलेलें एक मिडल्स्कूल आम्हीं पाहिलें. या छोट्याशा शाळेवर जवळजवळ पांच लाख रुपये खर्च करण्यांत आले होते. शाळेंत मुलांची संख्या फक्त चारशें होती. डेन्मार्कमधील नगरपालिका प्राथमिक शिक्षणाचें काम फारच चांगल्या रीतीनें करीत असल्याचें आढळून आलें. या शाळांच्या इमारतीकरितां गांवांतील लोकसुद्धां नगरपालिकांना खूप चांगलें साहाय्य करतात. आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत डेन्मार्कमधील नागरिक अतिशय जागरूक आहेत. ही शाळा पाहिल्यावर आम्ही टिक्यूब येथें गेलों. तेथें आम्ही नगरपालिकेच्या कचेरीला भेट दिली. नगरपालिकेच्या अध्यक्षांनीं आमचें स्वागत केलें. नागरिकांकडून कर कसा वसूल केला जातो व त्याचा हिशेब कोणत्या पद्धतीनें ठेविला जातो, याची कल्पना तेथील नोकरवर्गानें आम्हांला दिली. त्यानंतर नगरपालिकेच्या अध्यक्षांचें भाषण झालें. त्यांनीं आपल्या नगरपालिकेनें चालविलेल्या कामांची माहिती आम्हांस दिली. त्यानंतर आम्हांला अल्पोपहार देण्यांत आला. नंतर आम्हीं वृद्ध लोकांसाठीं त्या नगरपालिकेनें जें एक वसतिगृह चालविलेलें आहे, तें पाहण्यास गेलों.

डेन्मार्कमध्यें लोकांचें राज्य चालू आहे. त्यामुळें या ठिकाणीं जनतेच्या कल्याणाची काळजी सरकार चांगल्या रीतीनें घेत असतें. प्रत्येक डॅनिश् नागरिकाला अन्न, वस्त्र, आसरा मिळाला पाहिजे, या बाबतींत त्याचे हाल होतां कामा नये अशी काळजी येथील सरकार घेत असतें. ज्या म्हाताऱ्या लोकांना म्हातारपणीं स्वतःच्या कमाईवर जगतां येत नाहीं, त्यांच्याकरितां नगरपालिका व इतर संस्था, राहण्यासाठीं घरें बांधतात. ६५ वर्षें वयांचे जे डॅनिश् लोक आहेत त्यांपैकीं निम्म्या लोकांना वृद्धापकाळाचें पेन्शन् मिळत असतें. वर सांगितलेल्या नगरपालिकेनें म्हाताऱ्यांकरितां जें घर बांधलें होतें, त्या घरामध्यें राहणाऱ्या वृद्धांची सर्व सोय व्यवस्थित करण्यांत आली होती. १८४८ सालापासून वृद्धांना मदत करण्याचा कायदा जारी करण्यांत आला आहे. १९३३ सालीं या देशांत दुसरा एक लोककल्याणकारी कायदा सुरू करण्यांत आला. ज्याला ज्याला म्हणून सरकारी मदतीची जगण्यासाठीं जरूरी आहे, त्याला त्याला मदत करण्याची तरतूद या

कायद्यान्वयें करण्यांत आली आहे. वृद्धांकरितां बांधण्यांत आलेलें हें गृह आम्हीं पाहिलें. डेन्मार्कमध्यें लोकांची आयुर्मर्यादा खूप वाढली आहे. सर्वसाधारण भारतीयाचें आयुर्मान ३१ वर्षांचें आहे, तर डेन्मार्कमधील मनुष्याचें आयुर्मान ६५ वर्षांचें आहे.

डेन्मार्कमध्यें एकत्र कुटुंबपद्धति मुळींच नाहीं. मुलाचें लग्न झाल्याबरोबर तो बापापासून वेगळा राहतो. एखाद्या गृहस्थाला चार मुलगे असले तर हे चारहि मुलगे बापापासून वेगळे होतात. नोकरमाणसें ठेवणें येथें लोकांना परवडत नाहीं. त्यामुळें सर्वसाधारण म्हाताऱ्यांना मुलें दूर गेल्यावर स्वतंत्रपणें राहतां येत नाहीं. असे लोक वृद्धांसाठीं बांधलेल्या या गृहांत येऊन राहतात. या ठिकाणीं त्यांच्या शारीरिक गरजा भागविण्याची व्यवस्था केली जाते. माणसाला जरी भाकरी हवी असली तरी केवळ भाकरीवर तो जगूं शकत नाहीं. त्याला मन असतें; भावना असतात. या म्हाताऱ्यांच्या भावनांचा येथें कोंडमारा होत असल्याचें दिसतें. म्हाताऱ्यांना लहान मुलांची संगत हवी असते. नातवांचे लाड करण्यांत आजोबांना आनंद वाटत असतो. ही त्यांची भूक येथें भागत नाहीं. सणावारीं अगर सुट्टीच्या दिवशीं मुलगे व सुना येतात. ते बरोबर नातवंडांना आणतात. त्या दिवशीं म्हातारा खुशींत असतो; पण एरव्हीं मुलांची संगत शोधण्यासाठीं तो सार्वजनिक क्रीडांगणावर जाऊन उभा राहतो. खिशांतील चाकोलेट बाहेर काढून मुलांशीं दोस्ती करण्याचा तो प्रयत्न करतो. या म्हाताऱ्यांची धडपड पाहिली कीं, नातवंडांच्या सांनिध्यांत आपला वेळ घालविणारे आमच्या देशांतील म्हातारे या बाबतींत सुखी आहेत काय, असा प्रश्न माझ्यापुढें उभा राहिला. आमच्या म्हाताऱ्यांची भावनांची भूक भागत असली तरी पोटाची खळगी भरत नाहीं, म्हणून ते दुःखी-कष्टी असतात. या बाबतींत डेन्मार्कचा म्हातारा खरा भाग्यवान् आहे. दुपारच्या जेवणाचा अथवा कपड्यालत्त्याचा प्रश्न त्याला कधींच अवस्थ करीत नाहीं.

या संस्था पाहिल्यावर आम्ही हिलेरॉड येथील एक लोकशाळा पाहण्यासाठीं गेलों. ही एक नाणावलेली लोकशाळा आहे. या ठिकाणीं आम्ही वर्गांत जाऊन व्याख्यानें ऐकिलीं, करमणुकीचे कार्यक्रम पाहिले, व रात्रीचें जेवण घेतलें. लोकशाळेचा कार्यक्रम जितका जवळून पाहतां येईल तितका पाहण्याचा आम्हीं प्रयत्न केला. हा उन्हाळा असल्यामुळें आतां लोकशाळेंत मुलीच आल्या होत्या. सर्वसाधारणपणें या मुली वीस-बावीस वर्षांच्या होत्या. सर्व लोकशाळांमध्यें शिक्षण हें मातृभाषेंतूनच

दिलें जातें. या लोकशाळेंत बायबलच्या अभ्यासावर विशेष लक्ष दिलें जातें. लोकशाळेचा कार्यक्रम सकाळीं आठपासून सुरू होतो व तो रात्रीपर्यंत चालतो. सर्व विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी तेथील छात्रालयांतच राहत असल्यामुळें सामूहिक जीवन जगण्याची त्यांना चांगली संधि मिळते. या लोकशाळेंत बराचसा वेळ घालविल्यावर व त्यांचे सर्व कार्यक्रम पाहिल्यावर, आम्ही निवासस्थानीं परतलों. तत्पूर्वी तेथील विद्यार्थिनींनीं पुढें केलेल्या वह्यांवर स्वाक्षऱ्या देण्याचें काम केलें. डेन्मार्कमधील शाळांमध्यें व इतर संस्थांमध्यें पाहुण्यांकरितां एक पुस्तक ठेविलेलें असतें. संस्थेचे चालक या पुस्तकावर पाहुण्याची सही व पत्ता घेतात.

६ जुलै ५४

सकाळीं व्याख्यानें झालीं. दुपार मोकळीच होती. फार दिवसांनीं घरून आशाचें पत्र आलें. त्यामुळें घरची खुशाली समजली. आमची स्वारी आज खुषींत होती. श्री गौडा व श्री बरकतअल्ली यांच्याबरोबर मी मिसेस लारसनच्या स्टुडिओमध्यें गेलों. त्या बाईनें आम्हां तिघांचा एक ग्रूप फोटो घेतला. फोटोग्राफर बाई स्वभावानें फारच चांगली आहे. तिला एकच मुलगा आहे. त्या मुलाचें नांव एरिक व त्याच्या बायकोचें नांव एडिथ. हा मुलगा व सून कोपनहेगनजवळ राहतात.

७ जुलै ५४

दोन व्याख्यानें झाल्यावर आम्ही एक लोकशाळा पाहण्याकरितां निघालों. ही लोकशाळा मागें ज्यांचा उल्लेख करण्यांत आला आहे, त्या नवरुप नांवाच्या गृहस्थानीं चालविलेली आहे. डेन्मार्कमधील शिक्षणक्षेत्रांत नवरुप यांचें स्थान मोठें. त्यांचा अधिकार मोठा. त्यामुळें त्यांची शाळा पाहतांना विशेष आनंद वाटला. या ठिकाणीं रात्रींच्या शाळेंत काम करणाऱ्या शिक्षकांसाठीं एक ट्रेनिंगचा वर्ग चालला होता. त्यांना तांब्यापितळेच्या वस्तू करण्याचें काम शिकविलें जात होतें. दुसरा एक वर्ग स्त्रियांसाठीं चालला होता. या ठिकाणीं स्त्रियांना आपलें मासिक अंदाजपत्रक कसें करावें याचें शिक्षण देण्यांत येत होतें. साधारणपणें

पावणेदोनशें ते दोनशें रुपये कमाविणाऱ्या एका मुलीनें आपलें स्वतःचें मासिक अंदाजपत्रक आम्हांला दाखविलें. डेन्मार्कमधील सर्वसाधारण मुलीला कोणता खर्च करावा लागतो व तिचें नित्याचें जीवन कसें असतें याची कल्पना यावी म्हणून, हें अंदाजपत्रक मीं लिहून घेतलें.

| | | रुपये |
|---|---|---|
| (१) | राहण्याचा व भोजनाचा खर्च ...... | ७५ |
| (२) | दूध ...... | ३ |
| (३) | वाहतूक ...... | १२ |
| (४) | प्रातीवरील व इतर कर ...... | ७ |
| (५) | विमा वगैरे ...... | ६ |
| (६) | क्लब वगैरेची फी ...... | ६ |
| (७) | सौंदर्यप्रसाधनाचीं साधनें ...... | ८ |
| (८) | वर्तमानपत्रें ...... | २ |
| (९) | सिनेमा व इतर करमणुकीचा खर्च ...... | २ |
| (१०) | उन्हाळी व हिंवाळी कपडे, बूट वगैरेकरितां बाजूला ठेवावयाची रक्कम ...... | ४० |
| (११) | इतर अनपेक्षित खर्च ...... | १५ |
| | | १७६ |

मुलांपेक्षां मुली मासिक दोनशें रुपयांचें उत्पन्न अधिक लवकर कमावूं शकतात. कारण मुलींकरितां निरनिराळ्या प्रकारच्या नोकऱ्या वाट पाहात असतात. डेन्मार्क-मध्यें बेकारीचें प्रमाण फारच कमी आहे. हिंवाळ्यांत शेंकडा आठ टक्के लोक बेकार असतात, तर उन्हाळ्यांत फक्त एक टक्का लोक बेकार आढळतात. येथें कल्याणकारी राज्य असल्यामुळें बेकारीपासून रक्षण करण्याकरितां कामगारांचा विमा उतरविण्यांत येतो. बेकारीच्या काळांत त्याला भत्ता मिळतो व 'एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज' त्याच्यासाठीं काम शोधीत असते. या ठिकाणीं व्यवसायमार्गदर्शनाचें शिक्षण देण्याची सोय करण्यांत आली होती. डेन्मार्कमध्यें शिक्षकांना व्यवसाय-मार्गदर्शन करावें लागतें. शिक्षकांचा विद्यार्थ्यांशीं जसा संबंध असतो तसाच 'एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज'शींहि असतो. प्रारंभीं शिक्षक विद्यार्थ्यांना व्यवसायाबाबत मार्गदर्शन करितात. त्यानंतर जरूर लागल्यास सरकारी अधिकारी बोलाविण्यांत

येतो, व तो जरूर लागणारा सल्ला पुरवितो. डेन्मार्कमध्यें हें व्यवसायमार्गदर्शनाचें काम अगदीं अलिकडे सुरू करण्यांत आलें आहे. सबंध डेन्मार्कमध्यें असें मार्गदर्शन करणारे १४ सरकारी अधिकारी आहेत.

मि. नवरुप हे लोकशाळांचे एक अनुभवी तज्ज्ञ असल्यामुळें डेन्मार्कनें लोकशाळेच्या क्षेत्रांत एवढी प्रगति कशी केली, हें त्यांच्याकडून जाणून घेण्याचा आम्हीं अभ्यासपूर्वक प्रयत्न केला. "आमच्या येथें प्रौढ शिकायला तयार होत नाहींत. डेन्मार्कनें अशी कोणती किमया केली कीं, ज्यामुळें इतक्या उत्साहानें खेड्यांतील प्रौढ लोकशाळेंत जायला तयार होऊं लागले?" असा प्रश्न आम्हीं त्यांना विचारला.

"डेन्मार्कमधला शेतकरी १९ व्या शतकाच्या सुरुवातीला गुलामगिरींतच होता. १८१४ सालीं प्राथमिक शिक्षण सक्तीचें झालें. लोकांच्या हातीं सत्ता जाण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. शिकलेले लोक शेतकऱ्यांकडे तुच्छतेनें पाहात असत. ग्रामीण भागांतील शेतकरी व शहरी विभागांत राहणारे नागरिक यांच्यामध्यें तेढ वाढूं लागली. शेतकऱ्यांना जाणीव होऊं लागली कीं, आपणांला केवळ शिक्षण नसल्यामुळेंच हे शहरांतील लोक आपल्याशीं उद्धटपणें वागतात. आपण जर शिक्षण घेतलें, तर आपणांला सुद्धां देशाच्या कारभारांत भाग घेतां येईल. १८२० ते १८४० या काळांत शेतकऱ्यांना मंदीचे फटके बसले. पण यामुळें शेतकरी अधिक जागा झाला. १८४९ सालीं डेन्मार्कमध्यें लोकशाही राज्यपद्धति अस्तित्वांत आली व सत्ता लोकांच्या हातीं आली. परंतु बहुसंख्य लोक शेतकरी होते. ते शिक्षित नव्हते. लोकशाही प्रस्थापित झाल्यावर शहरांतील लोक म्हणूं लागले, "आपल्या देशांत शेतकरी संख्येनें खूप आहेत. त्यांची संख्या मोठी म्हणून राजकीय सत्ता त्यांच्या हातीं जायला पाहिजे. पण जोंपर्यंत हे शेतकरी अडाणी आहेत, तोंपर्यंत हीं मेंढरें हाकून नेणें अगदीं सोपें आहे. त्यांच्याजवळ संख्याबळ असलें तरी अकलेचें बळ आपल्याजवळ आहे. या अकलेच्या जोरावर आपण यांना ताब्यांत ठेवूं शकूं. सत्ता आपल्या हातीं टिकविणें मोठें कठीण नाहीं."

शहरीं सुशिक्षितांचे हे उद्गार भोळ्या शेतकऱ्यांना बोचूं लागले. आपण अडाणी म्हणून आपल्यावर हुकुमत गाजविण्याचा सुशिक्षितांचा कावा त्यांच्या लक्षांत आला. शिक्षण घेण्यासाठीं ते धडपडूं लागले. ही जागृति ग्रुंडरविगनें

जनतेमध्यें निर्माण केली व त्याच वेळीं त्यानें लोकशाळांची कल्पना जनतेपुढें मांडली. मंत्रमुग्ध होऊन लोकांनीं ती कल्पना ऐकून घेतली. आलेल्या आर्थिक मंदीमुळें निराश झालेल्या शेतकऱ्याला आशेचीं किरणें दिसूं लागलीं. परिस्थितीच्या झंझावातांत सांपडलेला शेतकरी सुखाच्या पैलतीरावर जाण्यासाठीं जेव्हां धडपडत होता, तेव्हां लोकशाळेच्या कल्पनेचा दीपस्तंभ ग्रुंडरविगनें त्यांना दाखविला आणि मोठ्या आशेनें आणि उत्साहानें डेन्मार्कच्या शेतकऱ्यांनीं त्या दीपस्तंभाकडे धाव घेतली. यामुळेंच डेन्मार्कच्या लोकशाळा शेतकऱ्यांमध्यें लोकप्रिय झाल्या व ही लोकशाळांची चळवळ त्यांनीं इतक्या हिरिरीनें, उत्साहानें आणि आशेनें उचलून धरली. याप्रमाणें मि. नवरुप यांनीं लोकशाळांच्याबद्दल सांगितलेली माहिती आम्हीं काळजीपूर्वक ऐकून घेतली. त्यांच्याशीं, त्यांच्या शिक्षकांशीं व विद्यार्थ्यांशीं तेथील कार्यक्रमाबाबत भरपूर चर्चा केल्यावर आम्ही घरीं परतलों.

८ जुलै ५४

भारतसरकारला पैशासाठीं पाठविलेल्या पत्रांना अजूनपर्यंत कांहीं उत्तर आलें नव्हतें. बरोबर आणलेले बहुतेकांचे पैसे संपायला आले होते. त्यामुळें आज आमच्या मंडळींची सभा होऊन पुढील कार्यक्रमांबाबत चर्चा झाली. त्याचप्रमाणें गेल्या महिन्याभरांत आम्हीं येथें जें पाहिलें त्याचा अहवाल गटागटानें तयार करावा, म्हणजे अंतिम अहवाल लिहिणें सोपें जाईल, असें ठरलें. संध्याकाळीं आम्ही त्या फोटोग्राफर बाईकडे गेलों. परवां त्यांनीं काढलेलीं आमचीं छायाचित्रें त्यांना पसंत न पडल्यामुळें, त्यानीं पुन्हा आमचीं एकदोन चित्रें घेतलीं.

९ जुलै ५४

दोन व्याख्यानांच्या व्यतिरिक्त इतर कांहीं कार्यक्रम नसल्यामुळें आम्हीं गांवांत फिरण्यासाठीं गेलों. आमच्यापैकीं कांहीं मंडळींना थोडीफार खरेदी करण्याची इच्छा होती. परंतु खरेदी करण्यासाठीं पैसा खिशांत नसल्यामुळें आम्ही दुकानांत जाऊन वस्तु पाहण्याचेंच काम केलें. ह्यानंतर पुन्हा आम्ही त्या फोटोग्राफरकडे गेलों. माझें एक चांगलें एन्लार्जमेन्ट तयार केलेलें त्या बाईनें मला दाखविलें. तें

खूपच चांगलें होतें. तें विकत घ्यावें असें मनापासून मला वाटलें; परंतु त्याचा आकार अवास्तव असेल अशी भीति वाटत असल्यामुळें त्याची किंमत विचारण्याचें धैर्य मला झालें नाहीं; पण इतक्यांत ती बाई म्हणाली, "डेन्मार्कची आठवण म्हणून हें छायाचित्र आपणांस बक्षीस देण्यासाठीं मी इतकें काळजीपूर्वक तयार केलें आहे." तिचें हें वाक्य ऐकून मला खूप आश्चर्य वाटलें.

या फोटोग्राफर बाईच्या मदतीला खिस्तन या नांवाची एक छोटीशी मुलगी आहे. ती सतरा-अठरा वर्षांची असेल. खिस्तन अत्यंत चलाख आणि बुद्धिमान आहे. मिसेस लारसनना फोटोग्राफीच्या कामांत ती मदत करीत असते. त्यांच्याकडून ती फोटोग्राफीचे धडे पण घेत असते. "मिसेस लारसनसारखी मी पण एक मोठी फोटोग्राफर होणार आहें," असें खिस्तन आम्हांला म्हणाली. डेन्मार्कमधल्या मुलींमध्यें एक प्रकारचा आत्मविश्वास, धीटपणा व मोकळेपणा आढळून येतो. याचें मुख्य कारण म्हणजे तेथील लोकांचा सुसंस्कृतपणा हेंच असावें. स्त्रियांशीं वागतांना त्यांची वृत्ति दाक्षिण्यानें व आदरानें भरलेली दिसते. या पुरुषांच्या चांगल्या समंजस वृत्तीमुळेंच येथील मुलींना एक प्रकारची सुरक्षितता वाटत असते व त्या निर्भयपणें हिंडूं फिरूं शकतात. रात्रीं दहा-अकराच्या सुमारासमुद्धां खिस्तनसारखी एखादी मुलगी डेन्मार्कमधील रस्त्यावरून, सायकलीवरून अथवा पायीं, हिंडूं फिरूं शकते. हें दृश्य पाहिल्यावर तेथील लोकांच्या सुसंस्कृतपणाबद्दल आदर वाटूं लागतो.

१० जुलै ५४

सकाळीं न्याहारी झाल्यावर आम्ही येथील ग्रंथालयांत गेलों. या ठिकाणीं आम्हीं कांहीं फिल्म्स पाहिल्या. त्यांपैकीं एक फिल्म ओडिसीबद्दल होती. डेन्मार्कमधील एक सुप्रसिद्ध परीकथालेखक हॅन्स खिश्चन अँडरसन याचें हें निवासस्थान होतें. त्यामुळें या जागेला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. डेन्मार्कमधील एक मोठें शहर म्हणून सुद्धां या शहराला महत्त्व मिळालें आहे.

या ग्रंथालयाचे ग्रंथपाल मि. ब्रेमर्स्टन यांनीं येथील ग्रंथालय-चळवळीबद्दल अधिक माहिती सांगितली. डेन्मार्कमधील छोट्या ग्रंथालयांसाठीं मध्यवर्ति ग्रंथालयाकडून दर आठवड्याला नवीं पुस्तकें येत असतात. कालांतरानें तीं परत

करावयाचीं असतात. या छोट्या ग्रंथालयांना मध्यवर्ति ग्रंथालयाकडून हरएक प्रकारची मदत होत असते; पण त्यांच्यावर ह्या मध्यवर्ति ग्रंथालयाचें कोणत्याहि प्रकारचें नियंत्रण नसतें. प्रत्येक कौंटीची एक मध्यवर्ति लायब्ररी असते. ही चांगलीच मोठी असते. अशा कौंटी लायब्ऱ्या डेन्मार्कमध्यें ३३ आहेत. या ग्रंथालयांतून पुस्तक नेणाऱ्यांना कोणतीहि फी द्यावी लागत नाहीं; डिपॉझिट ठेवावें लागत नाहीं. सर्व काम विश्वासावर चालतें. लोकांनीं काय वाचावें याबाबत ग्रंथपाल लोकांना मार्गदर्शन करतात.


डॅनिश लेखक हॅन्स ख्रिश्चन अँडरसन

“वाचनालयांत येणारे लोक साधारणपणें कोणत्या प्रकारचीं पुस्तकें अधिक वाचतात?” असा प्रश्न मीं विचारतांच मिस्टर ब्रेमर्स्टन म्हणाले, “लोक वाचीत असलेल्या पुस्तकांपैकीं सत्तर टक्के पुस्तकें हीं कथा कादंबऱ्या असतात. सर्वांत जास्त उडी या पुस्तकांवरच असते.”


एका परीकथेंतील दृश्य

ग्रंथालय पाहून झाल्यावर आम्ही आमच्या निवासस्थानीं परत आलों. या निवासस्थानांवर देखरेख करण्याचें व येथील सर्व व्यवस्था पाहण्याचें काम मिसेस अँडरसन नांवाची एक बाई करते. ही एक फ्रेंच बाई आहे. तिला इंग्रजी

मुळींच येत नाहीं; डॅनिश थोडें येतें. पहाटे पांच वाजल्यापासून तों रात्रीं दहा वाजेपर्यंत ती सारखी काम करीत असते. पायाला भिंगरी लावल्याप्रमाणें ती पळत असते. प्रत्येक बारीकसारीक गोष्टीकडे अत्यंत काळजीपूर्वकपणें तिची करारी नजर लक्ष देत असते. आमच्या ह्या निवासस्थानांत राहणाऱ्या लोकांसाठीं मधून मधून करमणुकीचे कार्यक्रम होतात. एरव्हीं खूप गंभीर वाटणारी मिसेस ॲंडरसन या करमणुकीच्या कार्यक्रमांत उत्साहानें भाग घेते. अशाच प्रकारचा कार्यक्रम आज ठेवण्यांत आला होता. या कार्यक्रमानंतर बरीच रात्रपर्यंत पर्ल बकनें लिहिलेली 'हिडन फ्लॉवर' नांवाची कादंबरी मी वाचीत पडलों होतों. येथें आल्यापासून माझे झोपेचे तास कमी झाले आहेत. येथें सकाळ लवकर उजाडते व रात्र उशिरां होते. त्यामुळें झोपेचे तास आपोआपच कमी होतात.

११ जुलै ५४

रविवारची सुट्टी असल्यामुळें कपडे धुण्याव्यतिरिक्त महत्त्वाचा कार्यक्रम नव्हता. आमच्या फोटोग्राफर मिसेस लारसन यांनीं आम्हांस आज सकाळींच चहाला बोलाविलें होतें. त्यांचें घर सुप्रसिद्ध क्रॉनबर्ग किल्ल्याच्या समोर उंच अशा जागीं आहे. घरापासून रस्त्यापर्यंतचा भाग सारखा उतरत जातो. या उतरणीवर सुंदर झाडें लावलेलीं आहेत. घर मोठें आकर्षक आहे. मिसेस लारसनचें वय ५० वर्षांचें आहे. त्यांच्या घरीं एक म्हातारा भेटला. बाईनीं आमची त्यांच्याशीं ओळख करून दिली; पण हा म्हातारा त्या बाईचा कोण याचा उलगडा त्या ओळखीवरून झाला नाहीं. बाईची साहाय्यक खिस्तन तेथें आली होती; मी तिला विचारलें, "हा म्हातारा कोण ?" ती म्हणाली, "तो बाईचा खरा नवरा. त्याचें वय ८२ वर्षांचें आहे. तो पण एक चांगला फोटोग्राफर होता; कलेच्या नादानें वेडावलेल्या लारसन बाईनीं तरुणपणीं त्याच्यावर प्रेम केलें होतें व त्यांचा प्रीतिविवाह झाला होता." मिसेस लारसनच्या वागण्यावरून आतां तिला त्या माणसाबद्दल फारसें आकर्षण राहिलें नसावें असें, कां कुणास ठाऊक, मला वाटलें. कदाचित् मी तिला अन्याय करीत असेन. मिसेस लारसन ही अत्यंत प्रेमळ आणि मनमोकळी बाई आहे. आमच्याशीं मैत्री वाढविण्यासाठींच तिनें आम्हांला घरीं बोलाविलें होतें. चहा घेत असतांना

बाईनीं आमचीं छायाचित्रें पण घेतलीं. गप्पागोष्टी करण्यांत व चहा आणि केक्स फस्त करण्यांत खूपच वेळ गेला. निवासस्थानीं परत आल्यावर भोजनाची वेळ केव्हांच टळून गेल्याचें कळलें. इच्छा असती तर जेवण मिळालें असतें, पण लारसन बाईच्या येथें चांगला फराळ झाल्यामुळें व आज आषाढी एकादशी असल्याची आठवण ऐन वेळीं झाल्यामुळें फळांच्या रसावरच दुपार भागविली. येथील आमच्या शिक्षणाबाबत भारतसरकारला जो अहवाल द्यावयाचा आहे, तो लिहिण्याचें काम श्री. निखिल रॉय व मी असें आम्हीं दोघांनीं करावयाचें आजच्या आमच्या सभेंत ठरलें. ही एक नवी जबाबदारी झाली.

१२ जुलै ५४

सकाळीं व्याख्यानें झालीं व दुपारच्या जेवणानंतर आम्ही एल्सिनोर नगरपालिकेनें शहरांत चालविलेलें काम पाहावयास निघालों. त्या ठिकाणीं महापौरांच्या वतीनें आमचें स्वागत करण्यांत आलें. स्वागत केवळ शाब्दिक नव्हतें. चहापाण्याची व्यवस्था पण चांगलीच होती. या नगरपालिकेनें लोकोपयोगी कामें कोणतीं चालविलीं आहेत, त्याची माहिती आम्हांला देण्यांत आली. ज्या दिवाणखान्यांत आमचें स्वागत करण्यांत आलें, त्या ठिकाणीं भिंतीमध्यें संगमरवरी दगडांवर कोरलेल्या पाट्या बसविण्यांत आल्या होत्या. त्यांची फार मोठी संख्या पाहून त्या कशाविषयीं आहेत हें जाणून घेण्याची आमची उत्सुकता वाढली. तपासाअंतीं असें कळलें कीं, आपल्याकडे ज्याप्रमाणें इमारतींना देणग्या देणारांचीं नांवें त्या त्या इमारतींवर लिहिण्यांत येतात, तशापैकींच तो प्रकार होता.

येथून आम्हीं, म्हाताऱ्या लोकांसाठीं नगरपालिकेनें बांधलेलीं 'वृद्धांचीं वसतिगृहें' पाहण्यासाठीं गेलों.

आपल्याप्रमाणें एकत्रकुटुंबपद्धति डेन्मार्कमध्यें नाहीं. त्यामुळें लग्नानंतर मुलें स्वतंत्र बिऱ्हाड करून आईबापांपासून विभक्त राहतात. सर्वसाधारण उत्पन्नाचीं जीं म्हातारीं माणसें आहेत, त्यांच्याकरितां अशीं वसतिगृहें चालविण्यांत येतात. या वसतिगृहांत वृद्ध जोडप्यांकरितां दोन खोल्यांचा ब्लॉक असतो. त्या ठिकाणीं त्यांना स्वयंपाक करतां येईल अशी व्यवस्था केली जाते. परंतु ही म्हातारी अथवा हा म्हातारा एकटा असला तर त्यांना एकच खोली देण्यांत

येते. अशा लोकांची जेवणाची व्यवस्था त्या ठिकाणीं असलेल्या सामुदायिक भोजनगृहांत करण्यांत येते. येथील व्यवस्था चांगली होती. म्हाताऱ्यांची खूपच काळजी घेतली जात होती. त्यानंतर आम्हीं याच नगरपालिकेनें चालविलेलें अर्भकालय, किंडरगार्टन शाळा इत्यादि संस्था पाहिल्या. या संस्था पाहात असतांना आम्हांस तीन अमेरिकन मुली भेटल्या. तरुण विद्यार्थि-विद्यार्थिनींना जग पाहण्याची मिळालेली ही संधि पाहून व या देशांतील विद्यार्थ्यांना ज्ञान-संवर्धनासाठीं मिळत असलेल्या सवलती पाहून, हें भाग्य आमच्या विद्यार्थ्यांना केव्हां लाभेल, असा विचार मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. संस्था पाहून परत आल्यावर पर्ल बकची कादंबरी माझी वाट पाहात होतीच. ती वाचण्यांत पुढील वेळ गेला.

१३ जुलै ५४

प्रो. जोहानसनबरोबर सकाळींच आम्ही कोपनहेगनला जावयास निघालों. हे प्राध्यापक मूळचे डॅनिश; पण अमेरिकेंत जाऊन स्थायिक झालेले. आपल्या येथें मासिकांमधून ज्या एका विशिष्ट प्राध्यापकांचें वर्णन केलें जातें, त्याच नमुन्याचे हे प्राध्यापक होते. त्यांच्याबरोबर प्रथम आम्ही कोपनहेगन येथील लायब्ररींत गेलों. ती पूर्वींच पाहिलेली असल्यामुळें तेथें आम्हीं फारसा वेळ घालविला नाहीं. तेथून पुढें आम्ही डेन्मार्कचा राष्ट्रीय म्यूझियम पाहायला निघालों. म्यूझियम खूपच मोठा आहे. थोड्या वेळांत तो सर्व पाहून होणें शक्य नाहीं; म्हणून आज आम्ही पौर्वात्य विभागच पाहण्याचें ठरविलें. या विभागांत तिबेट, चीन, जपान, नेपाळ, भारत इत्यादि देशांतील निरनिराळ्या वस्तू आणून ठेविलेल्या होत्या. भारताकरितां एक स्वतंत्र विभाग होता त्या विभागांत पुढील वस्तु पाहून आश्चर्य वाटलें. दळण्याचें जातें, पत्रावळ, द्रोण, पखाल, विळी, पुणेरी जोडा, बायकांचें नऊवारी लुगडें, गवऱ्या इत्यादि वस्तू तेथें होत्या.

शंकराची एक पिंडी व एक मोठा नंदी तेथें पाहायला मिळाला. बुद्धाच्या निरनिराळ्या मूर्ति येथें होत्या. या म्यूझियममध्यें थोडा वेळ घालविल्यावर आम्ही एल्सिनोरला परत आलों. आज जेवण वाढण्यासाठीं एक नवी मुलगी आलेली दिसली. तिची ओळख करून देण्यांत आली. हिचें नांव ईव्हा. ती चौदा-पंधरा वर्षांची असेल. ईव्हा नवव्या इयत्तेंत आहे. ती नॉर्वेजिअन मुलगी

आहे. तिच्या आईला नॉर्वेमधील डॉक्टरांनीं अपक्व अन्न घेण्याची सूचना केली आहे. या अन्नासंबंधींची माहिती मिळविण्याकरितां ईव्हा मुद्दाम येथें राहून अपक्व अन्नाबाबतचें सर्व तंत्र शिकून घेणार आहे. ईव्हाची शाळा आतां बंद आहे. नववींतील ईव्हा आपल्या सुट्टीचा कसा सदुपयोग करून घेते पाहा. या ठिकाणीं राहून जरूर तें शिक्षण घेण्यासाठीं पैसा खर्चण्याची पाळी येऊं नये म्हणून ईव्हानें येथें मोलकरणीचें (maid) काम पत्करलें आहे. पडेल तें काम हसत करायचें व हवें तें शिक्षण घ्यायचें अशी ईव्हाची वृत्ति आहे. परक्या ठिकाणीं असलें हलकें काम करण्याची ईव्हाला मुळींच लाज वाटत नाहीं. तिला इंग्रजी येत असल्यामुळें निवासस्थानांतील इतर बायांशीं बोलतांना ईव्हाची आतां मदत होऊं शकेल.

१४ जुलै ५४

उद्यांपासून आम्ही सर्व मंडळी खेड्यांत राहायला जाणार आहोंत. प्रवासाची तयारी करण्यासाठीं आजचा दिवस मोकळा ठेवण्यांत आला आहे. आमच्या बरोबर आलेले श्री मन्मथ रॉय यांनीं आज सकाळीं माझे केस कापले. केवळ छंद म्हणून त्यांनीं ही कला हस्तगत केली आहे. आज परदेशांत त्यांना व त्यांच्या मित्रांना त्यांच्या या छंदाचा किती चांगला उपयोग होत आहे! मन्मथ-बाबू पश्चिम बंगालच्या शिक्षणखात्यांत सरकारी नोकर आहेत. आपले केस कापण्याची त्यांना विनंति करतांना मला संकोच वाटला; परंतु आमच्या दादांनीं (श्रीधर) माझें काम केलें. केस चांगले कापले गेले.

दुपारीं आम्हा सर्वांना डॉ. मॅनिकी यांनीं चहाला बोलाविलें होतें. तेथें मिसेस मॅनिकींची ओळख करून देण्यांत आली. पुरुष ज्या वेळीं एकाद्या सार्वजनिक क्षेत्रांत विशेष तळपत असतो, त्या वेळीं प्रकाशांत मुळींच न येतां मागें राहून त्याला स्फूर्ति व हरएक प्रकारचें साहाय्य देणाऱ्या त्याच्या पत्नीच्या त्यागाची, निष्ठेची व श्रमाची, सर्वसाधारण लोकांना कल्पना येत नाहीं. लोकांना दिव्याचा प्रकाश दिसतो. त्या प्रकाशाच्या मागें असलेला डायनामो दिसत नाहीं. हीच स्थिति सार्वजनिक काम करणाऱ्या पुरुषांच्या पत्नीची असते. डॉ. मॅनिकींचें कार्य युरोपमध्यें मशहूर आहे. पण तें चालवीत असलेली संस्था उभारण्याच्या

कामीं मिसेस् मॅनिकी यांनीं घेतलेले श्रम कोणाच्या फारसे लक्षांत येत नाहींत. या चहाच्या समारंभाच्या वेळीं डॉक्टरांनीं आपल्या पत्नीच्या मदतीची थोडी कल्पना आम्हांला दिली. वेल्समधील प्राध्यापक डॉ. ग्रिफित्स व त्यांची पत्नी पण चहाला आली होती. डॉ. ग्रिफित्स मोठा हुशार माणूस आहे. भारताबद्दल आपणाला खूप जिव्हाळा असल्याचें तो वेळीं अवेळीं आम्हांला सांगत असतो. आमच्यापैकीं कांहीं लोकांवर त्यांनीं चांगलीच मोहिनी टाकली आहे.


या कार्यक्रमानंतर कॉलेजमध्यें एक करमणुकीचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचें धुरीणत्व स्वीडनच्या लोकांनीं घेतलें होतें. त्यांनीं सर्वांची करमणूक केली व सर्वांना चहा दिला.

१५ जुलै ५४

आज पंधरा तारीख. आजपासून आमची सर्वांची रवानगी डेन्मार्कमधील खेड्यांत होणार होती. सकाळींच डॉ. मॅनिकी आले. त्यांनीं एक यादी आणली होती. कोण कोठल्या कोणत्या गांवीं शेतकऱ्याच्या घरीं राहणार, याची त्यांनीं आम्हांला कल्पना दिली. माझ्यासाठीं पूर्वीं मीं पाहिलेलें स्टॅव्हनशॉल्ट हें गांव निवडण्यांत आलें होतें. तेथील मिस्टर ॲण्ड मिसेस् ओल्सन ह्यांच्या घरीं मी राहणार होतों. ह्यांची भेट जरी पूर्वीं झाली असली तरी एका जवळजवळ अनोळखी अशा परदेशी गृहस्थाच्या घरांत सोळा-सतरा दिवस आपले कसे जातील याविषयीं सारखी हुरहूर वाटत होती. यापूर्वीं आयुष्यांत कोणाकडेहि मीं तीनचारपेक्षां जास्त दिवस काढलेले नाहींत. या घरांत आपलें कसें जमेल याची काळजी वाटत होती. पण शेतकऱ्याच्या घरीं राहणें हा एक आमच्या शिक्षणाचा भाग होता व त्यामुळें हा कार्यक्रम टाळतां येण्यासारखा नव्हता. आल्या प्रसंगाचें हसत स्वागत करण्यांतच शहाणपणा आहे असा मनाशीं विचार करून आम्ही निघालों. सर्वजण एका बसमध्यें बसलों. जसजसा एकेकाचा गांव जवळ आला तसतसा आमच्यापैकीं एकएकजण उतरूं लागला. उतरणारा माणूस धडधडत्या अंतःकरणानेंच उतरत होता. तुमचे येथील दिवस सुखाचे जावोत, अशी सदिच्छा व्यक्त करून आम्हीं आमच्या मित्रांना निरोप देत होतों. सर्वांत शेवटीं बस स्टॅव्हनशॉल्टला आली.

बसच्या नाक्यावर श्री लेंढे यांचें स्वागत करण्यासाठीं मिस्टर ॲण्ड मिसेस् रासमुसन, श्री राजनायकम् यांच्या स्वागतासाठीं ९४ वर्षांचे मिस्टर एव्सन व त्यांचा नातू मून्स व माझ्या स्वागतासाठीं मिस्टर ॲण्ड मिसेस् ओल्सन हजर होतीं. या दोघांनीं माझें सामान उचलण्यास मदत केली व डॉक्टर मॅनिकींसह मी त्यांच्या घरीं जाऊन दाखल झालों.

डेन्मार्कमधील आमच्या वास्तव्यांतील एका नव्या पर्वाला आज सुरुवात झाली. मिस्टर आणि मिसेस् ओल्सन यांना इंग्रजी चांगलें येत नाहीं. त्यांच्या घरांतील मुलांना व नोकरांना मुळींच इंग्रजी येत नाहीं. मला मुळींच डॅनिश येत नाहीं. त्यामुळें येथें आपलें जमणार कसें, असा विचार मनांत आला; तोंच आमच्या यजमानांचीं दोन मुलें, हेनिंग व ऑस्कॉव्ह, आपल्या घरांत आलेला नवा प्राणी पाहण्याच्या कुतूहलानें आपल्या चारदोन मित्रमैत्रिणींना घेऊन तेथें आले. त्यांच्या



घरासमोरील अंगणांत चाललेलें चहापान

आईनें त्यांची माझ्याशीं ओळख करून दिली. एकमेकांची भाषा एकमेकांना न समजल्यामुळें नुसतें हसण्यापलीकडे मी कांहीं करूं शकलों नाहीं. मुलें खूप

कुतूहलानें माझ्याकडे बघत होतीं. मुलांची थट्टामस्करी करणें मला खूप आवडतें; पण या मुलांशीं बोलणें मला शक्य नव्हतें. आमच्या यजमानीणबाईनें भाषेबाबत त्यांची व माझी जी अडचण होणार होती, ती लक्षांत घेऊन दोन छोटे शब्दकोश आणले होते. एक इंग्रजी-डॅनिशचा शब्दकोश तिनें माझ्या हातीं ठेविला व दुसरा डॅनिश-इंग्रजी शब्दकोश स्वतःसाठीं व आपल्या यजमानासाठीं आणला असल्याचें तिनें मला सांगितलें.

चहा झाला. डॉ. मॅनिकी यांची जाण्याची वेळ झाली. खाण्यापिण्याबाबतच्या माझ्या काय गरजा आहेत, त्याची मिसेस् ओल्सननें डॉ. मॅनिकींजवळ चौकशी केली. मी गोमांस व डुकरांचें मांस खाणार नाहीं, बाकी मला वाटेल तें चालेल, असें डॉ. मॅनिकी यांच्यामार्फत मीं त्यांना कळविलें. त्यानंतर आमचा निरोप घेऊन डॉ. मॅनिकी निघून गेले. ते गेल्यावर मात्र एका भरल्या कुटुंबांत मी अगदीं एकटा असल्याची मला जाणीव झाली. इतक्यांत ओल्सन बाई तेथें आली व तिनें आपल्या घराचा भूगोल मला समजवून दिला. माझ्यासाठीं ठरवलेली खोली मला तिनें दाखविली. माझे कपडे ठेवण्यासाठीं आपल्याच कपाटाचा एक खण रिकामा करून दिला. मला काय हवें नको, त्याचा तपास करून ती निघून गेली. जेवणाची वेळ होईपर्यंत मी एकटाच होतों. जेवणाच्या वेळीं तिचे यजमान भेटले. पहिलाच दिवस. फारसा परिचय नाहीं. भाषेची अडचण. त्यामुळें फारसें संभाषण होऊं शकलें नाहीं. शहरापेक्षां येथें थंडी अधिक असल्याचें जाणवत होतें. त्यामुळें जेवण झाल्यावर त्यांचा निरोप घेऊन मी माझ्या खोलींत आलों. पुस्तक घेऊन झोप येईपर्यंत मी वाचीत पडलों. सतरा दिवसांतील एक दिवस कमी झाल्याची जाणीव होऊन तेवढेंच मनाला समाधान वाटलें.

१६ जुलै ५४

काल रात्रभर तर थंडीच पडली होती. परकें घर व कडाक्याची थंडी; त्यामुळें चांगली झोप मिळाली नाहीं. सकाळपासून पावसानें सारखी सोबत केली आहे. येथील लोक थट्टेनें आम्हांला म्हणतात, 'तुम्ही येतांना बरोबर पावसालासुद्धां आणलेंत कीं काय?' डेन्मार्कमधील हे उन्हाळ्याचे दिवस; पण यंदा येथें सारखा पाऊस आहे.

आज संध्याकाळीं मिस्टर ॲण्ड मिसेस् ओल्सन यांच्याबरोबर आम्ही मिस्टर रासमुसनकडे गेलों. आमच्या बरोबरीचे श्री लोंढे यांची व्यवस्था या गृहस्थाकडे केली होती. त्यांनीं आम्हांला भेटण्यासाठीं व आमची ओळख करून देण्यासाठीं जवळपासच्या कांहीं लोकांना रात्रीं कॉफीपानाला बोलाविलें होतें. डेन्मार्कमध्यें हा कॉफीपानाचा कार्यक्रम रात्रीं बराच वेळपर्यंत चालतो. मिस्टर रासमुसन यांना नील्स या नांवाचा एक मुलगा आहे. हा मुलगा फार चौकस व बोलका आहे. याचें वय सोळा वर्षांचें आहे. तो आपल्या वडिलांच्या शेतावर उमेदवार म्हणून काम करतो. त्याबद्दल त्याला त्याचे वडील २२०० क्रोनर उन्हाळ्यामध्यें देतात. म्हणजे जवळजवळ १६०० ते १७०० त्याला रुपये मिळतात व हिंवाळ्यांत १२०० क्रोनर म्हणजे ९०० ते १००० रुपये मिळतात. नील्स उन्हाळ्यांत बारा तास





मिसेस् ओल्सन

मि. ओल्सन

(ज्या शेतकऱ्यांकडे लेखक राहिले तीं शेतकरी पतिपत्नी)



लेखक

काम करतो. डेन्मार्कमध्यें उन्हाळ्यांत मजुरांचा तुटवडा असतो. या वेळीं बेकारीचें प्रमाण एकदम कमी होतें व मजुरीचे भाव वाढतात. नील्सचा राहण्याचा जेवणाचा व कपडे धुण्याचा खर्च त्याच्या वडिलांना करावा लागतो. (सर्वसाधारणपणें सर्वच धन्यांना आपल्या नोकरांसाठीं हा खर्च करावा लागतो.) नील्सला लागणारे नवे कपडे तो आपल्या पगारांतून घेतो. त्याचप्रमाणें वाचायला लागणारीं पुस्तकें, सिनेमा वगैरे इतर करमणुकी, सहली व सफरी, मित्रमैत्रिणींना चहाफॉफी इत्यादि सर्व खर्च त्याला आपल्या पगारांतून करावा लागतो. त्याचे वडील त्याला नियमित पगार देत असल्यामुळें धनी ज्याप्रमाणें एकाद्या नोकरांकडून काम करवून घेतो, तसें ते नील्सकडून काम मोजून घेतात. या बाबतींत खोटी दया दाखविली जात नाहीं. नील्सला पण स्वाभिमान असल्यामुळें आपल्या बापाकडून वक्तशीर मिळणाऱ्या पगाराची जाणीव ठेवून तो बापाच्या शेतावर प्रामाणिकपणें व व्यवस्थित काम करतो. हिवाळ्यांत त्याला नऊ-दहा तास काम करावें लागतें व उन्हाळ्यांत तो अकरा ते बारा तास काम करतो. पैसा कमविण्यासाठीं किती मेहनत करावी लागते याची पूर्ण जाणीव नील्सला झाल्यामुळें पैसा उधळण्याची संवय त्याला लागलेली नाहीं. नील्स आपल्या पैशाचा हिशेब नीट ठेवीत असतो.

या ठिकाणीं जमलेल्या डॅनिश लोकांच्याबरोबर खूपच गोष्टी केल्या. मधून मधून कॉफीचे पेले व केक्स फस्त होत होते. या कार्यक्रमामुळें ज्या स्टॅव्हनशॉल्ट गांवांत आम्ही राहायला आलों, त्या गांवाची व सर्वसाधारणपणें डेन्मार्कची

बरीच माहिती मिळाली. या ठिकाणीं पोल्सन नांवाचे एक गृहस्थ आले होते. या गृहस्थानें इंग्लंड वगैरे आजूबाजूच्या देशांत प्रवास केला होता. सेफ्टी रेझरचीं पातीं तयार करण्याचा एक कारखाना त्यानें चालविला आहे. भारताबद्दल या गृहस्थानें बरेंच वाचलें आहे. भारतामध्यें येण्याची इच्छा त्यानें अनेकदां बोलून दाखविली. ही आमची बैठक खूप रात्रपर्यंत चालली. मध्यरात्रीच्या सुमारास आम्ही घरीं परतलों.

१७ जुलै ५४

आज सकाळपासून पाऊस सुरूच होता. आतां आमचे यजमान मिस्टर ओल्सन व त्यांच्या पत्नी मिसेस् ओल्सन यांचा चांगला परिचय होऊं लागला आहे. यांचें कुटुंब छोटेंसेंच आहे. एरिक हा घरांतील कर्ता पुरुष. याचें वय अडतीस. त्याची पत्नी एला. हिचें वय छत्तीस. एला एरिकपेक्षां थोडी जास्त शिकलेली आहे परंतु त्याचा तिला गर्व नाहीं. डेन्मार्कमधील बहुसंख्य शेतकऱ्यांचीं मुलें सात वर्षांचें शिक्षण घेऊन चौदा वर्षें पूर्ण झाल्यावर शाळेच्या बाहेर पडतात. फारच थोडीं मुलें आणखी एकदोन वर्षें शाळेंत काढतात. चौदा ते अठरापर्यंतच्या काळांत मुलें शेतीवर अथवा कारखान्यांत उमेदवार म्हणून काम करतात. एरिकनें पंधरावें वर्ष पूर्ण झाल्यावर शाळा सोडली तर एलानें एकदोन वर्षें अधिक शिक्षण घेतलें. त्यांना दोन मुलगे आहेत. मोठा हेनिंग व छोटा ऑस्कॉव्ह. एलाला घरकामांत मदत करण्यासाठीं लिलियन नांवाची एक पंधरा वर्षांची मुलगी आहे. याखेरीज शेतीच्या कामांत मदत करण्यासाठीं दोन नोकर एरिकनें ठेविले आहेत. एरिक त्यांना नोकर म्हणत नाहीं; मदतनीस म्हणतो. या सर्वांचें जेवण एलाच करते. धनी, नोकर आणि त्यांचा पाहुणा मी, आम्ही सर्व मंडळी एकाच टेबलावर बसून एकच जेवण घेतों. डेन्मार्कमध्यें लोकशाहीचीं मुळें खूप खोलवर रुजलेलीं आहेत. डेन्मार्कला लोकशाहीचें माहेरघर म्हणतां येईल. लोकशाही तेथील लोकांच्या रक्तामध्यें भिनलेली दिसते. त्यामुळें माणसामाणसांमध्यें तेथें फरक केला जात नाहीं. धनी आपल्या नोकरांना प्रतिष्ठेनें वागवितो व आपल्या टेबलावर त्याला जेवायला बसवून आपलेंच खाणें त्याला खायला घालतो.

या घरांत आल्यापासून मी त्या घरांतील मंडळींचा दैनंदिन कार्यक्रम काळजीपूर्वक पाहात आहें. घरांतील सर्व मोठीं माणसें सकाळीं बरोबर पांचला उठतात. सध्यां एलाचे वडील पाहुणे आलेले आहेत. त्यांचें वय बहात्तर वर्षांचें आहे. म्हातारा प्रकृतीनें निकोप व वृत्तीनें आनंदी आहे. पाहुणा आला म्हणून तो घरीं बसून राहत नाहीं. शेतावर जाऊन तो एरिकच्या बरोबरीनें काम करतो. उन्हाळ्यांत शेतीचा हंगाम चालू असतो. सध्यां एरिकला शेतावर खूप काम करावें लागतें. सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो सारखा राबत असतो. कधींकधीं रात्रीचे दहा-अकरा वाजेपर्यंत काम करावें लागतें. एला रोज शेतावर कामाला जाऊं शकत नाहीं. तिला घरचेंच खूप काम असतें. ज्या वेळीं बटाट्याचा, स्ट्रॉबेरीचा किंवा इतर कोणताहि हंगाम येतो, त्या वेळीं मात्र एलाला शेतावर जाऊन काम करावें लागतें. सध्यां एला घरचें काम संभाळून निरनिराळ्या प्रकारचे मुरंबे करण्यांत गुंतलेली असते. दिवसभर शेतांत राबणारा एरिक व त्याचा सासरा संध्याकाळीं दाढी करून, तोंडांत मोठा पाइप घालून व चांगले कपडे चढवून ज्या वेळीं बाहेर पडतात, त्या वेळीं त्यांच्या स्वरूपांत जमीनअस्मानाचा फरक पडलेला दिसतो.

आज मी एला-एरिकबरोबर मिस्टर हेन्सन नांवाच्या गृहस्थाच्या घरीं गेलों होतों. या गृहस्थानें कांहीं मित्रांच्या मदतीनें एक 'ग्लायडर' बनविलेलें आहे. तें पाहण्यासाठीं आम्ही गेलों होतों. त्या ठिकाणीं आम्हीं चहा घेतला. मिस्टर हेन्सन ह्यांचें स्वतःचें ग्रंथालय खूप चांगलें दिसलें. या ग्रंथालयांतून तीनचार पुस्तकें निवडून मीं घेतलीं. त्यामध्यें सॉमरसेट मॉमचें एक चांगलें पुस्तक मला मिळालें. इतर डॅनिश लोकांच्या मानानें मि. हेन्सन यांना चांगलें इंग्रजी येत होतें.

१८ जुलै ५४

आज पण पाऊस पडत होता. त्यामुळें घरींच बसून थोडी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. ज्या स्टॅव्हनशॉल्ट गांवांत आम्ही राहण्यास आलों, तें गांव अगदीं लहानसें खेडें आहे. गांवची लोकसंख्या फक्त तीनशें आहे. या ठिकाणीं टपालगृह नाहीं. टपालाचा शिपाई रोज पत्रें द्यायला येतो. जातांना

आपण लिहिलेलीं पत्रें टपालांत टाकण्यासाठीं तो घेऊन जातो. आपण पैसे दिल्यावर पत्राला तिकिटें लावण्याचें काम तोच करतो. गांव खूप लहान असल्यामुळें गांवीं ग्रामपंचायत नाहीं. येथून जवळच दीड मैलावर फॅरम नांवाचें गांव आहे. तेथें नगरपालिका आहे. या नगरपालिकेच्या हद्दींत आमचें खेडें येतें. या गांवापासून रेल्वेचें स्टेशन दूर होतें. त्या स्टेशनपासून फॅरमला जाणारी बस स्टॅव्हनशॉल्टला थांबते. या गांवांत लहानसें एकच दुकान आहे. परंतु गांवांतील बहुतेक मंडळी बाजारहाट करण्यासाठीं भोंवतालच्या गांवीं जातात. कोपनहेगनपासून हें दहाबारा मैल दूर आहे. आम्ही राहात असलेल्या एल्सिनोरपासून हें गांव पंधरा-सोळा मैल दूर आहे. गांव जरी लहान असलें, तरी गांवांतील बहुतेक घरांतून टेलिफोन आहेत. रस्त्यावर फॅरमच्या नगरपालिकेच्या मार्फत रोज विजेचे दिवे लागतात. रस्ते चांगले डांबरी आहेत. मोटारी व बसेस यांची सारखी रहदारी चालू आहे. मोठीं माणसें व मुलेंबाळें सायकलींवरून हिंडत आहेत.

फॅरम हें उत्तर झीलंडमधील एक रम्य ठिकाण आहे. गांवाभोंवतालीं हिरवीगार झाडी आहे. या झाडीला लागून मोठमोठीं तळीं आहेत. त्यामुळें येथील वातावरण नितांतरमणीय आहे. स्टॅव्हनशॉल्टसुद्धां खूपच सुंदर आहे. ठिकठिकाणीं हिरवीगार कुरणें पसरलेलीं आहेत. प्रत्येक घराच्या अंगणांत हिरवींगार झाडें डोलत आहेत. त्या झाडांमधून चित्रविचित्र रंगांचीं फुलें तुमचें स्वागत करण्याकरितां डोकावून पाहात आहेत. हा गांव पाहून कोणाचेंहि मन प्रफुल्लित झाल्यावांचून राहणार नाहीं.

फॅरमला एक छोटीशी नगरपालिका आहे. तिला पॅरिश कौन्सिल असें म्हणतात. या कौन्सिलमध्यें नऊ सभासद आहेत. या छोट्या नगरपालिकेवर एका बड्या नगरपालिकेची—कौंटी कौन्सिलची देखरेख असते. या दोन्ही संस्थांचे सभासद प्रौढमतदान पद्धतीनें निवडून आलेले असतात.

फॅरमची वस्ती तीन हजार आहे. तें कोपनहेगनच्या अगदीं जवळ आहे. किंबहुना फॅरममध्यें आतां कोपनहेगन घुसूं लागलें आहे. कोपनहेगन ही डेन्मार्कची राजधानी. डेन्मार्कची लोकसंख्या ४०-४२ लाख. त्यांपैकीं दहा लाख लोक एकट्या कोपनहेगन शहरांत राहतात. आपल्या मुंबईची जशी वाढ होत चालली आहे व आतां जशी 'मोठी मुंबई' झाली आहे, तसेंच

कोपनहेगनचें ' मोठें कोपनहेगन ' होऊं लागलें आहे. फॅरममधील पुष्कळ लोक नोकरीधंद्यासाठीं रोज कोपनहेगनला जातात. तसेंच कोपनहेगनचे लोक शनिवारीं, रविवारीं, सुट्टीच्या दिवशीं व उन्हाळ्यांत फॅरमला व भोंवतालच्या स्टॅव्हनशॉल्टसारख्या खेड्याला येऊन राहतात. यामुळें फॅरमच्या आसपासच्या खेड्यांतील शेतकरी लोक खूप नाखूष आहेत. या शहरी पाहुण्यांच्या आगमनामुळें आपल्याकडे महागाई वाढत चालली आहे, असा येथील लोकांचा दावा आहे. दुसरी गोष्ट म्हणजे कोपनहेगनचे श्रीमंत लोक येथें हवा खाण्यासाठीं उन्हाळी घरें (Summer Houses) बांधूं लागले आहेत. त्यामुळें येथील जमिनींचे भाव सारखे वाढूं लागले आहेत. याचा परिणाम असा झाला आहे कीं, कष्ट करून शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आपलें उत्पन्न वाढविण्यासाठीं अधिक जमिनी मिळविणें कठीण झालें आहे. या सर्व गोष्टींमुळें या कोपनहेगनच्या सुखासीन लोकांचें येथें येऊन राहणें भोंवतालच्या खेड्यांतील मोठ्या वयाच्या मंडळींना पसंत नाहीं. त्यांची आणखी एक तक्रार आहे. कोपनहेगनचे शहरी लोक विलासी जीवनाचें जें भडक चित्र आमच्या मुलांपुढें ठेवतात, त्यामुळें आमच्या मुलांमध्यें ग्रामीण जीवनाबद्दल तिरस्कार वाढीस लागला आहे व खेड्यांना कंटाळून शहराकडे पळण्याची प्रवृत्ति त्यांच्यामध्यें मोठ्या प्रमाणांत वाढत असल्याचें आढळून येऊं लागलें आहे.

आज दुपारीं एला व एरिक यांच्याबरोबर मी फॅरमला गेलों. त्या ठिकाणीं स्थानिक नगरपालिकेनें चालविलेलीं कांहीं कामें मीं पाहिलीं. या नगरपालिकेच्या कचेरीमार्फत गांवांतील सर्व व्यवहार चालतात. सरकारी व नगरपालिकेचे कर येथेंच भरले जातात. लोकांच्या सर्व तक्रारी येथेंच नोंदल्या जातात. त्यांना लागणारी सर्व माहिती पुरविण्याची सोय येथेंच केलेली असते. त्यामुळें ज्यांना ज्यांना म्हणून कसलीहि गरज लागते, ते सर्व लोक नगरपालिकेच्या कचेरीकडे धाव घेतात. उदाहरणार्थ—जॉन नांवाच्या म्हाताऱ्याला पोट भरण्याचें साधन नाहीं. तो येथें येतो; आपली तक्रार नोंदवितो; व सरकारी मदतीची मागणी करतो. योग्य त्या तपासाअंतीं त्याला जरूर ती मदत या नगरपालिकेमार्फत मिळते. ही मेरी नांवाची एक कुमारिका आपली तक्रार नोंदविण्याकरितां आली आहे. ती लवकरच माता होणार आहे, असें तिच्या शरीरावरून दिसतें. आपल्याला हेन्री नांवाच्या एका तरुणानें फसविलें आहे व त्यामुळें ही आपत्ति आपल्यावर

आली आहे, अशी तक्रार ती या कचेरींत नोंदविते. बोलतांना ती सारखे अश्रू ढाळीत असते. येथील अधिकारी अत्यंत सहानभूतीनें तिचें म्हणणें ऐकून घेतो. तिच्या प्रसूतीसाठीं लागणारी सर्व मदत तिला येथें मिळेल, असें तो तिला आश्वासन देतो. ज्या तरुणामुळें तिच्यावर ही आपत्ति आली, त्याच्यावर कायदेशीर इलाज कसा करतां येईल, ह्याचा पण सल्ला तिला येथें दिला जातो. तात्पर्य काय कीं, नगरपालिकेचें कार्यालय म्हणजे सर्व नागरिकांचें निवाऱ्याचें स्थान. विश्वासानें मदतीसाठीं कुठें धाव घ्यावी, तर ती नगरपालिकेच्या कार्यालयाकडे.

या नगरपालिकेचें वार्षिक उत्पन्न अंदाजें ४० लाख रुपयांचें आहे. हें उत्पन्न नगरपालिकेनें बसविलेले जे कर असतात त्यामधून मिळतें. त्याजबरोबर प्रांतीवरील सरकारी कराच्या उत्पन्नापैकीं कांहीं भाग या नगरपालिकेला मिळतो. या उत्पन्नांतून नगरपालिका पुढील कामें करण्यावर खर्च करते :—नगरपालिकेच्या नोकरांचा पगारखर्च, बेकारांना भत्ता, आजारी लोकांना भत्ता, वृद्ध व अपंग लोकांची व्यवस्था, शिक्षण, दिवाबत्ती, रस्त्यांची व्यवस्था, शहरसफाई, सार्वजनिक बागा, क्रीडांगणें, तळीं इत्यादींची व्यवस्था.

या नगरपालिकेचे महापौर रोज ठराविक वेळीं आपल्या कार्यालयांत हजर राहतात. या वेळीं गांवांतील नागरिक आपल्या अडचणी त्यांना येऊन सांगतात. आपल्या नगरपालिकेच्या कामांतील उणीवा ते या नागरिकांकडून समजावून घेतात. आपल्या नगरपालिकेचें काम आणखी कसें सुधारतां येईल, याविषयीं ते लोकांशीं चर्चा करतात. लोक त्यांना विधायक सूचना करतात. या सूचनांची ते नोंद घेतात. या महापौरांना मासिक पगार मिळत नाहीं. परंतु सव्वादोन ते अडीच हजार रुपये दरवर्षी त्यांना मानधन म्हणून मिळतात. नगरपालिकेच्या इतर सभासदांना असलें मानधन मिळत नाहीं. महापौरांना मदत करण्यासाठीं एक चिटणीस नेमलेला असतो. या चिटणिसाच्या हाताखालीं कारकून असतात. सर्वांच्या मदतीनें महापौर नगरपालिकेचा दैनंदिन कारभार पाहतात. हा चिटणीस व इतर कारकून हे सरकारी नोकर आहेत.

फॅरममध्यें ९०० ते १००० कुटुंबें आहेत. या कुटुंबांतून जवळजवळ तीन हजार लोक राहतात. डेन्मार्कमध्यें प्रत्येक कुटुंबामागें मुलांचें प्रमाण १·४ आहे. म्हणजे दहा कुटुंबांत सुमारें चौदाच मुलें आढळतात. फॅरममध्यें शाळेंत

जाणाऱ्या मुलांची संख्या फक्त तीनशें आहे. या तीनशें मुलांकरितां सात इयत्तांची एक चांगली शाळा चालविली जात आहे. एलाचीं मुलें याच शाळेंत जातात. मीं जाऊन ती शाळा पाहावी, अशी एलाची फार इच्छा होती. शेतावर काम असल्यामुळें एरिक माझा निरोप घेऊन केव्हांच निघून गेला होता. मी एलाबरोबर शाळेंत गेलों. या शाळेची इमारत आम्हीं पाहिली. ह्या इमारतीवर जवळजवळ सहा लाख रुपये खर्च करण्यांत आले आहेत. उन्हाळ्याच्या सुट्टीमुळें शाळा बंद होती. शाळेचे मुख्याध्यापक तेथेंच राहात होते. आमच्या येण्याची वर्दी लागतांच ते तेथें आले व त्यांनीं आम्हांस जरूर ती माहिती पुरविली. हे गृहस्थ या शाळेंत गेलीं बत्तीस वर्षें काम करीत आहेत. नव्या वर्षाच्या सुरुवातीपासून ते सेवानिवृत्त होणार आहेत. ही शाळा पाहून आम्ही घरीं परतलों. संध्याकाळीं पाऊस असल्यामुळें आम्ही बाहेर पडूं शकलों नाहीं. सर्दी पण खूप झाली होती. म्हणून घरांतच बसून राहणें शहाणपणाचें वाटलें. आमच्या यजमानांच्या आग्रहावरून भारतीय पोषाख—धोतर, नेहरू शर्ट, गांधी टोपी व चपला—मीं परिधान केला. त्यांनीं माझीं छायाचित्रें घेतलीं. परदेशांत जाणाऱ्या माझ्या मित्रांना माझी सूचना आहे कीं, त्यांनीं आपला राष्ट्रीय पोषाख जरूर बरोबर बाळगावा व कांहीं प्रसंगीं तो परिधानहि करावा. विशेषतः शेरवानी, सुरवार व गांधीटोपी हा पोषाख शक्य तों जवळ बाळगावा.

१९ जुलै ५४

आज पाऊस कमी होता. सकाळीं लवकर उठून थोडें लेखनवाचन केलें. त्यानंतर एला एरिकसाठीं व आपल्या वडिलांसाठीं कॉफी केक्स घेऊन शेतावर जायला निघाली. "आमचें शेत पाहायला येतां का?" असें तिनें विचारतांच मी तिच्याबरोबर निघालों. शेतावर जाऊन एरिक व त्याचे नोकर किती कष्टाचें काम करतात, तें मीं पाहिलें. आम्ही शेतावर असतांच मि. रासमुसन यांचा निरोप आला कीं, 'श्री लोंढे व राजनायकम् फॅरमच्या नगरपालिकेच्या कार्यालयांत जात आहेत. तेव्हां तुम्ही पण लवकर या.' म्हणून मी त्यांच्याबरोबर फॅरमला गेलों.

नगरपालिकेच्या चिटणिसांनीं येथील कर वसूल करण्याची पद्धति आम्हांला समजावून सांगितली; नंतर त्यांनीं आपला एक अधिकारी आमच्याबरोबर दिला

व त्या अधिकाऱ्याबरोबर या नगरपालिकेनें चालविलेल्या इतर संस्था पाहण्यास आम्ही निघालों. या कचेरीच्या जवळच एक सार्वजनिक उद्यान आहे. हें अत्यंत रमणीय आहे. या उद्यानाची व्यवस्था नगरपालिकाच ठेविते. या उद्यानापासून कांहीं अंतरावर एक किंडरगार्टन शाळा आहे. त्या शाळेंत सकाळीं सातपासून ते सायंकाळीं पांच-सहा वाजेपर्यंत मुलें राहतात. मुलांना प्रत्यक्ष शिक्षण देणें हा ही शाळा चालविण्यांत हेतु नाहीं, तर मुलांना दिवसभर चांगल्या प्रकारें संभाळण्यासाठीं ही शाळा चालविली जाते. यांपैकीं बहुतेक मुलांचे आईबाप कामावर जातात. आईबापांच्या गैरहजेरींत मुलें कोण संभाळणार ? तीं मुलें शाळेंत येतात. ज्या बायका नोकरीसाठीं बाहेर जात नाहींत, त्यासुद्धां आपलीं मुलें या शाळेंत पाठवितात. या बायका घरकामांत गढलेल्या असतात. नोकरचाकर ठेवणें त्यांना परवडत नाहीं. घरांत काम फार. मदत कुणाची नाहीं. तेव्हां मुलांकडे पाहायला वेळ कुठून मिळणार ? त्यामुळें मुलांना त्या शाळेंत पाठवितात. किंडरगार्टनमुळें तीन ते सात वर्षांच्या मुलांना संभाळण्याची त्यांची जबाबदारी कमी होते. घरकामाकडे त्यांना अधिक लक्ष देतां येतें. शेतावर काम करणाऱ्या आपल्या यजमानांना पण मदत करणें त्यांना शक्य होतें; शिवाय किंडरगार्टनमध्यें मुलें पाठविण्यामध्यें दुसरा पण एक हेतु असतोच. येथें चांगल्या शिक्षकांच्या देखरेखीखालीं मुलें दिवसभर राहतात. चांगल्या संवयी त्यांना लावल्या जातात. त्यांच्या आरोग्याकडे नीट लक्ष पुरविलें जातें. त्यांना गाणीं व गोष्टी शिकविली जातात. त्यामुळें दिवसभर मुलें खूप आनंदांत असतात.

हीं सर्व मुलें सकाळीं सातला येथें येतात. मुलांना न्हाऊं घालणें, त्यांचे केस विंचरणें, त्यांना साफसूफ करणें, इत्यादि कामें केंद्रावरील बाया करतात. या ठिकाणीं तीन बाया होत्या. मुलांची संख्या ३०-३५ च होती. या तिघींपैकीं एक ट्रेन्ड परिचारिका होती व बाकीच्या दोघी किंडरगार्टनचें शिक्षण घेतलेल्या शिक्षिका होत्या. मुलें घरून येतांना त्यांच्या गळ्यांत एक पिशवी अडकविलेली असते. त्या पिशवींत दुपारचें जेवण असतें. शाळेंत आल्यावर शाळेमार्फत मुलांना खीर (Porridge) देण्यांत येते. हा सर्व खर्च नगरपालिकाच करते.

ही संस्था पाहिल्यावर नगरपालिकेमार्फत चालविण्यांत आलेली दुसरी एक संस्था पाहण्यास आम्ही गेलों. ज्या वृद्धांची परिस्थिति स्वतःचा संसार थाटण्या-इतपत चांगली आहे, त्यांच्याकरितां स्वस्त भाड्याचे ब्लॉक बांधलेले आहेत.

हे ब्लॉक इतके चांगले आहेत कीं, त्यांमधून राहणाऱ्या म्हाताऱ्यांचा आमच्यापैकीं पुष्कळांना हेवा वाटूं लागला. वृद्धांसाठीं बांधलेल्या या बहुतेक गृहांमध्यें त्यांची जेवणाखाण्याची सोय केलेली असते. फॅरम नगरपालिकेनें चालविलेल्या या अशा गृहांत ३० वृद्धांची सोय केलेली आहे. प्रत्येकास एक स्वतंत्र खोली आहे व याखेरीज सर्वांना बसण्याउठण्यासाठीं सर्व सुखसोयींनीं युक्त असे दोनतीन दिवाणखाने आहेत. या गृहांवर देखरेख करण्यासाठीं तीन बाया आहेत. त्यांपैकीं मुख्य बाईंना इंग्रजी चांगलें बोलतां येत होतें. त्यामुळें त्यांच्याकडून सर्व माहिती घेणें सोपें झालें. बाईंनीं आमचें चांगलें स्वागत केलें. त्यांच्याबरोबर आम्ही त्या वृद्धांच्या खोल्यांमधून गेलों व त्यांची विचारपूस केली. या गृहांतून ठराविक अंतरानें राहणारे कांहीं म्हातारे व म्हाताऱ्या अगदीं अपंग असतात. येथें देखरेख करणाऱ्या बायांना त्यांचें सर्व कांहीं करावें लागतें. या सर्व वृद्धांचें जेवण एके ठिकाणीं होतें; परंतु ज्यांना आपलें जेवण स्वतंत्र करावयाचें असेल, त्यांना तशी सवलत देण्यांत येते. कांहीं म्हाताऱ्यांच्या बरोबर त्यांच्या बायका असतात. त्यांना दोन खोल्यांचा ब्लॉक देण्यांत येतो. या ब्लॉकमधून ते आपला छोटासा संसार थाटतात. फॅरम नगरपालिकेनें वृद्धांसाठीं बांधलेले हे ब्लॉक अतिशय आकर्षक आहेत.

२० जुलै ५४

सकाळीं मिसेस् ओल्सनबरोबर त्यांच्या शेतावर गेलों. तेथें त्यांचे यजमान भेटले. त्यांनीं शेतीबाबत कांहीं उपयुक्त माहिती दिली. सायंकाळीं श्री लोंढे व राजनायकम्, त्यांचे यजमान, एरिक व मी शेतकीचें एक प्रायोगिक केंद्र पाहण्यास गेलों. त्या ठिकाणीं चाललेलें काम शेतकऱ्यांच्या संस्थेनें चालविलेलें होतें. आज या संस्थेच्या सभासदांची वार्षिक सभा होती. सभेला ४०-५० शेतकरी आले होते. त्यांपैकीं बरेच शेतकरी स्वतःच्या मोटारमधून आलेले होते. सभेला सुरवात होण्यापूर्वीं सर्व सभासदांनीं संस्थेच्या परिसरांत हिंडून त्या ठिकाणीं केलेल्या प्रयोगांची माहिती घेतली. हे प्रयोग करण्यासाठीं नेमलेल्या अधिकाऱ्यानें या वेगवेगळ्या प्रयोगांची सभासदांना माहिती सांगितली. ही सर्व माहिती ते सभासद काळजीपूर्वक ऐकत होते व त्या अधिकाऱ्याला अनेक प्रश्न विचारून

आपली जिज्ञासा पुरी करून घेत होते. या ठिकाणीं गव्हाचे, बीटचे वेगवेगळे नमुने पाहावयाला मिळाले. आपली शेती सुधारण्यासाठीं कोणकोणते प्रयत्न केले पाहिजेत, याचें शिक्षण देण्यासाठीं हें केंद्र चालविण्यांत आलें होतें. लोकशिक्षणाची ती एक प्रयोगशाळा होती. सभासदांनीं हिंडून सर्व प्रयोगांबद्दल माहिती घेतल्यावर सभेच्या कामाला सुरुवात झाली. सभा थोडक्यांतच आटोपली. त्यानंतर चहापाण्याचा कार्यक्रम झाला व नंतर आम्ही घरीं परतलों.


२१ जुलै ५४

आज आमच्या यजमानांना संध्याकाळीं त्यांच्या नातेवाइकांकडे जावयाचें असल्यामुळें श्री लोंढे यांचे यजमान मि. रासमुसन यांच्याकडे मी जेवायला जावें असें ठरलें. त्याप्रमाणें त्यांच्याकडून आमंत्रणहि आलें व दुपारचा कार्यक्रम पण त्यांनींच ठरविला. सकाळीं सॉमरसेट् मॉम्‌ची एक कादंबरी मी वाचीत बसलों होतों. एला माझ्या शेजारीं बसून आपलें विणकाम करीत होती. इतक्यांत तिचा आठ वर्षांचा मुलगा हेमिंग धावत आला व तिच्या कानांत कांहीं कुजबुजूं लागला. साहजिकच मीं विचारलें, ‘ काय गडबड आहे ? ’ तेव्हां एलानें मला पुढील हकीकत सांगितली : त्या दिवशीं त्यांच्याकडे एक इन्स्पेक्टर आला होता. तो इन्स्पेक्टर, एरिकच्या गायींनीं दिलेल्या दुधामध्यें लोण्याचें प्रमाण किती आहे हें पाहण्याकरितां आला होता. असा तो मधून मधून येत असतो. आज तो आला असतांना व दुधाची तपासणी करीत असतांना, एरिकचा मुलगा हेनिंग हा त्याच्याजवळ उभा होता. एरिकच्या गायींनीं दिलेल्या दुधांतील लोण्याचा अंश बराच वाढला असल्याचें त्यानें जाहीर केलें. म्हणूनच हेमिंग धावत आईजवळ आला व तो आईला म्हणाला, “ आई, आतां आपल्याला खूप पैसे मिळणार. आपल्या दुधांतील लोण्याचें प्रमाण वाढलें. आतां आपली मजा झाली. ” आठ वर्षांच्या त्या लहान मुलाचें, आपल्या धंद्याकडे आतांपासून किती लक्ष आहे, हें वरील प्रकारावरून लक्षांत येईल.

संध्याकाळीं मि. रासमुसनबरोबर आम्ही फॅरमे येथील एका बागाईतदाराकडे गेलों. त्याला इंग्रजी चांगलें येत होतें. त्यानें आपल्या शेतावर अनेक चांगले चांगले प्रयोग केले होते. काकड्या, टोमॅटो यांची पद्धतशीर लागवड

त्यानें केली होती व या सर्व मेहनतीमधून तो चांगलाच पैसा कमावीत होता.

यानंतर दुसऱ्या एका शेतकऱ्याच्या घरीं आम्ही गेलों. त्याच्याजवळ ५० एकर जमीन होती; दहा गायी होत्या. त्यांपैकीं एक गाय जर्सी जातीची होती. या गाईच्या दुधांत लोण्याचें प्रमाण ७·६ होतें. डेन्मार्कमध्यें आल्यापासून दुधांत एवढें मोठें लोण्याचें प्रमाण असणारी गाय आम्ही पाहिली नव्हती. सर्व-साधारणपणें हें प्रमाण ४॥ ते ५ असतें. डेन्मार्कमधील गायी रोज पंचवीस ते सत्तर पौंड दूध देतात. या शेतकऱ्याकडील गायी संख्येनें थोड्या होत्या. पण त्या



डॅनिश शेतकऱ्यांचें कुक्कुटपालन

खूप चांगल्या होत्या. याच्या जवळ पांच-सातशें कोंबड्या होत्या. गेल्या वर्षी जवळजवळ वीस हजार रुपये त्यानें अंडीं व कोंबड्या विकून मिळविले होते. डेन्मार्कमधील शेतकरी आपल्या येथील शेतकऱ्यांप्रमाणें केवळ शेतीच्या उत्पन्ना-वरच अवलंबून राहात नाहींत. गायी, डुकरें, कोंबड्या, हीं त्यांच्या संपत्तींत सारखी भर घालीत असतात.

संध्याकाळचें जेवण मि. रासमुसनकडे झालें. मिसेस् रासमुसन खूप बोलक्या

आहेत. त्यांना इंग्रजी फारसें येत नाहीं. आपल्या भाषणाला इंग्रजींत सुरुवात करून डॅनिशमध्यें त्या भाषण चालू ठेवीत; आणि मग त्यांची मुलगी एल्सी त्यांच्या लक्षांत आणून देई कीं पाहुण्यांना डॅनिश येत नाहीं. त्यावेळीं त्या ओशाळल्यासारख्या होत. एल्सी कोपनहेगनला एका कंपनींत काम करते. तिच्या पाठची बहीण इंग्री. तिनें शिक्षण संपविलें आहे व ती घरकामांत आपल्या आईला मदत करीत असते. घरांतील बरीचशी जबाबदारी हिनें उचललेली आहे. त्यांचा भाऊ नील्स हा त्यांच्याच शेतावर काम करीत असतो. हें सर्व कुटुंब खूप आनंदी व मनमोकळें आहे. त्यांच्याबरोबर संध्याकाळचा वेळ मजेंत गेला.


२२ जुलै ५४

आज हवा खूपच वाईट पडली होती. मिसेस् रासमुसन व मिसेस् ओल्सन यांनीं आमच्यासाठीं एक खूप भरगच्च कार्यक्रम आंखला होता. आज सकाळपासून सारा दिवस आम्ही कोपनहेगनमध्यें घालवावा असें ठरलें होतें. हवा वाईट पडल्यामुळें कार्यक्रम तहकूब करावा अशी सूचना आली. परंतु मुलांची खूप निराशा होईल, या सबबीवर ती सूचना मागें पडली. डेन्मार्कमधील खेड्यांतील बायकांना कोपनहेगनमध्यें एक दिवस घालविणें अतिशयच आवडतें. रासमुसनकडील मुलें, ओल्सनचीं मुलें, आम्हीं तिघे भारतीय व मिसेस् ओल्सन व मिसेस् रासमुसन अशीं सर्व मंडळी कोपनहेगनला जाण्यास निघालों. वाटेंत पावसानें थोडा त्रास दिला; तथापि आम्ही कोपनहेगनला जाऊन पोहोंचलों. त्या ठिकाणीं तेथील सुप्रसिद्ध पशुसंग्रहालय आम्ही पाहिलें. तेथून डेन्मार्कमधील लोकांचें अत्यंत आवडतें ठिकाण तिव्होली येथें आम्ही गेलों. तिव्होलीमध्यें मुलें खूप रंगून गेलीं व त्यांच्याबरोबर त्यांच्या आया पण तितक्याच उत्साहानें सर्व कार्यक्रमांत भाग घेऊं लागल्या. आज साऱ्या दिवसांत जे निरनिराळे कार्यक्रम आंखले गेले, त्यानिमित्त झालेला खर्च या दोन बायांनीं केला. सुमारें शंभर ते सव्वाशें रुपये खर्च झाला असावा. डॅनिश लोकांचें हें एक वैशिष्ट्य आहे. ते अत्यंत आतिथ्यशील आहेत. पाहुण्याची सरबराई करण्यांत त्यांना विशेष आनंद वाटतो. त्यांचें हें आतिथ्य पाहून आम्हांला संकोचल्यासारखें झालें व त्याप्रमाणें आम्हीं बोलूनहि दाखविलें. त्यावेळीं त्या बाया म्हणाल्या,

"आम्ही तुमच्या देशांत आल्यावर तुम्हीं नाहीं का आमचें स्वागत करणार? तसेंच आज आम्ही करीत आहोंत. यांत आभार वगैरे मानण्यासारखें कांहीं नाहीं." अशा प्रकारें सर्व दिवस कोपनहेगनमध्यें घालविल्यावर खूप रात्रीं आम्ही घरीं परतलों.

२३ जुलै ५४

परवां भेटलेल्या बागाईतदारांबरोबर आम्ही एक 'फ्रुट-पॅकिंग सेंटर' (फळें डब्यांत भरण्याचा कारखाना) पाहण्यास निघालों. हें केंद्र व्यापाऱ्यांच्या एका 'लिमिटेड' संस्थेमार्फत चालविण्यांत येत आहे. या संस्थेचे एकूण पंचेचाळीस सभासद आहेत. हे व्यापारी केळ्यांसारखीं फळें परदेशांतून मागवितात व तीं साऱ्या डेन्मार्कभर पोहोंचविण्याचें काम करतात. त्याचप्रमाणें स्थानिक फळेंसुद्धां बाहेर पाठविण्याचें काम येथें केलें जातें. या ठिकाणीं काम करणारीं माणसें नासूं लागलेलीं फळें निवडून तीं बाजूला काढून ठेवीत होतीं. त्याचा हिशेब ठेवला जात होता. प्रत्येक व्यापाऱ्याला दर महिन्याला जो हिशेब पाठविला जाई, त्यांत फळांच्या नासधुशीचाहि हिशेब असे. मीं त्या बरोबरच्या व्यापाऱ्याला विचारलें, "मालकांच्या गैरहजेरींत तुम्ही या फळांचा नाश करतां. त्याबद्दल त्यांच्याकडून कधीं तक्रार येत नाहीं का?" त्यावर तो म्हणाला, "नाहीं, हें सर्व काम विश्वासावर चालतें, फळें पाठविणाऱ्यांसाठीं थांबायचें ठरलें व त्यांना दाखवून जर माल साफसूफ करायचें ठरलें, तर त्यांत निष्कारण वेळ व पैसा जाईल. या व्यापाऱ्यांना खात्री



डेन्मार्कमधील जुन्या खेड्याचें दृश्य

आहे कीं, केंद्रावरील लोक जें काम करतील, तें त्यांच्या हिताचेंच असेल." या ठिकाणीं सर्व फळें शीतगृहांत ठेविण्यांत आलीं होतीं व जरुरीप्रमाणें ठराविक ठिकाणीं तीं रवाना केलीं जात होतीं.

हें केंद्र पाहिल्यावर आम्ही एक जुनें डॅनिश खेडें पाहण्यास निघालों. या खेड्यांतील घरें २०० वर्षांपूर्वीं बांधलेलीं होतीं. जुन्या डेन्मार्कचा हा नमुना आजहि काळजीपूर्वक जतन करून ठेविला आहे. या खेड्यांत जुन्या काळांत ज्या पद्धतीचें उपाहारगृह असे, तसेंच एक उपाहारगृह चालविलेलें होतें. या उपाहारगृहांत जाऊन आम्हीं फळांचें सरबत घेतलें.

स्थानिक लोकांची व आमची ओळख व्हावी व आम्हांला यांच्या देशाविषयीं अधिक माहिती मिळावी, म्हणून एला व एरिकनें आज कांहीं लोकांना रात्रीं चहाला बोलाविलें होतें. डेन्मार्कमधील शेतकरी हा दिवसभर कामांत असल्यामुळें हे असले कार्यक्रम संध्याकाळीं आठच्या पुढें ठेवण्यांत येतात. घरीं पाहुणे येणार असल्यामुळें कालपासूनच एला कामांत गढून गेली होती. येणाऱ्या पाहुण्यांसाठीं रुचकर खाद्यपदार्थ बनविण्याची तिची धडपड चालू होती. आपल्याकडील स्त्रियांप्रमाणें डेन्मार्कमधील स्त्रिया पण पाकशास्त्रामध्यें चांगल्या निपुण आहेत. पाहुण्यांसाठीं चांगले पदार्थ बनवावेत, जेवणाच्या टेबलावर ते आकर्षक रीतीनें मांडून ठेवावेत, या टेबलाची व एकूण दिवाणखान्याची चांगली मांडणी करावी, यासाठीं येथील स्त्रिया सारख्या धडपडत असतात. अशीच धडपड आज सकाळपासून एलाची चालू होती. मध्येंच एखादी सिगरेट पेटवून ती ओठांत धरून, काम करतां करतांच ती त्या सिगरेटचा आस्वाद घेत होती. पाहुणे येण्याच्या आधीं नवराबायको तयार होऊन त्यांच्या स्वागतासाठीं दारांत उभीं होतीं. बरोबर आठाला एकामागून एक पाहुणे येऊं लागले. पाहुणा आल्याबरोबर एला व एरिक पुढें जाऊन त्याच्या अंगावरील ओव्हरकोट व हॅट काढायला त्याला मदत करीत. दारांत पाऊल टाकतांच पाहुणा मिळालेल्या आमंत्रणाबद्दल या दोघांचे आभार मानी. डेन्मार्कमध्यें हें आभार मानण्याचें बंड फारच मोठें आहे. त्यांच्या भाषेंत 'टाक' (TAK) हा शब्द आभार मानण्याकरितां वापरतात. संभाषणामध्यें 'टाक' हा शब्द किती वेळां येईल याचा नेमच नाहीं. 'टाक', 'मांगे टाक', (पुष्कळ आभार) 'टुसेन टाक' (हजार आभार) 'टाक इलीगमोद' इत्यादि आभारप्रदर्शक शब्द वरचेवर वापरले जातात. तुम्ही जर डेन्मार्कला गेलांत व हे दोन-

तीन शब्द ध्यानांत ठेविलेत, तर तुमचें कोठेंहि अडणार नाहीं.

दारांत पाऊल टाकतांना जसे आभार मानतात, तसेंच टेबलावर बसतांना, प्रत्येक वस्तु घेतांना, परत जातांना सारखे आभार मानले जातात. या पाहुण्यांमध्यें एरिकचे आईवडील पण होते. त्यांनीं पण एला व एरिकचे भरपूर आभार मानले. एला एखाद्या आपल्याकडील सूनबाईप्रमाणें सासूसासऱ्यांच्या शेजारीं अधूनमधून जाऊन उभी राही, त्यांना काय हवें नको तें पाही व केलेले पदार्थ त्यांना आग्रहानें घ्यायला लावी. तिच्या वागण्यामध्यें आज खूप मोठ्या प्रमाणांत शालीनता दिसून येत होती. चहानंतर धूम्रपानाला सुरुवात झाली. एलाच्या सासूसासऱ्यानें आग्रहानें तिला सिगरेट घ्यायला लावली. एकंदरींत हें सर्व वातावरण खूप खेळीमेळीचें होतें. जमलेल्या मंडळींत इंग्रजी जाणणाऱ्या दोनतीन बायका व एकदोन पुरुष होते. ते माझ्याशीं बोलून भारताबद्दल माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत होते व मिळालेली माहिती डॅनिशमधून इतरांना समजावून देत होते. हा कार्यक्रम रात्रीं ११॥–१२ वाजेपर्यंत चालला. कार्यक्रमाच्या शेवटीं सामुदायिक गाणीं झालीं. आबालवृद्धांनीं या कार्यक्रमांत भाग घेतला. डेन्मार्कमधील असले कार्यक्रम गाण्यावांचून कधींच पुरे होत नाहींत. सर्वसाधारणपणें डॅनिश माणसाला गाण्याची खूप आवड असते व डेन्मार्कमधील कांही गाणीं तर सर्वांच्या मुखोद्गत असतात.

२४ जुलै ५४

सकाळीं न्याहारीच्या वेळीं आपल्या भोजनपद्धतीबद्दल एला-एरिकशीं बोलणें झालें. त्या वेळीं तुमच्या जेवणापैकीं एखादा प्रकार तुम्हांला करतां येत असल्यास मला तुम्ही माहिती द्या, मी तो तुम्हांला करून दाखवीन, म्हणजे तुम्हांला घरचें जेवण मिळाल्याचा आनंद होईल;' असें एला म्हणाली. पाकशास्त्रामध्यें विशेष प्रगति नसल्यामुळें व त्या कामीं आपण उपयोगांत आणणाऱ्या पदार्थांना डॅनिश भाषेंतील प्रतिशब्द माहीत नसल्यामुळें मी एलाला म्हणालों, "आज मी एक पदार्थ करून दाखवितों. तो तुम्हांला आवडला तर हा कार्यक्रम पुन्हा एकदां करूं." ही माझी सूचना त्यांना पसंत पडली व मी बल्लवाचार्य झालों. स्वयंपाकघरांत जाऊन मीं अंड्यांचें कालवण तयार केलें. त्यांच्या मानानें तें खूप तिखट

झालेलें होतें, तथापि त्यांनीं त्याचें मनसोक्त कौतुक केलें; मात्र तें भरपूर खाण्याची हिंमत त्यांना करतां आली नाहीं. अर्थात् आपल्या कृतीचें मलाच अधिक प्रेमानें स्वागत करावें लागलें. मी स्वयंपाक करीत असतांना एलनें मला 'एप्रन्' बांधायला दिलें होतें. स्वयंपाकघरांतील माझी कर्तबगारी पाहण्यासाठीं एरिक मुद्दाम शेतावरून घरीं आला होता. त्यानें माझें स्वयंपाकघरांत एक छायाचित्र घेतलें.



लेखक भारतीय पद्धतीचा जेवण्याचा पदार्थ बनवीत असतांना

जेवणानंतर दुपारीं आम्हीं दोघां शेतकऱ्यांच्या घरीं जावें व तेथून पुढें सिनेमा पाहण्यास जावें, असा कार्यक्रम एरिकनें ठरविला होता. मला पण डॅनिश फिल्म पाहण्याची उत्सुकता होती; परंतु डॉक्टर मॅनिकींच्या कॉलेजांत असतांना टेलिव्हिजनच्या पथकानें आमच्या कार्यक्रमांचें जें चित्रण व ध्वनिकरण केलें होतें, त्याचा प्रयोग आज संध्याकाळीं टेलिव्हिजनवर होणार होता. हा प्रयोग पाहण्याची आम्हांला खूप उत्कंठा वाटत होती. मी ऑस्ट्रेलियांत गेलों असतांना T. V. चे कार्यक्रम पाहिले होते; परंतु श्री लोंढे व राजनायकम् यांना हा कार्यक्रम पाहावयाचा होता व आमचीं स्वतःचीं छायाचित्रें त्या वेळीं घेतलीं गेल्यामुळें T. V. वर आपण कसे दिसतों हें पाहण्यास आम्ही उत्सुक होतों. "शेतकऱ्याच्या घरीं आम्ही येऊं, पण सिनेमाला आम्हीं येऊं शकणार नाहीं; कुठें जर T. V, चा सेट असेल तर त्या ठिकाणीं जाऊन कार्यक्रम आम्हांला पाहतां

येईल अशी व्यवस्था करावी" अशी आम्हीं एरिकला विनंति केली; "फॅरममधील एका व्यापाऱ्याकडे असा सेट आहे; मी त्याला जाऊन भेटतों" असें एरिकनें सांगितलें व त्याप्रमाणें त्यानें व्यवस्था केली. आम्हीं जाऊन तो कार्यक्रम पाहिला. कार्यक्रमांत आम्हीं सर्वांनीं 'वैष्णव जनतो तेणे कहिये' हें गाणें म्हटलें होतें व आमच्या तुकडींतील श्री रामी यांनीं एक राजस्थानी ग्रामीण गीत गायिलें होतें. हें सर्व आम्हांला ऐकायला व पाहायला मिळालें. याखेरीज त्या कॉलेजमध्यें आम्हीं केलेल्या श्रमदानाचें दृश्य पण आम्हीं T. V. वर पाहिलें. हा कार्यक्रम संपवून आम्ही मि. रासमुसनकडे आलों. त्या ठिकाणीं त्यांचा एक नातेवाईक आमची वाट पाहात होता. तो एक फोटोग्राफर आहे. त्यानें फ्लॅश-लाइटच्या साह्यानें आमचे कांहीं फोटो घेतले. थोड्या गप्पागोष्टी केल्यावर मी माझ्या निवासस्थानीं परत आलों.

एला व एरिक सिनेमापाहून परत आलीं होतीं. त्यांना भेटतांच त्यांच्या चेहऱ्यांवरून तीं दोघें अस्वस्थ असल्याचें दिसलें. तपासाअंतीं असें समजलें कीं, एरिकचा एक नोकर तीं दोघें सिनेमाला गेलीं असतांना पळून गेला. हे शेत-कऱ्यांचे कामाचे दिवस. डेन्मार्कमध्यें नोकरांचा तुटवडा. अशा ऐन कामाच्या गर्दींत कोणतीहि पूर्वसूचना न देतां तो नोकर पळाल्यामुळें दुसरा मिळेपर्यंत कामाची जी खोटी होईल त्याची काळजी या दोघांना सतावीत होती. आज सकाळींच त्या नोकराचा पगार चुकता करण्यांत आला होता. त्या वेळीं आपण ही नोकरी सोडून जाणार असें त्यानें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें दर्शविलें नव्हतें. डेन्मार्कमध्यें हंगामाच्या वेळीं चांगलीं माणसें मिळणें कठीण होतें. त्यामुळें शेतकरी आपल्या नोकरांना जपत असतो. सर्व नोकरांना जेऊन खाऊन पगार दिला जातो. धनी जें खातो, तेंच नोकराला देण्यांत येतें. जेवतांना आपल्या-बरोबर त्याचे पण बिअरचे ग्लास तो भरतो.

२५ जुलै ५४

आज रविवार होता. एला व एरिक चर्चला जायला तयार होत होतीं. "आमच्याबरोबर तुम्ही चर्चमध्यें याल का? तुमची जर कोणती धार्मिक अडचण नसेल तर तुम्हीं जरूर यावें अशी आमची इच्छा आहे" असें त्या दोघांनीं मला

सांगितलें. मीं त्यांची विनंति ताबडतोब मान्य केली. भारतांत असतांनासुद्धां मी चर्चमध्यें मधून मधून डोकावून पाहिलें होतें. ऑस्ट्रेलियांत असतांना मी चर्चमध्यें प्रार्थनेला हजर राहिलों होतों. प्रार्थनेच्या वेळची या लोकांची शिस्त व तेथील गंभीर व प्रशांत वातावरण मला आवडतें. त्यामुळें मी त्यांच्याबरोबर जायला तयार झालों. एथील सर्व लोक मार्टिन ल्यूथरचे अनुयायी आहेत. जवळ-जवळ ९७·५ टक्के लोक एकाच पंथाच्या चर्चमध्यें जातात. मला वाटतें डेन्मार्कनें जी प्रगति केली आहे, त्याचें हेंहि एक कारण असूं शकेल. सर्वांचा धार्मिक पंथ एक, सर्वांची भाषा एक. त्यामुळेंच सर्वांना एकदिलानें कामें करणें सोपें जात असावें.

प्रार्थनेच्या नंतर दुसरा एक कार्यक्रम चर्चच्या प्रांगणांत होतो. हजर असलेल्या लोकांच्या मृत नातेवाइकांना याच प्रांगणांत पुरलेलें होतें. त्या ठिकाणीं त्यांचीं स्मृतिनिदर्शक अशीं थडगीं किंवा दगड ठेवलेले होते. आलेल्या प्रत्येक इसमानें आपल्याबरोबर फुलें आणलीं होतीं. प्रार्थनेनंतर त्या थडग्यांजवळ जाऊन त्यांनीं भोंवतालची जागा साफसूफ केली व आणलेलीं फुलें तेथें भक्तिभावानें ठेविलीं व शांतपणें त्या थडग्यांसमोर कांहीं काळ उभे राहून मृतांविषयींच्या आपल्या आपुलकीच्या भावना त्यांनीं मूकपणें व्यक्त केल्या. या वेळीं कांहीं स्त्रियांच्या डोळ्यांतून अश्रूचे सर ओघळूं लागले.

आज रविवार असल्यामुळें जेवणाचा बेत विशेष चांगला होता. आतां माझ्या आवडीनिवडी एलाला माहीत झाल्यामुळें मला रुचतील असेच पदार्थ ती बनवीत असते. आज पण या लोकांनीं आम्हांला भेटण्यासाठीं कांहीं पाहुण्यांना चहाला बोलाविलें आहे. त्यांच्या स्वागताच्या तयारींत एला गढून गेली आहे. आज एरिकला माझ्याशीं बोलण्यासाठीं भरपूर वेळ आहे. आम्हीं दोघे मिळून एलाची मधून मधून खूप मस्करी करीत आहोंत.

आतां आठ वाजले, एकामागून एक पाहुणे येऊं लागले. चहापानाचा कार्यक्रम जोरांत चालू झाला. इतक्यांत एक सूचना आली कीं, मीं जम-लेल्या पाहुण्यांना भारताबद्दल, विशेषतः स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योउत्तर काळांत भारतीयांनीं केलेल्या कार्याबद्दल, माहिती द्यावी. ही सूचना मीं मान्य केली. सुमारें तासभर हा कार्यक्रम चालला. माझ्या प्रत्येक वाक्याचें डॅनिशमधून भाषांतर करण्याचें काम एका स्त्रीनें केलें. कारण जमलेल्या लोकांपैकीं

जवळ जवळ ७५ टक्के लोकांना इंग्रजी मुळींच समजत नव्हतें. त्यामुळेंच हा कार्यक्रम लांबला. नंतर त्यांनीं कांहीं प्रश्न विचारले व मीं त्यांना उत्तरें दिलीं. पुढें गाण्याचा कार्यक्रम सुरू झाला व तो सुमारें १२ वाजेपर्यंत चालला. या कार्यक्रमांत एकाएकीं एक व्यत्यय आला. एक अकल्पित घटना घडली व सर्वांना आपल्या स्थानावरून उठावें लागलें.

एलाला मदत करण्याकरितां लिलिअन नांवाची एक मुलगी तिनें घरीं ठेवल्याचें मागें मीं सांगितलें आहेच. ती मुलगी त्यांच्या घरांतील तळघरामध्यें आपल्या खोलींत झोपली होती. तिची किंकाळी फार जोरांत ऐकूं आल्यामुळें एला तेथें धावत गेली. तिच्यामागें एरिक गेला व बाकीचीं सर्व माणसें विचारपूस करूं लागलीं. तपासाअंतीं असें समजलें कीं, शेजारच्या शेतकऱ्याकडे काम करणारा एक मुका माणूस दारूच्या नशेंत लिलियनच्या खोलींत शिरला. लिलियनला त्याची चाहूल लागतांच तिनें किंकाळी फोडली. तिची हालचाल पाहून तो मुका पळाला. एला लिलियनला घेऊन वर आली. लिलियन खूप घाबरली होती व रडत होती. एलानें तिला एक उत्तेजक पेय पिण्यास दिलें व आपल्या खोलींत आपल्या बिछान्यावर तिला नेऊन निजविलें. सबंध रात्र लिलियन एलाच्या पुढ्यांत झोपली. लिलियन ही एलाची मोलकरीण. मालकीण मोलकरिणीला पुढ्यांत घेऊन झोपल्याचें दृश्य डेन्मार्कसारख्या देशांतच पाहायला मिळेल. डेन्मार्कच्या लोकांनीं लोकशाही किती चांगल्या रीतीनें स्वीकारलेली आहे, व ही लोकशाही त्यांच्या जीवनांत किती खोलवर रुजलेली आहे हें या उदाहरणावरून लक्षांत येईल. डेन्मार्कमध्यें माणसामाणसामध्यें फरक केला जात नाहीं. श्रीमंत व गरीब, मालक व मजूर, मालकीण व मोलकरीण एकमेकांशीं आपुलकीनें वागतांना दिसतात.

या प्रकरणामुळें पुढील कार्यक्रम तहकूब झाला. पाहुण्यांना निरोप देण्यांत आला. एरिक व त्याचे दोनतीन निकटचे परिचित एके ठिकाणीं बसले. त्यांनीं थोडासा विचारविनिमय केला. पोलिसांना टेलिफोन करण्यांत आला. दहा मिनिटांत मोटारनें पोलिस येऊन थडकले. त्यांनीं प्राथमिक चौकशी केली व ते निघून गेले. अर्ध्या अर्ध्या तासानें टेलिफोनवरून ते एरिकला आपण करीत असलेल्या प्रयत्नांची कल्पना देत होते. सुमारें साडेचारला त्या माणसाला पकडल्याचें त्यांनीं टेलिफोनवरून एरिकला कळविलें व मग आम्ही सर्व मंडळी झोपण्यासाठीं उठलों.

२६ जुलै ५४

आज सारखा पाऊस पडत होता. यंदा डेन्मार्कमध्यें खूपच पाऊस आहे. पावसामुळें दिवसभर घरांत बसून राहावें लागलें. संध्याकाळच्या सुमारास एला व एरिकच्या बरोबर स्मॉरम नांवाच्या एका खेड्यावर गेलों. त्या ठिकाणीं त्यांचा एक मित्र राहात होता. प्रारंभीं त्यानें आपलें शेत आम्हांला दाखविलें. या शेतावर आपण सुरू केलेले नवे प्रयोग त्यानें समजावून सांगितलें. थोड्या वेळानें आम्ही त्यांच्या दिवाणखान्यांत आलों. त्या ठिकाणीं आणखी चारदोन पाहुणे आले होते. त्यानंतर कॉफी पिण्याच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. भारतांतील स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास मीं सर्वांना सांगावा अशी एरिकनें मला सूचना केली. आलेल्या मंडळींत वकिलीचा अभ्यास करणारी एक विद्यार्थिनी होती. तिनें दुभाष्याचें काम करण्याचें कबूल केलें. १८५७ सालापासून तों १९४७ सालापर्यंत स्वातंत्र्यासाठीं आपल्या देशांत झालेल्या प्रयत्नांची साद्यंत हकीकत मीं त्यांना सांगितली. ती त्यांना खूपच आवडली. नंतर त्या दुभाषी मुलीनें मला विचारलें, "तुम्हीं किंवा तुमच्या घरांतील कोणींतरी ब्रिटिशांच्या तुरुंगांतील पाहुणचार घेतला का ?" त्यावर "१९३३ सालीं मी ब्रिटिशांचा पाहुणा म्हणून साठ दिवस तुरुंगात राहिलों होतों." त्यानंतर ३॥ वर्षें मी स्थानबद्ध होतों. त्याचप्रमाणें माझा धाकटा भाऊ १९४० सालीं तीन महिने तुरुंगांत होता, असें मीं तिला सांगितलें. या माहितीमुळें त्या मंडळींना माझ्याबद्दल विशेष आदर वाटल्याचें दिसून आलें. "तुमच्या देशांतील स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास खूपच रोमांचकारी आहे. आज तुम्ही खूप नवी उद्बोधक माहिती सांगितलीत. तुमच्या देशाबद्दल अगदीं विपरीत गोष्टी यापूर्वी आम्ही ऐकत आलों होतों. गेल्या तीन चार वर्षांत मात्र तुमच्या देशाबद्दलची खरी माहिती आम्हांला मिळूं लागली आहे व तुमच्याबद्दल आमच्या देशामध्यें आदराचें वातावरण वाढत आहे. असें जमलेल्या मंडळीनें मला सांगितलें."

२७ जुलै ५४

आज मी उठण्याच्या आंतच मिसेस ओल्सननें दारावर थाप मारली. ती म्हणाली, "मिस्टर रासमुसनचा टेलिफोन आला आहे. लिंबी येथील शेतकी

शाळेंत डेन्मार्कमधील सरकारी चळवळीबद्दल एक व्याख्यान होणार आहे व त्या व्याख्यानासाठीं तुम्हांला ते घेऊन जाणार आहेत. तुम्ही झटकन तयार व्हा. न्याहारी तयार आहे.” लवकर तयार होऊन मी मिस्टर रासमुसनकडे गेलों. त्या ठिकाणीं श्री लोंढे व राजनायकम् माझी वाट पाहात उभे होते. नंतर आम्ही चौघे सदर शेतकी शाळेंत गेलों. व तेथें डेन्मार्कमधील सहकारी चळवळींबाबत व्याख्यान ऐकिलें. या देशांत सहकारी सोसायटीची चळवळ चांगलीच वाढीला लागलेली आहे. सहकारी सोसायट्यांचें माहेरघर म्हणून आज डेन्मार्कची प्रसिद्धि आहे. येथील सोसायट्यांचें काम फार चांगलें चालतें. डेन्मार्कमध्यें सहकारी सोसायट्यांचा कायदा नाहीं. या सोसायट्या ‘रजिस्टर’ करवून घ्याव्या लागत नाहींत. त्यांच्यावर सरकारी नियंत्रण नाहीं. तथापि या सर्व सोसायट्यांचा कारभार फारच समाधानकारक चालतो. तुम्हीं सोसायटीचे कितीही शेअर्स घेतलेत, तरी तुम्हांला मत मात्र एकच. त्यामुळें श्रीमंतांना व गरिबांना सोसायटीच्या कामकाजांत सारखाच हक्क मिळतो. प्रत्येक सोसायटीला बाजारभावानें माल विकावा लागतो. सर्व माल रोखीनें विकला जातो. जो माल विकावयाचा त्यामध्यें कोणत्याहि स्वरूपाची भेसळ असणार नाहीं, याची काळजी घ्यावी लागते. या व्यवहारांतून होणाऱ्या नफ्यापैकीं कांहीं भाग सभासदांची शैक्षणिक लायकी वाढविण्यासाठीं बाजूला काढून ठेवावा लागतो.

डेन्मार्कमधील सहकारी सोसायट्यांना सरकारची मुळींच मदत मिळत नाहीं व लोक पण सरकारकडे मदत मागायला जात नाहींत. आपला घरचा व्यवहार जितक्या काळजीनें ते लोक करतात, तितक्याच काळजीनें व कसोशीनें ते सोसायट्यांचा कारभार पण पाहतात. त्यामुळें सोसायटीच्या व्यवहारांत गोंधळ किंवा अफरातफर आढळून येत नाहीं. प्रत्येक सोसायटी एका विशिष्ट प्रकारचा व्यवहार पाहते. धान्य उत्पादन करणारी सहकारी सोसायटी उत्पादनाची बाजू संभाळील तर मार्केटिंग सोसायटी विक्रीचा भागच पाहील. एकाच प्रकारच्या कामाची जबाबदारी एका सोसायटीनें बरींच वर्षें सांभाळल्यामुळें त्यांच्या कामांत एक प्रकारची कार्यक्षमता आलेली असते.

डेन्मार्कमधील सहकारी चळवळ कशी देशव्यापी झाली आहे, हें पुढील आंकड्यांवरून आपल्या सहज लक्षांत येईल. ४०-४५ लाख लोकांच्या या देशांत सहकारी सोसायट्यांच्या सभासदांची संख्या २०-२५ लाख आहे.

एकूण सोसायट्यांची संख्या आठ ते नऊ हजार आहे. एकाच धंद्यांत काम करणाऱ्या सोसायट्यांचें फेडरेशन बनवितात. अशीं ५० फेडरेशनें आहेत. डेन्मार्कमधील एकूण लोकसंख्येपैकीं शेकडा ४५ टक्के लोकांच्या गरजा सहकारी सोसायट्यांमार्फत पुरविल्या जातात. येथें उत्पन्न होणाऱ्या एकूण दुधापैकीं ९१% दूध सहकारी डेअरीमार्फत विकलें जातें. येथून बाहेरगांवीं विकल्या जाणाऱ्या लोण्यापैकीं ६४% लोणी सहकारी सोसायट्यांमार्फत विकलें जातें. म्हणजे डेन्मार्कमधील जनतेचे बरेचसे व्यवहार सहकारी सोसायट्यांमार्फत होतात. त्यांना लागणारें कर्ज व घरें बांधण्याला लागणारा पैसा ते सहकारी सोसायटीमार्फत मिळवतात. प्रत्येक डॅनिश शेतकरी वेगवेगळ्या प्रकारच्या दहा ते पंधरा सोसायट्यांचा सभासद असतो. सहकारी सोसायट्यांचें जाळें डेन्मार्कभर पसरलेलें आढळतें.

या सहकारी चळवळीमुळें डेन्मार्कमधील लोकांचें आर्थिक जीवन खूप समृद्ध झालें आहे. सामाजिक विषमता दूर पळाली आहे; परंतु या सहकारी चळवळींचा एवढाच कांहीं फायदा झालेला नाहीं. या चळवळीमुळें डेन्मार्कच्या लोकांमध्यें लोकशाहीला पोषक अशी मनोवृत्ति निर्माण झाली आहे. सहकारी चळवळीचा हा अत्यंत मोलाचा फायदा आहे, असें येथें मानलें जातें. डेन्मार्कमध्यें ही जी सहकारी सोसायट्यांची चळवळ इतकी यशस्वी झाली, त्याचें श्रेय येथील जनता डेन्मार्कमधील लोकशाळांना देते. या शाळांमधून येथील शेतकऱ्यांना जें मौलिक शिक्षण मिळतें, त्या शिक्षणामुळेंच येथील लोकांना ही सहकारी सोसायटीची चळवळ इतक्या यशस्वीपणें चालवितां आली. या शाळांतून त्यांना जें चांगलें शिक्षण मिळालें, त्यामुळेंच येथील लोक सहकारी सोसायट्यांचा कारभार नेकीनें, प्रामाणिकपणानें व किफायतशीरपणें करूं शकतात.

दुपारीं अडीचच्या सुमारास एला व एरिकबरोबर मी ‘गोनसेमावला’ या खेड्यावर गेलों. त्या ठिकाणीं डॉ. मॅनिकी आले होते व आमचे सर्व भारतीय मित्र तेथें जमले होते. ते ज्यांच्या घरीं राहिले होते, ते सर्व डॅनिश यजमान व त्यांच्या घरच्या स्त्रिया पण येथें हजर होत्या. ओळखी करून देण्याचा औपचारिक कार्यक्रम संपल्यावर आमच्यापैकीं कांहीं लोकांनीं डेन्मार्कमधील ग्रामीण जीवनाबद्दलचे आपले अनुभव सांगितले. सर्वांचा सूर एकच होता कीं, खेड्यांतील हे आपले दिवस खूप आनंदांत गेले. या अल्प काळांत आपणांला

डेन्मार्कचें खरें दर्शन झालें व एक प्रकारचा मौलिक अनुभव येथें मिळाला. सव डॅनिश लोकांनीं भारतीयांना अत्यंत प्रेमानें व आतिथ्यशीलतेनें वागविलें. उत्तरा-दाखल कांहीं डॅनिश गृहस्थांनीं भाषणें केलीं. त्यांनीं भारतीय लोकांच्यामध्यें असलेल्या खिलाडू वृत्तीचें व इतर सद्गुणांचें वर्णन केलें. ह्या लोकांच्यामुळेंच आम्हांला नवभारताच्या पुनर्रचनेच्या प्रयत्नांचें नीट आकलन झालें, असें त्यांनीं सांगितलें. जागतिक राजकारणांत भारताला महत्त्वाचें स्थान आहे व जागतिक शांतता प्रस्थापित करण्यांत भारत महत्त्वाची कामगिरी करील, असा विश्वास त्यांनीं व्यक्त केला. हीं भाषणें चालू असतांनाच एला व तिच्यासारख्या दोन-तीन स्त्रिया यांच्या डोळ्यांमधून गंगायमुना वाहात होत्या. डेन्मार्कमधील स्त्रिया भारतीय स्त्रियांसारख्याच भावनाप्रधान व हळव्या वृत्तीच्या आहेत, असें दिसलें. या कार्यक्रमानंतर आम्ही सर्वजण स्टॅव्हनशॉल्टला परत आलों. एलाएरिकनीं राजनायकमूला आग्रहानें जेवायला ठेवून घेतलें. राजा फौंटनपेननें चित्रें चांगलीं काढतो. त्यामुळें तो कोठेंहि गेला, तरी त्याच्या भोंवतीं पोरांची गर्दी जमते. हेमिंग-ऑस्कॉव्हला त्यानें चित्रें काढून दिलीं. येथून परतण्याचा दिवस जवळ येत चालल्यामुळें आज आम्हीं खूप वेळ बसून गप्पा केल्या.

२८ जुलै ५४

आज सकाळीं साडेतीन-चारलाच उठून बसलों. करकरीत उजेड दिसल्या-मुळें सकाळ झाल्यासारखें वाटलें. रोजचें आन्हिक आटोपल्यावर मी वाचीत बसलों. बराच वेळ झाला तरी चहाला बोलावणें आलें नाहीं; म्हणून सहज घड्याळ पाहिलें तों न्याहारीला अजून खूप अवकाश असल्याचें दिसून आलें. उन्हाळ्यांत डेन्मार्कमध्यें लवकर उजाडत असल्यामुळें हा घोटाळा झाला.

आजच्या कार्यक्रमांत जनावरांची कृत्रिम रीतीनें पैदास करणाऱ्या केंद्राला भेट देण्याचा कार्यक्रम होता. डेन्मार्कमध्यें वळू ठेवण्याची पद्धत आहे. सर्व पैदास कृत्रिम पद्धतीनेंच केली जाते. शेतीसाठीं बैलांची गरज नसते. पैदाशीसाठीं मोजकेच बैल ठेवण्यांत येतात. बाकीच्या सर्व बैलांना लहानपणींच कसाईखान्यांत पाठविण्यांत येतें. पैदाशीसाठीं वापरण्यांत येणारा वळू बारा ते पंधरा वर्षें काम देऊं शकतो.

या ठिकाणीं आम्हीं चांगल्या गाई पाहिल्या. डेन्मार्कमध्यें गाईंचीं शिंगें त्या लहान असतांनाच कापून टाकण्याची प्रथा आहे. "तुम्हीं गाईंचीं शिंगें कां कापतां?" असें केंद्रावरील लोकांना आम्हीं विचारलें. त्यावर ते म्हणाले, "शिंगें जर कापलीं नाहींत, तर त्यांचा उपयोग भांडणाच्या वेळीं गाई करतात व त्यामुळें चांगल्या गाईंना मोठी दुखापत होते. गाई नेहमींच संरक्षित वातावरणांत वावरत असल्यामुळें स्वतःचें संरक्षण करण्यासाठीं त्यांना शिंगांची आवश्यकता नसते."

दुपारीं येथून तीन-चार मैल दूर असलेल्या 'त्रियाकोल' नांवाच्या गांवीं आम्ही गेलों. त्या ठिकाणीं एक नवी शाळेची इमारत बांधली जात होती. या इमारतींत येथील प्राथमिक शाळा भरणार होती. या शाळेंतील मुलांची संख्या सुमारें सातशें होती. ही शाळा येथील नगरपालिकेच्या ताब्यांत होती. शाळेसाठीं बांधली जाणारी नवी इमारत खूप सुंदर व प्रासादतुल्य होती. या इमारतीवर सुमारें ३० ते ३५ लाख रुपये खर्च करण्यांत आले होते. डेन्मार्कमधील माध्यमिक शाळांच्या इमारतींपेक्षां तेथील प्राथमिक शाळांच्या इमारती अधिक चांगल्या दिसल्या. प्राथमिक शाळा चालविण्याची जबाबदारी स्थानिक नगरपालिकेकडे असते. या नगरपालिकेला गांवकऱ्यांची मदत मिळत असल्यामुळें या शाळांच्या इमारतींवर व उपकरणांवर भरपूर खर्च करणें शक्य होतें. शाळेच्या इमारतींतच मुख्याध्यापकांच्या राहण्याची सोय करण्यांत आली होती. ही त्यांची राहण्याची जागा अत्यंत आकर्षक व सर्व सुखसोईंनीं सुसज्ज अशी होती. शाळा दाखविणाऱ्या गृहस्थानें मला विचारलें, "आमच्या मुख्याध्यापकाचें निवासस्थान तुम्हांस कसें काय आवडलें?" मी म्हणालों, "भारतांतील नोकरी सोडून या शाळेच्या मुख्याध्यापकाच्या जागेसाठीं अर्ज करावा, असे विचार माझ्या मनांत येऊं लागले आहेत. तुमच्या शाळेच्या मुख्याध्यापकाचा मला हेवा वाटूं लागला आहे." खरोखरीच त्या ठिकाणीं राहायला जाणारा त्या प्राथमिक शाळेचा मुख्याध्यापक खूप भाग्यवान् असला पाहिजे.

२९ जुलै ५४

श्री गौडा यांचा सकाळींच टेलिफोन आल्यामुळें मला खोलींतून बाहेर बोलावण्यांत आलें. गोनसेमावला या नांवाच्या गांवीं एका शेतकऱ्याच्या घरीं ते

राहात होते. डेन्मार्कमध्यें टेलिफोनचें जाळें चांगलेंच पसरलेलें आहे. त्यामुळें एका खेड्यापासून दुसरें खेडें दूर वाटत नाहीं.

"तुमचें मी मनापासून अभिनंदन करतों." असें श्री गौडा टेलिफोनवर बोलले. मी आश्चर्यचकित होऊन त्यांना म्हणालों, "माझें अभिनंदन? आणि तें कशाबद्दल?" ते म्हणाले, "पुढील महिन्यांत 'युनेस्को'तर्फे 'हिलेरॉड' येथें एक जागतिक सेमिनार भरणार आहे. भारत सरकारचे प्रतिनिधि म्हणून या सेमिनारसाठीं आपली दोघांची निवड करण्यांत आली आहे. मग सांगा मी तुमचें अभिनंदन करायला पाहिजे कीं नको?" मी म्हणालों, "मलाही तुमचें मनापासून अभिनंदन करायला पाहिजे." आमचें टेलिफोनवरून चाललेलें भाषण एला व एरिक लक्ष देऊन ऐकत होतीं. "काय बातमी आहे? गौडानें तुमचें कशाबद्दल अभिनंदन केलें?" असें त्यांनीं विचारलें. मीं त्यांना गौडानें सांगितलेली माहिती थोडक्यांत समजावून दिली. मग त्या दोघांनीं माझें मनापासून अभिनंदन केलें.

खरोखर आजचा दिवस आयुष्यांतील एक संस्मरणीय दिवस ठरेल. युनेस्को-सारख्या एका मोठ्या संस्थेनें आंखलेल्या एका जागतिक सेमिनारला स्वतंत्र भारताचा प्रतिनिधि म्हणून हजर राहण्याचा मान मला मिळाला असल्याचें ऐकून मला मनापासून आनंद झाला. ही बातमी ऐकण्यासाठीं आपली मंडळी जवळ असती तर अधिक चांगलें झालें असतें असा विचार पण मनांत येऊन गेला.

आज आम्हां सर्वांना एरिकच्या वडिलांनीं जेवायला बोलाविलें होतें. एरिकचें लग्न झाल्यावर आपलें जुनें घर त्यांनीं एरिकला दिलें व स्वतःसाठीं जवळच एक टुमदार असें छानसें घर बांधलें. त्या ठिकाणीं एरिकचे वडील, त्याची आई व एरिकची मावशी एवढी मंडळी राहात होती. त्यांच्या घरीं आम्ही पोहोंचल्यावर त्या घरांतील सर्व मंडळींनीं आमचें दारांतच स्वागत केलें. पांच मिनिटें आम्ही दिवाणखान्यांत बसलों, इतक्यांत एला माझी परवानगी घेऊन स्वयंपाकघरांत गेली व जेवण वाढण्याची व्यवस्था करूं लागली. आम्ही जेवायला बसलों असतांना एला वाढण्याचें काम करीत होती. तिच्या सासवा पण आमच्याबरोबर जेवायला बसल्या. सर्वांना वाढून झाल्यावर आपल्याकडील सूनबाईप्रमाणें एला नंतर जेवायला बसली. जेवणें आटोपल्यावर नंतरची सर्व आवराआवर एलानेंच केली. डेन्मार्कसारख्या पुढारलेल्या देशांतसुद्धां कांहीं कामें सुनांनीं केलींच पाहिजेत असा संकेत असल्याचें पाहून आश्चर्य वाटलें. सासऱ्याच्या घरीं काम करीत

असलेली एला भारतांतील कोणत्याहि घरंदाज घरांतील सुनेपेक्षां मला मुळींच निराळी वाटली नाहीं. जेवणें झाल्यावर आम्ही सर्व दिवाणखान्यांत जमलों. काम आटोपल्यावर एला आमच्यामध्यें येऊन बसली व तिनें आपलें स्वेटर विणण्याचें साहित्य पिशवींतून बाहेर काढलें. ती येऊन बसल्याबरोबर तिच्या म्हाताऱ्या सासऱ्यानें सिगरेटची पेटी तिच्यापुढें केली. एलानें थोडासा संकोच केला. त्यावर तिचा सासरा म्हणाला, "एला, तुला आवडणारी सिगरेट मीं मुद्दाम आणली आहे; ही फारशी कडक नाहीं, तुला ही आवडेल." असें म्हणून त्यानें आग्रहानें तिला सिगरेट घ्यायला लावलें. सासरासुनेचें हें प्रेमळ व मनमोकळें वागणें पाहून मला थोडेंसें आश्चर्यच वाटलें.

संध्याकाळीं आम्ही सर्व मंडळी राजनायकम् ज्या घरीं राहात होते त्या एल्सन नांवाच्या शेतकऱ्याच्या घरीं गेलों. त्यांच्या घराच्या मागील बाजूला एक छानसें तळें होतें. सुमारें तास दीड तास या तळयांत आम्ही होडींतून हिंडलों. आमच्या बरोबर श्री लोंढे ज्यांच्या घरीं राहिले होते, त्या घरची सर्व मंडळी होती. होडींतून हिंडून आल्यावर आम्ही सर्व मंडळी कॉफीपानास बसलों. स्टॅव्हनशॉल्ट-मधील लोकांना भेटण्याची ही शेवटची संधि असल्यानें आज आम्ही तिघां भारतीयांनीं तेथील सर्व लोकांचे मनापासून आभार मानले. आमच्याप्रमाणेंच येथील आमच्या यजमानांनींसुद्धां, आम्ही त्यांना आपल्या सहवासाचा आनंद दिल्याबद्दल व भारताविषयीं मोलाची माहिती दिल्याबद्दल आमचे आभार मानिले. ही आभार मानण्याचीं भाषणें भावनापूर्ण झाल्यामुळें हळव्या वृत्तीच्या लोकांवर त्यांचा परिणाम झाला. पुन्हा एकदां गंगायमुनांचा संगम दिसला. आज खूप वेळपर्यंत आम्ही गप्पा मारीत बसलों.


३० जुलै ५४

आज सकाळींच खूप सर्दी झाली. थोडासा ताप आल्यासारखें वाटलें. आज माझ्यासाठीं एला-एरिकनीं खूप भरगच्च कार्यक्रम आंखला होता. आजचा दिवस कोपनहेगनमध्यें घालवावा, असें त्यांनीं ठरविलें होतें. डेन्मार्कमधील लोक 'जिवाची मुंबई करण्याकरितां' कोपनहेगनमध्यें जातात. एक सबंध दिवस कोपनहेगनमध्यें घालविणें येथील खेड्यांतील लोकांना फार आवडतें. मी आजारी

पडूं नये व कार्यक्रम रद्द होऊं नये म्हणून एला व एरिक यांनीं मला कांहीं गोळ्या व एकदोन डोस दिले. आम्ही दहासाडे दहाला बाहेर पडणार होतों. मधून मधून एला किंवा एरिक मला येऊन सांगत होतीं, "तुम्हांला जर बरें वाटत नसेल तर, आपण आजचा कार्यक्रम रद्द करूं या." सुदैवानें मला बरें




म्यूझियममधील एका पुतळ्याचे भग्नावशेष



म्यूझियममधील एक पुतळा

वाटलें व त्यांच्या मोटारींत बसून आम्ही कोपनहेगनला गेलों. तेथें एला व एरिक यांना नॅशनल म्यूझियममधील पौर्वात्य विभाग पाहावयाचा होता व त्या विभागांतील कांहीं वस्तूंबद्दल माझ्याकडून माहिती मिळवावयाची होती. दोनतीन तास आम्हीं येथें घालविले. नंतर आम्ही कोपनहेगनमधील रॉयल पोर्सलेन फॅक्टरी पाहायला गेलों. त्या ठिकाणीं काचेच्या व पोर्सलेनच्या (चिनीमातीच्या) खूप चांगल्या चांगल्या वस्तु विक्रीला ठेविल्या होत्या. त्यांपैकीं कांहीं वस्तूंच्या किंमती एला-एरिकनें विचारल्या. त्यावर किंमती सांगणाऱ्या माणसानें सांगितलें, "नमुना नंबर एक व दोनच्या वस्तू परदेशीं बाजारपेठां-

करितां तयार करण्यांत आल्या आहेत. तिसऱ्या व चौथ्या प्रतीच्या वस्तु तुम्हांला मिळतील." आपल्याला खूप आवडलेली वस्तू घेतां येत नाहीं, म्हणून एला थोडी निराश झाली. येथील लोकांचें हें धोरणच आहे कीं, चांगल्या प्रतीच्या वस्तू या परदेशांतच विकावयाच्या व अशा रीतीनें परदेशी पैसा आपल्या देशांत आणायचा. हें राष्ट्रीय धोरण डेन्मार्कमधील सर्व लोक शांतपणें स्वीकारतात व त्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठीं सरकारशीं जरूर तें सहकार्य करतात. या भेटीची आठवण म्हणून मीं एकदोन वस्तू खरेदी केल्या.

परत येतांना कोपनहेगनमध्येंच जेवण घेण्याचा विचार एलानें बोलून दाखविला. त्यावर मी म्हणालों, "येथें एखादें चिनी दुकान नाहीं का?" माझा प्रश्न ऐकल्यावर एरिक म्हणाला, "येथें चिनी हॉटेल आहे. पण त्या हॉटेलांत जायला आम्हांला भीति वाटते. या भीतीमुळें आम्ही आजपर्यंत कधीं त्या हॉटेलमध्यें गेलों नाहीं. तुम्हीं कधीं चिनी हॉटेलमधील जेवणाचा अनुभव घेतला आहे का?" ऑस्ट्रेलिया व न्युझीलंडमध्यें मी गेलों असतांना खूप वेळां मीं चिनी हॉटेलांत जेवण घेतलें होतें. तें जेवण मला खूप चांगलें वाटलें होतें. सिडनेमधील उत्तमांतलें उत्तम हॉटेल चिनी लोकांनीं चालविलेलें होतें व संध्याकाळीं तेथील सर्व श्रीमंतांची त्या हॉटेलांत खूप गर्दी जमते, अशी माहिती मी त्यांना दिली. "या चिनी हॉटेलबद्दल तुम्हांला कसली भीति वाटते?" असा प्रश्न मीं त्यांना केला. चिनी लोक उंदीर व झुरळें खातात, असा आपल्यापैकीं कांहींचा जसा गैरसमज असतो तसाच गैरसमज चिनी लोकांबाबत डेन्मार्कच्या लोकांमध्यें सुद्धां दिसून आला. हा गैरसमज मीं दूर केल्यावर एला व एरिक चिनी हॉटेलांत जेवायला यायला तयार झालीं. कोपनहेगनमधील 'हॉटेल पेकिंग'मध्यें आम्ही गेलों. या ठिकाणीं आम्हीं चांगलें जेवण घेतलें. एला-एरिकला पण तें जेवण आवडलें.

कोपनहेनगहून परत येत असतांना वाटेंत एला म्हणाली, "आपण Minoelunder या स्थळीं जाऊं या." इंग्रजींत या स्थळाला 'मेमरी पार्क' म्हणतात. तिच्या सूचनेप्रमाणें एरिकनें आपली मोटर त्या उद्यानाकडे वळविली. गेल्या महायुद्धांत जर्मनीनें डेन्मार्क व्यापला होता त्या वेळीं जर्मन राजवट हाणून पाडण्यासाठीं एक भूमिगत चळवळ डेन्मार्कमधील नवजवानांनीं सुरू केली होती. या चळवळीमध्यें भाग घेतल्याचा ज्यांच्या ज्यांच्याविषयीं संशय आला होता, त्या सर्वांचे अमानुष हाल हिटलरच्या सैनिकांनीं केले व त्यांच्यापैकीं पुष्कळांवर गोळ्या झाडण्यांत

आल्या. हिटलरच्या पाशवी अत्याचाराला बळी पडलेल्या अनेक नवजवानांचीं थडगीं येथें पाहायला मिळालीं. या चळवळींत डेन्मार्कमधील कित्येक तरुणांनीं बलिदान केलें. कांहींच्या थडग्यांवर त्यांचीं नांवें दिसत होतीं, परंतु कित्येकांचें नांवनिशाण राहिलें नव्हतें. या 'अनामिक हुतात्म्यांच्या' त्यागाचें वर्णन करणारी एक शिला येथें बसविलेली आढळली. ह्या सर्व क्रान्तिवीरांबद्दल डेन्मार्कमधील जनतेला नितांत आदर वाटत असतो. आम्ही ज्या वेळीं या ठिकाणीं आलों, त्या वेळीं किती तरी लोक 'या मृतांना' आपली श्रद्धांजलि वाहण्याकरितां आलेले दिसले.

या ठिकाणीं एक अत्यंत हृदयस्पर्शी दृश्य मीं पाहिलें. तें मी कधींहि विसरूं शकणार नाहीं. साठीच्या घरांत आलेला एक म्हातारा आपल्या मुलाच्या थडग्या-भोंवतीं बसून त्या ठिकाणीं लावलेल्या फुलझाडांना पाणी घालीत होता. पाण्याचें सिंचन झाडांवर चाललें होतें. त्याच वेळीं त्याच्या दोन्ही डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रुधारांचें सिंचन त्या थडग्यावर होत होतें. बापाचें श्राद्ध मुलानें करायचें ही जगाची नेहमींची प्रथा. या ठिकाणीं आपल्या तरुण मुलाचें श्राद्ध बाप उरकीत होता. यापेक्षां भयंकर दारुण असा दुसरा दैवदुर्विलास कोणता असूं शकेल? त्या थडग्याभोंवतीं एकाकी बसून तो बाप अश्रू ढाळीत होता; आणि मुलाच्या थडग्याभोवतीं वाढलेलें गवत उपटून काढून त्या थडग्याची साफसुफी करतांना मुलाच्या सहवासाचें काल्पनिक सुख तोअनुभवीत होता. हें दृश्य पाहिल्यावर कितीतरी वेळ माझी चित्तवृत्ति विचलित झाली होती! युद्ध संपलें तरी युद्धानें केलेल्या अत्याचाराच्या स्मृती किती भयानकपणें मागें रेंगाळत राहतात!

तेथून परत आल्यावर आम्ही निलसन नांवाच्या गृहस्थाकडे गेलों. या गृहस्थाला दोन मुली होत्या. त्यांपैकीं मोठी विद्यापीठांत शिक्षण घेत होती. भारता-बद्दलचीं चारदोन पुस्तकें तिनें वाचलीं होतीं. अधिक माहिती घेण्यास ती खूप उत्सुक होती. तिला इंग्रजी बरेंच चांगलें येत होतें. मला तिनें भारताबद्दल अनेक प्रश्न विचारले. मीं त्या प्रश्नांचीं दिलेलीं उत्तरें आपल्या आईवडिलांना समजावींत, म्हणून तिनें त्या सर्वांचें भाषांतर करून जमलेल्या लोकांना सांगितलें. त्यानंतर ह्या मुलीनें गाणीं वगैरे म्हणून दाखविलीं.

३१ जुलै ५४

आज या शेतकरी कुटुंबांतून मी बाहेर पडणार! आम्हां सर्व मंडळींचा खेड्यांतील मुक्काम आज संपणार! गेले पंधरा-सोळा दिवस मी या कुटुंबांत राहिलों. कुटुंबांतील सर्व मंडळींनीं मला त्यांच्यापैकींच एक मानलें. आम्ही एकमेकांशीं खूप आपुलकीनें वागलों. आमच्यामध्यें चांगला स्नेह निर्माण झाला. मी यापूर्वी कोणाच्याहि घरामध्यें कधींहि इतके दिवस राहिलों नव्हतों. हा एक आयुष्यांतला नवा अनुभव होता. या कुटुंबांतील कर्ता पुरुष एरिक व त्याची पत्नी एला यांनीं माझ्यासाठीं खूप परिश्रम घेतले. माझें येथील वास्तव्य अधिकाधिक सुखाचें व्हावें, म्हणून त्यांनीं जास्तींत जास्त कष्ट घेतले; खूप पैसाहि खर्च केला. या सर्वापेक्षांहि अधिक महत्त्वाची गोष्ट, म्हणजे हीं दोघें माझ्याशीं अत्यंत प्रेमळपणानें वागलीं. आज जाण्याचा दिवस उगवला. एक प्रकारचें विषण्णतेचें वातावरण घरामध्यें फैलावलें. सकाळपासून मी जाण्याची तयारी करूं लागलों. सुमारें दहाच्या सुमाराला डॉ. मॅनिकी बस घेऊन आले. आजूबाजूच्या खेड्यांत राहायला गेलेले आमचे भारतीय मित्र त्या बसमध्यें होते. एला व एरिक व त्यांचीं छोटीं मुलें आम्हांला निरोप देण्यासाठीं दारांत येऊन उभीं राहिलीं होतीं. हीं मुलें व त्यांची आई निरोप देतांना रडत होतीं. मुलांच्या वडिलांचा चेहरा पण खूप गोरामोरा झाला होता. श्री गौडांनीं आमच्या सर्वांचे फोटो घेतले. या प्रेमळ कुटुंबाचा निरोप घेऊन मी बसमध्यें बसलों.

या सोळा दिवसांमध्यें डेन्मार्कचें खरें दर्शन झालें. डेन्मार्कमधील लोकांचें अंतरंग जवळून पाहायला मिळालें. त्यांच्या आतिथ्याचा आस्वाद मीं घेतला. लोकशाहीचीं पाळेंमुळें डेन्मार्कमध्यें किती खोलवर रुजलेलीं आहेत याची मला कल्पना आली. सामाजिक विषमता नाहींशी करून कल्याणकारी राज्यव्यवस्था स्थापन करण्याकरितां डेन्मार्कनें चालविलेल्या प्रयत्नांचा जवळून परिचय करून घेतां आला. भारतीयांच्याबद्दल डेन्मार्कच्या लोकांमध्यें वसत असलेली स्नेहाची भावना अनुभवितां आली. भारताचे पुढारी ' जवाहरलाल नेहरू ' यांच्या आंतरराष्ट्रीय कामगिरीबद्दल येथील लोकांमध्यें वसत असलेल्या आदराची पण कल्पना आली. थोडक्यांत सांगायचें म्हणजे, जें डेन्मार्कचें दर्शन अनेक पुस्तकें वाचून अथवा

व्याख्यानें ऐकून झालें नसतें, तें या पंधरा दिवसांच्या काळांत फार सुस्पष्टपणें झाल्याचा आनंद मिळाला. हे पंधरा सोळा दिवस खूप आनंदांत गेले. शाश्वत मूल्यबाबतची श्रद्धा वाढीला लागल्यासारखें वाटलें. मानवतेवरील विश्वास वाढला व भविष्य काळाबद्दल अधिक आशा वाटूं लागली.

१ ऑगस्ट ५४

आम्हीं डेन्मार्कमध्यें जें पाहिलें त्याबाबत भारत सरकारला अहवाल द्यावयाचा आहे. त्यासंबंधीं चर्चा करण्याकरितां आज सकाळीं आम्ही सर्वजण एके ठिकाणीं जमलों. याप्रमाणें रोज आम्ही जमून आपल्या शिफारशींचा विचार करणार आहोंत. ही चर्चा आज सुमारें दोनतीन तास चालली.

आज संध्याकाळीं डॉ. मॅनिकी यांच्या कार्यालयांत काम करणाऱ्या ब्रिटा नांवाच्या मुलीचा वाढदिवस होता. येथें आल्यापासून आम्हां सर्वांना या मुलीनें खूप मदत केली. विशेषतः पैशांची मोड वगैरे मिळवून देणें, आमचे कार्यक्रम जमविणें, इत्यादि कामांत हिची खूप मदत झाली. वाढदिवसाचें आमंत्रण अचानक आल्यामुळें तिला बक्षीस देण्यासाठीं कोणतीहि वस्तु विकत घेतां आली नाहीं. मजजवळ एक चांदीचा भारतीय रुपया होता तो मीं तिला बक्षिस दिला. माझें बक्षीस तिला फार आवडलें. जमलेल्या सर्वांनीं त्या बक्षिसाचें कौतुक केलें.

या ठिकाणीं एक फ्रेंच मुलगी भेटली. ती खूप बोलकी होती. तिला इंग्रजी चांगलें येत होतें. ती म्हणाली, "घरीं परत जातांना तुम्ही पॅरिसला या. मी तुम्हांला आमचें पॅरिस शहर दाखवीन." पॅरिस पाहण्याची मलाहि उत्कंठा आहे. परंतु हा कार्यक्रम कसा जमणार? अजून भारत सरकारकडून येणारे पैसे आले नाहींत. ते जरी आले तरी पॅरिसला जातां येईल किंवा नाहीं याची शंकाच वाटते!

२ ऑगस्ट ५४

आज डॉ. मॅनिकींबरोबर आम्ही कोपनहेगनला गेलों. त्या ठिकाणीं आम्हीं सुतारकामाचें शिक्षण देणारी संस्था पाहिली; एका मध्यवर्ति औद्योगिक शाळेला भेट दिली व हक्कशिक्षणाच्या खात्याच्या कार्यालयांत गेलों. या संस्था पाहून बाहेर येत

३१ जुलै ५४

आज या शेतकरी कुटुंबांतून मी बाहेर पडणार! आम्हां सर्व मंडळींचा खेड्यांतील मुक्काम आज संपणार! गेले पंधरा-सोळा दिवस मी या कुटुंबांत राहिलों. कुटुंबांतील सर्व मंडळींनीं मला त्यांच्यापैकींच एक मानलें. आम्ही एकमेकांशीं खूप आपुलकीनें वागलों. आमच्यामध्यें चांगला स्नेह निर्माण झाला. मी यापूर्वी कोणाच्याहि घरामध्यें कधींहि इतके दिवस राहिलों नव्हतों. हा एक आयुष्यांतला नवा अनुभव होता. या कुटुंबांतील कर्ता पुरुष एरिक व त्याची पत्नी एला यांनीं माझ्यासाठीं खूप परिश्रम घेतले. माझें येथील वास्तव्य अधिकाधिक सुखाचें व्हावें, म्हणून त्यांनीं जास्तींत जास्त कष्ट घेतले; खूप पैसाहि खर्च केला. या सर्वांपेक्षांहि अधिक महत्त्वाची गोष्ट, म्हणजे हीं दोघें माझ्याशीं अत्यंत प्रेमळपणानें वागलीं. आज जाण्याचा दिवस उगवला. एक प्रकारचें विषण्णतेचें वातावरण घरामध्यें फैलावलें. सकाळपासून मी जाण्याची तयारी करूं लागलों. सुमारें दहाच्या सुमाराला डॉ. मॅनिकी बस घेऊन आले. आजूबाजूच्या खेड्यांत राहायला गेलेले आमचे भारतीय मित्र त्या बसमध्यें होते. एला व एरिक व त्यांचीं छोटीं मुलें आम्हांला निरोप देण्यासाठीं दारांत येऊन उभीं राहिलीं होतीं. हीं मुलें व त्यांची आई निरोप देतांना रडत होतीं. मुलांच्या वडिलांचा चेहरा पण खूप गोरामोरा झाला होता. श्री गौडांनीं आमच्या सर्वांचे फोटो घेतले. या प्रेमळ कुटुंबाचा निरोप घेऊन मी बसमध्यें बसलों.

या सोळा दिवसांमध्यें डेन्मार्कचें खरें दर्शन झालें. डेन्मार्कमधील लोकांचें अंतरंग जवळून पाहायला मिळालें. त्यांच्या आतिथ्याचा आस्वाद मीं घेतला. लोकशाहीचीं पाळेंमुळें डेन्मार्कमध्यें किती खोलवर रुजलेलीं आहेत याची मला कल्पना आली. सामाजिक विषमता नाहींशी करून कल्याणकारी राज्यव्यवस्था स्थापन करण्याकरितां डेन्मार्कनें चालविलेल्या प्रयत्नांचा जवळून परिचय करून घेतां आला. भारतीयांच्याबद्दल डेन्मार्कच्या लोकांमध्यें वसत असलेली स्नेहाची भावना अनुभवितां आली. भारताचे पुढारी 'जवाहरलाल नेहरू' यांच्या आंतरराष्ट्रीय कामगिरीबद्दल येथील लोकांमध्यें वसत असलेल्या आदराची पण कल्पना आली. थोडक्यांत सांगायचें म्हणजे, जें डेन्मार्कचें दर्शन अनेक पुस्तकें वाचून अथवा

व्याख्यानें ऐकून झालें नसतें, तें या पंधरा दिवसांच्या काळांत फार सुस्पष्टपणें झाल्याचा आनंद मिळाला. हे पंधरा सोळा दिवस खूप आनंदांत गेले. शाश्वत मूल्यबाबतची श्रद्धा वाढीला लागल्यासारखें वाटलें. मानवतेवरील विश्वास वाढला व भविष्य काळाबद्दल अधिक आशा वाटूं लागली.

१ ऑगस्ट ५४

आम्हीं डेन्मार्कमध्यें जें पाहिलें त्याबाबत भारत सरकारला अहवाल द्यावयाचा आहे. त्यासंबंधीं चर्चा करण्याकरितां आज सकाळीं आम्ही सर्वजण एके ठिकाणीं जमलों. याप्रमाणें रोज आम्ही जमून आपल्या शिफारशींचा विचार करणार आहोंत. ही चर्चा आज सुमारें दोनतीन तास चालली.

आज संध्याकाळीं डॉ. मॅनिकी यांच्या कार्यालयांत काम करणाऱ्या ब्रिटा नांवाच्या मुलीचा वाढदिवस होता. येथें आल्यापासून आम्हां सर्वांना या मुलीनें खूप मदत केली. विशेषतः पैशांची मोड वगैरे मिळवून देणें, आमचे कार्यक्रम जमविणें, इत्यादि कामांत हिची खूप मदत झाली. वाढदिवसाचें आमंत्रण अचानक आल्यामुळें तिला बक्षीस देण्यासाठीं कोणतीहि वस्तु विकत घेतां आली नाहीं. मजजवळ एक चांदीचा भारतीय रुपया होता तो मीं तिला बक्षिस दिला. माझें बक्षीस तिला फार आवडलें. जमलेल्या सर्वांनीं त्या बक्षिसाचें कौतुक केलें.

या ठिकाणीं एक फ्रेंच मुलगी भेटली. ती खूप बोलकी होती. तिला इंग्रजी चांगलें येत होतें. ती म्हणाली, "घरीं परत जातांना तुम्ही पॅरिसला या. मी तुम्हांला आमचें पॅरिस शहर दाखवीन." पॅरिस पाहण्याची मलाहि उत्कंठा आहे. परंतु हा कार्यक्रम कसा जमणार? अजून भारत सरकारकडून येणारे पैसे आले नाहींत. ते जरी आले तरी पॅरिसला जातां येईल किंवा नाहीं याची शंकाच वाटते!

२ ऑगस्ट ५४

आज डॉ. मॅनिकींबरोबर आम्ही कोपनहेगनला गेलों. त्या ठिकाणीं आम्हीं सुतारकामाचें शिक्षण देणारी संस्था पाहिली; एका मध्यवर्ति औद्योगिक शाळेला भेट दिली व हक्शिक्षणाच्या खात्याच्या कार्यालयांत गेलों. या संस्था पाहून बाहेर येत

असतांना अचानकपणें कोपनहेगनच्या रस्त्यांत मला एला ओल्सन भेटली. ती म्हणाली "एरिकचा दांत काढण्याकरितां आम्ही डॉक्टरकडे आलों आहोंत. मी त्याचीच वाट पाहात उभी आहें." इतक्यांत एरिक आला. अचानकपणें झालेल्या या भेटीमुळें आम्हां सर्वांना खूप आनंद झाला.

आमच्या बरोबरची सर्व मंडळी पॉलिटिकेन् नांवाच्या वृत्तपत्राच्या कचेरींत गेली. मी व बरकतअल्ली त्यांना भेटण्यासाठीं निघालों असतांना खूप जोराचा पाऊस आल्यामुळें एका दुकानांत शिरलों. त्या दुकानदाराशीं आम्ही पाऊस जाईपर्यंत बोलत बसलों. हा दुकानदार कम्युनिस्टांचा मोठा द्वेष्टा वाटला. कम्युनिस्ट हे राक्षसी लोक आहेत व त्यांच्या राज्यांत लोकांचे अमानुषपणें हाल केले जातात, अशी याची ठाम कल्पना दिसली. त्यानें माझा पत्ता विचारला व शिष्टाचार म्हणून मीं तो त्याला सांगितला व त्यानें वही पुढें केल्यामुळें मीं तो लिहून पण दिला. पण बरकतअल्लीला ही गोष्ट आवडली नाहीं. पुरेसा परिचय नसतांना त्या माणसाला मीं पत्ता लिहून दिला ही माझी चूक झाली, असें त्याला वाटलें. ज्या माणसानें पावसामध्यें अर्धा तास उभें राहायला आपल्याला जागा दिली त्याच्याशीं मी वागलों त्यापेक्षां निराळ्या रीतीनें वागणें योग्य झालें नसतें, असें मला वाटलें. आम्ही परत आल्यावर आपल्या निवासस्थानीं जाण्यापूर्वी डॉ. मॅनिकी यांनीं सर्वांना गोळा केलें व श्री गौडांना व मला युनेस्को सेमिनारमध्यें भारतातर्फे हजर राहण्यासाठीं भारत सरकारनें निवडल्याची बातमी सर्वांना निवेदन केली. यानंतर मित्रांनीं येऊन माझें अभिनंदन केलें.

३ ऑगस्ट ५४

कुमारी डेबू या नांवाची मुंबईची एक पारशी महिला आज सकाळीं मला भेटली. ही बाई दोन वर्षें अमेरिकेंत होती. येथें एक स्त्रियांची परिषद आजपासून चालू होणार आहे. त्या परिषदेसाठीं ही बाई आली होती. मीं तिची इतर भारतीयांशीं ओळख करून दिली.

दुपारीं अहवालाबाबत चांगली चर्चा झाली. मधून मधून वातावरण गरम होत होतें. आज ब्रिस्टल विश्वविद्यालयाचे फ्लेचर नांवाचे गृहस्थ येथें आले आहेत. आम्हांला व्याख्यानें देण्यासाठीं डॉ. मॅनिकी यांनीं कांहीं परदेशी

प्राध्यापकांना बोलावलें आहे. डॉ. ग्रिफिथ यांनीं आंतरराष्ट्रीय राजकारणावर व्याख्यानें दिलीं. मि. फ्लेचर यांचीं शिक्षणशास्त्रावर व्याख्यानें व्हावयाचीं आहेत. आजच्या व्याख्यानांत त्यांनीं नवीन विषय, विशेषतः नवी भाषा, कशी शिकावी व शिकवावी हें सांगितलें. मि. फ्लेचर यांनीं आफ्रिकेंत बरेच दिवस घालविलेले आहेत. त्यामुळें तेथील जीवनाचा त्यांचा अनुभव फार मोठा आहे. सध्यां आपल्याकडील मुलांना दोन-तीन भाषा शिकाव्या लागतात, म्हणून पालकांची तक्रार ऐकूं येते. या बाबतींत आपला आफ्रिकेंतील अनुभव सांगतांना मि. फ्लेचर म्हणाले, "टँगानिकामध्यें अकरा वर्षांचा मुलगा चार भाषेंत बोलूं शकतो. मुलांना भाषा शिकवितांना आपण एखादी नवी भाषा शिकत आहोंत, याची जाणीव कमींत कमी होईल अशी काळजी घ्यावी. जी भाषा शिकवायची असेल त्या भाषेंतून छोट्या छोट्या गोष्टी सांगितल्या, तर भाषा शिकवायला फार त्रास पडत नाहीं."

४ ऑगस्ट ५४

मि. फ्लेचर यांचें आजहि व्याख्यान झालें. आजच्या व्याख्यानांत 'शिक्षणामध्यें खेळाचें स्थान काय?' या विषयावर त्यांनीं चांगलें विवेचन केलें. तुम्हांला कोणाला कांहीं शिकवायचें असेल तर खेळामार्फत तें चांगलें शिकवितां येईल. प्रत्येक शाळेला जोडून एक क्रीडांगण, एक वर्कशॉप व एक बाग असलीच पाहिजे, असें ते म्हणाले. किलिमांजारो येथील एका शाळेचा अनुभव सांगतांना ते म्हणाले, "मुलींना गृहजीवनशास्त्र शिकविण्याची एक अभिनव पद्धति मीं येथें पाहिली. शाळेनें कांहीं छोटीं बालकें दत्तक घेतलीं होतीं. त्या बालकांना वाढविण्याचें काम त्या शाळेंतील मुली करीत होत्या. माता म्हणून पुढें आपल्यावर येणाऱ्या जबाबदाऱ्या मुलींना चांगल्या रीतीनें पार पाडतां याव्यात, म्हणून शिक्षणक्रमांतच तरतूद केलेली येथें आढळली." शिक्षणाचा आणि जीवनाचा इतका व्यावहारिक संबंध परदेशांमध्यें घातला जातो. जीवनोपयोगी शिक्षण देणें हें तेथील शाळाचालक आपलें कर्तव्य मानतात. आज बाकीचा सारा वेळ अहवालाच्या चर्चेंतच गेला.

५ ऑगस्ट ५४

सकाळचा वेळ लेखनांत गेला. आज डॉ. फ्लेचर व डॉ. ग्रिफिथ यांचीं व्याख्यानें झालीं. सायंकाळीं आमच्या निवासस्थानांत राहणाऱ्या लोकांनीं एक करमणुकीचा कार्यक्रम आंखला होता. इतक्यांत एक बाई माझ्यासाठीं एक तार घेऊन आली. परदेशांत आपल्याला तारा सहसा येत नाहींत. त्यामुळें या तारेंत काय असेल, हें जाणून घेण्याची उत्सुकता खूप होती. ती तार भारतसरकारच्या शिक्षणखात्याकडून आली होती. आगामी 'युनेस्को' परिषदेसाठीं भारत सरकारचा प्रतिनिधि म्हणून माझी निवड झाली असून मीं त्या परिषदेला हजर राहावें, असा मजकूर त्या तारेंत होता. ही बातमी मला अनधिकृतपणें आधींच समजली होती. पण आज सरकारी हुकूमच हातीं पडला.

६ ऑगस्ट ५४

अहवाल लिहिण्याचें काम चालू आहे. त्या अहवालासाठीं इतर माहिती मिळविण्याची पण धडपड चालू आहे. त्या दृष्टीनें वाचन बरेंच करावें लागतें. व्याख्यानें चालूच आहेत. दिवस असा कामांत गेल्यामुळें संध्याकाळीं मी मिसेस् लारसन्‌कडे गेलों. बाईनें पूर्वी काढलेले माझे दोन फोटो मला दिले. वेगवेगळ्या मासिकांतून माझ्याबद्दल तिनें जें वाचलें आहे, तें कितपत सत्य आहे, हें ती मधून मधून मला प्रश्न विचारून पडताळून पाहात होती. मी भारतामध्यें येणार आहें व मुंबईपासून तें काश्मीरपर्यंतचा मुलूख मला पाहावयाचा आहे असें ती म्हणाली. तिच्याकडे भारताचा फार चांगला नकाशा आहे व एक ॲटलस पण आहे. बोलतांना मधून मधून या नकाशांचा ती उपयोग करीत होती. थोडा वेळ तिच्याशीं गप्पा मारल्यावर मी घरीं परत आलों.

७ ऑगस्ट ५४

सात ऑगस्ट म्हणजे टागोरजयंती. हा दिवस फार चांगल्या रीतीनें साजरा करावयाचा, असें आमच्या बंगाली मित्रांनीं सुचविलें होतें. त्याप्रमाणें कार्यक्रम

आंखण्यांत आला होता. कांहीं मंडळींना या कार्यक्रमासाठीं खास आमंत्रणें आम्हीं पाठविलीं होतीं. टागोरांच्या शांतिनिकेतनमधील श्री धार आमच्या-बरोबर असल्यामुळें खुद्द शांतिनिकेतनमध्यें हा दिवस किती गांभीर्यानें पाळला जातो व या प्रसंगीं कोणता कार्यक्रम आंखला जातो, याची त्यांना कल्पना होती. टागोरांच्या जीवनकार्याविषयीं श्री निखिलरंजन रॉय यांनीं पाहुण्यांना माहिती सांगितली. श्री धार यांनीं त्यांचीं कांहीं गीतें (बंगालीमधून) म्हणून दाखविलीं. कांहीं गीतांमध्यें ध्रुपदांच्या वेळीं आम्हीं पण साथ केली. हा कार्यक्रम खूपच चांगला झाला. सर्व पाहुण्यांना तो आवडला. गुरुदेवांनीं डॉ. मॅनिकी यांच्या विद्यालयाला भेट दिली होती. त्या वेळीं त्यांचें एक छायाचित्र घेण्यांत आलें होतें. या समारंभासाठीं आम्हीं तें मिळविलें होतें. छायाचित्राला हार घालण्यांत आला होता. श्री गौडा यांनीं आणलेल्या म्हैसूरी अगरबत्त्या त्या छायाचित्रासमोर लाविल्या होत्या. त्यांचा सुवास साऱ्या दिवाणखान्यांत दरवळत होता. या प्रसंगीं डॉ. मॅनिकी यांनीं पण गुरुदेवांना श्रद्धांजलि वाहिली. नंतर 'जनमनगण' हें गुरु-देवांचें गीत आम्हीं सर्वांनीं सांघिक रीतीनें म्हणून दाखविलें व कार्यक्रम समाप्त झाला. आलेल्या पाहुण्यांना कॉफी देण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. आमच्यापैकीं बऱ्याचजणांनीं आज भारतीय पोषाख केला होता.

आमची जी भारतीयांची तुकडी डेन्मार्कमध्यें आली आहे तिच्यासाठीं होणारा सर्व खर्च फोर्ड फाउंडेशननें भारताला या कामासाठीं दिलेल्या मदतींतून होणार होता. या फोर्ड फाउंडेशननें नेमिलेले एक शिक्षणाधिकारी डॉ. वॉर्ड आज येथें आले आहेत. नेहमीं ते दिल्लीला असतात. भारतामध्यें फोर्ड फाउंडेशनमार्फत ज्या ज्या शिक्षणयोजना आंखल्या जातात त्यांचें नियोजन व संचालन करणारे ते एक अधिकारी आहेत. आमच्या या तुकडीचें काम कसें काय चाललें आहे, हें नीट रीतीनें समजावून घेण्यासाठीं ते आज खास विमानानें आले आहेत. डॉ. मॅनिकी यांनीं त्यांची आम्हां सर्वांशीं ओळख करून दिली.

८ ऑगस्ट ५४

आज रविवार होता. ओल्सन दंपतीनें मीं हा रविवार आपल्याबरोबर घालवावा म्हणून मला आमंत्रण केलें होतें. माझ्याप्रमाणें श्री लोंढे व श्री राजनायकम्

यांना पण त्यांच्या स्टॅव्हनशॉल्ट येथील यजमानांनीं बोलाविलें होतें. म्हणून आज सकाळीं आम्ही तिघेजण आगगाडीनें स्टॅव्हनशॉल्टला जायला निघालों. एल्सिनोरपासून लिंबी नांवाच्या स्टेशनापर्यंत आम्ही गाडीनें गेलों व पुढें बसनें स्टॅव्हनशॉल्टला गेलों. बसस्टॅण्डवर एला माझी वाट पाहात उभी होती. तिच्याबरोबर मी त्यांच्या घरीं गेलों.

बोलतांना एला म्हणाली, "एरिक आतांच बाहेर गेला आहे. काल रात्रभर तो जवळजवळ जागाच होता. सकाळीं तो शेतावर कामाला गेला व आतां ट्रॅक्टरसाठीं कांहीं सामान विकत घेण्यास तो फॅरमला गेला आहे." मीं एलाला विचारलें, "रात्रभर एरिक कशासाठीं जागत होता?" त्यावर ती म्हणाली, "काल रात्रीं आमची डुकरीण व्याली; म्हणून एरिकला जागत बसावें लागलें." मी म्हणालों, "तुमच्या डेन्मार्कमध्यें तुम्ही लोक आपल्या डुकरांचें खूप कौतुक करतां. डुकरीण विणार होती म्हणून एरिकला जागायची काय जरूर?" एला म्हणाली, "डुकरीण ज्या वेळीं विते त्या वेळीं वेदनांनीं ती बेचैन होते. त्या थोड्याशा जागेंत ती खूप जोरानें हालचाल करते. अशा वेळीं नवीन उपजलेलें पिलूं तिच्या पायांखालीं सांपडून मरण्याच्या आंत तें बाजूला केलें पाहिजे." हें ती सांगत असतांना ती आंतमध्यें गेली व एका गरम कपड्यांत गुंडाळलेलें एक डुकराचें पिलूं तिनें आणून दाखविलें. त्या पिलाला तीनचार ठिकाणीं जखमा झाल्या होत्या. एलानें त्या मला दाखविल्या व ती म्हणाली, "मीं आतां तुम्हांला सांगितलें ना? त्याच प्रकारानें हें पिलूं जखमी झालें आहे. एरिक थोडा बाजूला झाला, तेवढ्यांत हें पिलूं जखमी झालें."

डेन्मार्कमधील लोक डुकरें पाळण्याचा धंदा अतिशय काळजीपूर्वक करतात. हा धंदा कसा किफायतशीर होतो, असें मीं एलाला विचारलें असतांना तिनें पुढील माहिती सांगितली. ती म्हणाली, "एकशेंपस्तीस ते एकशेंचाळीस रत्तलांच्या एका डुकराची किंमत जवळजवळ तीनशें क्रोनर असते. म्हणजे अंदाजें दोनशें ते सव्वादोनशें रुपये असते. एका डुकरिणीला सर्वसाधारणपणें एका वेळीं दहा पिलें होतात." (हा आंकडा कमींत कमीं पांच व जास्तींत जास्त सतरापर्यंत जातो.) काल रात्रीं व्यालेल्या डुकरिणीला फक्त पांचच पिलें झाल्यामुळें एला हळहळत होती. डुकरिणीला वर्षांतून दोनदां पिलें होतात. म्हणजे एका डुकरिणीला दर वर्षाला साधारणपणें २० पिलें होतात. थोडे दिवस

या पिल्लांना काळजीपूर्वक संभाळून वाढविलें व प्रत्येक पिलाचें वजन चाळीस रत्तल झालें कीं तें पिलू कसाईखान्याला विकून टाकतात. प्रत्येक पिलाची किंमत नव्वद ते शंभर क्रोनर येते, म्हणजे एका डुकरिणीच्या वीस पिलांची किंमत १८०० ते २००० क्रोनर म्हणजे अंदाजें १४०० ते १५०० रुपये इतकी होते. डेन्मार्कमधील शेतकऱ्यांच्या जीवनांत डुकरांना केवढें महत्त्वाचें स्थान आहे याची चांगली कल्पना एलानें दिलेल्या माहितीवरून आली.

संध्याकाळीं इंटरनॅशनल पीपल्स कॉलेजमध्यें निरनिराळ्या देशांतून आलेले अडीचशें विद्यार्थी घेऊन डॉ. मॅनिकी एंप्सनच्या बागेंत आले. आज ही मंडळी येथें जमणार हें मिस्टर व मिसेस् ओल्सनना माहीत होतें. ही सर्व मंडळी आपलें संध्याकाळचें जेवण बरोबर घेऊन येथें आली होती. एलानें आमच्याकरतां जेवण बरोबर घेतलें व आम्ही त्या मंडळींत जाऊन मिसळलों. ब्रिस्टल विश्वविद्यालयाचे नोल्सन नांवाचे एक प्राध्यापक आले होते. त्यांची पत्नी व मुलें पण त्यांच्याबरोबर होतीं. या गृहस्थांच्याबरोबर बोलण्यामध्यें बराचसा वेळ गेला. या अडीचशें मंडळींना भाग घेतां येतील असे कांहीं सांघिक खेळ या ठिकाणीं योजिले होते. डॅनिश लोक अशा तऱ्हेचे खेळ खूप खेळतात. स्वतःची करमणूक करून घेण्यामध्यें ही मंडळी खूप निष्णात आहेत. येथील लोकांना भरपूर हसायला व खेळायला आवडतें. कुणीं सांगितलेल्या गोष्टींत फारसा विनोद नसला तरी डॅनिश गृहस्थ ती ऐकतांना पोट धरून हसत राहील. अशा प्रकारें बरेचसे करमणुकीचे कार्यक्रम झाल्यावर आम्ही एल्सिनोरला परत जायला निघालों.

९ ऑगस्ट ५४

आज सकाळीं अहवालाबाबत आमची चर्चा चालू झाली. त्या वेळीं फोर्ड फाउंडेशनचे डॉ. वॉर्ड, प्राध्यापक फ्रेचर व डॉ. मॅनिकी ही मंडळी हजर होती. संध्याकाळीं या सर्व प्राध्यापकांच्या बरोबर आमचा एक ग्रूप फोटो घेण्यांत आला. डॉ. मॅनिकी व त्यांच्या विद्यालयांतील सर्व प्राध्यापक आले होते. ब्रिस्टल येथील इंस्टिट्यूट ऑफ एज्युकेशन या संस्थेचे डायरेक्टर प्रो. फ्लेचर, वेल्समधील स्वान्सीय विश्वविद्यालयाचे डॉ. ग्रिफिथ्स, ब्रिस्टल विद्यालयाचे प्रा. नोल्सन, डेन्मार्कच्या मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशनचे ॲडव्हायसर कोल्न जोगनसन, मॅगलीस

फोक हायस्कूलचे प्राचार्य नवरुप, एलिसनोरचे ग्रंथपाल मिस्टर ब्रेमरस्टंट व त्यांचे जांवई, मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशनमधील मोठे अधिकारी मि. ऑब्लिग, इत्यादि ज्या ज्या व्यक्तींनीं आम्हांला मार्गदर्शन केलें त्या सर्वांना आम्हीं आमंत्रण दिलें होतें. या सर्व मंडळींना आम्हीं जेवण्याचें पण आमंत्रण दिलें होतें. फोटो व जेवण हा कार्यक्रम उरकल्यावर एका डॅनिश गृहस्थानें सिलोनची एक तयार केलेली फिल्म पाहण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर कॉफीपान झाल्यावर सर्व मंडळी आपापल्या घरीं परतली.

१० ऑगस्ट ५४

आतां लवकरच १५ ऑगस्ट येणार. भारताचा स्वातंत्र्यदिन आम्ही येथें खूप उत्साहानें साजरा करावयाचें ठरविलें आहे. या दिवसाचा कार्यक्रम आंखण्याकरितां आम्ही एकत्र जमलों. ज्या ज्या शेतकऱ्यांच्या घरीं आम्ही राहिलों होतों त्या सर्व शेतकऱ्यांना या कार्यक्रमासाठीं निमंत्रण पाठविण्याचें आम्हीं ठरविलें होतें. सकाळचा झेंडावंदनाचा कार्यक्रम अगदीं पद्धतशीर पार पाडला पाहिजे, असें आम्हीं ठरविलें. पण झेंडा कोठून मिळवायचा ? या बाबतींत डॉ. मॅनिकींशीं आम्हीं चर्चा केली होती. भारताचा झेंडा मिळूं शकेल असें त्यांनीं सांगितलें. झेंडावंदनाच्या वेळीं म्हणावयाच्या गाण्यांची तालीम आम्हीं घेतली. झेंडावंदनाच्या वेळीं सर्वांनीं आपला राष्ट्रीय पोषाख घालावा व ज्यांच्याजवळ राष्ट्रीय पोषाख नाहीं त्यानीं निदान गांधीटोपी घालावी असें आम्हीं ठरविलें.

या कार्यक्रमाला बाहेरची मंडळी आम्ही बोलावणार असल्यामुळें डॉ. मॅनिकींच्या बरोबर आम्हीं या कार्यक्रमाबाबत चर्चा केली. आम्ही ज्या शेतकऱ्यांच्या जवळ राहिलों होतों, त्या सर्व शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना त्या दिवशीं संध्याकाळचें जेवण आपण देऊं असें त्यांनीं आम्हांला आश्वासन दिलें.

११ ऑगस्ट ५४

सकाळींच डॉ. वॉर्ड माझ्या खोलींत आले. डेन्मार्कमधील वास्तव्यांत आम्हांला आलेल्या अनुभवांबाबत डॉ. वॉर्डनें माझ्याशींच चर्चा केली. फोर्ड फाउंडेशनतर्फे

भारतामध्यें जें कार्य चाललें आहे, त्याची पण त्यांनीं माहिती दिली. या सर्व चर्चेंत डॉ. वॉर्ड आपले अनुभव मला अतिशय मनमोकळेपणानें सांगत होते.

दुपारीं प्राध्यापक नोल्सन यांची इंग्लंडमधील शिक्षणपद्धतीविषयीं दोन व्याख्यानें झालीं. संध्याकाळीं श्री गौडांना व मला डॉ. मॅनिकी यांनीं चहाला बोलाविलें होतें. डॉ. व मिसेस ग्रिफिथ्स पण आमंत्रित म्हणून हजर होते. डॉ. ग्रिफिथ्सनीं आंतरराष्ट्रीय राजकारणाचा चांगलाच अभ्यास केला आहे. इतःपर आंतरराष्ट्रीय राजकारणाचीं सूत्रें आशियांतून हलतील व या बाबतींत भारत व चीन हे दोन देश मोठा महत्त्वाचा भाग घेतील, असें ते म्हणाले. आंतरराष्ट्रीय राजकारणांत पंडित नेहरू पुढील कांहीं वर्षांत खूप महत्त्वाची कामगिरी करतील, असाहि विश्वास त्यांनीं प्रकट केला. डेन्मार्कच्या लोकशाळेसारख्या प्रौढशिक्षणांच्या संस्था भारतामध्यें कशा रीतीनें स्थापन करितां येतील व भारताच्या परिस्थितीला अनुरूप असे या लोकशिक्षणाच्या योजनेंत कोणते फेरबदल करावे लागतील, याबाबत डॉ. मॅनिकी व डॉ. ग्रिफिथ्स यांच्याशीं आमची खूप चर्चा झाली. परदेशामध्यें महत्त्वाच्या चर्चा करण्याचा मोका चहाच्या वेळीं व भोजनाच्या प्रसंगीं साधण्यांत येतो. पण कधीं कधीं रात्रींचें जेवण झाल्यावर कॉफीसाठीं माणसें ज्या वेळीं एकत्र जमतात त्या वेळीं सुद्धां अशा चर्चा करण्यासाठीं या संधीचा फायदा घेतला जातो. आमच्याशीं ही चर्चा करण्यासाठींच डॉ. मॅनिकी यांनीं आम्हांला चहाला बोलाविलें होतें.

१२ ऑगस्ट ५४

सकाळीं दोन व्याख्यानें झालीं. बाकीचा वेळ अहवालाची चर्चा करण्यांत व त्याचा कांहीं भाग लिहिण्यांत गेला. संध्याकाळीं मिस्टर ॲण्ड मिसेस् ओल्सन आपल्या मुलांना घेऊन मला भेटायला आलीं होतीं. येतांना माझ्यासाठीं त्यांनीं भेट आणली होती. ती भेट म्हणजे एक शिजवलेली कोंबडी. डेन्मार्कमधील शेतकरी ज्याप्रमाणें गाई व डुकरें पाळतात, त्याचप्रमाणें जातिवंत कोंबड्या पाळण्याकडेसुद्धां त्यांचें तितकेंच लक्ष असतें. उत्पन्नाची एक बाब म्हणून या धंद्याकडे ते विशेष लक्ष देतात. एरिकजवळ ८० मोठ्या कोंबड्या व जवळ जवळ १५० लहान कोंबड्या होत्या. (माझ्या १५-१६ दिवसांच्या त्यांच्या येथील मुक्कामांत त्यांपैकीं कांहींना

फोक हायस्कूलचे प्राचार्य नत्ररुप, एल्सिनोरचे ग्रंथपाल मिस्टर ब्रेमरस्टंट व त्यांचे जांवई, मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशनमधील मोठे अधिकारी मि. ऑठिंग्ग, इत्यादि ज्या ज्या व्यक्तींनीं आम्हांला मार्गदर्शन केलें त्या सर्वांना आम्हीं आमंत्रण दिलें होतें. या सर्व मंडळींना आम्हीं जेवण्याचें पण आमंत्रण दिलें होतें. फोटो व जेवण हा कार्यक्रम उरकल्यावर एका डॅनिश गृहस्थानें सिलोनची एक तयार केलेली फिल्म पाहण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर कॉफीपान झाल्यावर सर्व मंडळी आपापल्या घरीं परतली.

१० ऑगस्ट ५४

आतां लवकरच १५ ऑगस्ट येणार. भारताचा स्वातंत्र्यदिन आम्ही येथें खूप उत्साहानें साजरा करावयाचें ठरविलें आहे. या दिवसाचा कार्यक्रम आंखण्याकरितां आम्ही एकत्र जमलों. ज्या ज्या शेतकऱ्यांच्या घरीं आम्ही राहिलों होतों त्या सर्व शेतकऱ्यांना या कार्यक्रमासाठीं निमंत्रण पाठविण्याचें आम्हीं ठरविलें होतें. सकाळचा झेंडावंदनाचा कार्यक्रम अगदीं पद्धतशीर पार पाडला पाहिजे, असें आम्हीं ठरविलें. पण झेंडा कोठून मिळवायचा ? या बाबतींत डॉ. मॅनिकींशीं आम्हीं चर्चा केली होती. भारताचा झेंडा मिळूं शकेल असें त्यांनीं सांगितलें. झेंडावंदनाच्या वेळीं म्हणावयाच्या गाण्यांची तालीम आम्हीं घेतली. झेंडावंदनाच्या वेळीं सर्वांनीं आपला राष्ट्रीय पोषाख घालावा व ज्यांच्याजवळ राष्ट्रीय पोषाख नाहीं त्यानीं निदान गांधीटोपी घालावी असें आम्हीं ठरविलें.

या कार्यक्रमाला बाहेरची मंडळी आम्ही बोलावणार असल्यामुळें डॉ. मॅनिकींच्या बरोबर आम्हीं या कार्यक्रमाबाबत चर्चा केली. आम्ही ज्या शेतकऱ्यांच्या जवळ राहिलों होतों, त्या सर्व शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना त्या दिवशीं संध्याकाळचें जेवण आपण देऊं असें त्यांनीं आम्हांला आश्वासन दिलें.

११ ऑगस्ट ५४

सकाळींच डॉ. वॉर्ड माझ्या खोलींत आले. डेन्मार्कमधील वास्तव्यांत आम्हांला आलेल्या अनुभवांबाबत डॉ. वॉर्डनें माझ्याशींच चर्चा केली. फोर्ड फाउंडेशनतर्फे

भारतामध्यें जें कार्य चाललें आहे, त्याची पण त्यांनीं माहिती दिली. या सर्व चर्चेंत डॉ. वॉर्ड आपले अनुभव मला अतिशय मनमोकळेपणानें सांगत होते.

दुपारीं प्राध्यापक नोल्सन यांची इंग्लंडमधील शिक्षणपद्धतीविषयीं दोन व्याख्यानें झालीं. संध्याकाळीं श्री गौडांना व मला डॉ. मॅनिकी यांनीं चहाला बोलाविलें होतें. डॉ. व मिसेस ग्रिफिथ्स पण आमंत्रित म्हणून हजर होते. डॉ. ग्रिफिथ्सनीं आंतरराष्ट्रीय राजकारणाचा चांगलाच अभ्यास केला आहे. इतःपर आंतरराष्ट्रीय राजकारणाचीं सूत्रें आशियांतून हलतील व या बाबतींत भारत व चीन हे दोन देश मोठा महत्त्वाचा भाग घेतील, असें ते म्हणाले. आंतरराष्ट्रीय राजकारणांत पंडित नेहरू पुढील कांहीं वर्षांत खूप महत्त्वाची कामगिरी करतील, असाहि विश्वास त्यांनीं प्रकट केला. डेन्मार्कच्या लोकशाळेसारख्या प्रौढशिक्षणांच्या संस्था भारतामध्यें कशा रीतीनें स्थापन करितां येतील व भारताच्या परिस्थितीला अनुरूप असे या लोकशिक्षणाच्या योजनेंत कोणते फेरबदल करावे लागतील, याबाबत डॉ. मॅनिकी व डॉ. ग्रिफिथ्स यांच्याशीं आमची खूप चर्चा झाली. परदेशामध्यें महत्त्वाच्या चर्चा करण्याचा मोका चहाच्या वेळीं व भोजनाच्या प्रसंगीं साधण्यांत येतो. पण कधीं कधीं रात्रींचें जेवण झाल्यावर कॉफीसाठीं माणसें ज्या वेळीं एकत्र जमतात त्या वेळीं सुद्धां अशा चर्चा करण्यासाठीं या संधीचा फायदा घेतला जातो. आमच्याशीं ही चर्चा करण्यासाठींच डॉ. मॅनिकी यांनीं आम्हांला चहाला बोलाविलें होतें.

१२ ऑगस्ट ५४

सकाळीं दोन व्याख्यानें झालीं. बाकीचा वेळ अहवालाची चर्चा करण्यांत व त्याचा कांहीं भाग लिहिण्यांत गेला. संध्याकाळीं मिस्टर ॲण्ड मिसेस् ओल्सन आपल्या मुलांना घेऊन मला भेटायला आलीं होतीं. येतांना माझ्यासाठीं त्यांनीं भेट आणली होती. ती भेट म्हणजे एक शिजवलेली कोंबडी. डेन्मार्कमधील शेतकरी ज्याप्रमाणें गाई व डुकरें पाळतात, त्याचप्रमाणें जातिवंत कोंबड्या पाळण्याकडेसुद्धां त्यांचें तितकेंच लक्ष असतें. उत्पन्नाची एक बाब म्हणून या धंद्याकडे ते विशेष लक्ष देतात. एरिकजवळ ८० मोठ्या कोंबड्या व जवळ जवळ १५० लहान कोंबड्या होत्या. (माझ्या १५-१६ दिवसांच्या त्यांच्या येथील मुक्कामांत त्यांपैकीं कांहींना

सद्‌गति मिळाली.) त्यांच्या सर्व कोंबड्या व्हाइट लेगहॉर्न, ऱ्होड आयलंड वगैरे जातिवंत प्रकारच्या होत्या. या कोंबड्यांना खूप काळजीपूर्वक वाढविण्यांत आलें होतें. एरिकचे वडील ७२ वर्षांचे आहेत. एरिकच्या कोंबडयांची व्यवस्था पाहण्याचें काम त्याचे वडील जातीनें पाहात असतात.

एरिक व इतर सर्व शेतकरी आपल्या कोंबडयांचीं अंडीं सहकारी सोसायटी-मार्फतच विकतात. या सर्व सहकारी सोसायट्या शेतकऱ्यांकडून गोळा केलेलीं अंडीं परदेशांत विकायला पाठवितात. इंग्लंड हें डेन्मार्क मधल्या अंडयांचें मोठें गिऱ्हाईक. आम्हीं एका अशा सहकारी प्रकारच्या सोसायटीला भेट दिली होती, त्या वेळीं येथून इंग्लंडला अंडीं कशीं पाठवितात, तें आम्हीं जवळून पाहिलें होतें. डेन्मार्कमध्यें शेतकरी नर कोंबडे फारसे शिल्लक ठेवीत नाहींत. त्यांचा वापर खाण्यासाठीं केला जातो. त्यांची संख्या अधिक असली, तर ते विकून टाकण्यांत येतात. पैदाशीसाठीं खास जातिवंत नर ठेवण्याची येथें प्रथा आहे.


एरिक आज खूप थकलेला दिसला. उन्हाळ्यामध्यें शेतकऱ्यांना खूप काम करावें लागतें. पहाटे पांच वाजल्यापासून रात्रीं दहा वाजेपर्यंत एरिक शेतामध्यें काम करीत असतो. त्याच्या हातांत एक दोन नवीं पुस्तकें होतीं. येतां येतां एल्सिनोरमधील दुकानांतून त्यांनीं तीं पुस्तकें घेतलीं होतीं. तो म्हणाला, "हीं दोन्ही पुस्तकें शेतीबद्दलचीं आहेत." शेतीमध्यें काय सुधारणा करतां येईल हें जाणून घेण्याकरितां एरिकची सारखी धडपड चालू असते. त्याच्याकडे तीनचार शेतीविषयक मासिकें येतात. याखेरीज तो ज्या ज्या वेळीं कोपनहेगनसारख्या शहरांत जातो, त्या त्या वेळीं पुस्तकाच्या दुकानांत शिरून शेतीसंबधींचीं, दूध-दुभत्याबद्दलचीं अथवा कुक्कुटपालनविषयींचीं पुस्तकें घेऊन येतो. वेळांत वेळ काढून तो तीं वाचून काढतो. सरकारच्या प्रायोगिक कृषिकेंद्रावर ( Experimental Agricultural Farm) होणारे प्रयोग तो समजावून घेतो. हे प्रयोग समजावून घेण्यासाठीं तो त्या केंद्राला मधून मधून भेटी देतो. याखेरीज एरिकनें येथील एका नांवाजलेल्या लोकशाळेंत जाऊन हिंवाळ्याच्या शिबिरांतील शिक्षण घेतलें आहे. शेतीबद्दल आपली माहिती शास्त्रशुद्ध असावी, म्हणून तो एका शेतकी शाळेंत गेला होता. त्या ठिकाणीं पांच महिन्याचें एक शिबिर चालू होतें. या शिबिरांत जाऊन एरिकनें शेतीविषयक शिक्षण घेतलें.

एरिकप्रमाणें एला पण सवड साधून वाचीत असते. स्त्रीजीवनाबाबत मार्ग-

दर्शन करणारीं तीनचार मासिकें ती मागविते. शॉर्टहॅण्ड, जमाखर्च इत्यादि विषयांचें शिक्षण देणाऱ्या पांच पांच महिन्यांच्या दोन शिबिरांना ती हजर राहिली होती. भरतकामाचें शिक्षण देणाऱ्या वर्गाला सुद्धां ती जात असे. विणकाम पण ती चांगलें करते. आपल्या दोन्ही मुलांचें व नवऱ्याचे गंजीफ्रॉक तिनें स्वतः विणलेले आहेत. याखेरीज गृहव्यवस्थेचें (Housekeeping) शिक्षण घेण्यासाठीं पांच महिन्यांच्या एका शिबिराला ती नुकतीच जाऊन आली आहे. तात्पर्य काय कीं, आपण कमी शिकलेले असलों तरी आपलें ज्ञान अपुरें राहूं नये, म्हणून येथील शेतकऱ्यांची सारखी धडपड चालू असते. ज्या ज्या शेतकऱ्यांच्या घरीं आम्ही गेलों त्या त्या प्रत्येक शेतकऱ्याचें स्वतःच्या मालकीचें असें एक छोटें तरी ग्रंथालय आम्हांला आढळलें होतें.

१३ ऑगस्ट ५४

सकाळीं अहवालाबाबत चर्चा झाली. त्या चर्चेंत आम्हीं भाग घेतला व त्याच वेळीं आमच्या सर्व मित्रांचा निरोप घेतला. आज संध्याकाळीं श्री गौडा व मी



ग्रुंडरविग फोक हायस्कूल

फ्रेड्रीसबर्गला सेमिनारसाठीं जाणार. प्रवासाची सर्व तयारी करण्यांत दुपारचा वेळ गेला. दुपारीं खोलीमध्यें कामांत गुंतलों असतांना मला बोलाविण्यासाठीं एक दोन मित्र आले. अमेरिकेंत टोरांटो येथें सोशल सर्व्हिस कॉन्फरन्स भरली होती. या कॉन्फरन्ससाठीं भारतांतून जवळ जवळ ७० स्त्रीपुरुष गेले होते. परिषद संपल्या-वर त्यांनीं आजूबाजूच्या देशांना भेटी देण्याचा कार्यक्रम हातीं घेतला. त्यांपैकीं कांहींजण एल्सिनोरपर्यंत येऊन पोहोचले. डॉ. मॅनिकींचें विद्यालय पहाण्याकरितां ते येथें आले असतांना आमच्या आगमनाची वार्ता त्यांना समजली व आम्हांला भेटण्यासाठीं ते आमच्या निवासस्थानीं आले. या मंडळीमध्यें मध्यप्रदेशांतील सोशल सर्व्हीस खात्याचे मंत्री नामदार गुप्ता, त्याच खात्याचे मुख्य अधिकारी श्री शुक्ला, टाटानगरमधील श्री अण्णेगिरी, मुंबईच्या कुमारी वाडिया व कलकत्त्याचे श्री चॅटर्जी वगैरे मंडळी प्रमुख होती. या मंडळींशीं आमची चर्चा झाली. नंतर आम्हीं त्या सर्वांना चहा दिला. आमचा निरोप घेऊन ते कोपन-हेगनला परतले.

संध्याकाळीं टॅक्सीमधून श्री गौडा व मी फ्रेड्रीसबर्गला गेलों. युनेस्कोची सेमिनार तेथील सुप्रसिद्ध ग्रुंडरविग फोक हायस्कूलमध्यें भरणार होती. आमची सर्वांची राहण्याची व्यवस्था तेथेंच करण्यांत आली होती. इतकेंच नव्हे तर आम्हां सर्वांचा राहण्याचा जेवण्याचा खर्च युनेस्कोमार्फतच होणार होता. जवळ-जवळ ३५ देशांचे लोक या परिषदेला येणार असल्याचें समजलें व सर्व प्रति-निधींची संख्या ५०-६० पर्यंत होईल अशी माहिती मिळाली. आज रात्रीपर्यंत सर्व प्रतिनिधी येऊन पोहोंचतील असा चालकांचा अंदाज होता. त्यामुळें त्यांची व्यवस्था करण्यांत युनेस्कोचे अधिकारी गढून गेले होते. आमचें त्यांनीं हसत-मुखानें स्वागत केलें. परिषदेच्या कार्यक्रमाची कल्पना त्यांनीं आम्हांला दिली व आमच्या खोल्या आम्हांला दाखविल्या. आम्हीं दोघांनीं मिळून एकच खोली घेतली. चालकांनीं आलेल्या कांहीं लोकांशीं आमची ओळख करून दिली. आज एका नव्याच वातावरणांत मी येऊन राहिलों आहें. उद्यांपासून जगांतील वेग-वेगळ्या देशांतील लोकांशीं संबंध येणार आहे. त्यांच्या संगतींत तीन आठवडे काढावयाचे आहेत. हे लोक कसे असतील? परिषदेचें काम कसें चालेल? आपल्याला त्यांत कितपत भाग घेतां येईल? इत्यादि गोष्टींचा विचार करण्यांत ती रात्र गेली.

१४ ऑगस्ट ५४

आज कार्यक्रम असा कांहींच नाहीं. सेमिनारचें औपचारिक उद्घाटन उद्यां होणार आहे; परंतु उद्यां पंधरा ऑगस्ट, आपला स्वातंत्र्य दिन. उद्यां आम्ही मोठा कार्यक्रम एल्सिनोर येथें करण्याचें ठरविलें आहे. या कार्यक्रमाला हजर राहण्यासाठीं श्री गौडा व मी संध्याकाळीं येथून एल्सिनोरला जाणार आहोंत. आजचा सारा दिवस आलेल्या प्रतिनिधींशीं ओळखी करण्यांत व हिलेरॉड शहर पाहण्यांत गेला.


श्री गौडा व मी यांखेरीज आणखी दोन भारतीय येथें आले आहेत. त्यांपैकीं एक प्रो. आमलान् दत्ता हे कलकत्ता विश्वविद्यालयाचे एक प्राध्यापक आहेत. त्यांचा मजूर चळवळीशीं सुद्धां संबंध आहे. आंतरराष्ट्रीय मजूर संघटने-मार्फत कांहीं शिक्षण घेण्यासाठीं ते हॉलंडला आले होते. त्यांचा व युनेस्कोच्या लोकांचा त्यांच्या तेथील वास्तव्यांत संबंध आला. आमच्या सेमिनारचा चर्चेचा विषय ग्रामीण भागांतील प्रौढशिक्षण आहे. आलेल्या प्रतिनिधींचे तीन गट पाडण्याची योजना आंखण्यांत आली आहे. प्रत्येक गटाला एक गटप्रमुख व एक रिपोर्टर नेमण्यांत आला आहे. प्रो. दत्ता हे पहिल्या गटाचे गटप्रमुख आहेत. सर्व भारतीयांनीं एका गटांतच शिरूं नये, असें येथल्या चालकांनीं आम्हांस सुचविलें. प्रो. आमलान् दत्ता हे पहिल्या गटांत आहेत. श्री गौडा यांनीं आपलें नांव तिसऱ्या गटासाठीं दिलें आहे. एक इंग्लिश गृहस्थ या गटाचे गटप्रमुख आहेत. पहिल्या व तिसऱ्या गटांत हे दोन भारतीय गेल्यामुळें मला माझें नांव दुसऱ्या गटासाठीं द्यावें लागलें. आमच्या गटाचे गटप्रमुख एक फ्रेंच गृहस्थ आहेत. आम्हां तिघांखेरीज एक भारतीय महिला येथें आली आहे. तिचें नांव कुमारी टॉमस. या बाई त्रावणकोर-कोचीन विभागांतील सीरियन ख्रिश्चन आहेत. त्या अलिगड विश्वविद्यालयांत प्राध्यापकाचें काम करतात. 'वफूना' (Wafuna) नांवाच्या जागतिक महिला-संघटनेची जिनेव्हा येथें एक परिषद होती. त्या परिषदेला या आल्या होत्या. तेथून डेन्मार्कमध्यें या सेमिनारसाठीं त्या आल्या आहेत. भारतांतील चौघेजण जरी आम्ही हजर असलों तरी भारतसरकारचे अधिकृत प्रतिनिधी आम्ही दोघेच. श्री गौडा व मी.

संध्याकाळचें जेवण झाल्यावर प्रा. दत्तांना बरोबर घेऊन आम्ही एल्सिनोरला

गेलों. उद्यांच्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमासाठीं श्री दत्ता यांना आम्हीं आग्रहानें आमच्याबरोबर नेलें. आम्ही पोहोचलों त्या वेळीं आमच्या रॉकॉस्ट स्कूलमध्यें करमणुकीचा कार्यक्रम चालू होता. या कार्यक्रमाला आम्ही हजर राहिलों. या इमारतींतील ज्या टुमदार खोलींत मी राहत होतों, ती खोली आतां दुसऱ्याला देण्यांत आली असल्यामुळें थोडी गैरसोय झाली; परंतु एकाच रात्रीचा प्रश्न होता. आमची तिघांची सोय या इमारतींतील एका दिवाण-खान्यांत करण्यांत आली होती. आमच्यापैकीं दोघे, श्री नानाभाई भट व श्री मनुभाई पंचोली, भारताला परत जाण्यासाठीं उद्यां सकाळींच येथून निघणार आहेत. हे दोघे सौराष्ट्रांतून आले आहेत. सकाळीं लवकर उठण्याची व्यवस्था करून आम्ही झोपीं गेलों.

१५ ऑगस्ट ५४

आज पंधरा ऑगस्ट. भारताला स्वातंत्र्य मिळाल्याला आज सात वर्षें पूर्ण झालीं. भारतापासून सहासात हजार मैल दूर असलेल्या एका परदेशांत आज आम्ही स्वातंत्र्यदिन साजरा करणार. ठरल्याप्रमाणें आम्ही सकाळीं लवकर उठलों व प्रार्थनेसाठीं एकत्र जमलों. प्रार्थना झाल्यावर 'शुभास्ते पन्थानः सन्तु' म्हणून श्री नानाभाई व श्री मनुभाई यांना आम्हीं प्रेमाचा निरोप दिला. अद्यापि भारताचा झेंडा हातीं आला नव्हता; म्हणून आम्ही काळजींत होतों. एल्सिनोरमध्यें राहत असलेल्या दोन भारतीयांची आमची ओळख झाली होती. त्यांनीं झेंडा मिळवून देण्याचें कबूल केलें होतें. झेंडा वेळेवर न मिळाला तर काय करावें याचा आम्हीं विचार करीत असतांनाच एक टॅक्सी आली व त्या टॅक्सीमधून आम्हां सर्वांना प्रिय असलेला भारताचा झेंडा पण आला. न्याहारीनंतर आम्ही सर्वजण झेंडावंदनाला जमलों. डॉ. मॅनिकी यांच्या कॉलेजांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना व इतर परिचित मंडळींना, आम्हीं समारंभाचें आमंत्रण दिलें होतें. डॉ. मॅनिकी यांच्या कॉलेजांतील ध्वजस्तंभाजवळ हा कार्यक्रम झाला. आमच्यापैकीं ज्यांच्या-जवळ ह्या औपचारिक प्रसंगीं घालवयाचा सरकारमान्य भारतीय पोषाख होता, त्यांनीं तो परिधान केला होता. ज्यांच्याजवळ असला पोषाख नव्हता त्यांनीं सर्वांनीं गांधीटोप्या घातल्या होत्या. त्यामुळें एक प्रकारचें छोटेंसें भारतीय



झेंडावंदन

वातावरण येथें उत्पन्न झालें होतें. झेंडावंदनाचा कार्यक्रम श्री गौडा यांच्या हस्तें झाला. प्रथम डेन्मार्कचा झेंडा वर गेला, नंतर भारताचा, त्यानंतर यूनोचा. याप्रमाणें तीन झेंडे एका ध्वजस्तंभावर फडकूं लागले. झेंडावंदनाच्या प्रसंगीं म्हटलीं जाणारीं 'वंदे मातरम्', 'विजयी विश्व तिरंगा प्यारा' व 'जनमन' ही तिन्हीं गीतें आम्ही सर्वांनीं एकदम गायिलीं. झेंड्यांना मानवंदना दिल्यावर श्री गौडा यांनीं प्रसंगाला साजेसें थोडेंसें भाषण केलें. त्यानंतर डॉ. मॅनिकी यांनीं स्वातंत्र्योत्तर काळांत आंतरराष्ट्रीय राजकारणांत भारतानें केलेल्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. झेंडावंदनाच्या या जाहीर कार्यक्रमानंतर आम्ही सर्व

रॅकॉस्ट स्कूलमध्यें परतलों. या संस्थेच्या चालक मिस् यूल या बाईनें आजच्या प्रसंगाची आठवण म्हणून आम्हां सर्वांना एक एक डेन्मार्कचें निशाण बक्षीस दिलें. आपल्या येथें निशाण केव्हां लावावें याविषयीं सरकारी नियम फार कडक आहेत. डेन्मार्कमध्यें याच्या उलट प्रकार आहे. डॅनिश लोक आपलें निशाण वेळोवेळीं लावीत असतात. त्यांच्याकडे कोणी पाहुणा येणार असल्यास घरासमोरील ध्वजस्तंभावर ते आपलें निशाण लावितात. पाहुणा जेवायला बसला कीं त्याच्या टेबलासमोर ते एक लहानसें निशाण लावतात. घरांत जर कोणाचा वाढदिवस असेल तर त्या दिवशीं त्यांच्या टेबलावर जेवण्याच्या वेळीं निशाण लावतात. एकदां आम्ही एका शाळेंत गेलों होतों. त्या ठिकाणीं एकाच वर्गात त्या दिवशीं चारपांच निशाणें पाहावयाला मिळालीं. आज या मुलांचा वाढदिवस असल्यामुळें येथील पद्धतीप्रमाणें आम्ही यांच्यासमोर आमच्या देशाचें निशाण लावलें आहे, असा वर्गशिक्षकानें खुलासा केला.

या कार्यक्रमानंतर श्री गौडा व मी मिसेस लारसनकडे गेलों. त्या ठिकाणीं तिचा मुलगा व सून आली होती. मुलाचें नांव एरिक व सुनेचें नांव एडिथ. हें जोडपें मोठें आनंदी दिसलें. त्यांना मूलबाळ नाहीं, ही गोष्ट त्यांना कितपत दुःख देत असावी, हें अल्पपरिचयामुळें सांगणें कठिण आहे. परंतु मिसेस लारसनच्या बोलण्यावरून ही उणीव तिला विशेष जाणवत असावी असें दिसलें.

संध्याकाळीं स्वातंत्र्यदिनानिमित्त आम्हीं खास कार्यक्रम आंखला होता. ज्या शेतकऱ्यांच्या घरीं आम्हीं राहिलों होतों, ते सर्व शेतकरी आपआपल्या पत्नींना व कांहींजण आपल्या मुलांना सुद्धां घेऊन या कार्यक्रमासाठीं हजर राहिले होते. आपली ही परिचित मंडळी पुन्हा एकदां भेटल्यामुळें, आम्हां सर्वांना खूप आनंद झाला. एला व एरिक पण या कार्यक्रमासाठीं आलीं होतीं. या कार्यक्रमाचे वेळीं श्री गौडा यांनीं सर्वांचें स्वागत केलें. श्री निखिल रॉय यांनीं थोडक्यांत भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास सांगितला व मीं जमलेल्या सर्व पाहुण्यांचे आभार मानण्याचें भाषण केलें. त्यानंतर करमणुकींचा कार्यक्रम झाला. आमच्यापैकीं प्रत्येकानें कांही ना कांहीं कार्यक्रम केला. मी संस्कृतमध्यें एक विनोदी भाषण केलें. त्याचें भाषांतर श्री रॉय यांनीं इंग्रजींत केलें व खूप हशा पिकला. इंग्रजी समजणारीं माणसें विनोद समजल्यामुळें हसलीं, तर न समजणारे लोक शिष्टाचार म्हणून हसले. सुमारें साडेनऊच्या सुमाराला हा कार्यक्रम संपला.

त्यानंतर डॉ. मॅनिकी यांनीं सर्वांना कॉफी दिली. नंतर मिस्टर ॲण्ड मिसेस ओल्सन यांच्या मोटारमधून श्री गौडा व मी फ्रेड्रीसबर्गला सेमिनारच्या जागीं जाण्यासाठीं निघालों.

तेथें पोहोचल्यावर एला व एरिक आमच्या खोलींत आलीं. थोडा वेळ गप्पा मारल्यावर आमचा निरोप घेऊन तीं स्टॅव्हनशॉल्टला परतलीं. आजचा दिवस खूप गडबडींत पण तितकाच आनंदांत गेला. परदेशामध्यें सुद्धां भारतीय स्वातंत्र्यदिन इतक्या उत्साहानें व चांगल्या रीतीनें साजरा करतां आला याबद्दल आम्हांला समाधान वाटलें.

१६ ऑगस्ट ५४

सेमिनारचें औपचारिक उद्‌घाटन कालच झालें. पण आम्ही कालच्या स्वातंत्र्य-दिनाच्या उत्सवांत गुंतल्यामुळें कार्यक्रमाला हजर राहूं शकलों नाहीं. आज सकाळपासून सेमिनारच्या कार्यक्रमाला उत्साहानें सुरुवात झाली. ज्या ज्या देशांतील प्रतिनिधी सेमिनारसाठीं आले होते, त्या त्या सर्व देशांचे झेंडे व्यासपीठावर रांगेनें लावण्यांत आले होते. त्यामध्यें भारताचा तिरंगी झेंडा डौलानें फडकत असलेला पाहून आम्हांला खूप समाधान व आनंद वाटला.

व्यासपीठावर सेमिनारचे डायरेक्टर्स आहेत, डॉ. मिलथर्स आहेत. त्यांच्या शेजारीं तिन्ही गटांचे गटप्रमुख बसले आहेत. व्यासपीठाच्या टोकाला युनेस्कोच्या फ्रान्समधील कार्यालयाचे प्रतिनिधी मिस्टर डॉस बसले आहेत. या सेमिनारचे खरेखुरे सत्ताचालक हेच आहेत. या सर्व कार्यक्रमाची योजनाबद्ध अशी जी आंखणी करण्यांत आली आहे, त्यांत त्यांचा मोठा हात आहे. त्याचप्रमाणें आलेल्या प्रतिनिधींची व्यवस्था जास्तींत जास्त समाधानकारक व्हावी म्हणून त्यांची धडपड चालू आहे. या दिवाणखान्याच्या एका टोंकाला व्यासपीठ आहे, तर दुसऱ्या टोंकाला दुभाषी (interpreters) लोकांचें दालन आहे. या परिषदेचें कामकाज दोन भाषांतून चालणार आहे. एक फ्रेंच व दुसरी इंग्लिश. येथें आलेल्या कितीतरी लोकांना इंग्रजी मुळींच समजत नाहीं. आलेल्या प्रतिनिधींची काळजी-पूर्वक पाहणी केल्यावर मला असें आढळून आलें कीं, ज्या ज्या ठिकाणीं ब्रिटिशांनीं राज्य केलें, त्या त्या ठिकाणच्या लोकांना इंग्रजी येत होतें. जेथें

ब्रिटिशांचें वर्चस्व होऊं शकलें नाहीं, त्या ठिकाणच्या लोकांना इंग्रजी शिकण्याची मुळींच गरज वाटली नाहीं.

प्रत्येक प्रतिनिधीच्या समोर कानाला लावण्याचें एक यंत्र होतें. ज्या वेळीं एखादा प्रतिनिधी फ्रेंचमधून भाषण करी, त्या वेळीं दुभाषी लोक, त्याचें इंग्रजींत भाषांतर क्षणाचाहि विलंब न लावतां करीत. कानाला लावलेल्या यंत्रांतून आम्हांला फक्त इंग्रजीच भाषण ऐकूं येत होतें. मीं ज्या वेळीं इंग्रजींत भाषण केलें, त्या वेळीं त्या भाषणाचें फ्रेंच भाषेंत भाषांतर करण्यांत आलें व फ्रेंच जाणणाऱ्या माणसांना आपल्या कानीं लावलेल्या यंत्रांतून फक्त फ्रेंचच ऐकूं येत होतें. ही सर्व व्यवस्था येथें प्रथमच पाहायला मिळाल्यामुळें मला साश्चर्य कौतुक वाटलें.

प्रारंभीं सर्व प्रतिनिधींची एकत्र अशी एक बैठक झाली. त्यानंतर कॉफीपान झालें. साधारण दीडएक तास सभेचें काम झाल्यावर कॉफीपानासाठीं किंवा जेवणासाठीं सभा तहकूब ठेविण्यांत येई. या कॉफीपानाच्या कार्यक्रमानंतर प्रतिनिधी तीन गटांत विभागले गेले व प्रत्येक गटानें विषयाचा एक एक भाग घेऊन चर्चा करायला सुरुवात केली. आमच्या गटाचे प्रमुख 'नाझे' नांवाचे एक फ्रेंच गृहस्थ होते. त्यांनीं चर्चेला सुरुवात झाल्यावर मला दोन शब्द बोलण्यास सांगितलें. दुपारीं कांहीं कार्यक्रम नव्हता. रात्रीं पुन्हा खुलें अधिवेशन भरलें. रात्रींच्या अधिवेशनांत एक महत्त्वाचा प्रश्न चर्चेला आला. परमेश्वराच्या अस्तित्वावर प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमांतून विशेष भर दिला जावा, असें एका सभासदानें खूप अट्टाहासानें सांगितलें. त्याला कांहींजणांनीं विरोध केला. ही चर्चा खूपच रंगली. मध्यंतरीं दहाच्या सुमारास कॉफीपानाचा कार्यक्रम झाला. बाराच्या सुमारास आम्ही विश्रांतीसाठीं आपआपल्या खोल्यांकडे परतलों.

१७ ऑगस्ट ५४

सेमिनारच्या कामाला आतां व्यवस्थित सुरुवात झाली आहे. सकाळीं गटागटानें चर्चा करण्यासाठीं वेळ देण्यांत आला होता. दुपारचा वेळ व्याख्यानांकरितां ठेविण्यांत आला होता. मि. नवरुप यांची लोकशाळा पाहिल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. आज त्या नवरुपांचें या सेमिनारच्या पुढें व्याख्यान झालें. १९४९ सालीं अशीच एक सेमिनार डेन्मार्कमध्यें भरली होती. त्या वेळीं मि. नवरुप हे त्या

सेमिनारचे अध्यक्ष होते. प्रौढशिक्षणाच्या क्षेत्रांत त्यांना येथें खूप मानाचें स्थान मिळालेलें आहे. डेन्मार्कमधील प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमाबाबत बोलतांना ते म्हणाले, "आमच्या देशामध्यें आज जी प्रौढशिक्षणाची चळवळ एवढी वाढीला लागली आहे, त्याचें सारें श्रेय येथील जनतेला आहे. याबाबत सरकारनें फारसे प्रयत्न केलेले नाहींत. ज्याप्रमाणें डेन्मार्कमधील सहकारी चळवळीचें सारें यश येथील जनतेला दिलें जातें, त्याचप्रमाणें येथील प्रौढशिक्षणाची चळवळ यशस्वी व्हायला येथील जनतेचे परिश्रम कारणीभूत झालेले आहेत. या कार्यक्रमाला जर कुणाची मोलाची मदत झाली असेल तर ती येथल्या शिक्षकांची झाली. १८१४ सालीं ज्या वेळीं सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा सुरू करण्यांत आला, त्याच वेळीं त्या कायद्यामध्यें एक सूचनावजा तरतूद करण्यांत आली होती ती अशी : शाळेमध्यें काम करणाऱ्या शिक्षकांनीं संध्याकाळीं आपल्या फुरसुदीच्या वेळीं आपल्या जुन्या विद्यार्थ्यांना शाळेंत बोलवावें व त्यांना कांहीं तरी शिकवावें. प्रारंभींच्या काळांत या कामाबद्दल शिक्षकांना थोडासा सुद्धां मेहनताना देण्याची तरतूद नव्हती. पुढें त्यांना थोडे पैसे देण्याची व्यवस्था करण्यांत आली; परंतु हें काम करणाऱ्या शिक्षकानें मोबदल्याची मुळींच अपेक्षा केली नाहीं."

याबाबतची एक मनोरंजक आठवण मि. नवरुप यांनीं सांगितली. त्यांचे वडील पण शिक्षक होते. मि. नवरुप म्हणाले, "मला आठवतें कीं, मी लहान असतांना आमचे वडील प्रौढांचे वर्ग चालवीत असत. वर्गात येणाऱ्या प्रौढांना फी द्यावी लागत नसे, इतकेंच नव्हे, तर आपल्या पदरच्या पैशांतून माझी आई आठवड्यांतून तीनचार वेळां या लोकांना कॉफी देत असे. आमच्यापैकीं कोणाचा वाढदिवस आला कीं त्या वेळीं हे वर्गांतील प्रौढ आम्हांला एकादी खुर्ची किंवा आमच्या वडिलांना एकादा पाइप बक्षीस देत. या वर्गांतील एकूण वातावरण अगदीं मोकळें व कौटुंबिक स्वरूपाचें असे. वर्गाचें काम संपल्यावर माझे वडील सरकारकडे या कामाबद्दल एक अहवाल सादर करीत व तो अहवाल वाचल्यावर या सबंध कामाबद्दल सरकार त्यांना पांच ते सात रुपयांपर्यंतची मोठी रक्कम उदारपणें बक्षीस पाठवीत असे."

१९३० सालीं डेन्मार्कमध्यें रात्रीच्या शाळेचा एक खास कायदा करण्यांत आला. डेन्मार्कमधील प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमांत ज्याप्रमाणें तेथील लोकशाळांना


महत्त्वाचें स्थान आहे, त्याचप्रमाणें तेथील रात्रींच्या शाळांना पण तितकेंच महत्त्व देण्यांत येतें. १९३० सालीं ज्या वेळीं रात्रींच्या शाळांचा कायदा जारी करण्यांत आला, त्या वेळीं या शाळांमध्यें ३०,००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. आज ही संख्या तीन लाखांवर गेली आहे. या शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं शेंकडा ८३% विद्यार्थ्यांचें वय १८ पेक्षां जास्त आहे. या शाळांत काम करणाऱ्या शिक्षकांच्या पगाराच्या दोनतृतीयांश इतकी रक्कम सरकारकडून मिळते. अट एक कीं बाकीची एकतृतीयांश रक्कम जनतेनें दिली पाहिजे, स्थानिक नगरपालिकांवरहि पण या कार्यक्रमाला मदत करण्याची जबाबदारी टाकण्यांत आली आहे. त्यांनीं या वर्गांसाठीं जागा दिली पाहिजे, दिवाबत्तीची सोय केली पाहिजे व हिंवाळ्यांत खोली गरम ठेवण्याची तरतूद केली पाहिजे. कोणत्याहि शिक्षकाला दहा विद्यार्थी मिळाले व या विद्यार्थ्यांचे त्यांचे २० पाठ घेतले कीं त्याला सरकारी मदत मिळूं शकते. आजसुद्धां डेन्मार्कमधील खेड्यांतून पसरलेला प्राथमिक शिक्षक या प्रौढशिक्षणाच्या क्षेत्रांत अत्यंत गौरवास्पद कामगिरी करीत आहे.

दुपारीं जेवणानंतर फ्रेड्रीसबर्ग येथील सुप्रसिद्ध किल्ला पाहण्याकरितां आम्ही कांहींजण गेलों. या किल्ल्यामध्यें खूप प्रेक्षणीय वस्तू ठेविलेल्या आहेत. त्या पाहाण्यांत आमचा बराचसा वेळ गेला. रात्रीं पुन्हा गटांच्या सभा झाल्या व सुमारें बाराच्या सुमारास आम्ही झोपायला गेलों.

१८ ऑगस्ट ५४

आज सेमिनारचें काम बंद ठेवण्यांत आलें होतें. परदेशांतून आलेल्या सर्व मंडळींना येथील सुप्रसिद्ध स्थळें व संस्था पाहतां याव्यात म्हणून आठवड्यांतून एक दिवस सर्व काम स्थगित ठेविण्यांत येईल व त्या दिवशीं सर्व प्रतिनिधींना सहलीला नेण्यांत येईल, असें प्रारंभींच जाहीर करण्यांत आलें होतें. त्यामुळें आम्ही सर्व मंडळी सहलीला निघालों. आतां प्रतिनिधींची संख्या ६५ वर आली आहे. या प्रतिनिधींमध्यें अमेरिकन, युरोपियन, एशियन व आफ्रिकनहि आहेत. गोरे आहेत, काळे आहेत व पीतवर्णीय पण आहेत.

आम्ही मोटरनें कोपनहेगनला आलों. प्रारंभीं आम्ही येथील आकाशवाणीचें



मत्स्यकन्या

केंद्र पाहिलें. तेथून आम्ही शेतकी कॉलेजांत गेलों. त्याच ठिकाणीं जेवण घेऊन आम्हीं कोपनहेगन शहर पाहण्यास निघालों. आज एका मत्स्यकन्येचा (Mermaid) पुतळा आम्हीं पाहिला. शहरांतील महत्त्वाचीं स्थळें पाहिल्यावर आम्ही येथील सेक्रेटरीएटमध्यें गेलों. त्याठिकाणीं सर्व प्रतिनिधींना शिक्षण खात्यातर्फे मेजवानी देण्यांत आली. शिक्षण खात्याचे मंत्री रजेवर असल्यामुळें सध्यां त्या खात्याचें मंत्रीपद एका स्त्रीकडे होतें. या बाईनें आमचें सर्वांचें औपचारिक स्वागत केलें. हा कार्यक्रम संपल्यावर आम्ही डेन्मार्कमधील सर्व लोकांच्या आवडत्या ठिकाणीं म्हणजे तिव्होलीमध्यें गेलों. येथें आम्हांला हिलेरॉडमधील माध्यमिक शाळेंतील एक शिक्षक भेटले. श्री गौडांचा व त्यांचा पत्रद्वारें परिचय झाला होता. आमच्याशीं ओळख झाल्यावर तिव्होलीमध्यें हे शिक्षक आमची सरबराई करण्याचा सारखा प्रयत्न करीत होते. त्यांची आतिथ्यशीलता पाहून आम्हांला संकोचल्यासारखें झालें. तिव्होलीहून आम्ही १२॥ ला परत आलों. आल्याबरोबर कॉफी तयार असल्याची वर्दी मिळाली. डेन्मार्कमधील लोक कॉफीचे फार मोठे भोक्ते. त्यांना अधून मधून सारखी कॉफी लागतेच व प्रत्येक वेळीं कॉफीचे तीनचार पेले ते फस्त करितात. कॉफीपान झाल्यावर रात्रीं एकच्यानंतर सर्व मंडळी झोपायला गेली.

१९ ऑगस्ट ५४

येथें आलेल्या प्रतिनिधींचे मुख्यतः दोन गट पडतात. इंग्लंड-अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांतून आलेल्या प्रतिनिधींचा एक गट व आशिया, आफ्रिका यांमधील मागासलेल्या देशांतून आलेल्या प्रतिनिधींचा दुसरा गट. या पुढारलेल्या देशांमध्यें साक्षरतेचें प्रमाण खूपच वाढलेलें आहे. येथील बहुतेक सर्व लोकांना गेलीं कित्येक वर्षें सात सात वर्षांचें प्राथमिक शिक्षण मिळालेलें आहे. त्यामुळें या देशांतील प्रौढशिक्षणाचा अर्थ व त्याचें कार्यक्षेत्र खूपच वेगळें आहे. या देशांत प्रौढशिक्षणाचा अर्थ प्रौढांचें पुढील शिक्षण (Further Education) असाच केला जातो. ज्याला जें कांहीं पूर्वीच्या शिक्षणक्रमांत मिळालें नाहीं, तें त्याला प्रौढशिक्षणाच्या वर्गांतून मिळूं शकतें. त्यामुळें प्रौढशिक्षणाच्या कांहीं वर्गांतून समाजशास्त्र, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, राजकारण, तत्त्वज्ञान इत्यादि गंभीर विषय प्रौढांना शिकविण्याची तरतूद असते. त्याचप्रमाणें चित्रकला, गायन, वादन, नर्तन इत्यादि कलासुद्धां या वर्गांतून शिकविल्या जातात. बायकांच्या प्रौढशिक्षणांच्या वर्गांतून त्यांना सुमाता व सुगृहिणी बनविण्याचें शिक्षण दिलें जातें. त्याचप्रमाणें वेगवेगळ्या कला व हस्तव्यवसायसुद्धां त्यांना वर्गांतून शिकविले जातात. त्यामुळें येथील प्रौढशिक्षणाचे वर्ग खूप चांगले चाललेले असतात; कारण ज्याला जो विषय शिकण्याची आवड आहे, त्याला तो विषय शिकविण्याची सोय झालेली असल्यामुळें तो आपल्या शिक्षणामध्यें रममाण होतो. या सर्व पुढारलेल्या देशांतून आज जो प्रौढशिक्षणाचा कार्यक्रम इतका व्यवस्थितपणें हाताळला जात आहे, त्याचें मुख्य कारण एकच आहे. या बहुतेक सर्व देशांतून प्रौढांना मत देण्याचा हक्क देण्यांत आला आहे. हा हक्क त्याला योग्य रीतीनें बजावितां यावा, म्हणून त्याला चांगलें शिक्षण देणें अत्यंत जरुरीचें आहे, असें येथील लोक मानतात. या मतदारांची शैक्षणिक पातळी जसजशी वाढत जाईल, तसतसा देशाचा कारभार सुधारत जाईल, अशी या लोकांची श्रद्धा असल्यामुळें प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमाकडे या लोकांनीं इतकें चांगलें लक्ष दिलेलें आहे.

आशिया व आफ्रिकाखंडांतील मागासलेल्या देशांमध्यें प्रौढशिक्षणाचा अर्थ अगदीं निराळा आहे. या देशांमध्यें साक्षरतेचें प्रमाण अत्यंत कमी आहे.

त्यामुळें या ठिकाणीं प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमाला साक्षरताप्रसारापासून प्रारंभ होतो. जोंपर्यंत मनुष्य साक्षर झाला नाहीं, तोंपर्यंत त्याला आपलें स्वतःचें शिक्षण स्वतःच्या प्रयत्नानें वाढवितां येणें शक्य नाहीं. त्यामुळें प्रौढांची साक्षरता वाढविण्यावरच या देशांतील लोकांचे प्रयत्न केंद्रित झालेले दिसतात.

ज्याप्रमाणें या देशांमध्यें निरक्षरतेचें प्रमाण फार मोठें आहे, त्याचप्रमाणें या देशांमध्यें अज्ञानाच्या जोडीला दारिद्य आणि रोगराई यांचें फार मोठें प्रमाण आहे. लोकांची रोगराई दूर झाल्यावांचून त्यांच्या हातून उत्पादन चांगलें होऊं शकणार नाहीं, व जोंपर्यंत देशांतील उत्पादन वाढीला लागलें नाहीं, तोंपर्यंत देशांतील दारिद्य दूर होणार नाहीं. जोंपर्यंत लोकांमध्यें अज्ञानाचें प्रमाण फार प्रचंड आहे तोंपर्यंत देशांतील आरोग्य सुधारणार नाहीं व देशाचें उत्पादन पण वाढणार नाहीं. त्यामुळें या सर्व मागासलेल्या देशांमध्यें प्रौढशिक्षणाची दिशा व व्याप्ति वर निर्दिष्ट केलेल्या पुढारलेल्या देशांपेक्षां खूप निराळी असायला पाहिजे. आमच्या देशांतील प्रौढशिक्षणाच्या चळवळीला देशांतील निरक्षरता नाहींशी करण्याचा प्रश्न प्रथम हातीं घ्यावा लागेल. परंतु हा साक्षरताप्रसाराचा कार्यक्रम हाताळतांना आपणांला दोनतीन गोष्टीं लक्षांत ठेवाव्या लागतील. साक्षरताप्रसार हें साधन म्हणून आपणांला वापरावयाचें आहे. तें साध्य होऊं शकणार नाहीं.

आपल्या जीवनामध्यें साक्षरतेला काय स्थान आहे, त्याची सर्वसाधारण प्रौढाला मुळींच कल्पना नाहीं. त्यामुळें साक्षर व्हायला तो मुळींच उत्सुक नसतो. साक्षर होण्याची ज्याला इच्छा नाहीं, त्याला शिकविणें चांगल्या शिक्षकालासुद्धां कठीण काम वाटतें व त्यामुळें केवळ साक्षरताप्रसाराची चळवळ ही मूळ धरूं शकत नाहीं. प्रौढ शिकण्याला नाखूष नसतो. कांहींतरी नवें शिकण्याची त्याची नेहमीं धडपड चालू असते; परंतु त्याला जें शिक्षण देणें असतें तें त्याच्या जीवनाशीं निगडित झालेलें असावें, अशी त्याची अपेक्षा असते. त्याच्या दैनंदिन गरजा पुऱ्या पाडण्याला व त्याचें उत्पादन वाढवून त्याचें जीवनमान सुधारण्याला जर त्या शिक्षणाची मदत झाली तर असें शिक्षण घ्यायला सर्वसाधारण प्रौढ केव्हांहि तयार होतील. मागासलेल्या देशांतील प्रौढशिक्षणाचा कार्यक्रम कसा असावा याची कल्पना वरील विवेचनावरून येईल. पुढारलेल्या व मागासलेल्या देशांतील प्रौढशिक्षणाचीं उद्दिष्टें कशीं निराळीं आहेत व त्यामुळें त्या देशांतील प्रौढ-

शिक्षणाचे कार्यक्रम कसे भिन्न पद्धतीनें आंखले गेले पाहिजेत याची गेल्या तीन-चार दिवसांत झालेल्या चर्चेवरून आम्हांला नीट कल्पना आली.

आज आमच्या गटनायकानें भारतांतील प्रौढशिक्षणाची पद्धति व त्याचा कार्यक्रम याबाबत प्रतिनिधींना सविस्तर माहिती सांगण्याची मला विनंति केली. या बाबतींत कालच त्यांनीं मला सूचना देऊन ठेविल्यामुळें मीं खूपच तयारी केली होती. गटनायकाच्या विनंतीप्रमाणें मीं आज सविस्तर भाषण केलें. इंग्रजी न जाणणाऱ्या प्रतिनिधींच्यासाठीं मी बोलत असतांनाच माझ्या भाषणाचें फ्रेंचमध्यें भाषांतर केलें जात होतें. भाषण संपल्यावर आमचे फ्रेंच गटप्रमुख मि. नाझे यांनीं खूप चांगली माहिती सांगितल्याबद्दल मला धन्यवाद दिले. कांहीं प्रतिनिधींनीं मला प्रश्न विचारले. त्यांचीं मीं उत्तरें दिल्यावर सभा बरखास्त झाली. त्यानंतर कांहीं प्रतिनिधींनीं माझी भेट घेऊन माझें हार्दिक अभिनंदन केलें.

२० ऑगस्ट ५४

सकाळीं साडेतीन चार तास गटसभा झाल्या. येथील कार्यक्रम असा आंखण्यांत आला आहे कीं, प्रतिनिधींना दुपारची वेळ आपलीं कामें करण्यासाठीं व कांहीं स्थळें पाहण्यासाठीं मोकळी ठेवण्यांत आली आहे. सकाळीं आठ ते साडेआठ न्याहारी झाल्यावर साडेआठ ते दहा सभा चालते. दहा ते साडेदहा कॉफीपान झाल्यावर साडेदहा ते साडेबारा पुन्हा सभेचें काम चालतें. त्यानंतर दुपारचें जेवण व विश्रांति. संध्याकाळीं जेवण झाल्यावर साडेसात ते नऊ पुन्हा सभेचें काम चालतें. नऊ ते साडेनऊ कॉफीपानचा कार्यक्रम उरकल्यावर साडेनऊ ते अकरा हा वेळ सभेसाठीं राखून ठेविण्यांत येतो. आजच्या खुल्या अधिवेशनांत प्रा. आमलान् दत्ता यांचें अत्यंत चांगलें व्याख्यान झालें.

२१ ऑगस्ट ५४

आज गटसभा झाली व त्यानंतर खुलें अधिवेशन झालें. त्यानंतर कांहीं कार्यक्रम नसल्यामुळें मी स्टॅव्हनशॉल्टला गेलों. तेथें चहा घेतल्यावर मी ओल्सन

यांच्या शेतावर गेलों. त्या वेळीं यंत्राच्या साहाय्यानें धान्य कापण्याचें काम चालू होतें. कमींत कमी मजुरांच्या मदतीनें यंत्रांच्या जोरावर येथील शेतकरी कसें काम करतात, तें आज मीं जवळून पाहिलें. एरिक ट्रॅक्टर चालवीत होता व त्याच्या मदतीला फक्त एकच नोकर होता. डेन्मार्कमध्यें बेकारी मुळींच नाहीं. हिंवाळ्यामध्यें मात्र बेकारीचें प्रमाण आठ टक्क्यांपर्यंत जातें. उन्हाळ्यांत हें प्रमाण फक्त एक टक्का असतें; परंतु या बेकारीच्या काळांत बेकारांना भत्ता देण्याची तरतूद करण्यांत आलेली आहे. त्यामुळें बेकारीचे परिणाम जाणवत नाहींत.

डेन्मार्कमध्यें आल्यापासून डॅनिश जीवनाचें यथार्थ चित्रण करणारा एकादा तरी डॅनिश बोलपट पाहावा अशी माझी मनापासून तीव्र इच्छा होती. आज मी स्टॅव्हनशॉल्टला राहणार असल्याकारणानें आज रात्रीं माझ्यासाठीं सिनेमाचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. स्टॅव्हनशॉल्टमध्यें सिनेमागृह नाहीं. फॅरमला एक थिएटर आहे. या थिएटरांत केव्हां तरी चांगले बोलपट लागतात. "आजचा बोलपट चांगला नाहीं. तथापि तुम्हांला डॅनिश बोलपट पाहावयाचा आहे; तेव्हां आपण आज जाऊं या." असें एरिक म्हणाला. आम्ही सिनेमाला गेलों. बोलपट पाहून माझी खूप निराशा झाली.

२२ ऑगस्ट ५४

पाऊस खूपच होता. एल्सिनोरहून श्री लोंढे येथें यावयाचे होते. ते मला भेटावयास आले. त्यांच्याबरोबर थोडा वेळ गप्पा मारल्या व नंतर आम्ही दोघेजण मिस्टर ओल्सन यांच्या शेतावर गेलों. त्या ठिकाणीं कापणीचा कार्यक्रम आम्हीं थोडा वेळ पाहिला. श्री लोंढे हे अमरावती येथील एका जनता कॉलेजचे आचार्य आहेत. त्यांना शेतीची बरीच माहिती आहे. त्यामुळें एरिकला प्रश्न विचारून त्यांनीं माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला.

आज संध्याकाळीं मिस्टर व मिसेस रासमुसन यांनीं आम्हांला निरोप देण्याकरितां एक चहाचा कार्यक्रम आंखला होता. येथील आमच्या सर्व परिचित मंडळींना त्यांनीं आमंत्रण दिलें होतें. स्टॅव्हनशॉल्टमध्यें प्रथम आम्ही जेव्हां आलों. त्या वेळीं आमचा सर्वांशीं परिचय करून देण्याकरितां रासमुसन दंपतीनें असाच एक कार्यक्रम आंखला होता. आज सर्वांचा आम्हांला

निरोप घेतां यावा म्हणून त्यांनीं हा कार्यक्रम नियोजित केला आहे. या प्रसंगीं डॅनिश लोकांनीं आमच्या तीन महिन्यांच्या वास्तव्यांत आम्हांला दिलेल्या मदतीबद्दल व त्यांच्या आतिथ्यशीलतेबद्दल आम्हीं त्यांचे मनापासून आभार मानले. आम्हीं येथें येतांना भारतांतील लोकांच्या सदिच्छा आपल्यासाटीं आणल्या होत्या. आज आम्ही आपल्या सदिच्छा बरोबर घेऊन जात आहोंत व लवकरच स्वदेशीं परतल्यावर आपण व्यक्त केलेल्या सर्व भावना आमच्या लोकांना निवेदन करूं असें त्यांना आम्हीं आश्वासन दिलें व त्या गांवाला आम्हीं अखेरचा रामराम टोकला.

२३ ऑगस्ट ५४

ज्या पैशांची आम्हीं वाट पाहात होतों, ते पैसे अखेर आज हातीं आले. त्यामुळें केलेलें कर्ज फेडतां आलें व घरीं जाईपर्यंत आतां काळजी राहिली नाहीं! आज डॉ. मॅनिकींच्याबरोबर आमचे सर्व भारतीय मित्र येथें आले होते. सेमिनारच्या डायरेक्टरनें त्यांचें स्वागत केलें. भारतीय मंडळींना या परिषदेला उपस्थित राहण्याचें आमंत्रण दिल्याबद्दल आमच्या संघाच्या वतीनें मीं चालकांचे आभार मानले. या सर्व मित्रांना भोजनाचेंहि आमंत्रण होतें. भोजनोत्तर खुल्या अधिवेशनाचा पहिला भाग संपल्यावर आमचे हे सर्व लोक एल्सिनोरला परतले. आपली मंडळी पुन्हा भेटल्याबद्दल आनंद वाटला.

२४ ऑगस्ट ५४

सकाळीं गटांच्या सभा झाल्या. दुपारचा वेळ मीं लोकशिक्षण मासिकाकरितां लेख लिहिण्यांत घालविला. ज्या ग्रुंडरविग फोक हायस्कूलमध्यें आम्ही उतरलों आहोंत, त्या विद्यालयाच्या प्राचार्यांनीं आपल्या लोकशाळेबद्दल आम्हांला माहिती सांगितली. त्यांच्या व्याख्यानांत त्यांनीं पुढील मुद्द्यांवर विशेष भर दिला.

डेन्मार्कमध्यें प्रत्येक खेड्यामध्यें एक सभागृह असतें. या सभागृहामध्यें मधूनमधून जाऊन या लोकशाळेचे प्राध्यापक व प्राचार्य वेगवेगळ्या विषयांवर

व्याख्यानें देतात. अशा रीतीनें ग्रामीण विभागांतील उत्साही लोकांशीं ते आपला संबंध ठेवतात; व त्यांना मार्गदर्शन करतात.

या शाळांमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्याचीं अभिवचनें दिलेलीं नसतात. हें शिक्षण देतांना एक मुख्य गोष्ट लक्षांत घेतली जाते; ती म्हणजे हें शिक्षण घेऊन विद्यार्थ्यानें परत आपल्या घरीं जावें व आपला पूर्वीचा व्यवसाय चांगल्या रीतीनें करावा.

या सेमिनारची सर्व व्यवस्था पाहणारे श्री डॉस हे मोठे कर्तबगार गृहस्थ आहेत. त्यांचा स्वभाव या मनमोकळा आहे. त्यांचा व आमचा आतां चांगला परिचय झाला आहे. आज जेवणाच्या वेळीं त्यांची मुलगी आमच्याबरोबर जेवायला होती. त्यांनीं माझ्याशीं तिचा परिचय करून दिला. ही मुलगी इंग्लंडमधील एका शेतकी कॉलेजांत शिक्षण घेते. सध्यां तिच्या कॉलेजला सुट्टी आहे. सुट्टीमध्यें आळसांत वेळ घालविण्यापेक्षां ती शेतीचें अधिक शिक्षण घेण्याच्या हेतूनें डेन्मार्कमधील एका शेतकऱ्याच्या घरीं येऊन राहिली आहे. हे सुगीचे दिवस आहेत. या वेळीं शेतकऱ्यांना मदतीची गरज असते. डेन्मार्कमध्यें मजूरांचा तुटवडा असतो. कुमारी डॉस ज्या शेतकऱ्याकडे कामाला राहिली आहे, तो शेतकरी तिच्या वडिलांना प्रवासांत भेटला होता. आपल्या मुलीची शेतकऱ्याच्या



शेतांत काम करणारी डॅनिश तरुणी

घरीं जाऊन काम करण्याची इच्छा श्री डॉस यांनीं ह्या शेतकऱ्याच्या कानीं घातली व त्यांनीं तिला आपल्या घरीं येण्याचें आमंत्रण दिलें. तिचें नांव हिलेरी आहे. हिलेरी मला म्हणाली, "मला हें काम खूप आवडतें. सध्यां सुगीचे दिवस असल्यामुळें मी ज्याच्या घरीं आलें आहें, तो शेतकरी व त्याची पत्नी पहाटेपासून रात्रीपर्यंत काम करीत असतात. मी सुद्धां त्यांच्या बरोबर शेतांत काम करतें व आमच्या यजमानीणबाईंना घरकामांत पण मदत करतें." यावर मी म्हणालों, "सुट्टीमध्यें विश्रांति घ्यायची, कीं नसतें काम अंगावर ओढवून घ्यायचें?" माझ्या या प्रश्नावर त्या मुलीनें मोठें मार्मिक उत्तर दिलें. ती म्हणाली, "कामामध्यें बदल करणें म्हणजे विश्रांति घेणें नाहीं का? हें काम मीं पत्करलें, म्हणून मला डेन्मार्क पाहायला मिळाला. हें काम करण्याबद्दल मला मेहेनताना पण मिळणार आहे. त्याची मोठी गरज आहे असें नव्हे; परंतु आपल्या स्वतःच्या साध्या गरजा पुऱ्या पाडण्यासाठीं नेहमींच पप्पांजवळ किंवा ममीजवळ हात पसरणें मला आवडत नाहीं; आणि सगळयांत मोठा फायदा म्हणजे या रजेच्या मुदतींत मला दोनतीन तरी चांगल्या मैत्रिणी मिळतील. गेल्या सुट्टीच्या वेळीं मी इंग्लंडमधील एका खेड्यांतील एका शेतकऱ्याच्या घरीं अशीच कामाला गेलें होतें. दीड महिना मीं तेथें काम केलें. थोडा अनुभव मिळाला, थोडे पैसे मिळाले; व चांगल्या ओळखी झाल्या." मला वाटतें आमच्या येथील विद्यार्थिनींनीं ह्या उदाहरणावरून कांहींतरी शिकण्याचा प्रयत्न करावा.

२५ ऑगस्ट ५४

आजचा सहलीचा दिवस. परिषदेचें नेहमींचें काम आज बंद होतें. सकाळीं सर्व प्रतिनिधी रॉस्किल्डा नांवाच्या गांवीं जाण्यासाठीं निघाले. प्रथम आम्हीं सर्वांनीं लिंबी येथें जाऊन तेथील म्युझियम पाहिला. नंतर रॉस्किल्डाचें चर्च आम्हीं पाहिलें. त्यानंतर कामगारांसाठीं चालविण्यांत आलेली येथील लोकशाळा 'फोक हायस्कूल' आम्हीं पाहिली.

आज जी लोकशाळा आम्ही पाहायला आलों आहोंत, ती एका कामगार संघटनेनें चालविलेली शाळा आहे. 'Workers Educational Asociation' (WEA) या नांवाची कामगारांची संघटना परदेशांमध्यें कामगारांत शिक्षणाचा

प्रसार करण्याचें मोठें कार्य करीत असते. मीं ज्या तीनचार परदेशांना भेटी दिल्या, त्या प्रत्येक ठिकाणीं मला WEAनें चालविलेल्या शिक्षणविषयक चळवळी पाहायला मिळाल्या. आमच्याकडील कामगारसंघटनांचें व कामगारांच्या पुढाऱ्यांचें, कामगारांच्या शिक्षणाकडे लक्ष लागलेलें दिसत नाहीं. कामगारांची शैक्षणिक पातळी वर यावी, म्हणून उपरिनिर्दिष्ट संस्था परदेशांत खूप महत्त्वाचें कार्य करीत असतात, असें माझ्या निदर्शनास आलें.

जी लोकशाळा आम्हीं पाहिली, त्या लोकशाळेंत वेगवेगळे अभ्यासक्रम शिकविण्याची तरतूद आहे. नवराबायको आपल्या छोट्या मुलांना घेऊन या शाळांमध्यें येतात. शाळेला जोडूनच मुलांच्यासाठीं बालमंदिर आहे. आलेले आईबाप मुलांना बालमंदिराच्या कार्यकर्त्यांच्या हवालीं करतात व स्वतः वर्गांत जाऊन तेथें शिक्षण घेतात. त्या ठिकाणीं त्यांना राजकारण, अर्थशास्त्र, असे विषय शिकविले जातात. ज्याला ज्या विषयांत रस आहे त्याला तो विषय शिकविण्याची येथें सोय करण्यांत आली आहे. नवरा बाजारभावांबद्दल अथवा वेतनश्रेणी-बद्दल माहिती मिळवील; तर त्याची बायको मुलांची काळजी कशी घ्यावी, घराची सजावट कशी करावी, आदर्श संसार कसा करावा, इत्यादि माहिती मिळवील.

याच ठिकाणीं दुसरी एक लोकशाळा आम्हीं पाहिली. ही शाळा १९०९ सालीं स्थापन झाली होती. येथें फक्त मुलींना व स्त्रियांना शिक्षण दिलें जात होतें. या विद्यार्थिनी स्कँडिनेव्हियामधल्या सर्व देशांतून येथें येत असतात. इतर लोकशाळांप्रमाणें ही शाळा पण खाजगी आहे व या शाळेला पण सरकारी मदत मिळत असते. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींपैकीं कांहीं विद्यार्थिनींना या शिक्षणासाठीं सरकारकडून शिष्यवृत्ति मिळते. डेन्मार्कमधील महिलांनीं स्त्रियांच्या उन्नतीसाठीं अनेक संस्था उभारल्या आहेत. या स्त्रीसंघटनातर्फे कांहीं विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती देऊन येथें शिक्षण घेण्यास पाठविण्यांत येते. या ठिकाणीं शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींचें सरासरी वय १८ ते १९ वर्षांचें असतें. ही संस्था चाल-विण्यांत चालकांचा उद्देश विद्यार्थिनींना सुगृहिणी व सुमाता बनविणें हाच आहे. त्या दृष्टीनें अभ्यासक्रमांत शिवण, स्वयंपाक करणें, गृहव्यवस्था राखणें, इत्यादि विषय शिकवण्याची तरतूद केलेली आहे. आठवड्याला १८ तास मुलींना व्याख्यानें ऐकावीं लागतात व बाकीच्या वेळांत त्यांच्याकडून प्रत्यक्ष काम करवून

घेतलें जातें. वर सांगितलेल्या विषयाखेरीज वाङ्मय, इतिहास, समाजशास्त्र, इत्यादि विषय पण या शाळांतून शिकविले जातात.

येथें येणाऱ्या विद्यार्थिनींपैकीं २/३ विद्यार्थिनी ग्रामीण विभागांतून येतात व बाकीच्या १/३ नागरी विभागांतील असतात. ग्रामीण विभागांतून येणाऱ्या सर्वच मुली शेतीवर काम करणाऱ्या नसतात. अलिकडे डेन्मार्कमध्यें खेड्यांतील लोक फार मोठ्या प्रमाणांत शहरांत जाऊं लागले आहेत. तरुण मुलींमध्यें शहरांत जाऊन नोकरी करण्याची प्रवृत्ति वाढत्या प्रमाणांत दिसून येऊं लागली आहे. मला एकदां एक शेतकरी भेटला. त्याच्याशीं बोलतांना तो अविवाहित असल्याचें मला समजलें. मी त्याला म्हणालों, "आपण अद्यापि लग्न कसें नाहीं केलें ?" तो म्हणाला, "ज्या प्रकारच्या मुलीशीं लग्न करावें असें मला वाटतें, त्या मुलींना खेड्यामध्यें राहणें आवडत नाहीं. खेड्यांतील जास्त उत्पन्नाच्या माणसापेक्षां शहरांतील कमी उत्पन्नाचा मनुष्य आमच्या मुलींना अधिक पसंत असतो. शहरांमधील छानछोकीच्या जीवनाचें आकर्षण आमच्या मुलींना फार मोठ्या प्रमाणांत वाटूं लागलें आहे. खुषीनें खेड्यांत राहणारी चांगली मुलगी आढळेपर्यंत लग्न न करण्याचें मीं ठरविलें आहे."

ही शाळा पाहून व जवळ जवळ सबंध दिवस बाहेर घालवून आम्ही संध्याकाळच्या जेवणासाठीं आमच्या वसतिगृहांत आलों. जेवणानंतर फ्रान्समधून आलेले मि. नाझे व त्यांचे सहकारी यांनीं आम्हांला कांहीं फ्रेंच फिल्म्स दाखविल्या. नंतर कॉफीपान झालें व हा कार्यक्रम संपला.

२६ ऑगस्ट ५४

आतां सेमिनारचें काम खूप जोरांत चालू आहे. सकाळीं गटागटांच्या सभा झाल्या. गटांच्या सभांनीं घेतलेले निर्णय खुल्या अधिवेशनापुढें चर्चेला येतात. या ठिकाणीं त्या निर्णयांवर साधकबाधक चर्चा होते. नंतर अंतिम निर्णय घेतले जातात. या सेमिनारमध्यें ग्रामीण विभागांतील प्रौढ शिक्षणाबाबत अनेक मुद्द्यांवर साधकबाधक चर्चा होणार आहे.

आज एका व्याख्यानामध्यें येथील एका लोकशाळेबद्दल महिती सांगण्यांत आली. डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे व फिनलंड हे चार स्कँडिनेव्हियन देश आहेत.

या चार देशांमध्यें निकटचे संबंध स्थापन केले पाहिजेत व त्या देशांतील लोकांमध्यें परस्परांबद्दल भ्रातृभाव व जिव्हाळा निर्माण झाला पाहिजे याची जाणीव येथील विचारवंत लोकांना आहे; कारण हे चारहि देश खूप लहान आहेत. आजच्या धकाधकीच्या मामल्यामध्यें एकएकटेपणानें जगणें, त्यांना कठीण होऊन बसलें आहे; परंतु हे चारहि देश एक झाले तर युरोपांतील इतर मोठ्या देशांच्या बरोबरीचें महत्त्वाचें स्थान या देशांना मिळूं शकेल, ही गोष्ट लोकांच्या मनावर ठसविण्याकरितां ही लोकशाळा चालविण्यांत आली असल्याचें त्या व्याख्यात्यानें सांगितलें. जनतेच्या मनामध्यें जो बदल घडवून आणावयाचा आहे, तो शिक्षणामार्फतच घडवून आणतां येईल, असा येथील लोकांचा विश्वास आहे. तें उद्दिष्ट साधण्यासाठींच वर सांगितलेली लोकशाळा चालविण्यांत येत आहे, असेंहि तो व्याख्याता म्हणाला.

२७ ऑगस्ट ५४

गटसमितीची सभा, उपसमितीची सभा व खुलें अधिवेशन यांमध्यें बराचसा वेळ गेला. आज दुपारीं डेन्मार्कमधील महिला संघटनेमध्यें काम करणाऱ्या एका बाईची भेट झाली. तिच्याशीं बोलतांना डेन्मार्कमध्यें स्त्रियांना किती महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे तें जाणून घेण्याचा मीं प्रयत्न केला. स्त्रियांच्या बाबतींत डेन्मार्कनें कोणकोणते कायदे केले आहेत व त्या कायद्यांमुळें त्यांच्या जीवनामध्यें स्थैर्य व सुरक्षितता किती प्रमाणामध्यें आली आहे, हें पण जाणून घेण्याचा मीं प्रयत्न केला. या बाईकडून मला पुढील माहिती मिळाली.

डेन्मार्कमध्यें लग्नासाठीं मुलीचें वय कमींत कमी १८ असावें लागतें व मुलाचें २१. १८ वर्षांच्या खालील मुलीचें व २१ वर्षांखालील मुलाचें लग्न व्हायचें असल्यास त्या दोघांना आपल्या पालकांची संमति मिळवावी लागते. डेन्मार्कमध्यें लग्न हा करार मानून त्याची नोंदणी करावी लागते. लग्नानंतर मुलीला आपल्या नवऱ्याचें आडनांव घेण्याचा अधिकार मिळतो; परंतु तिची जर इच्छा असली तर माहेरचेंच आडनांव ती लावूं शकते. डेन्मार्कमध्यें घटस्फोटाचें प्रमाण फार वाढत चाललें आहे. डेन्मार्कमध्यें होणाऱ्या पांच लग्नांपैकीं एका लग्नाचा घटस्फोटांत अंत होतो. कोपनहेगन या शहरांत तीन लग्नांपैकीं एका लग्नांत

घटस्फोट होतो. त्यामुळें येथील कायद्यांत घटस्फोटित आईबापांच्या व मुलांच्या हक्कांसंबंधीं व जबाबदाऱ्यांसंबंधीं बरीच तरतूद करण्यांत आली आहे. येथील कायद्याप्रमाणें स्त्री व पुरुष या दोघांना समान वैवाहिक हक्क देण्यांत आले आहेत. या दोघांनीं कुटुंबांच्या गरजा पार पाडण्यास मदत केली पाहिजे. पति व पत्नी या दोघांनीं परस्परांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. नवरा व बायको यांचें परस्परांशीं पटलें नाहीं तर कोर्टामार्फत त्यांना विभक्त राहतां येतें, किंवा घटस्फोट मिळवितां येतो. परंतु त्यांना कोर्टामार्फत ही अखेरची अनुज्ञा मिळण्याच्या पूर्वी, त्या दोघांमध्यें समझोता करण्याचे प्रयत्न झालेले आहेत अशी कोर्टाची खात्री व्हावी लागते. हें समझोता करण्याचें काम स्थानिक पाद्री अथवा कोर्टाचा एकादा अधिकारी करतो. सर्वसाधारणपणें पुढील कारणांस्तव घटस्फोट मिळूं शकतो.

पतिपत्नी १८ महिने परस्परांपासून दूर राहत असले, तर या मुदतीच्या शेवटीं दोघांच्या संमतीनें त्यांना घटस्फोट मिळवितां येईल. तीं जर ३० महिने एकमेकांपासून दूर असले तर दोघांची संमति नसतांनासुद्धां त्यांपैकीं कोणालाहि कोर्टांत जाऊन घटस्फोट मिळवितां येईल. वरील मुदतीच्या आंत सुद्धां पति-पत्नींना कोर्टांत जाऊन घटस्फोट मिळवितां येतो. मात्र त्या वेळीं घटस्फोट मिळविण्यासाठीं पुढें दिलेल्या कारणांसारखें एकादें सबळ कारण असावें लागतें: (१) पतिपत्नींपैकीं एकानें जर व्यभिचार केला असला तर दुसऱ्या पक्षाला घटस्फोट मागतां येतो. (२) चार वर्षेपर्यंत पतिपत्नींमध्यें वैवाहिक संबंध नसले तर त्यांना घटस्फोट मिळूं शकतो. (३) दोघांपैकीं एकाला जर गुप्तरोग झाला असला व तो त्याच्यापासून दुसऱ्याला होण्याचा संभव असला तर घटस्फोट मिळूं शकतो. (४) दोघांपैकीं एकजण दुसऱ्याचे हाल करीत असला अथवा त्याचा जीव घेण्याचा त्यानें प्रयत्न केला असला, तर त्यामुळेंसुद्धां घटस्फोट मागतां येतो. (५) दोघांपैकीं एकाला दोन वर्षांपेक्षां अधिक कैदेची शिक्षा झाली असली किंवा दोघांपैकीं एकाचें ३ वर्षेपर्यंत डोकें फिरलेलें असलें व त्याचें डोकें सुधारण्याची शक्यता नसली, तर दुसऱ्या पक्षाला घटस्फोट मागतां येतो.

या बाईशीं बोलतांना असें आढळून आलें कीं, येथील बायकांना कायद्यानें खूपच संरक्षण दिलेलें आहे. त्याचप्रमाणें सरकारनें ज्या वेगवेगळ्या कल्याणकारी योजना आंखलेल्या आहेत, त्या योजनांमुळें स्त्रियांना खूप सुरक्षितता मिळालेली

आहे. त्यांच्या हातून चूक झाल्यास किंवा त्यांच्यावर अन्याय झाल्यास त्यांना सरकारी संस्थाकडे धांव घेतां येते. त्याचप्रमाणें अशा आपत्तींत सांपडलेल्या स्त्रियांना मदत करण्यासाठीं महिलांच्या संघटनांमार्फत वेगवेगळ्या संस्था साऱ्या देशभर काम करीत असल्याचें दिसून येतें. सर्व क्षेत्रांमध्यें पुरुषांच्या बरोबरीनें आत्मविश्वासानें व कर्तव्यपरायणतेनें स्त्रिया भाग घेत असल्याचें दिसून येतें.

२८ ऑगस्ट ५४

सकाळीं गटसभा झाल्यावर दुपारचा कार्यक्रम तहकूब झाल्याचें सांगण्यांत आलें. दुपारीं सर्व प्रतिनिधींना डॉ. मॅनिकी यांचें 'इंटरनॅशनल पीपल्स कॉलेज' पाहण्यास आमंत्रण असल्याचें सांगण्यांत आलें. त्याप्रमाणें जेवण झाल्यावर आम्ही सर्व मंडळी बसनें एल्सिनोरला गेलों. त्या ठिकाणीं डॉ. मॅनिकी यांनीं सर्व प्रतिनिधींचें स्वागत केलें व आपल्या संस्थेचा इतिहास निवेदन केला.

याच कॉलेजांत आमचें येथील शिक्षण झाल्यामुळें त्यांनीं सांगितलेली माहिती आम्हांला तरी नवी नव्हती; परंतु ही माहिती सांगून झाल्यावर प्रतिनिधींनीं विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देतांना डॉ. मॅनिकी यांनीं कांहीं गोष्टींचा विशेष विस्तारानें उल्लेख केला. ते म्हणाले, "संगीताची भाषा ही आंतरराष्ट्रीय आहे. दोन भिन्न देशांतील लोकांना परस्परांची भाषा जरी समजली नाहीं, तरी परस्परांचें गाणें मात्र समजूं शकतें व या गाण्यांमुळें दोन देशांतील लोक एकमेकांच्या अधिक जवळ येऊं शकतात. जर्मन लोकांचीं प्रेमगीतें, डॅनिश लोकांचीं लोकगीतें, व इंग्रजांचीं विद्यार्थि-गीतें हीं सर्व देशांतील लोकांना आवडतात. जर्मनांचें मॅन्डोलिन व गिटार हीं वाद्यें जर्मन भाषा न जाणणाऱ्यांना सुद्धां मुग्ध करूं शकतात. आमच्या कॉलेजचा उद्देश आंतरराष्ट्रीय सलोखा निर्माण करणें हा असल्यामुळें ज्या ज्या साधनांनीं दोन देशांतील लोक एकमेकांजवळ जाऊं शकतील, त्या सर्व साधनांचा आम्हीं उपयोग करण्याचें ठरविलें आहे.

"आमच्या शाळेंत श्रमदानला आम्ही खूप महत्त्व देतों. भिन्न देशांतील लोक एकमेकांच्या शेजारीं उभे राहून ज्या वेळीं श्रमदान करतात, त्या वेळीं त्यांना परस्परांची चांगली ओळख पटते. श्रमदान करतांना फारसें बोलावें लागत नाहीं;

परंतु हें कार्य चालू असतांना प्रत्येक माणसाचें व्यक्तिमत्त्व प्रतीत होऊं शकतें. माणसामध्यें चिकाटी, बिनचूकपणा, कसब व ताकद कितपत आहे, याची श्रमदानाच्या वेळीं इतरांना कल्पना येऊं शकते. भाषेच्या मार्फत मनुष्य दुसऱ्यांवर खोटी छाप पाडूं शकतो, परंतु ज्या वेळीं तो हातानें काम करतो त्या वेळीं मात्र तो कोणाची अशी फसवणूक करूं शकत नाहीं. त्याचा दुबळेपणा त्याला झाकतां येत नाहीं. आमच्या विद्यालयांत श्रमदान सुरू करण्यामध्यें आमचा दुसरा एक हेतु आहे. आपल्या समाजांत जे बुद्धिजीवि लोक आहेत, त्यांना आपण शेतकरी किंवा कामगार लोकांपेक्षां खूप श्रेष्ठ आहोंत, अशी घमेंड वाटते. त्याचप्रमाणें हातानें काम करणारे जे जे लोक आहेत, त्या सर्वांना आपण बुद्धिजीवि लोकांपेक्षा कमी दर्जाचे आहोंत, अशा न्यूनगंडानें पछाडलेलें असतें; परंतु ज्या वेळीं हा श्रमदानाचा कार्यक्रम आमच्या शाळेंत सुरू केला, त्या वेळीं आमच्या येथें काम करणाऱ्या शेतकऱ्यांना, कारागिरांना व मजुरांना आपण या शिकलेल्या मंडळींपेक्षां एका क्षेत्रामध्यें कितीतरी श्रेष्ठ आहोंत, याची प्रचीति आली व बुद्धिजीवि लोकांना सुद्धां आपल्या उणिवांची तीव्रतेनें जाणीव झाली. त्यामुळें बुद्धिजीवि आणि श्रमजीवि यांच्यामध्यें जें अंतर वाढत चाललेलें आज आपल्या समाजांत दिसतें, तें अंतर कमी करून या दोन्ही वर्गांतील लोक एकमेकांच्या अधिक जवळ येऊं शकले.

"आमच्या विद्यालयांत वेगवेगळ्या भाषा शिकविण्याकडे आम्ही अधिक लक्ष देतों. आपला ज्यांच्याशीं संबंध येतो, त्यांची भाषा जर आपल्याला समजली व ती जर बोलतां आली, तर आपण त्यांच्या अधिक जवळ जाऊं शकतों. भिन्न भाषा बोलणाऱ्या लोकांच्यामध्यें परस्परांविषयीं गैरसमज वाढूं शकतात. या भिन्न भिन्न भाषांमुळें वेगवेगळ्या देशांतील लोकांच्यामध्यें एक प्रकारची तटबंदी उभारलेली दिसते. ही तटबंदी मोडून टाकून आंतरराष्ट्रीय एकजूट निर्माण करावयाची असेल, तर आपल्यापैकीं प्रत्येकानें जेवढ्या परकीय भाषा शिकतां येतील, तेवढ्या शिकण्याचा प्रयत्न करावा. इंग्लिश, जर्मन, फ्रेंच इत्यादि वेगवेगळ्या भाषा आमच्या विद्यार्थ्यांना शिकविण्याची आम्हीं तरतूद केल्यामुळें आमच्या ह्या शाळेंत जगांतील वेगवेगळ्या देशांतून आलेले लोक एकमेकांशीं गुण्यागोविंदानें व स्नेहभावानें वागत असल्याचें दृश्य आपल्याला पाहावयाला मिळेल."


डॉ. मॅनिकी यांच्या म्हणण्याची सत्यता तेथील लोकांना फारशा अट्टाहासानें पटवून देण्याची गरज नव्हती. युरोपमधील लोकांना वेगवेगळ्या भाषा शिकण्याचा छंद असल्याचें दिसून येतें. डेन्मार्कमधील सर्वसाधारण माणसालासुद्धां तीनचार भाषा येतात. डॅनिश त्यांची मातृभाषा, स्वीडिश व नॉर्वेजियन या शेजाऱ्यांच्या भाषा व जर्मनांनीं तेथें अधूनमधून राज्य केल्यामुळें त्यांची जर्मन भाषा डॅनिश माणसाला अवगत असते. या बाबतींत आमच्या देशांतील लोक फार कर्मठ. हिंदी व दुसरी एखादी प्रादेशिक भाषा विद्यार्थ्यानें शिकलीच पाहिजे असें परिपत्रक सरकारनें काढल्याबरोबर टीकेचें केवढें मोठें रान उठविण्यांत आलें! भारतासारख्या अनेक प्रांतांच्या देशांत भिन्न भाषा बोलणारे लोक असल्यामुळें प्रांतीयवाद आपल्याकडे वाढीला लागला आहे व दिवसेंदिवस त्यामध्यें कडवट-पणा अधिक येऊं लागला आहे. आंतरभारतीसारख्या संस्थांची आपणांला आतां अधिक गरज आहे. ही संस्था पाहून रात्रीं आम्ही हिलेरॉडला परत आलों.

२९ ऑगस्ट ५४

आज मुक्काम एल्सिनोरलाच होता. सकाळचा वेळ जें सामान बोटीनें जावयाचें होतें, त्याची बांधाबांध करण्यांत गेला. अकराच्या सुमारास मिसेस् लारसन आपल्या मुलाला व सुनेला घेऊन आली. त्यांच्या मोटारमधून आम्ही (श्री गौडा व मी) कोपनहेगनला गेलों. मिसेस् लारसनच्या मुलाचें घर कोपन-हेगनला आहे. जातांना वाटेंत आम्हीं डेन्मार्कमधील सुप्रसिद्ध मत्स्यालय पाहिलें. त्यानंतर येथील राजानें स्वतःच्या शिकारीसाठीं खास राखून ठेविलेला हरिणांचा बाग आम्हीं पाहिला. ठिकठिकाणीं हरणांचे छोटे छोटे कळप उड्या मारत असल्याचें विलोभनीय दृश्य पाहून मनाला आनंद होत होता; इतक्यांत महाकवि कालिदासाच्या शाकुंतलांतील पुढील दोन ओळींची आठवण होऊन मन विषण्ण झालें.

> क्व बत हरिणकानां जीवितं चातिलोलम् ।
> क्व च निशितनिपाता वज्रसाराः शरास्ते ॥

शाकुंतलांतील हरिणें दुष्यंताच्या बाणाला बळीं पडणार होतीं; परंतु हीं सुंदर गोजिरवाणीं हरिणें त्याहून भयंकर अशा बंदुकीला बळी पडणार आहेत.



डेन्मार्कमधील बुश (झाडी) ची कल्पना देणारें दृश्य

यानंतर आम्ही दिवसभर कोपनहेगनमध्यें लारसन मंडळींच्या घरीं राहिलों व संध्याकाळीं त्यांच्याबरोबर जवळच्याच एका उपनगरांत माध्यमिक शिक्षणाचें काम करणाऱ्या एका गृहस्थाकडे गेलों. त्या ठिकाणीं आम्हीं थोडा वेळ घालविला. या गृहस्थाला भारताबद्दल बरीच माहिती आहे. भारताला मदत करण्यासाठीं डेन्मार्कमध्यें जे कांहीं प्रयत्न केले जातात, त्यामध्यें सहभागी होण्याची यांची धडपड असते. आपल्या विद्यार्थ्यांच्या मार्फत येथील प्रौढशिक्षणाच्या कार्याला मदत पाठविण्यासाठीं यांनीं कांहीं पैसे गोळा केले होते व ते श्री गौडा यांच्या संस्थेला पाठविले होते. आपला देश आज पुनर्रचनेचें जें काम करीत आहे, त्याकडे कौतुकानें व आशेनें पाहणारी जी कांहीं परदेशी मंडळी आहेत, त्यापैकीं तो एक होता. ११॥ पर्यंत त्याच्याशीं बोलण्यांत वेळ गेला व नंतर आम्ही मोटारनें हिलेरॉड येथें परिषदेच्या जागीं आलों.

३० ऑगस्ट ५४

डेन्मार्कमधील शिक्षण खात्याच्या मंत्र्यांनीं आज आम्हां भारतीयांना चहाला बोलाविलें होतें. त्यामुळें सकाळीं गटसभा झाल्यावर दुपारीं गौडा व मी कोपनहेगनला गेलों. त्या ठिकाणीं आमचे सर्व भारतीय मित्र आम्हांला भेटले. ३१ तारखेला हे सर्व येथून स्वदेशीं जायला निघणार. आमची परिषद चालू असल्यामुळें आम्हांला तूर्त येथें राहणें प्राप्त आहे. आम्हीं शिक्षणमंत्र्यांच्या येथें चहाला जमलों असतांना त्या ठिकाणीं आम्हांस आणखी तीन भारतीय भेटले. त्यांपैकीं श्री आपटे नांवाचे एक महाराष्ट्रीय गृहस्थ होते. यांची व माझी पूर्वीं जबलपूरला भेट झाली होती. आपल्या देशाला भेट दिल्याबद्दल शिक्षणमंत्र्यांनीं चहानंतर झालेल्या भाषणांत भारतीय संघाचे आभार मानले व भारताच्या शैक्षणिक पुनर्रचनेच्या कार्यक्रमांत डेन्मार्ककडून सर्व प्रकारचें सहकार्य मिळेल, असें आश्वासन दिलें. संध्याकाळीं हिलेरॉड येथें गटसभेचा कार्यक्रम असल्यामुळें स्वदेशीं परतणाऱ्या आमच्या सर्व मित्रांना प्रेमाचा निरोप देऊन आम्हीं हिलेरॉड येथें परत आलों.

३१ ऑगस्ट ५४

सकाळीं एक चांगलें व्याख्यान ऐकायला मिळालें व त्यानंतर गटसभा झाल्या. दुपारीं आम्ही एका शिक्षकाच्या घरीं गेलों. त्याची पत्नी तेथील लायब्ररींत ग्रंथपालाचें काम करते. सदर शिक्षक येथील एका माध्यमिक शाळेमध्यें काम करितात. त्यांनीं ट्रेनिंग घेतलेलें आहे. डेन्मार्कमध्यें एकूण १९–२० ट्रेनिंग कॉलेजें आहेत व त्यामधून तीन ते साडेतीन हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या ट्रेनिंग कॉलेजांत कांहीं सरकारनें चालविलेलीं आहेत, तर कांहीं खाजगी संस्थांनीं चालविलेलीं आहेत. ट्रेनिंग कॉलेजचा अभ्यासक्रम साधारणपणें चार वर्षांचा असतो. मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्यांना तो अडीच वर्षांत पूर्ण करतां येतो. या कॉलेजमधून बाहेर पडलेले विद्यार्थी प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेंत शिकवूं शकतात. हायस्कूलमध्यें शिकविणारे शिक्षक मात्र विश्वविद्यालयीन शिक्षण घेतलेले असतात. याखेरीज शिक्षकांना जुजबी ट्रेनिंग देण्यासाठीं वेगवेगळीं

शिबिरें घेणारें शिक्षकांचें एक हायस्कूल येथें आहे. या शाळेंत दोन आठवड्यां-पासून तों एक वर्षापर्यंतच्या मुदतीचे वेगवेगळ्या विषयांवरील अभ्यासवर्ग शिक्षकांच्या फायद्यासाठीं चालविले जातात.

या शिक्षकांच्या घरीं जेवण घेतल्यानंतर त्यांच्याबरोबर आम्ही एका प्रयोगशाळेंत गेलों. या ठिकाणीं स्कँडिनेव्हियामधील सर्व देशांतून विद्यार्थी येतात. ते येथें एकदोन आठवडे राहतात व एकाद्या विषयाचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याचा प्रयत्न करतात. येथें आम्हांला माध्यमिक शाळेचे कांहीं विद्यार्थी भेटले. या भागांत असणाऱ्या वनस्पतींची माहिती मिळविण्यासाठीं ते येथें आले होते. निरनिराळ्या झाडांचीं पुष्कळशीं पानें त्यांनीं गोळा केलीं होतीं व त्या झाडांबद्दल मोठमोठ्या पुस्तकांतून शिक्षकांच्या मदतीनें कांहीं माहिती मिळवून आपल्या




स्कँडिनेव्हियांतील वेगवेगळ्या भागांत राहणाऱ्या
महिलांच्या पोशाखांची कल्पना देणारें चित्र

वहींत ती लिहून घेण्याचें काम त्यांनीं चालविलेलें होतें. एकाद्या विषयाचा अभ्यास करण्याची ही नवी पद्धति आम्हांला अनुकरणीय वाटली.

ही शाळा पाहिल्यावर आम्ही परिषदेच्या जागीं आलों. आज प्रतिनिधींसाठीं डेन्मार्कमधील लोकनृत्यांचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. हा कार्यक्रम अतिशय चांगला झाला. ह्या वेळीं नृत्य करणाऱ्या स्त्रियांनीं स्कँडिनेव्हियामधील फिनलंड, स्वीडन, नॉर्वे इत्यादि देशांतील नृत्यांचे नमुने दाखविले. नृत्य करतांना त्यां त्या देशांची वेषभूषा त्यांनीं केली होती. त्यानंतर परिषदेचे डायरेक्टर श्री मिल्यर्स म्हणाले, "या ठिकाणीं आपण भिन्नभिन्न देशांतून आलों आहोंत. या सर्व देशांतील लोकांचे पोषाख वेगळेवेगळे आहेत. त्यांच्या भाषा भिन्नभिन्न आहेत. जमलेल्या प्रतिनिधींना आपल्या मित्रांच्या पोषाखाची व भाषेची कल्पना येणें जरूर आहे. सबब माझी आपणांला अशी विनंति आहे कीं, आपल्यापैकीं प्रत्येकानें आपला राष्ट्रीय पोषाख परिधान करावा व आपल्या मातृभाषेंत चार शब्द बोलावेत. १५-२० मिनिटांत आपण पुनः येथें जमूं या."

त्यानंतर थोड्याच वेळांत सर्व प्रतिनिधी आपआपल्या राष्ट्रीय पोषाखांत येऊन हजर झाले. स्कॉटलंडमधील एका गृहस्थानें तेथील हायलंडरचा पोषाख घातला होता. निग्रो लोकांनीं आपले पोषाख घातले होते. असे वेगवेगळे पोषाख घालून प्रतिनिधी त्या ठिकाणीं जमले व त्यांनीं आपआपल्या भाषेंत छोटींशीं भाषणें केलीं. श्री गौडा यांनीं म्हैसूरी फेटा व उपरणें परिधान केलें होतें. त्यांनीं कन्नड भाषेंत छोटेंसें भाषण केलें. मीं पण राष्ट्रीय पोषाख घातला होता व मराठी भाषेंत त्यांचे आभार मानले. हा कार्यक्रम सर्वांना अतिशय आवडला.

१ सप्टेंबर १९५४

आज परिषदेचें काम तहकूब होतें, म्हणून श्री गौडा व मी स्टॅव्हनशॉल्टला गेलों. तीन तारखेला माझा वाढदिवस असल्यामुळें व त्या दिवशीं मला येथें यायला सवड होणार नसल्यामुळें तो कार्यक्रम आजच घ्यावा असा ओल्सन मंडळींनीं व गौडांनीं विचार केला होता. त्याप्रमाणें आम्ही येथें जमलों होतों. संध्याकाळीं कांहीं पाहुण्यांना आमंत्रण देण्यांत आलें होतें. गौडांच्या सल्ल्यानुसार

या कार्यक्रमाच्या वेळीं भारतीय वातावरण उत्पन्न करण्याचा कसोशीनें प्रयत्न करण्यांत आला होता. त्याचप्रमाणें डॅनिश लोक हा समारंभ ज्या पद्धतीनें साजरा करतात, ती पद्धत पण स्वीकारली होती. भारताचा एक छोटासा झेंडा मिळविण्यांत आला होता व तो माझ्यासमोर ठेवण्यांत आला होता. वाढदिवसाच्या दिवशीं डेन्मार्कमध्यें निमंत्रितांना कोको देण्याची पद्धत आहे. या प्रसंगीं भाषणें पण करण्याचा त्यांचा रिवाज आहे.

डेन्मार्कमधील लोक ज्या वेळीं मेजवानीनिमित्त किंवा चहासाठीं असे एके ठिकाणीं जमतात, त्या वेळीं पाहुण्यांसाठीं भाषणें करण्यांत त्यांना खूप उत्साह वाटतो. या वेळीं पाहुण्यांची व परस्परांची स्तुति करण्यांत येते. उत्तरादाखल पाहुण्यांचीं पण भाषणें होतात. या सर्व भाषणांतून 'अहो रूपम् अहो ध्वनिः' चा प्रकार चालतो. या प्रसंगीं तुम्ही काय बोलतां याकडे फारसें कोणाचें लक्ष नसतें. पण भाषणें छोटीं झालीं तर डॅनिश लोकांना तीं विशेष आवडतात. परंतु एखादा वक्ता जर प्रदीर्घ भाषण करूं लागला तर डॅनिश लोक अत्यंत संयम बाळगून शांतपणें तें भाषण ऐकून घेतात.

या मेजवानीच्या वेळीं धूम्रपान फार जोरांत चालतें. येथील लोकांना सिगार किंवा चिरूट ओढणें फार आवडतें. जमलेल्या मंडळीपैकीं बहुतेक सर्वजण मोठमोठे चिरूट ओढतात. बायका सहसा चिरूट ओढीत नाहींत. परंतु त्या सिगारेट मात्र खूप ओढतात. प्रत्येक बाईजवळ तिच्या बॅगमध्यें सिगारेटची पेटी, सिगारेट लायटर व तो बिघडला तर पंचाईत होऊं नये म्हणून साधी काड्याची पेटी या वस्तू असणारच.

मेजवान्यांच्या प्रसंगीं डॅनिश लोक मद्यें पण घेतात. बीर (Beer) ला ते मद्य मानीत नाहींत. हें पेय खूप मोठ्या प्रमाणांत घेतलें जातें. जे लोक असलीं पेयें घेत नाहींत, त्यांच्याकरितां फळांचे रस ठेविलेले असतात. प्रत्येकानें आपला ग्लास भरल्यावर तो दुसऱ्याच्या ग्लासला लावून 'स्काल' (Skaal) असा घोष करण्यांत येतो व नंतर पेले तोंडाला लाविले जातात. डेन्मार्कच्या लोकांचें बीर हें राष्ट्रीय पेय आहे. हा कार्यक्रम रात्रीं खूप वेळ चालला. जमलेल्या मंडळींनीं शुभेच्छा व्यक्त केल्या. आमच्या यजमानांनीं व कांहीं पाहुण्यांनीं भाषणें केलीं. उत्तरादाखल माझें भाषण झालें व सुमारें एकच्या सुमारास आम्ही परिषदेच्या जागीं जायला निघालों.

सप्टेंबर ५४

उद्यां परिषदेचें काम संपणार असल्यामुळें आज सारा दिवस गटसभांमधून झालेल्या चर्चेचे जे निर्णय सभेपुढें विचारांसाठीं आले होते, त्यांवर चर्चा करण्यांत गेला. फक्त जेवणाचा व चहाचा वेळ सोडला, तर सारा दिवस या अधिवेशनामध्यें गेला. त्यामुळें इतर कुठलाहि कार्यक्रम आज आम्ही घेऊं शकलों नाहीं.

ग्रामीण विभागांतील प्रौढ शिक्षणाबाबतच्या सर्व प्रश्नांची या परिषदेनें खूप कसोशीनें चर्चा केली व त्याबाबत आज कांहीं निर्णय घेण्यांत आले. उद्यांच्या अधिवेशनांत आणखी कांहीं निर्णय घेण्यांत येतील. परिषदेनें संमत केलेले ठराव व तिनें केलेल्या विधायक शिफारसी युनेस्कोमार्फत पुस्तकरूपानें लवकरच प्रसिद्ध होतील. त्या तपशिलांत जाण्याचें हें स्थळ नव्हे; परंतु या प्रसंगीं एवढेंच नमूद करावयाचें आहे कीं, परिषदेनें घेतलेले सर्व निर्णय प्रौढशिक्षणाची पुनर्रचना करण्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचे होते. मागासलेल्या देशांत, प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम आंखतांना शिक्षणापुरताच संकुचित विचार करून भागत नाहीं; तर दळणवळणाची व वाहतुकीची सोय जास्तींत जास्त लोकांना उपलब्ध करून देणें हे कार्यक्रम सुद्धां प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमाचा भाग होऊं शकतात. प्रौढ-शिक्षणाचा मुख्य उद्देश लोकांचा आर्थिक दर्जा सुधारणें, त्यांची क्रयशक्ति वाढविणें, त्यांचें जीवन सुखी व समृद्ध करणें, हा असल्यामुळें शेतीसुधारणा, पशुपालन, छोट्या उद्योगधंद्यांची उभारणी करणें व रोगांचा नायनाट करून सर्वांचें आरोग्य सुधारून त्यांची उत्पादनशक्ति वाढविणें, इत्यादि सर्व गोष्टींचा समावेश प्रौढ-शिक्षणामध्यें होऊं शकतो.

३ सप्टेंबर ५४

आज या सेमिनारचा शेवटचा दिवस. खुलें अधिवेशन फार वेळ चाललें होतें. गेले कांहीं दिवस गटागटानें ज्या चर्चा करण्यांत आल्या, त्यांच्या अनुरोधानें वर सांगितल्याप्रमाणें महत्त्वाचे निर्णय या परिषदेनें घेतले. त्यानंतर आभार-प्रदर्शक औपचारिक ठराव संमत करण्यांत आले. कांहीं मंडळींनीं या सेमिनार-

मध्यें आपणांस आलेले अनुभव निवेदन केले. गेले कित्येक दिवस चालू असलेल्या परिषदेचें आज 'सूप वाजलें'.

सायंकाळीं सर्व प्रतिनिधींचा एक मेळावा भरला. त्या वेळीं वेगवेगळ्या देशांतील लोकांनीं कांहीं करमणुकीचे कार्यक्रम करून दाखविले. या कार्यक्रमांत फ्रेंच लोकांनीं विशेष उत्साहानें भाग घेतला होता. आज माझा वाढदिवस असल्या-मुळें परिषदेच्या डायरेक्टरनें सर्व प्रतिनिधींच्या वतीनें माझें अभिनंदन केलें. या वेळीं माझ्या टेबलासमोर पुष्कळ मेणबत्त्या पेटविण्यांत आल्या होत्या.

भिन्न भिन्न देशांतून आलेल्या प्रतिनिधींच्या सहवासांत गेले तीन आठवडे खूपच मजेंत गेले. जवळ जवळ ३५-४० देशांतील लोक या ठिकाणीं जमले होते. त्यांपैकीं पुष्कळांशीं प्रत्यक्ष परिचय झाला. अनौपचारिक बोलणीं झालीं. त्यामुळें जगांतील वेगवेगळ्या देशांत प्रौढांच्या शिक्षणाचा प्रश्न आज कशा रीतीनें हाताळला जात आहे, याची सम्यक् कल्पना आली. विशेषतः भारतासारख्या आशिया व आफ्रिका खंडांतील मागासलेल्या देशांत हें प्रौढशिक्षणाचें काम कसें चालतें व तेथील लोक या कार्यक्रमाची योजना व अंमलबजावणी कोणत्या रीतीनें करितात, याची पण कल्पना आली. पुष्कळ पुस्तकें वाचून जें मला मिळू शकलें नसतें तें मला या तीन आठवड्यांत भरपूर प्रमाणांत मिळालें. प्रौढ शिक्षणाच्या प्रश्नाकडे पाहण्याची एक नवी दृष्टि मला लाभली. माझ्या शिक्षणाच्या दृष्टीनें गेले तीन आठवडे मला अत्यंत महत्त्वाचे वाटले.

४ सप्टेंबर ५४

आज सकाळीं न्याहारीनंतर परिषदेला आलेले सर्व प्रतिनिधी आपआपल्या घरीं जाण्यासाठीं धांवपळ करूं लागले. श्री गौडा व मी एल्सिनोरला परत आलों. आजचा सारा दिवस एल्सिनोरमधील 'इंटरनॅशनल पीपल्स कॉलेज' मधील प्राध्यापकांचा व इतर परिचितांचा निरोप घेण्यांत गेला. त्याचप्रमाणें ज्या रॉकॉस्ट स्कूलमध्यें आम्ही राहत होतों, तेथील लोकांचा पण आम्हीं कृतज्ञतापूर्वक निरोप घेतला. संध्याकाळीं मिसेस लारसननें आम्हांला अखेरचा निरोप देण्याकरितां जेवायला बोलाविलें होतें. त्यांचें घर क्रोनबर्ग किल्ल्याच्या समोर असल्यामुळें तिच्या मुलांबरोबर कांहीं काळ आम्हीं त्या किल्ल्यांत

घालविला. त्या ठिकाणीं हॅम्लेट व ऑफिलिया यांचे पुतळे आम्हीं पाहिले. यापूर्वी तीनचार वेळां आम्हीं या किल्ल्याला भेट दिली होती. परंतु किल्ल्याचा हा भाग आमच्या पाहण्यांत आला नव्हता. हॅम्लेट व ऑफिलियाचे पुतळे पाहून हॅम्लेट नाटकाचें कथानक डोळ्यांसमोरून झटकन गेलें.

एल्सिनोरमधील आमची ही शेवटची रात्र. या प्रसंगीं मिसेस लारसन यांनीं आमचीं छायाचित्रें घेतलीं. ही मंडळी काल मला न भेटल्यामुळें आज त्यांनीं माझ्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या व कोकोपान केलें. उद्यां पांच तारखेला एरिक ओल्सन यांचा वाढदिवस असल्यामुळें बारा वाजेपर्यंत आपण सर्वांनीं बसावें व बारा वाजल्यानंतर एरिकच्या वाढदिवसानिमित्त त्याचें शुभचिंतन करून मग परत जावें असें ठरलें. ज्याचा वाढदिवस असेल त्याच्यासाटीं 'He is a jolly good fellow' या अक्षरांनीं सुरुवात होणारें एक गाणें म्हणण्याचा येथें प्रघात आहे. काल युनेस्कोच्या सर्व लोकांनीं हें गाणें गायिलें होतें. आज येथें तें पुन्हा ऐकायला मिळालें! बारा वाजल्यानंतर एरिकचें आम्हीं शुभचिंतन केलें व जमलेल्या सर्व मंडळींनीं तारस्वरांत तेंच गाणें पुन्हां गायिलें. पुन्हां कोकोपानाचा कार्यक्रम झाला; छोटींशीं भाषणें झालीं व त्यानंतर Goodbye to Elsinore असें म्हणत आम्ही बाहेर पडलों.

गेल्या तीन महिन्यांत येथील लोकांनीं आम्हांला खूप चांगल्या रीतीनें वागविलें. येथील सर्व संस्था पाहण्याची त्यांनीं आम्हांला संधि दिली व आमच्या गरजांकडे आपुलकीनें लक्ष दिलें. आमच्यावर त्यांनीं अकृत्रिम प्रेम केलें. त्या सर्व स्मृतींची आठवण करीत आम्हीं उर्वरित रात्र घालविली. उद्यां पहाटे उठून आम्हीं कोपनहेगनला जाणार !

५ सप्टेंबर ५४

ज्या एल्सिनोरमध्यें आम्हीं गेले कांहीं दिवस राहिलों, त्या एल्सिनोरचा व तेथील सर्व मंडळींचा आज सकाळीं आम्हीं निरोप घेतला. आगगाडीनें आम्ही कोपनहेगनला जायला निघालों. डॉ. मॅनिकी स्टेशनवर आले होते. त्यांनीं पुन्हा एकदां डेन्मार्कमधील लोकशाळांची कल्पना भारतामध्यें कशी रुजवितां येईल याबाबत आमच्याशीं चर्चा केली. नंतर त्यांनीं आम्हांला प्रेमाचा निरोप दिला.

कोपनहेगन स्टेशनवर डेन्मार्कमधील शिक्षणखात्यांतील एक अधिकारी मिस्टर ऑब्लिग हजर होते. आजचा दिवस आम्हीं त्यांच्या घरीं घालवावा असा त्यांचा आग्रह होता. त्याप्रमाणें ते आम्हांला आपल्या घरीं घेऊन गेले. दुपारचें जेवण झाल्यावर, "कोपनहेगनमध्यें आतां तुम्हांला काय काय पाहावयाचें आहे, तें तुम्ही सांगा. आज तें तुम्हांला दाखविण्याची व्यवस्था करूं. आजचा कार्यक्रम तुमच्या संमतीनेंच ठरवावयाचा, असें मीं व मिसेस् ऑब्लिगनें ठरविलें आहे." असें मि. ऑब्लिग म्हणाले.

गेले कांहीं दिवस खूप कामांत गेल्यामुळें व येथून आतां उद्यां निघावयाचें असल्यामुळें फार भटकून आता पाहण्याची कांहीं इच्छा नव्हती. त्यांनीं आग्रह केल्यामुळें, आम्हीं येथील आर्ट गॅलरी पाहायला गेलों. ही चित्रशाळा १८९७ सालीं उघडण्यांत आली. १९०६ सालीं ती खूपच वाढविण्यांत आली. जगांतील अतिशय सुप्रसिद्ध असे कलांचे नमुने येथें पाहायला मिळतात. कार्ल जेकपसन यानें १८८२ सालीं हे नमुने गोळा करावयाला सुरुवात केली. डॅनिश व परदेशी कलाकारांच्या उत्कृष्ट कृती त्यानें गोळा केल्या होत्या. कार्लनें हा आपला सर्व संग्रह आपल्या मृत्युपत्रान्वयें डेन्मार्कमधील जनतेला बहाल केला. तो सर्व संग्रह या ठिकाणीं पहायला मिळतो. थोरव्हॉल्टसन या नांवाचा एक मोठा शिल्पकार डेन्मार्कमध्यें होऊन गेला. त्यानें डेन्मार्कमधील शिल्पकलेला युरोपमध्यें खूप मानाचें स्थान मिळवून दिलें. या शिल्पकाराच्या कलाकृती आम्हांला येथें पहायला मिळाल्या. त्यानंतर थोडा वेळ येथील सुप्रसिद्ध तिव्होलीमध्यें हिंडल्यावर आम्ही घरीं परतलों.

मि. ऑब्लिग हे एक विद्वान् गृहस्थ आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा त्यांनीं चांगला अभ्यास केला आहे. भारतानें गेल्या कांहीं वर्षांत केलेल्या प्रगतीची त्यांना जाणीव आहे. त्यांनीं शिक्षणशास्त्राचें देखील चांगलें अध्ययन केलें आहे. त्यांची पत्नी चांगली गायिका आहे. भारतामध्यें येऊन आपल्या गाण्याचे कार्यक्रम करण्याची मनीषा तिनें बोलून दाखविली. रात्रीच्या जेवणानंतर तिनें पियानोवर आम्हांला कांहीं गाणीं म्हणून दाखविलीं. उद्यां पहाटे लवकरच उठून प्रवास करायचा असल्यामुळें आम्हीं आपल्या यजमानांचा निरोप घेऊन आमच्या खोलींत विश्रांतीसाठीं गेलों.

६ सप्टेंबर ५४

सकाळीं लवकर उठून विमान कंपनीच्या कार्यालयामध्यें जाऊन हजर झालों. त्या ठिकाणीं थोड्याच वेळांत इंटरनॅशनल पीपल्स कॉलेजमधील प्राध्यापिका मिस् मोयूर, डॉ. पिटर मॅनिकी, रॉकॉस्ट स्कूलच्या चालिका मिस् युल, मिसेस् लारसन, तिचा मुलगा व सून, इत्यादि मंडळीं येऊन आम्हांला भेटली. यांपैकीं कांहींनीं विमान सुटेपर्यंत आमच्याबरोबर राहून आमचीं छायाचित्रें वगैरे घेतलीं. सर्वांचा निरोप घेऊन आम्ही विमानांत जाऊन बसलों. एक हिंदी बाई शेजारीं येऊन बसल्या. त्यांनीं आमची ओळख करून घेतली. या बाईचें नांव कुमारी गंगम्मा. त्या कूर्ग प्रांतांत राहणाऱ्या आहेत. डॉक्टरीची परीक्षा पास झाल्यावर त्यांनीं सिलोनमध्यें एका इस्पितळांत नोकरी धरली. तेथूनच उच्च शिक्षणासाठीं गेलीं दोन वर्षें लंडनमध्यें राहून त्यांनीं एक पदवी मिळविली. थोड्याच दिवसांनीं त्या सिलोनला परत जाऊन आपल्या कामावर रुजू होणार आहेत. डॉ. गंगम्मा म्हणाल्या, "लंडनमध्यें तुम्हांला जें जें पाहावयाचें असेल तें तें दाखवायला मी आज तुमच्याबरोबर येऊं शकेन. आज मला भरपूर वेळ आहे." डॉ. गंगम्मांना कानडी येत असल्यामुळें श्री गौडांना विशेष आनंद झाला.

आम्ही दुपारीं तीनच्या सुमारास लंडनच्या विमानतळावर उतरलों. तेथून हॉटेलमध्यें जाण्यासाठीं दुसऱ्या एका विमानतळापर्यंत बसनें आलों. त्या ठिकाणीं आल्यावर, आपला पासपोर्ट, तिकीट व इतर कांहीं कागद असें एक पॅकेट पूर्वीच्या विमानतळावर आपण विसरल्याचें श्री गौडा यांच्या लक्षांत आलें. परदेशामध्यें आपला पासपोर्ट हरवण्यासारखी दुसरी आपत्ति नाहीं. त्यामुळें आम्ही दोघें खूप गोंधळलों. डॉ. गंगम्मांनीं 'काय झालें' म्हणून तपास केला. मीं त्यांना झालेली हकीकत सांगितली. त्या म्हणाल्या, "तुम्ही कांहीं काळजी करूं नका. आपली वस्तु कोठें विसरलों, याची जर आपणांस निश्चित कल्पना असली तर ती वस्तु खात्रीनें जाणार नाहीं. मी सर्व व्यवस्था करतें." त्याप्रमाणें त्यांनीं टेलिफोन केला; आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं सुमारें सातच्या सुमारास सर्व कागदपत्र आम्हीं जेथून टेलिफोन केला होता त्या ठिकाणीं आम्हांस मिळाले. डॉ. गंगम्माला तेथील अधिकाऱ्यानें, "सात वाजतां तुम्ही बोलतां त्या ठिकाणीं या. तोंपर्यंत तुमचे कागदपत्र येथें मिळाल्यास आम्ही

पाठवून देऊं" असें सांगितलें होतें. सर्व कागद, विशेषतः पासपोर्ट आणि तिकीट, मिळाल्यामुळें श्री गौडाजी पुन्हा खुषींत आले.

विमानांतून उतरतांना मला थोडासा फटका बसला. माझें सामान वजनांत थोडेंसें जास्त भरलें. त्यामुळें लंडन ते कोपनहेगन या प्रवासांत मला जवळ जवळ ३५ रुपये भूर्दंड भरावा लागला. याच हिशेबानें लंडन ते मुंबई प्रवास करतांना मला खूप पैसे भरावे लागतील, अशी भीति निर्माण झाल्यामुळें मी थोडा अस्वस्थ झालों. सामान टाकून देणें शक्य नाहीं व नेणें परवडणार नाहीं. मी अस्वस्थ असल्याचें डॉ. गंगम्मांच्या लक्षांत आलें व त्यांनीं मला, "तुम्ही कसला विचार करतां? मी तुम्हांला कांहीं मदत करूं शकतें का?" असें विचारलें. मीं माझी अडचण त्यांना समजावून सांगितली. त्या म्हणाल्या, "सुमारें महिनाभरानें मी सिलोनला जायला निघणार आहें. माझी आगबोट बहुधा मुंबईवरून जाईल. जें सामान तुम्हांला तिथें गेल्याबरोबर लागणार नाहीं, तें एका बॅगमध्यें भरून मजजवळ द्या. मी तें तुम्हाला पोहोंचविण्याची व्यवस्था करीन. यदाकदाचित् माझी आगबोट मुंबईला लागली नाहीं, तर मी तुमची बॅग कोणत्या तरी मार्गानें पोहोंचविण्याची व्यवस्था करीन. तुम्ही निर्धास्त राहा. बॅगचा विचार आतां डोक्यांतून काढून टाका. You simply forget it."

नंतर आम्ही लंडनमधील हॅटेल हॉवर्ड या ठिकाणीं मुक्कामासाठीं गेलों. तेथें सामान ठेवल्यावर, डॉक्टरबरोबर आम्ही लंडन शहर पाहण्यास निघालों. "लंडनमधील तुम्हांला कोणता भाग बघावयाचा आहे?" असें गंगम्मानें पुन्हा एकदां आम्हांला विचारलें. त्यावर मी म्हणालों, "इंग्रजी कादंबऱ्यांतून व वर्तमानपत्रांतून ज्या भागांबद्दल आम्ही नेहमीं वाचीत असतों, तो भाग आम्हांला दाखवा. उदाहरणार्थ: Ten Downing Street, हाइडपार्क, फ्लीट स्ट्रीट, रिजेंट पार्क वगैरे. जमल्यास आम्हांला ट्यूब रेल्वेंतूनसुद्धां जावयाचें आहे." असा प्रवास मीं ऑस्ट्रेलियांत असतांना केला होता. पण लंडनमधील ट्यूब रेल्वेबद्दल खूप वेळां वाचल्यामुळें मला त्या रेल्वेनें प्रवास करण्याची फार इच्छा होती. हीं सर्व प्रमुख स्थळें डॉ. गंगम्मानें आम्हांस दाखविलीं. बसनें, ट्यूब रेल्वेनें, त्यांनीं आम्हांला चांगलेंच हिंडविलें.

"गेल्या महायुद्धांत लंडन शहरावर खूप वेळां बॉम्बवृष्टि झाली. या हल्ल्याला बळी पडलेला एखादा भाग आम्हांला पाहायला मिळेल का?" असें

मी गंगम्माला विचारलें. त्यावर त्या म्हणाल्या, "एलिझाबेथच्या राज्यारोहणा-समारंभाच्या निमित्तानें अशा भागांची फार झपाट्यानें डागडुजी करण्यांत आली आहे. तथापि आपण एके ठिकाणीं जाऊं या. तेथें तुम्हांला बॉम्बहल्ल्याच्या दुष्परिणामाचें दृश्य पाहायला मिळेल." थोड्या वेळानें आम्ही एका विभागांत दाखल झालों. रस्त्याच्या बाजूला असलेला दर्शनी भाग नव्यानें बांधण्यांत आला होता. पण थोडें आंत जाऊन पाहिल्यावर आधुनिक महायुद्धाचे परिणाम किती भयंकर असतात व त्यांच्या दारुण स्मृती किती भयानकपणें दीर्घकालपर्यंत रेंगाळत राहतात, याची स्पष्ट कल्पना आली. मानवानें आपल्या बुद्धीचा वापर करून कमींत कमी वेळांत जास्तींत जास्त माणसांचा संहार करण्याचें तंत्र शोधून काढलें व त्याचे भीषण परिणाम, किती तरी निरपराध जीवांना भोगावे लागले!

आम्ही रस्त्यानें प्रवास करीत असतांना, आम्हांला बरेच हिंदी पुरुष दिसले. कांहीं स्त्रिया पण दिसल्या. कोपनहेगनमध्यें हिंदी माणूस दिसल्याबरोबर त्याच्याकडे दुसरा हिंदी जशी धांव घेतांना दिसला तसें लंडनमध्यें होत नाहीं. लंडनमध्यें खूप भारतीय आहेत. आपल्या देशबांधवांना दररोज पाहण्याची त्यांना संवय लागल्यामुळें रस्त्यानें जाणारा एक भारतीय बाजूनें जाणाऱ्या दुसऱ्या भारतीयाची दखल सुद्धां घेत नाहीं. आपल्या देशबांधवांची ही वृत्ति आम्हांला मोठी चमत्कारिक वाटली.

लंडनमध्यें हिंदी लोकांनीं चालविलेलीं कांहीं भोजनगृहें आहेत. गंगम्माच्या सूचनेवरून अशाच एका भोजनगृहांत आज आम्ही जेवयला गेलों. खूप दिवसांनीं गव्हाची चपाती व चांगलें हिंदी जेवण खायला मिळालें. या भोजन-गृहांत गोऱ्या लोकांची गर्दी विशेष होती. "एवढ्या मोठ्या प्रमाणांत हे गोरे लोक येथें कसे?" असें मीं विचारतांच गंगम्मा म्हणाल्या, "ज्या इंग्लिश लोकांनीं नोकरीच्या निमित्तानें भारतांत किंवा सिलोनमध्यें कांहीं वर्षें काढलीं, त्यांना मसाले घातलेलें जेवण घेण्याची संवय लागलेली आहे. आतां त्यांना इंग्लिश जेवण बेचव वाटतें व म्हणून मधून मधून ही सर्व मंडळी भारतीय पद्धतीचा खाना खाण्याकरितां येथें नेहमीं येत असतात. लंडनमधील सर्व हिंदी हॉटेलांत गोऱ्यांची गर्दी आढळते."

रात्रीं जवळ जवळ ११॥–१२ पर्यंत हिंडून आम्हीं जेवढें लंडन पाहतां येईल तेवढें पाहण्याचा प्रयत्न केला. डॉ. गंगम्मा जर भेटल्या नसत्या तर हा लाभ

आम्हांला झाला नसता. लंडनसारख्या परक्या शहरांत डॉ. गंगम्मा अत्यन्त आत्मविश्वासानें व हुषारीनें फिरतांना पाहून आम्हांला खूप कौतुक वाटलें. लंडनसारख्या खूप गजबजलेल्या व गर्दीच्या शहरांतून हिंडतांना डॉ. गंगम्मांची आम्हांला खूप मदत झाली. आमचा कोणत्याहि प्रकारें पूर्व परिचय नसतांना या बाईनें आमच्यासाठीं जी मेहनत घेतली व आमच्याबद्दल जी आपुलकी व्यक्त केली त्याबद्दल तिचे आभार मानावे तितके थोडेच! हिलेरॉड येथील आमच्या वास्तव्यांत आम्हांला गंगम्माच्या विरुद्ध स्वभावाची एक भारतीय बाई भेटली होती. तिचें वागणें इतकें घमेंडखोरपणाचें होतें कीं, तिला भारतीय महिलांचा नमुना म्हणून परदेशांत पाठविणें धोक्याचें होतें! भारतीय महिला कशी नसते तें या बाईकडे पाहिल्यावर कोणालाहि समजून आलें असतें; व ती नेमकी कशी असते याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ. गंगम्मा!

७ सप्टेंबर ५४

सकाळीं न्याहरीनंतर आम्ही विमानतळावर जायला निघालों. डॉ. गंगम्मा लवकर उठून आम्हांला निरोप देण्यासाठीं आल्या होत्या. या वेळीं घडलेला एक प्रसंग माझ्या विशेष लक्षांत राहिला आहे. हॉटेलमध्यें उतारूंना मदत करण्यासाठीं एक नोकर असतो. या नोकराला डॉ. गंगम्मानीं टॅक्सी आणण्यास सांगितलें. त्यानें टॅक्सी आणली. टॅक्सीवाल्याला प्रवासाबाबत त्यांनीं कांहीं सूचना केल्या. हॉटेलचा नोकर मध्येंच कांहीं सांगूं लागला. त्याच्या म्हणण्याचा आशय असा होता कीं, या दोघांचें सामान त्या मोटरींतून जाणार नाहीं. डॉक्टरनीं त्याला सांगितलें कीं मी आणि टॅक्सीवाला आम्ही बघून घेऊं. तथापि त्यानें टॅक्सींत सामान ठेवतांना पुन्हा तीच बडबड सुरू केली. त्या वेळीं डॉ. गंगम्मा संतापल्या व "तूं येथून चालता हो. आमच्या कामांत मध्यें बोलूं नकोस," असें अत्यंत कडक शब्दांत त्याला म्हणाल्या. त्याचा चेहरा एकदम पडला. तो टॅक्सीवाला, मी व गौडा आम्ही तिच्याकडे पाहतच राहिलों. गोऱ्या लोकांच्या देशांत एका भारतीय महिलेनें दाखविलेली ही तडफ पाहून मला सकौतुक आश्चर्य वाटलें. मी गंगम्माला म्हणालों, "तुमची धिटाई पाहून मला जरा चमत्कारिक वाटलें." त्या म्हणाल्या, "या लोकांना कळलें पाहिजे कीं, शहाणपणाचा मक्ता त्यांच्याच

जवळ नाहीं. चार गोष्टी त्यांच्याप्रमाणें आम्हांला सुद्धां समजतात. आम्ही गुलाम होतों, तेव्हां साहेबाची मिजास संभाळली; पण आतां आम्हीं स्वतंत्र देशाचे नागरिक आहोंत, हें या लोकांनीं विसरतां कामा नये."

सुमारें दहाच्या सुमारास आमचें विमान सुटलें. आगगाड्या जशा कधीं उशीरा सुटतात, तसें विमानसुद्धां उशिरा सुटूं शकतें. आमच्या विमानाला सुटायला जवळ जवळ तासभर उशीर लागला. १२॥ च्या सुमारास आम्ही जर्मनींतील 'डॅसलडॉर्फ' नांवाच्या विमानतळावर उतरलों. लंडनला श्री. गौडा फ्रान्सला जाणाऱ्या विमानांत बसायला गेले. ते पॅरिसला तीनचार दिवस राहणार होते. पॅरिस पाहण्याची मलाहि खूप इच्छा होती. परंतु एक तर मला रजा नव्हती व दुसरी गोष्ट म्हणजे खर्च पण खूप होईल असें दिसलें. पुन्हा केव्हां तरी योग असला तर पॅरिसला आपण खास येऊं, अशी मीं मनाची समजूत करून घेतली. येथून माझा प्रवास एकट्यानेंच होणार होता; पण लंडनला आमचे मित्र श्री बर्कतअल्ली फिराक अनपेक्षितपणें आमच्या विमानांत दाखल झाले. ते आल्यामुळें पुढील प्रवास चांगला होईल असें वाटून आनंद झाला. डॅसलडॉर्फला विमान लागेपर्यंत फिराक माझ्या शेजारीं बसूं शकले नाहींत, परंतु येथून पुढें मात्र आम्हांला शेजारीं बसून प्रवास करतां आला.

डॅसलडॉर्फ विमानतळावर सर्व ठिकाणीं जर्मन भाषा ऐकूं येऊं लागली. आम्हांला जर्मनीमधील एक शब्द पण समजत नव्हता. या ठिकाणीं दुपारचें जेवण व्हायचें होतें. जेवणाची सर्व सिद्धता झाली होती. कांहीं न बोलतां खुणांनीं जेवढें जमेल तेवढेंच काम करणें भाग पडलें होतें. येथें विमान अंदाजें दीड तास थांबलें. विमानतळ सोडून आम्ही बाहेर जाऊं शकलों नाहीं. बोलतां बोलतां मी बरकतअल्लींना म्हणालों, "जग किती लहान झालें आहे पाहा. आपण सकाळचा नाष्टा लंडनमध्यें घेतला. दुपारचें जेवण जर्मनींत झालें. संध्याकाळचा चहा इटलींत होईल व रात्रीची कॉफी आपण ईजिप्तमध्यें कैरोला पिऊं. उद्यां सकाळच्या जेवणाला आपण मुंबईत हजर राहूं."

थोड्या वेळानें विमान सुटलें व दुपारीं ४ च्या सुमारास आम्ही इटलीमधील रोमच्या विमानतळावर उतरलों. आमच्या विमानांत एक दक्षिणी जोडपें होतें. रोमच्या विमानतळावर त्यांची आमची ओळख झाली. तपासाअंतीं असें समजलें कीं, हे गृहस्थ पुण्यांतीलच रहिवासी आहेत. त्यांचें नांव पाठक. ते

विमानखात्यांतील एक अधिकारी आहेत. सौ. पाठकांना घेऊन ते कांहीं दिवस शिक्षणासाठीं लंडनमध्यें राहिले होते. मी त्यांना पाहिल्याबरोबर ओळखूं शकलों नाहीं; परंतु बोलतां बोलतां ते एकदां माझ्या घरीं पुण्यांत येऊन गेल्याचें त्यांनीं सांगितलें. श्री व सौ. पाठक भेटल्यामुळें आम्हांला आनंद वाटला. आमच्या विमानांत मुंबईला राहणारें एक पारशी जोडपें पण भेटलें. टोरँटो येथें भरलेल्या सोशल सर्व्हिस परिषदेसाठीं हें जोडपें गेलें होतें. त्यांच्याबरोबर त्याच परिषदेला गेलेल्या एक गुजराथी बाई व एक पारशी सद्‌गृहस्थ होते. रोमच्या विमानतळावर या सर्व सहप्रवाशांची ओळख झाली. व्यापारानिमित्त इंग्लंडला आलेले माखणवाला नांवाचे एक गुजराथी गृहस्थ पण भेटले. माझ्या धाकट्या भावाचा व त्यांचा परिचय असल्याचें त्यांनीं सांगितलें. मला गुजराथी बोलतां येत असल्यामुळें हे पार्शी व गुजराथी माझ्याशीं आपुलकीनें बोलूं लागले. रोमच्या विमानतळावर मिळालेला वेळ अशा प्रकारें आम्हीं खर्ची घातला. रोम शहरांत जायला मिळालें असतें तर खूप आनंद वाटला असता; परंतु शहरांत जातां येणें शक्य नव्हते. त्यामुळें दुधाची तहान ताकावर भागविण्यासाठीं रोम शहराची कल्पना आणून देणारीं जीं छायाचित्रें विमानतळावरील दुकानांत विक्रीसाठीं ठेविलीं होतीं, त्यांतून कांहीं निवडून आम्हीं खरेदी केलीं. इटली देशांतील कन्फेक्शनरी (मिठाई) खूप प्रसिद्ध आहे. त्यापैकीं कांहीं नमुना घेण्याचा आम्हीं प्रयत्न केला. अत्यंत कलात्मक पेटीमध्यें ठेविलेली चॉकोलेट मीं छोट्या प्रतिभेसाठीं विकत घेतली. बरोबरच्या इतर प्रवाशांनीं पण अशाच कांहीं वस्तू खरीदल्या. त्यानंतर सूचना मिळाल्याबरोबर आम्ही विमानांत जाऊन बसलों. आतां पुढील मुक्काम कैरोला व त्यानंतर मुंबईत!

अशा प्रकारें मुंबईला लवकर पोहोचण्याची आम्ही अपेक्षा करीत होतों. रात्रीं बाराच्यापुढें आम्ही कैरोला जाऊन पोहोंचलों. रोम ते कैरो या प्रवासांत आमच्या विमानांत बिघाड झाला होता. ही गोष्ट आमच्या लक्षांत आली नव्हती. आम्ही कैरोला जाऊन पोहोंचलों. नेहमींप्रमाणें खालीं उतरण्याची घाई आढळून आली नाहीं. पहिली सूचना अशी आली, 'तुम्ही उतरतांना आपल्या हँडबॅग्ज बरोबर घ्या.' परंतु अद्यापि शिडी मात्र लागली नव्हती. १०–१५ मिनिटांनीं पुन्हां एक आणखी सूचना आली. आणखी पंधरा मिनिटांनीं असें सांगण्यांत आलें कीं, 'कैरोला एक दोन तास थांबावें लागेल.' नंतर आम्ही विमानतळावर

आलों. त्या ठिकाणीं आम्हांला कॉफी देण्यांत आली. 'कैरोला आपणांला अधिक वेळ थांबावें लागेल. आपण सर्वजण येथील एका हॉटेलमध्यें जाऊं या. तुमचें विमानांतील सर्व सामान येथें आणलें आहे. तें नीट पारखून बरोबर घ्या,' असें आम्हांला सांगण्यांत आलें. त्या सूचनेप्रमाणें आम्ही आपआपलें सामान घेऊन बसमध्यें जाऊन बसलों. पहाटे चारला आम्ही हॉटेल व्हिक्टोरिया येथें जाऊन पोहोंचलों. त्या ठिकाणीं गेल्यावर आमचें विमान बिघडल्याची बातमी जाहीर करण्यांत आली. एखादा मनुष्य आकस्मिक कारणानें जर मेला, तर त्याच्या नातेवाईकांना ती बातमी जितक्या सावधगिरीनें सांगतात, तेवढ्याच सावधगिरीनें विमान बिघडल्याची बातमी आम्हांला सांगण्यांत आली. आम्ही ज्या विमानानें आलों, त्या विमानाचें नांव 'झांशी की राणी'. ही राणी मध्येंच कां रुसली, याचा तपास करतां असें कळलें कीं, तिचें चारांपैकीं एक एंजिन बंद पडलें होतें; व कदाचित् एकामागून दुसरें, दुसऱ्यामागून तिसरें एंजिन बंद पडण्याची भीति होती. वैमानिकानें अत्यंत हुशारीनें कैरोचा किनारा गांठला होता. माझ्याबरोबरचा पार्शी गृहस्थ मला म्हणाला, "आपणांवर परमेश्वराची खरोखर कृपा आहे. हें इंजिन रोम ते कैरो या रस्त्यामध्यें बंद पडलें, म्हणून ठीक झालें; जर कां कायरो सोडल्यावर तें बिघडलें असतें, तर मोठी आपत्ति आली असती!" कायरो ते मुंबईमध्यें विमान उतरवायला सोयीची जागा नाहीं. हा अपघात जर कायरो सोडल्यावर झाला असता तर? तर हें प्रवासवर्णन लिहिण्याची संधीच मिळाली नसती! सर्व मंडळी सुटकेचा श्वास टाकीत होती! त्याचबरोबर आतां पुढला प्रवास केव्हां व कसा सुरू होणार, याचाहि विचार करण्यांत सर्वजण गढून गेले होते. "आपण ठराविक वेळीं मुंबईला पोंहचूं शकत नाहीं; सबब ज्याला कुणाला घरीं तारा करावयाच्या असतील, त्यांनीं त्या झटकन आम्हांला लिहून द्याव्यात. सकाळीं नऊ वाजेपर्यंत आपण येथें आराम करावा. न्याहारीनंतर पुढील प्रवासाबाबत आम्ही कांहींतरी तुम्हांला निश्चित सांगूं शकूं" असें स्थानिक अधिकाऱ्यानें आम्हांला सांगितलें. घरीं पाठविण्यासाठीं तारा लिहून देऊन आम्ही आमच्यासाठीं ठेवलेल्या खोलींत गेलों. आतां पहाटेचे ५ वाजले आहेत. सारी रात्र जागरण झाल्यामुळें बिछान्याला पाठ लावण्याची गरज फार वाटूं लागली आहे!

८ सप्टेंबर ५४

सकाळीं फेरीवाल्यांच्या आरडाओरडीनें जागा झालों. परदेशामध्यें फेरीवाले रस्त्यानें अशा प्रकारें आरडाओरड करून आपला माल विकीत नाहींत. त्यामुळें गेले तीन महिने असले आवाज कानांवर पडले नव्हते. हे आवाज ऐकून आपण घराच्या जवळपास आलों, याची जाणीव झाली. उठून खिडकींतून आजूबाजूला नजर टाकिली तों आपण कैरोंत आहोंत कीं मुंबईत आहोंत, याबद्दल भ्रम वाटूं लागला. मुंबईतील भेंडीबाजार, महमदअल्ली रोड, या भागांत जी वर्दळ दिसते, तीच या रस्त्यांवर दिसत होती. सकाळची न्याहारी झाल्यावर कपडे करून आम्ही प्रवासाच्या तयारीनें खालीं आलों असतां, "सकाळीं विमान सुटणार नाहीं, आणखी कांहीं तास येथें थांबावें लागेल. येथील वेळेचा सदुपयोग आपणाला करितां यावा म्हणून आम्हीं आपल्याकरितां सफरीचा कार्यक्रम आंखला आहे. कैरोमधील प्रेक्षणीय स्थळें मुख्यतः पिरॅमिड्स आपणांला दाखविण्यांत येतील; तेव्हां कृपा करून आपण सर्वांनीं आलेल्या बसमध्यें बसावें." असें आम्हांला सांगण्यांत आलें.

कैरो शहर पाहण्याकरितां एखादा अधिक दिवस येथें घालवावा लागेल व त्या दिवशीं पिरॅमिड्स पाहायला मिळतील, अशी जर आधींच कल्पना असती तर येथें थांबण्याचें कांहीं वाटलें नसतें; परंतु आमचें विमान मोडलें आहे, तें केव्हां नीट होईल याचा अंदाज नाहीं, दुसरें विमान केव्हां येईल याची निश्चित कल्पना नाहीं, अशा अनिश्चित मनःस्थितींत पिरॅमिड्स पाहण्याची आलेली संधि फारशी चांगली वाटली नाहीं. आपलें विमान निर्जन अशा साहरा वाळवंटांतील एखाद्या जागीं थांबलें असतें, तर आपण काय केलें असतें? त्यांतल्या त्यांत भाग्याची गोष्ट अशी कीं, कैरोसारख्या सुप्रसिद्ध शहरीं तें येऊन थांबलें आहे व त्यामुळें पिरॅमिड्स पाहण्याची संधि आपणांला मिळाली आहे, असे विचार मनांत येत होते तोंच बस चालू झाली. कैरोच्या रस्त्यानें जातांना बुरखे घेतलेल्या अरब स्त्रिया पाहिल्या. हॉटेलच्या बाहेर खाटा टाकून गप्पा मारीत बसलेले निरुद्योगी पुरुष पाहिले. तार स्वरांत वाजणारे ग्रामोफोन हॉटेलमधून ऐकूं येऊं लागले. हीं सर्व दृश्यें पाहून आपण पौर्वात्य शहरांत आल्याची वरचेवर जाणीव होत होती. गोरे प्रवासी येथें वरचेवर येत असल्यामुळें प्रवाशांच्या गळ्यांत

आपला माल बांधून त्यांच्यापासून जास्तींत जास्त फायदा उपटण्याची संवय येथील लोकांना लागलेली दिसली. आमच्या हॉटेलच्या दारांत विविध वस्तू विकणाऱ्या फेरीवाल्यांची टोळधाडच जमली होती. तीर्थांच्या ठिकाणीं यात्रेकरूंवर भटभिक्षुक जशी झडप घालतात, त्याच प्रकारें या विक्रेत्यांनीं आम्हांला घेरून घेतलें. कामचलाऊ इंग्रजी व तितक्याच बेताचे फ्रेंच या दोन भाषांचा वापर करून आपला माल ते प्रवाशांना विकण्याची धडपड करीत होते. मुंबईतील फेरीवाल्यांच्या मानानें हे लोक विशेष हुशार वाटले.

बसनें आम्ही कैरो शहराचें धांवतें दर्शन घेत तेथील सुप्रसिद्ध म्युझियममध्यें आलों. त्या ठिकाणीं अनेक चांगल्या चांगल्या गोष्टी आम्हीं पाहिल्या. आल्याबरोबर येथें आमचे गट पाडण्यांत आले; व प्रत्येक गटाला एक वाटाड्या (Guide) देण्यांत आला. फ्रेंच बोलणारे लोक फ्रेंच जाणणाऱ्या वाटाड्याबरोबर गेले. मला या वाटाड्यांचें फार कौतुक वाटलें. कैरोमधील लोकांनीं हा एक नवीन धंदा शोधून काढला आहे. वाटाड्याचें काम तें अतिशय चांगल्या रीतीनें करतात. प्रत्येक वस्तूची माहिती सांगतांना त्याचा पूर्व इतिहास अस्खलितपणें ते सांगतात. ही माहिती सांगतांना आमचा वाटाड्या फारच चांगलें इंग्रजी बोलत होता. तपासाअंतीं त्याचें शिक्षण फारसें झालेलें नव्हतें, असें समजलें. परंतु गेलीं कित्येक वर्षें हा धंदा तो करीत असल्यामुळें तो आपल्या कामांत खूप निष्णात झाला होता. या ठिकाणीं आम्हीं इतक्या चांगल्या वस्तू पाहिल्या कीं, त्यांची सविस्तर माहिती सांगण्यासाठीं एक स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागेल. अनेक प्रकारचीं मौलिक रत्नें येथें होतीं. आमच्याबरोबर ज्या स्त्रिया होत्या, त्या या रत्नजडित वस्तू पाहण्यांतच गुंग झाल्या होत्या. ईजिप्तमधील पूर्वीच्या मोठमोठ्या राजांनीं आपल्या मृत्यूनंतर आपलें प्रेत सुरक्षित ठेविण्यासाठीं, आपल्या नजरेसमोर वेगवेगळ्या शवपेटिका तयार केल्या होत्या. या शवपेटिकांमध्यें, सोनें, चांदी व दगड यांचा वापर करण्यांत आला होता. पुढेंमागें सोन्याच्या लोभानें आपल्या शरीराला कोणीं धक्का देऊं नये, म्हणून प्रत्येक शवासाठीं तीन तीन पेटिका तयार करण्यांत आल्या होत्या. मौल्यवान् रत्नें व वस्त्रें घालून प्रेत प्रथम सुवर्णपेटिकेंत ठेवण्यांत येई, नंतर ती पेटिका एका चांदीच्या पेटिकेंत ठेवण्यांत येई, या दोन्ही पेटिका एका दगडाच्या पेटिकेंत ठेवण्यांत येत व शेवटच्या पेटिकेवर त्या व्यक्तीचें चित्र कोरण्यांत येत असे. मला वाटलें

कीं, या राजांचा सर्व वेळ आपलें मरणोत्तर जीवन चांगलें कसें जाईल याचा विचार करण्यांत व त्याची तयारी करण्यांतच गेलेला असावा.

हा म्यूझियम पाहून झाल्यावर आम्हीं कैरोमधील दुसरीं कांहीं इतिहासप्रसिद्ध स्थळें पाहिलीं. नंतर जेवण घेण्याकरितां दुसऱ्या एका हॉटेलांत गेलों. पूर्वी आम्हांला तेथें असें सांगण्यांत आलें होतें कीं, १२-१२॥ वाजेपर्यंत आपलें विमान दुरुस्त होईल व जेवण झाल्याबरोबर आपणांला पुढील प्रवास करतां येईल. परंतु आम्ही जेवायला गेलों असतांना जाहीर करण्यांत आलें कीं, 'आमचें विमान ताबडतोब दुरुस्त होण्याची आशा नाहीं. आमच्यासाठीं हिंदची राजकन्या (Princess of Hind) या नांवाचें दुसरें विमान तयार ठेवण्याची खटपट चालू आहे. ४-४॥ चे सुमारास निघूं शकूं. तोंपर्यंत आम्ही जाऊन पिरॅमिड्स पाहून यावें. आमचें जेवण झाल्याबरोबर आम्हांला नेण्यासाठीं घोडे, उंट, गाढव व एक टांगा इतकीं वाहनें तयार आहेत. वाटेल तें वाहन आम्हीं निवडावें. वाहनाबरोबरचा मनुष्य आम्हांला काळजीपूर्वक घेऊन जाईल व सुखरूप परत आणील.'

काल कैरोला लागल्यापासून हॉटेलमध्यें राहण्याचा, जेवणाखाण्याचा, वाहतुकीचा, निरनिराळीं स्थळें पाहण्याचा व वाटाड्यांबद्दलचा जो जो खर्च झाला किंवा होत आहे तो सर्व विमान कंपनीमार्फत केला जाणार आहे. प्रत्येक शहरांतील चांगल्यांतलीं चांगलीं हॉटेलें त्यांनीं प्रवाशांसाठीं ठरवून ठेविलेलीं असतात. कंपन्यांच्या मोठ्या बसेसमधून उतारूंची नेआण करण्यांत येते. एकंदरींत विमानाच्या प्रवासांत उतारूंना खूप सुखसोयी मिळतात. कैरो येथील सर्व खर्च विमान कंपनीनें केल्यामुळें, आम्हांला हीं सर्व ठिकाणें पाहणें शक्य झालें.

जेवण झाल्याबरोबरच आम्ही बाहेर आलों. ते वाटाडे आमची वाट पाहत उभेच होते. आमच्यापैकीं बऱ्याचजणांनीं उंट पसंत केले. एकदोन युरोपियन मुलांची नजर पांढऱ्या शुभ्र गाढवाकडे गेली. गाढव हा प्राणीसुद्धां मोहक दिसूं शकतो या गोष्टीवर कैरोमधील गाढव पाहीपर्यंत माझा विश्वास बसला नव्हता. येथें गाढव व उंट हीं वाहतुकीचीं साधनें आहेत. उंटावरून आम्ही पिरॅमिड्सजवळ आलों. जेवण झाल्याबरोबर लागलीच उंटावर बसल्यामुळें आपणाला त्रास होईल असें आमच्यापैकीं प्रत्येकाला वाटलें, परंतु तसा कांहीं त्रास झाला नाहीं. पिरॅमिड्सचें दर्शन आम्हीं त्यांच्या पायथ्याशीं उभे राहून घेतलें. या ठिकाणीं कांहीं अरब प्रवाशांकडून पैसे मिळविण्यासाठीं पिरॅमिडवर

चढण्याचा एक उपक्रम करतात. आम्ही गेल्याबरोबर असे चारदोन अरब आमच्याभोंवतीं जमले. आम्हीं पिरॅमिडवर चढून दाखवितों, असें त्यांनीं सांगितलें व नंतर त्यांच्यापैकीं एकाला त्यांनीं वर पाठविलें. तो झटकन वर चढला व तितक्यांत वेगानें खालीं परत आला व नंतर त्यांनीं आमच्याजवळून आपली दक्षिणा गोळा केली. या ईजिप्तमधील पिरॅमिड्सचें वर्णन यापूर्वी अनेक लोकांनीं केलेलें असल्यामुळें तें वर्णन करण्यांत वेळ घालविणें मला योग्य वाटत नाहीं. परंतु हे पिरॅमिड्स पाहिल्यावर प्राचीन काळच्या पौर्वात्य देशांतील कलावंतांनीं केलेल्या अपूर्व कामगिरीबद्दल खूप अभिमान वाटतो. गेलीं कित्येक वर्षें हे पिरॅमिड्स या ठिकाणीं 'उभे' आहेत व या कलावंतांच्या अमर कृतीचें ते जगाला प्रदर्शन दाखवीत आहेत. पिरॅमिड्स आम्ही पाहात असतांनाच असा संदेश आला कीं, आम्हीं लवकर परतावें; कारण 'हिंदची राजकन्या' प्रवाशांना घेऊन निघायला तयार झाली आहे. त्याप्रमाणें कांहीं वेळ आम्हीं उंटावरून प्रवास केला व पुन्हा बसनें निवासस्थानीं आलों. त्या ठिकाणीं आम्हीं चहा घेतला व आपआपलें सामान घेऊन विमानतळांवर येऊन पोहोंचलों. येथें आल्यावर असें समजलें कीं, विमान आठच्या सुमारास सुटेल! त्यानंतर जेवणाचा कार्यक्रम झाला. आठ वाजून गेले, पण कांहीं हालचाल दिसेना. आतां मात्र उतारूंचा धीर सुटत चालला. वैमानिकाच्या पोषाखांत दिसणाऱ्या माणसाला थांबवून नेमकें विमान केव्हां सुटेल, याचा अंदाज घेण्याची धडपड ही मंडळी करीत होती. या विमानतळावर ईजिप्तमधील कांहीं वस्तू विकण्याचीं दुकानें होतीं. त्या वस्तू पाहण्यांत कांहीं लोक कालक्षेप करीत होते. १० वाजेपर्यंत हाच प्रकार चालू होता. '१०। च्या सुमारास विमान सुटणार आहे, सर्वांनीं आपलें सामान घेऊन चलावें' अशी सूचना आली व अखेरीस १०॥ ला विमान सुटलें!

९ सप्टेंबर १९५४

रात्रभर विमानांतच होतों. कालचा सारा दिवस अस्वस्थ मनःस्थितींत व गडबडींत गेला. त्यामुळें सर्वजण खूप थकून गेले होते. साहजिकच सारी रात्र विश्रांति घेण्यांत घालवितां आली. सकाळचा वेळ उतरण्याची तयारी

करण्यांत गेला. विमान संथपणें चालू होतें. सप्टेंबरचा महिना असल्यामुळें वातावरण खूपच प्रसन्न होतें. कोणत्याहि प्रकारचा त्रास न होतां सांताक्रुझच्या विमानतळावर दुपारीं १२॥ च्या सुमारास मी येऊन उतरलों. माझी येण्याची वेळ निश्चित नसल्यामुळें विमानतळावर माझ्या स्वागतासाठीं कोणीहि हजर नव्हतें. तास दीड तास कस्टमच्या तपासणींत गेला व सर्व प्रवास निर्विघ्नपणें पार पडल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानीत मी विमानतळावरून बाहेर पडलों. टॅक्सीनें वांद्याला जाऊन मी वडिलांना भेटलों, पुण्याला तार केली व संध्याकाळीं डेक्कन क्वीननें पुण्याला परत आलों. या ठिकाणीं घरची मंडळी व इतर इष्टमित्र माझी वाट पाहात उभे होते. सुमारें शंभर दिवसांनीं मी स्वगृहीं परतलों.

# सिंहावलोकन

हॅन्स ख्रिश्चन अँडरसन हा डेन्मार्कचा सुप्रसिद्ध लेखक १८०५ ते १८७५ या काळांत होऊन गेला. त्यानें केलेलें डेन्मार्कचें वर्णन आजहि लागू पडतें. तो म्हणतो : खरोखरच डेन्मार्क नितांतरमणीय आहे. ठिकठिकाणीं हिरवींगार कुरणें पसरलेलीं आहेत. रस्त्याच्या बाजूला वनराजी दृष्टीस पडेल. येथील शेतामध्यें हिरवीं ओरसचीं रोपें दिसतील. ठिकठिकाणीं फुलझाडें दिसतील. हें निसर्गसौंदर्य पाहून कोणाच्याहि मनाला आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं.

डेन्मार्कची हवा हा येथील लोकांच्या संभाषणांतील मोठा आवडीचा विषय. दोन डेन भेटले कीं ते एकमेकांना विचारतील, " आज हवा कशी काय पडेल असें तुला वाटतें ? " कधीं कधीं तासातासाला हवेमध्यें बदल होतो. मे ते ऑगस्ट या महिन्यांमध्यें स्वच्छ सूर्यप्रकाश येथें मिळतो. डिसेंबर व जानेवारी या महिन्यांत सूर्यदर्शन फारच थोडा वेळ घडतें. फेब्रुवारी महिन्यांत थंडी कडाक्याची पडते, तर जुलै महिना खूप गरम असतो.

डेन्मार्कमध्यें दरवर्षी २० ते ३२ इंच पाऊस पडतो. बहुधा वर्षभर पाऊस पडत असतो. परंतु त्यांतल्या त्यांत ऑगस्ट व ऑक्टोबर या दोन महिन्यांत पाऊस अधिक पडतो. ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून एप्रिल अखेरपर्यंत रात्रीं धुकें पडतें. मे महिन्यापासून पुढील तीन महिने रात्रींसुद्धां उत्तरेकडून प्रकाश येतो. डेन्मार्कमध्यें सर्व प्रकारची हवा असू शकते. मात्र येथें अत्यंत कडाक्याची थंडी किंवा तीव्र उष्णता कधींच नसते. वर्षभर पाऊस पडत असल्यामुळें बरसाती (रेनकोट) कोटावांचून येथें कधींहि फिरतां येत नाहीं.

डेन्मार्कची लोकसंख्या ४२ लाख आहे. दर हजारीं जननाचें प्रमाण २३·४ तर मृत्यूचें प्रमाण १०·२ आहे. यामुळें डेन्मार्कमध्यें लोकसंख्या वाढती आहे. सर्वसाधारण डॅनिश पुरुषाचें आयुर्मान ६२·६५ वर्षें आहे. तर स्त्रियांमध्यें हें प्रमाण ६७·७० वर्षें आहे. दर कुटुंबामागें मुलांचें प्रमाण फक्त १·४ आहे.

जमिनीच्या वांटपाचा प्रश्न डेन्मार्कनें १७८७ सालीं सोडवायला सुरुवात केली. या वर्षी गुलामगिरींत खितपत पडलेला डॅनिश शेतकरी स्वतंत्र झाला. या लोकांना जमिनी खरीदण्यासाठीं सर्व प्रकारची मदत देण्यांत आली. १८९९ सालीं सरकारनें एक कायदा केला आणि या कायद्याप्रमाणें शेतकऱ्याला जमीन

घेण्यासाठीं व त्या जमिनीवर त्याचें घर बांधण्यासाठीं मदत देण्याची सरकारनें सत्ता मिळवली. आज सरकार शेतकऱ्याला जमीन घेण्यासाठीं व घर बांधण्यासाठीं कर्ज देतें. तें कर्ज खूप मुदतीनें तो शेतकरी फेडतो. अशा प्रकारें सरकारनें २५ हजार शेतकऱ्यांना मदत केली आहे.

डेन्मार्कमधील लोकांचा शेतकी हा महत्त्वाचा धंदा आहे. शेतीसाठीं फार मोठ्या प्रमाणांत यंत्रांचा उपयोग केला जातो. छोटे शेतकरी मात्र आपल्या कुटुंबियांच्या मदतीनें शेतीचें काम करतात. शेतकरी शेतीला जोडून गाई, डुकरें व कोंबड्या पाळतात. या जोडधंद्यामुळेंच येथील लोकांची परिस्थिति खूप चांगली आहे. मासेमारी करणें हाहि एक येथील महत्त्वाचा धंदा आहे. जवळजवळ २०,००० लोक मासेमारीचें काम करतात. डेन्मार्कमध्यें खाणी मुळींच नाहींत. तथापि ह्या देशांतील $\frac{१}{३}$ लोक निरनिराळ्या प्रकारच्या उद्योगधंद्यांमध्यें गुंतलेले आहेत. जहाजें बांधणें हाहि एक येथील मोठा धंदा आहे. येथें सिमेंटच्या गिरण्या खूप आहेत. बीटपासून साखर पण खूप मोठ्या प्रमाणांत येथें तयार होते.

आपल्या देशांत पाहुणे आले कीं, डॅनिश लोकांना खूप आनंद होतो. त्यांचें तें खूप कोडकौतुक करतात. दरसाल येथें खूप परदेशी येतात. त्यामुळें डॅनिश लोकांना आपल्या मातृभाषेखेरीज इंग्लिश, फ्रेंच, स्वीडिश, नॉर्वेजियन, जर्मन, स्पॅनिश, पोर्तुगीज इत्यादि भाषा येतात. सर्वसाधारणपणें प्रत्येक डॅनिश माणसाला एक तरी परकीय भाषा येतेच. परदेशांत आपले मित्र आहेत, हें सांगण्यांत डॅनिश माणसाला अभिमान वाटतो. बोलतांना नेहमीं आपल्या शिकागोमधील अथवा ऑक्सफर्डमधील मित्राचा उल्लेख करणें त्याला फार आवडतें.

पाहुण्यांना घरीं आग्रहानें बोलावून आणून त्यांना मेजवानी देणें डॅनिश माणसाला खूप आवडतें. पाहुणा घरीं आला कीं त्याच्यासाठीं चांगलें गलेलठ्ठ वासरूं मारण्यांत त्याला धन्यता वाटते. तो उगीच अवास्तव आदर दाखविणार नाहीं, पण तुमच्याशीं मोकळेपणानें वागेल. थोड्या वेळांत तो तुमचा दोस्त होऊन जाईल व पाहुण्याच्या स्वागतानिमित्त घरांत खूप गडबड उडवून देईल.

आपण खूप सुसंस्कृत लोक आहोंत, असें डॅनिश लोकांना मनापासून वाटतें. याचें एक कारण म्हणजे त्यांना परकीय भाषा येतात. दुसरें कारण म्हणजे त्यांच्यापैकीं प्रत्येकानें हॅम्लेट वाचलेलें आहे. आपल्या देशांत थोरव्हॉल्टसन यासारखा मोठा शिल्पकार होऊन गेला, हॅन्स ख्रिश्चन ॲन्डरसन यासारखा प्रसिद्ध लेखक

झाला, याचा त्यांना नेहमीं अभिमान वाटतो. ४०-४५ लाख लोकवस्तीच्या या देशांत फक्त दोनच माणसें निरक्षर आहेत, असें सांगण्यांत येतें. पण हीं दोन माणसें कोठें आहेत हें कोणालाहि माहीत नाहीं.

डॅनिश माणूस हा खाण्याचा खूप शोकी असतो. सर्वसाधारणपणें तो खूप खातो, पण घरीं पाहुणा आला तर त्या निमित्तानें तो अधिकच खातो. सकाळीं न्याहारीच्या वेळीं पाव, अंडीं, मुरंबा वगैरे पदार्थ त्याला लागतात. दुपारचें जेवण तो घरीं घेतो, अथवा बाहेर सुद्धां घेतो. काळ्या रंगाची रायपासून केलेली ब्रेड त्याला फार आवडते. या भाकरीनें माणसाची ताकद वाढते. परंतु परदेशी माणसांना ही भाकरी आवडत नाहीं. डॅनिश लोक गाईचें, डुकराचें मांस खातात. कधींमधीं ते कोंबड्या मारतात. येथें मासे खूप चांगले मिळतात. डेन्मार्कमध्यें भाज्याहि विविध प्रकारच्या मिळतात. परंतु भाज्या माणसांपेक्षां घरांतील जनावरांना घालण्यासाठींच वापरल्या जातात.

डेन्मार्कमध्यें फुलें खूप आहेत. घरांतील खिडक्यांतून फुलांच्या कुंड्या ठेवलेल्या आढळतात. डॅनिश लोक आपल्या मित्रांना भेटायला जातांना बरोबर फुलें घेऊन जातात. कधीं कधीं आपली भेटचिठ्ठी बरोबर पाठवून आपण जाण्याच्या आधीं फुलें पाठविण्याची येथें पद्धत आहे.

बहुधा संध्याकाळचें जेवण झाल्यावर येथील लोक मित्रांना भेटायला जातात. हें जेवण ६ ते ७ वाजतां होतें. त्यानंतर आठच्या सुमारास हे लोक आपल्या मित्रांकडे जातात व त्या ठिकाणीं गप्पा मारीत मध्यरात्रीपर्यंत बसतात. या वेळीं पाहुण्यांना कॉफी, खाण्याचे पदार्थ व मद्यें पण देण्यांत येतात. डेन्मार्कमध्यें सायकली खूप आहेत. रस्त्यांमधून सायकलींचा सुळसुळाट पाहिल्यावर परदेशी माणसाला असें वाटतें कीं या सर्व सायकली सरकारी मालकीच्या असाव्यात. परंतु तसें नाहीं. त्या २० लाख सायकली लोकांच्या मालकीच्या आहेत.

डॅनिश लोकांना सहली व सफरी खूप आवडतात. सणावारीं व शनिवार-रविवारीं ते सहलीला बाहेर पडतात. येथें प्रवाशांच्या सोईसाठीं खूप चांगलीं निवासस्थानें व आरामगृहें बांधलेलीं आहेत. येथील लोकांना पोहण्याचा खूप छंद आहे. डॅनिश मुलीसुद्धां पोहण्यामध्यें पटाईत आहेत.

डेन्मार्क हा लोकशाहीप्रधान देश आहे. १८४९ सालापासून येथें लोकशाही राज्यव्यवस्था चालू आहे. डेन्मार्कमध्यें कांहीं श्रीमंत लोक आहेत. पण त्यांचा

कुणी हेवा करीत नाहीं; कारण येथील श्रीमंत लोकांना कर खूप द्यावे लागतात व त्यामुळें फार काल हा माणूस श्रीमंत राहूं शकत नाहीं. श्रीमंत व गरीब यांच्यामध्यें येथें फारसा फरक नाहीं. साध्या कामगाराला सालीना ६००० रुपये मिळतात, तर मोठ्यांतल्या मोठ्या जमीनदाराचें वार्षिक उत्पन्न १८ ते २० हजार रुपये असतें. साध्या झाडू मारणाऱ्याला वर्षाला ४॥ ते ५ हजार रुपये मिळतात, तर चांगली वकिली चालणाऱ्या कायदेपंडिताला १८ ते २० हजार रुपयांपेक्षां अधिक उत्पन्न असूं शकत नाहीं. श्रीमंत व गरीब यांच्यामधील अंतर खूपच कमी करण्यांत आलें आहे. आपल्या देशाचें वर्णन डॅनिश लोक पुढीलप्रमाणें करतात :

"That few possess too much
And still fewer too little."

शिक्षणाचा प्रसारसुद्धां खूप असल्यामुळें आपल्याकडे आढळणारी शिक्षित व अशिक्षित यांच्यामधील दरी येथें तुम्हांला दिसणार नाहीं. टॅक्सी हाकणारा माणूस तुम्हांला हक्सलेचीं पुस्तकें वाचतांना आढळेल, तर एखाद्या कंपनीच्या जनरल मॅनेजरला सुद्धां डॅनिशमध्यें लिहिलेली कादंबरी वाचतां येणार नाहीं. ज्याला ज्याला म्हणून अभ्यास करण्याइतपत अक्कल आहे, त्याला शिकण्याची संधि मिळते. प्रत्येक माणसाला समान संधि मिळवून देणें हें या देशाचें घोषवाक्य आहे. स्त्रियांना व पुरुषांना मतदानाचा सारखाच हक्क आहे; त्यामुळें त्यांच्यामध्यें तेढ नाहीं. स्त्री व पुरुष परस्परांचे मित्र म्हणून वागतात.

येथें सर्व लोकांना पोटभर अन्न, अंगभर कपडा व राहावयाला घर मिळवून देण्याची येथील सरकारनें काळजी घेतली आहे. सर्वांना ७ वर्षांचें मोफत शिक्षण देण्यांत येतें. पैशाच्या अभावीं कोणाचेंही शिक्षण बंद पडूं शकत नाहीं. आजारामध्यें सार्वत्रिक विमापद्धतीमुळें मदत मिळूं शकते. माणसामध्यें फरक केला जात नसल्यामुळें आणि श्रीमंत व गरीब यांच्यामध्यें फारसें अंतर नसल्यामुळें येथें वर्गविरोध आढळून येत नाहीं. चांगलें अन्न, उत्तम हवा व भरपूर साधनें यामुळें येथील लोकांचें आरोग्य पण खूपच चांगलें असतें या सर्व अनुकूल गोष्टी उपलब्ध असल्यामुळें येथील माणसें नेहमीं आनंदांत असतात व आलेल्या पाहुण्यांनासुद्धां ते खूप आनंदांत ठेवण्याचा प्रयत्न करतात. यांचें आदरातिथ्य, मनमोकळा स्वभाव, पाहुण्यांबद्दलची विशेष आस्था व डेन्मार्कचें निसर्गरमणीय सौंदर्य यामुळें आलेल्या पाहुण्याचे दिवस येथें मजेंत जाऊं शकतात.